

१५७९
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. १८९२
REFBK-0007155

१८६२
294
निबंध
८३४२९
२५।२।८१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना
१९७०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ८३४२९ वि: निबंध
क्रमांक १८६२ नों: दि: २५।२।८१

# कमल पत्रें

[ ना. सी. फडके यांनीं प्रवासांतून कमलाबाईंना पाठविलेलीं पत्रें ]

७१५५

ना. सी. फडके

REFBK-0007155

दुसरी आवृत्ति

नोव्हेंबर १९४९ ]

[ किंमत तीन रुपये

— एकमेव विक्रेते —
**कुलकर्णी ग्रंथागार**
१८६ शनिवार, पुणें २

● ● ●

प्रकाशन ५६ वें.

● ● ●

— प्रकाशक —
**शामकान्त लक्ष्मण वर्वे,**
आयडियल बुक सर्व्हिस,
८८५ सदाशिव, पुणें २.

● ● ●

— मुखपृष्ठ —
**चित्रकार मुळगांवकर**

● ● ●

— मुद्रक —
**अमरेन्द्र लक्ष्मण गाडगीळ,**
मङ्गल साहित्य मुद्रणालय
'आनन्द चेम्बर्स', आम्बराई, पुणें ४.

● ● ● छापत आहेत

१ **जेहलम** : ना. सी. फडके

२ **मैफल** : ना. सी. फडके

३ **पद्मा** : गो. नी. दाण्डेकर

४ **लपलेला ओघ** : ग. दि. माडगूळकर

५ **विखुरलेलें मोतीं** : शान्ता माडखोलकर

छापत आहेत ● ● ●

# आमचीं ललित प्रकाशनें

| | | |
|---|---|---|
| १ अमृतकण : | वि. वि. बोकील, बी. ए., बी. टी. | ३ |
| २ ठिगळ : | वि. वि. बोकील, बी. ए., बी. टी. | ४ |
| ३ विझती ज्योत : | शांता ज. शेळके, एम्. ए. | ५ |
| ४ चंद्रज्योति : | सौ. मालती दांडेकर | २ |
| ५ भूकंप : | प्रो. गं. भा. निरंतर, एम्. ए. | २॥ |
| ६ मालकंस : | गोपीनाथ तळवलकर | ३॥ |
| ७ पहिले चुंबन : | ग. ल. ठोकळ, बी. ए., बी. टी. | ३ |
| ८ त्रिवेंद्रमची सफर : | सौ. कमला फडके, एम्. ए | ३ |
| ९ मला काय त्याचें ? | वि. दा. सावरकर | २। |
| १० स्वराज्याचा अरुणोदय : | आचार्य प्र. के. अत्रे | ३ |
| ११ भेळ : | य. गो. जोशी | २ |
| १२ झंझावात : | प्रो. ना. सी. फडके, एम्. ए. | ५ |
| १३ मंथन : | प्रो. ना. सी. फडके, एम्. ए. | ४ |
| १४ गुलमोहर : | शान्ता ज. शेळके, एम्. ए. | ३ |
| १५ सावरकरांच्या गोष्टी : | वि. दा. सावरकर | ४ |
| १६ पूर्वेचा वारा : | प्रा. लीला देशमुख | ५ |
| १७ कांटेरी मार्ग : | सौ. मालती दांडेकर | ५ |
| १८ रेशमाच्या गांठी : | दत्त रघुनाथ कवठेकर | ४ |
| १९ द्वादशी : | प्रो. चिं. वि. जोशी | २। |
| २० अपुरा डाव : | दत्त रघुनाथ कवठेकर | ४ |
| २१ लगीनघाई : | वि. वि. बोकील | १। |
| २२ झांकलीं माणकें : | न. अ. दांडेकर | १। |
| २३ चुकामूक : | दत्तू बांदेकर | २ |
| २४ गांठ-भेट : | वि. वि. बोकील | १॥ |
| २५ माझी भावगीतें : | बाबूराव गोखले | २ |
| २६ मायेची शाल : | वि. वि. बोकील | १॥ |
| २७ देणें देवाचें : | मनमोहन | ३ |
| २८ आशेचे किरण : | प्रो. वा. भा. पाठक | २॥ |
| २९ कमलपत्रें : | प्रो. ना. सी. फडके, एम्. ए. | ३ |

कुलकर्णी ग्रंथागार, पुणें २.

# काशीयात्रा

७९५५

—१—

तुझा निरोप घेऊन निघालों तों इथें सुखरूप पोचलों, हा ठराविक ठशाचा प्रारंभ तुला पत्र लिहितांना नकोसा वाटतो. ज्या गांवीं यावयासाठीं निघालों त्या गांवीं सुखरूप येणं मला आवडत नाहीं असं नव्हे; तर तुला लिहिण्यासारख्या कांहींतरी गमती प्रवासांत घडाव्या अशी माझी इच्छा असते. आणि बहुधा प्रत्येक मोठ्या प्रवासांत असं कांहींतरी घडतं, आणि प्रवास मिळमिळीत न होतां त्यांत लहान अगर मोठे नाट्यप्रसंग घडतात. परवां काय झालं सांगतों. मुंबईच्या व्हिक्टोरिया टर्मिनसवरून रात्रीं पावणे नवाला निघणाऱ्या कलकत्ता मेलमध्यें मला रिझर्वेशन मिळालं होतं. मुंबईला सकाळीं अकराच्या सुमारास डेक्कन क्वीननें पोचलों, दिवसभर ज्यांना ज्यांना भेटायचं होतं त्यांना भेटण्यासाठीं हिंडलों, व रात्रीं स्टेशनवर परत येऊन गाडींत बसलों. आमच्या सेकंड क्लासच्या डब्याला पांच कंपार्टमेंट्स होते. चार चार बर्थस्चे चार आणि दोन बर्थस्चा एक. या छोट्या कंपार्टमेंटमध्यें माझी जागा होती. छानपैकीं जागा मिळाली म्हणून मोठ्या खुषींत मीं बर्थवर बिस्तरा पसरला, गाडी सुटल्यावर कपडे बदलले, आणि पानाचा डबा काढून प्रवासांतल्या सोबत्यांना विचारलं, 'आपण पान खाणार काय ?' त्यांच्या आमच्या गप्पा सुरू झाल्या. त्या संपल्यावर ते आपल्या वरच्या बर्थवर चढले आणि मीं एक पुस्तक काढून झोंप येईपर्यंत वाचण्याच्या इराद्यानं अंथरुणांत पसरलों. आतां जवळ जवळ तीस तास या डब्यांत मला काढायचे होते, आणि जागा मोठी आरामशीर मिळाली असल्यामुळें प्रवास सुखाचा होणार याबद्दल खात्री वाटत होती. वाचतां वाचतां झोंप आली कीं निजायचं व सकाळीं खांडवा स्टेशन येईपर्यंत ताणून द्यायची असा बेत मनाशीं ठरवून मी पुस्तक वाचण्यांत गुंग झालों. कल्याण स्टेशनवर गाडी थांबली. परंतु तिकडे लक्ष देण्याचं मला कांहीं कारण नव्हतं. कल-

कत्यास जावयास निघालेले वरच्या बर्थवरचे माझे सोबती केव्हांच झोपेच्या स्वाधीन झाले होते. बाहेर प्लॅटफार्मवर चाललेली उतारूंची धांवाधांव आणि गडबड मला ऐकूं येत होती. परंतु तिकडे विशेष लक्ष न देतां माझं वाचन मीं चालू ठेवलं, पण तितक्यांत कुणी तरी माझ्या खिडकीवर जोरानं टकटक केलं. गार्ड ओरडून सांगत होता, "या डब्यांतल्या साऱ्या उतारूंनीं खालीं उतरलं पाहिजे, हा डबा नादुरुस्त झालेला आहे. तो आम्ही सोडून टाकणार आहोंत!" ही गोष्ट त्यानं पांची कंपार्टमेंट्मधल्या लोकांना सांगितली. "चला मेहेरबानी करून लवकर खालीं उतरा. गाडीची खोटी करूं नका." त्याचा हा इशारा ऐकतांच आमच्या पांच कंपार्टमेंट्मधल्या उतारूंची धांदल जी उडाली ती कांहीं विचारूं नकोस. मी एकटाच सडा होतों, परंतु बाकीच्या कित्येक उतारूंबरोबर बायका होत्या, मुलं होतीं, म्हाताऱ्या आया होत्या, सामानाचे ढीग होते. या सगळ्या सरंजामानिशीं खालीं उतरायचं आणि दुसऱ्या जागीं बसायचं म्हणजे एक दिव्यच होतें. हमाल भराभर सामान ओढूं लागले, पोरंसोरं रडूं लागलीं, बायका कुरकुरूं लागल्या, पुरुष रेल्वे कंपनीला शिव्या देऊं लागले. आम्ही गार्डला व स्टेशन मास्तरला म्हटलं, "दहा दहा दिवस आधीं रिझर्व्ह केलेल्या जागा सोडायला तुम्ही आम्हांला सांगतां तर नवे सेकंड क्लासचे डबे जोडून आमची सोय करा." त्यांनीं उत्तर दिलं, "आम्ही फार दिलगीर आहोंत. पण या स्टेशनवर तशी सोय करणें अशक्य आहे. थर्डमध्यें इंटरमध्यें जिथें जागा मिळेल तिथें बसा. सेकंडक्लाससाठीं तुम्ही दिलेला जादा आकार तुम्हांला परत मिळेल. हें करायचं नसेल तर पुढच्या गाडीनं जा." आम्ही भांडूं लागलों. परंतु त्यांचं एकच, "रेल्वे कंपनीचे नियम असे आहेत." फर्स्टक्लासमध्यें आमची सोय करा असं आम्ही सांगितलं.

ते म्हणाले, "सोय करूं पण तुम्हांला जादा आकार द्यावा लागेल." डबा नादुरुस्त झाला हा कांहीं आमचा अपराध नव्हे. ही कंपनीची चूक आहे असा मुद्दा काढून आम्ही भांडूं लागलों. परंतु त्यांचं सारखं उत्तर हेंच कीं रेल्वे कंपनीचे अमुक अमुक नियम आहेत. या बाचाबाचींत कांहीं अर्थ नाहीं असें दिसल्यावर कुणी थर्ड क्लासांत, कुणी इंटरमध्यें शिरले. मी मात्र शेजारच्या फर्स्ट क्लासमध्यें सामान नेऊन पथारी पसरली व गार्डला आणि स्टेशन मास्तरला सांगितलं कीं मी कांहीं जादा आकार देणार नाहीं. त्यांनीं मला पुन्हां बजावलं कीं जादा आकार तुम्हांला द्यावा लागेलच. थर्ड क्लासांत अगर

इंटरमध्यें जाऊन रात्रभर जागरण करण्याची माझी बिलकूल इच्छा नव्हती. सुखाची झोप मला पाहिजे होती. तिचे साठ रुपये द्यावे लागले तर पुढचं पुढें पाहूं असं मनाशीं म्हणून अंथरुणावर पसरून पुन्हां पुस्तक वाचूं लागलों.

सकाळीं खांडवा स्टेशन केव्हां येऊन गेलं तें मला कळलं नाहीं. मी अगदीं डाराडूर निजलों होतों. कोणीतरी मला हालविलं तेव्हां मी जागा झालों. पहातों तों तिकिटं तपासणारा माणूस माझ्यापुढें उभा होता. हा प्रकार सकाळीं होणार हें मला माहीत होतं, आणि तिकिट तपासायला माणूस आला कीं त्याच्याशीं कसं वागायचं तें मीं रात्रीं निजतां निजतां मनाशीं ठरवून ठेवलं होतं. मी अंथरुणांत उठून बसलों व माझं तिकिट त्याच्या हातीं शांतपणें दिलं. त्यानं तें पाहिलं व खिशांतली जाड वही काढून तो म्हणाला, “ तुम्हांला जादा आकार भरला पाहिजे. ” त्याच्याशीं हुज्जत घालण्यांत अर्थ नाहीं हें मीं रात्रींच विचारांतीं ठरविलं होतं. मीं त्याला म्हटलं, “ माझ्याजवळ पैसे नाहींत. मी जादा आकार देऊं शकत नाहीं. ” तो म्हणाला, “ ठीक आहे. तुम्ही जाणार आहांत त्या ठिकाणीं तुम्हांला पैसे भरावे लागतील. मात्र तुम्ही आतां मला लिहून दिलं पाहिजे कीं तुम्ही कल्याणपासून फर्स्ट क्लासनं प्रवास केला आहे. ” मीं म्हटलं, “ ठीक आहे. देतों लिहून. ” मीं एका कागदावर स्टेटमेंट लिहिलं, खालीं सही आणि कोल्हापूरचा पत्ता लिहिला, व कागद त्याच्या हातीं दिला. सही वाचल्याबरोबर त्यानं मला नमस्कार केला, आणि आतांपर्यंत जरी त्यानं माझ्याशीं इंग्रजींत भाषण केलं होतं तरी आतां एकदम शुद्ध मराठींत तो म्हणाला, “ आपण फडके होय ? वा वा ! बरी गांठ पडली. मोठा आनंद झाला. आपलीं पुस्तकं आम्ही वाचतों. आज आपल्याला प्रत्यक्ष पाहिलं. ” माझ्याकडून लिहून घेतलेलं स्टेटमेंट त्यानं फाडून टाकलं, व मग हलकेच म्हटलं, “ आपलीं एक दोन पुस्तकं पाठविलीं पाहिजेत आपण. ” पुढच्या छोटया स्टेशनावर तो माझा निरोप घेऊन डब्यांतून खालीं उतरला.

परंतु याचा अर्थ संकट टळलं असा नव्हता. पुढच्या प्रत्येक मोठया स्टेशनावर तिकिट तपासणारा माणूस डब्यांत शिरायचा, जादा आकार दिला पाहिजे असं त्यानं म्हणायचं, माझ्याजवळ पैसे नाहींत असं मी म्हणायचा, ठीक आहे ज्या स्टेशनावर उतराल त्याठिकाणीं ते तुम्हांला भरावे लागतील असं त्यानं बजावायचं, हा क्रम चालू होता. मी मनाशीं समजून चुकलों होतों कीं साठ रुपये आपल्याला भरावे लागणार.

ते भरल्यानंतर फार तर रेल्वे कंपनीकडे सगळी हकीगत कळवून माझे पैसे मला परत मिळावेत अशी मागणी मी करूं शकत होतों. परंतु ती मागणी कंपनीकडून मान्य होणार नाहीं हें मी जाणून होतों. तिसऱ्या प्रहरीं जबलपूर स्टेशन आलं. रात्रीं दहा वाजतां अलाहाबाद स्टेशनावर गाडी आली. प्रत्येक ठिकाणीं तिकिट कलेक्टरची आणि आमची आतां ठरून गेलेली भाषा झाली. मोगलसराई स्टेशनावर मला गाडी बदलायची होती. या स्टेशनावर जादा आकार भरल्यावांचून माझी सुटका होणार नाहीं हें मला उघड दिसूं लागलं. तथापि एक निर्वाणीची युक्ति मीं मनाशीं ठरविली. अशी कीं मोगलसराई येण्याच्या सुमारास सामान बांधून व कपडे करून तयार रहायचं, गाडी उभी राहिल्यावरोबर हमालाची वाट न पहातां स्वतः सामान काढून एखाद्या सेकंड क्लासच्या डब्यापुढें नेऊन ठेवायचं, व तिथें उभं रहायचं. तिथें कुणीं हटकलं तर सांगायचं कीं मी सेकंड क्लासांतनंच आलों. हा डाव साधेलच अशी खात्री नव्हती. पण बघूं या अशा विचारानं मोगलसराई स्टेशनांत गाडी शिरून चाकांचा खडखडाट झाला तेव्हां मी जय्यत तयार होऊन डब्याच्या दारांत उभा राहिलों. पण गाडी जेव्हां पुरती थांबली तेव्हां माझा फर्स्ट क्लासचा डबा नेमका स्टेशन मास्तराच्या ऑफिसच्या समोर आला ! इतकंच नव्हे तर ऑफिसच्या दारांत जाड काळा गरम सूट घातलेला स्टेशन मास्तर उभा असलेला माझ्या दृष्टीस पडला ! त्या काळपुरुषाला पाहिल्यावरोबर मीं मनाशीं म्हटलं,आतां मात्र साठ रुपये गेले खास ! परंतु हातपाय न गाळतां मनाशीं योजलेला डाव करून पहाण्याचं मीं ठरविलं. डब्यांतून उतरलों, सामान भराभरा काढलं व एका सेकंड क्लासच्या डब्यापुढें एका खांबाजवळ नेऊन ठेवून तिथें उभा राहिलों. अगदीं सुरक्षित गोष्ट म्हणजे सरळ पलीकडच्या प्लॅटफॉर्मवर जाऊन बनारसच्या गाडींत बसायचं ही होती. पण कोथमिरे मला भेटण्यासाठीं येणार होता. त्याची माझी चुकामुक होऊं नये म्हणून मला त्या खांबापाशीं उभा रहाणं भाग होतं. परंतु उभं रहावं लागलं तरी आतां संकट टळलं एवढी खात्री मला वाटत होती. एखादा अर्ध मिनिट असं उभा राहिलों नाहीं तोंच "सर ! सर !" अशा हांका मारीत कोथमिरे आलाच. मग मी त्याच्याबरोबर जाऊन बनारसच्या गाडींत बसलों. बोलतां बोलतां त्यानं विचारलं, "सर, तुम्ही विशेष आनंदांत दिसतां ?" मीं म्हटलं, "होय, आतां साठ रुपये मिळविलेत मी." त्याला सारी हकीकत सांगितली तेव्हां तोहि हंसत सुटला !

बनारस कॅन्टोनमेंटवर आमची गाडी पहाटे पांच वाजतां आली. येथून हिंदु युनिव्हर्सिटी तीन साडे तीन मैल दूर आहे. कोथमिरेनं टांग्याऐवजीं रिक्षा ठरवून आणलेला पाहून मीं त्याला विचारलं, "अरे रिक्षांत इतकं सारं सामान जाणार काय?" तो म्हणाला, "हें कांहींच नाहीं. याच्या चौपट सामान रिक्षावाले नेतात." आणि रिक्षावाल्याशीं फक्त एक रुपयाचं भाडं त्यानं ठरविलं होतं! आम्ही बसलों व रिक्षा चालू झाला. थंडी कांहीं फार कडक पडली नव्हती. परंतु किती झालं तरी बनारसची थंडी ती. ओव्हरकोट आणला नाहीं याचा मला चांगलाच पश्चाताप होऊं लागला. हाताचे पंजे खाकांत कितीहि आवळून धरले तरी गरम होईनात आणि पायांत पायमोजे न घालतां उघडया शूसँडल्स घातल्या असल्यामुळें पावलं अशीं गारठून गेली कीं विचारूं नकोस. कोथमिरेला मी सारखं विचारीत होतों, "अजून किती दूर आहे रे तुझी युनिव्हर्सिटी?"

सकाळीं उन्हं पडल्यावर मात्र मला बनारसची थंडी विशेष वाटेना. उलट तिथले 'बाबूजी' आणि 'पंडितजी' उगीचच मारे शाली आणि रजया लपेटून हिंडत होते त्याचं मला हंसूं येऊं लागलं. आमची तत्त्वज्ञान परिषद २१ तारखेस सुरू व्हायची होती. मी एक दिवस आधीं आलों होतों. या दिवसाचा कार्यक्रम मीं मनाशीं ठरविला होता, तो असा कीं परिषदेच्या बाबतींतलं थोडंसं काम होतं तें उरकल्यावर बनारस शहरांत जायचं आणि भटकायचं. मी कांहीं प्रथमच बनारसला आलों नव्हतों. १९१७ सालीं अखिल भारतीय संगीत परिषद या ठिकाणीं झाली तिला मी आलों होतों. पण त्या गोष्टीला आतां तीस वर्षं झालीं होतीं, व या अवधींत बनारस कितपत वाढलं आहे, पालटलं आहे तें पहाण्यांत गंमत होती. शिवाय सिद्धेश्वरी नांवाच्या बनारसच्या प्रसिद्ध गाणाऱ्या बाईची भेट घेऊन 'गाणं ऐकवा' असं त्यांना म्हणायचं मीं ठरविलं होतं. दोन वर्षांपूर्वी त्या आपल्या देवल क्लबतर्फे झालेल्या जलशांत गायला आल्या तेव्हां त्यांची आपली थोडीशी ओळख झाली होती हें तुला आठवत असेलच. त्यांच्या भेटीला जायला एवढया अल्प परिचयाचा आधार पुरेसा होता. मुळींच परिचय नसतांना देखील गाणाऱ्या वाजवणाऱ्या लोकांकडे जाऊन 'मला फार षोक आहे, आपली कीर्ति मीं फार ऐकली आहे, ऐकवाल तर फार उपकार होतील.' असं म्हणायला हरकत नसते व दिलदार कलावंत सहसा विन्मुख पाठवीत नाहींत हें मला माहीत असल्यामुळें सिद्धेश्वरीप्रमाणेंच

आणखी एका बाईकडे जाण्याचं मीं योजलं होतं. तिचं नांव रसूलनबाई. हिचं गाणं आपण रेडिओवर पुष्कळ वेळां ऐकलं आहे. आणि दरवेळीं आपण उद्‌गार काढले आहेत कीं या बाईच्या आवाजीचं माधुर्य आणि कवालीच्या शब्दोच्चारांतला रस अजब आहे, आठवतंना तुला ? सिद्धेश्वरी आणि रसूलन बाई यांच्या बिऱ्हाडांचे पत्ते मला माहीत नव्हते. परंतु ते शोधून काढायचा निश्चय असला कीं ते सांपडतात म्हणून शनिवारीं तिसऱ्या प्रहरीं हिंदु युनिव्हर्सिटींतून बनारस शहराकडे आमची स्वारी निघाली.

गेल्या तीस वर्षांत बनारस शहर विशेष बदलल्याचं मला दिसेना. मुख्य रस्ते डांबराचे झाले आहेत व थोडेसे रुंदहि झाले आहेत; लोकसंख्या वाढली आहे, आणि पूर्वी एकहि रिक्षा नव्हता पण आतां रिक्षांचा अक्षरशः सुळसुळाट झालेला आहे. ( इथें एकंदर तीन हजार रिक्षा आहेत ! ) परंतु एवढ्या गोष्टी सोडल्या तर तीस वर्षांपूर्वी जें बनारस मीं पाहिलं तेंच आतांहि दिसलं. रहदारीचा तोच अव्यवस्थितपणा, तोच बकालीपणा, सर्व प्रकारच्या वाहनांची तीच बेफाट धांवपळ, दुकानांची तीच बेडौल मांडणी, घोंगावणाऱ्या माशांप्रमाणें वाटणाऱ्या लोकांचे तेच थवे, रहाणीची आणि पोशाखाची तीच वेडीवाकडी सौंदर्यहीन तऱ्हा, तेच बोळ, त्याच गल्ल्या !

मीं एका कोपऱ्यावर रिक्षा सोडला व सिद्धेश्वरी बाई कुठें रहातात म्हणून तपास करूं लागलों. कुणी सांगेल असं कांहीं लक्षण दिसेना. परंतु अखेर एका महाभागानं सांगितलं. " उजव्या अंगाला वळा. नारळी बाग म्हणून एक गल्ली लागेल. त्या गल्लींतून जाऊन जो कोपरा लागेल तिथें विचारा म्हणजे कुणीहि तुम्हांला सांगेल. " त्याचे आभार मानून मी पुढें झालों तों अशा कल्पनेनं कीं नारळाचीं झाडं दिसतील ती नारळी बाग. मनाशीं आश्चर्यहि करीत होतों कीं इथें बनारस व इतक्या अरुंद गल्लींत नारळांची बाग कुठली आली ? परंतु असेलहि, त्याचा काय नेम, असं म्हणून मी चालूं लागलों. पण नारळाचं झाड कुठें दिसेल तर शपथ. पण तितक्यांत ज्या गल्लींत शिरलों तिथें दुतर्फा दुकानांतून ज्या वस्तू टांगलेल्या दिसल्या त्या पहातांच 'नारळी–बाग' या संज्ञेचा उलगडा झाला. गुडाख् ओढण्याच्या गांवठी स्वस्त हुक्क्यांचे जुडगेच्या जुडगे साऱ्या दुकानांत टांगलेले होते. दोन अडीच फुटांची एक नळी आणि तिला जोडलेली नारळाची पोकळ करवटी, व नळीला आणि नारळाला गांवठी काळं तांबडं वार्निस

दिलेलं असा या हुक्क्यांचा थाट होता. हुक्क्यांचे हे नारळ जिकडे तिकडे या गल्लींत दिसत होते म्हणून तिचं नांव नारळी बाग ! या गोष्टीची गंमत वाटून मनाशीं हंसत हंसत मीं पुढें झालों. कोपऱ्यावरच्या पानवाल्याला विचारलं, " सिद्धेश्वरीबाई कुठें रहातात ? " तो म्हणाला, " या पलीकडच्याच इमारतींत. " अखेर मकाण सांपडलं या आनंदांत मी पुढें झालों. पण पहातों तों घराचा दरवाजा आंतून बंद होता !

● ● ●

## —२—

बनारसच्या अरुंद गल्लींतल्या एखाद्या मोठ्या इमारतीचा बंद दरवाजा ठोठावणं म्हणजे कांहीं सोपं काम नाहीं. परंतु सिद्धेश्वरीबाईंचं बिऱ्हाड शोधण्याचं अवघड काम केल्यानंतर आतां त्यांच्या बंद दरवाज्यापुढें माघार घेण्यास मी तयार नव्हतों. कोथमिरे माझ्याबरोबर आला होता. फर्ग्युसन कॉलेजांत असतांना 'त्राटिका' नाटकांत मी काम केलं होतं, त्याबद्दलच्या गंमती मीं तुला पुष्कळदां सांगितल्या आहेत. तूं म्हणशील तुम्ही सिद्धेश्वरी बाईच्या घरासमोर उभे राहिलांत त्याचा व त्राटिका नाटकाचा काय संबंध? पण संबंध आहे. असा कीं त्राटिका नाटकांतला नायक प्रतापराव एका प्रवेशांत त्राटिकेच्या घराच्या बंद दरवाजापुढें उभा राहिलेला असतो व त्या वेळेस पिलाजी नांवाच्या आपल्या नोकराला तो मोठ्यांदा हुकूम सोडतो, 'पिल्या ठोठाव! दार ठोठाव!' त्या नाटकांतल्या मोठ्या हास्यकारक प्रसंगांपैकीं हा एक प्रसंग आहे. सिद्धेश्वरीबाईंच्या घरापुढें उभा राहिलों असतांना मला त्राटिकेंतल्या त्या प्रसंगाची आठवण झाली. कोथमिरेजवळ मीं ती आठवण बोलून दाखविली नाहीं; पण त्याला दार ठोठावायला सांगितलं. दोन चारदां ठोठावल्यावर एक म्हातारा नोकर दाराशीं आला. सिद्धेश्वरीबाई घरीं आहेत काय अशी आम्ही चौकशी केली तेव्हां त्यानं सांगितलं त्या बाहेर फिरायला गेल्या आहेत, सुमारें तासाभरांत परत येतील. चिठ्ठी लिहून ठेवावी व जावं असा विचार मीं केला. मला सफाईदार हिंदींत चिठ्ठी लिहितां आली नसती म्हणून कोथमिरेला मीं ती कामगिरी सांगितली. "गतवर्षी कोल्हापूरच्या देवल क्लबतर्फे झालेल्या जलशांत गावयासाठीं आपण आला होतां तेव्हां आपला व माझा थोडासा परिचय झालेला आहे. मी येथें कांहीं कामानिमित्त आलों आहे. आपली भेट घेण्याची माझी इच्छा आहे. तासाभरानें पुन्हां येत आहे."

अशा मजकुराची चिठ्ठी कोथमिरेनं लिहिली ती नोकराजवळ देऊन आम्ही तेथून निघालों, हा तास कांहीं आम्ही वाया घालविणार नव्हतों. गंगेंत थोडसं बोटिंग करायचं आणि गंगेच्या किनाऱ्यावर ' नेपाळी मंदिर ' म्हणून एक मंदिर आहे तें पहाण्याचं मीं ठरविलं.

बोटिंग करण्यासाठीं ज्या नावाड्याची नाव आम्ही ठरविली तो सुदैवानं मोठा चलाख व बोलघेवडा निघाला. त्यानं आम्हांला सुंदर जलविहार तर घडविलाच, पण शिवाय एखाद्या धंदेवाईक ' गाईड '–प्रमाणें आम्हांला जें जें दिसेल त्याच्यावर त्याची ' कॉमेंटरी ' चालू होती. हा अमका घाट, तो पलिकडचा तमका घाट, त्या घाटावर प्रेतं जाळतात, ( आम्ही पाहिलं तों खरोखरच दहा वीस प्रेतं आपआपल्या तिरड्यावर अगदीं निमूटपणें ' प्रायॉरिटी'ची वाट पहात पडलीं होतीं ! ) हा अमक्याचा वाडा, अशी त्याची धांवती वर्णनात्मक टीका आम्हांला मोठी उद्‌बोधक वाटत होती. आम्ही कांठाला एके ठिकाणीं लागलों व ' नेपाळी मंदिरा'कडे गेलों तेव्हां आमच्या या गाईड-नावाड्याच्या रसवंतीला अगदीं स्फुरणच चढलं. या नेपाळी मंदिराचं बांधकाम लांकडाचं आहे, आणि धाटणी ब्रह्मी तऱ्हेची आहे. म्हणजे याला कळस नाहीं, तर एखाद्या इमारतीच्या खिडकीपुढें पावसासाठीं झडपीं लावतात तशीं एकावर एक अशीं परसट पाळ्यासारखीं छपरं आहेत. लांकडावर खूप कोरीव काम आहे. या कोरीव कामाकडे आम्ही कांहीं विशेष लक्ष देणार नव्हतों. परंतु आमचा वाटाड्या म्हणाला, " इथं फार सुंदर चित्रं आहेत तीं तुम्ही नीट पाहिलीं पाहिजेत." आम्ही विचारलं, " कुठं आहेत चित्रं ? " " तीं पहा–" असं म्हणून त्यानं बोट दाखविलं. मंदिराचं जें सगळ्यांत खालचं छप्पर आहे त्याला आधार देण्यासाठीं प्रत्येक बाजूला दोन दोन अशा तिरप्या तुळया बसविल्या आहेत. या प्रत्येक तुळईच्या बुंध्याशीं जो लाकडी चौकोन आहे त्या चौकोनावर एक एक चित्र कोरलेलं आहे. देवळाच्या दर्शनी भागाकडे असलेल्या दोन चित्रांकडे आमचा वाटाड्या बोट दाखवीत होता. आम्ही निरखून पाहूं लागलों तों तीं चित्रं म्हणजे संभोगाचीं आसनं आहेत असं आम्हांला दिसून आलं. प्रत्येक चित्रांत जो चमत्कारिक प्रसंग दाखविला होता तो आम्हांला नीट कळावा अशा सद्‌बुद्धीनं आमचा हा नाविक वाटाड्या आतां एकदम इंग्रजींत बोलूं लागला ! आम्हांला त्यानं त्या देवळाला प्रदक्षिणा घालायला लावली व प्रत्येक बाजूच्या दोन्ही चित्रांचा अगदीं

संपूर्ण खुलासा त्यानं ऐकविला. कोथमिरे साहजिकच ओशाळला व तेथून चलण्याची घाई करूं लागला. पवित्र मंदिराच्या बांधकामांत असले बीभत्स शृंगाराचे प्रसंग कोरलेले तो प्रथमच पहात होता. मीं त्याला म्हटलं, " दक्षिण हिंदुस्थानांत जाऊन तिथलीं देवालयं बघ, म्हणजे प्राचीन लोकांनीं लिंग पूजा कोणत्या थराला नेली होती तें तुला कळेल."

आम्ही परत बाजार–चौकांत आलों तेव्हां जिकडे तिकडे दिवे लागले होते. साडे पांचच वाजले होते, परंतु बनारसमध्यें रात्र पडली होती! रस्त्यावरची रहदारी अगदीं ऐन घाईला आली होती. तीस वर्षांपूर्वी मी बनारसला आलों तेव्हां वर्तमान-पत्रं विकणारा पोऱ्या हा प्राणी मला दिसला नव्हता. पण आतां पहातों तों जवळ जवळ पुण्या-मुंबईतल्याप्रमाणें हे प्राणी रस्त्यांतून धांवत होते. 'आज' व 'संसार' या पत्रांचे अंक सगळ्यांत जास्त लोकांच्या हातीं मला दिसले. 'आज' हें हिंदी पत्र नांवारूपाला आणून अत्यंत लोकप्रिय करण्याचं काम एका महाराष्ट्रीय गृहस्थांनीं केलं आहे. त्यांचं नांव पराडकर. ज्यांची मायभाषा हिंदी आहे अशा हिंदी लेखकां-हूनहि हिंदीचे शैलीकार म्हणून या गृहस्थांना इकडे मान आहे. 'आज' हें पत्र फार जुनं आहे. 'संसार' हें पत्र पराडकरांनींच अलीकडे नव्यानं सुरूं केलं आहे.

टांगेवाले, रिक्षावाले, रेवडी, खिसमीस विकणारे हात गाडीवाले, वाकडया तिकडया गतीनं चालणारे, अंगाभोंवतीं शाल–जोडया लपेटलेले तुंदिलतनु 'बाबू,' वर्तमानपत्रं विकणारीं पोरं, आणि भिकारी, यांच्या अत्यंत अव्यवस्थित रहदारीची खळखळणारी नदी कशीबशी ओलांडून गोविंदपुरा नांवाच्या गल्लींत शिरून आम्ही पुन्हां सिद्धेश्वरी बाईच्या मकाणावर आलों. त्या आतां घरीं परत आलेल्या होत्या. त्यांनीं आमचं स्वागत केलं, चहा पाणी तांबूल इत्यादि गोष्टी झाल्या, व मामुली गप्पाहि झाल्या. मग मीं हळूंच विषय काढला, "आम्हांला गाणं ऐकवतां काय?" त्या म्हणाल्या, " हो हो! कां नाहीं?" आणि त्यांनीं लगेच तंबोरा काढला. तितक्यांत त्यांचे गुरुबंधु व सध्यां त्यांची भाची शांतिदेवी हिला तालीम देणारे पंडित हरि शंकर मिश्र हेहि आले. बाहेरच्या दिवाणखान्यांतून उठून आंतल्या छोटया कमऱ्यांत येण्याची विनंति आम्हांला करण्यांत आली, व तेथें गेल्यावर गाणं सुरूं झालं.

मला नेहमींचा अनुभव आहे तो असा कीं तालीम देणारा व ती घेणारा शिष्य किंवा शिष्या तालीम कधींहि ऐकविणार नाहींत. तालीम चालू असतांना तुम्ही गेलांत तर तालीम लगेच बंद होईल. हातांतला डग्गा दूर ठेवला जाईल आणि तंबोरा गवसणींत लपूं लागेल. परंतु सिद्धेश्वरीबाईच्या घरीं अनुभव आला तो अगदीं वेगळा—शांतिदेवींच्या रोजच्या तालमीला आम्ही आल्यामुळें रजा देण्याऐवजीं पंडित हरि शंकर मिश्र यांनीं ती अधिकच उत्साहानं सुरू केली, व तालीम देतां देतां ते स्वतःच इतके रंगून गेले कीं जणूं ते स्वतंत्रपणेंच गायला बसले होते.

मला ते फार चांगल्या दर्जाचे गायक वाटले. त्यांची आवाजी मिठास नसली तरी पुष्कळच मधुर आहे. आवाजीची उंची चांगली आहे व पल्ला नमुनेदार आहे. सुरेलपणा भरपूर आहे, तान उपज तयार आणि स्वच्छ आहे, आणि विशेष म्हणजे दृष्टि रसिकाची आणि ढंगदार आहे. ज्या रागिणीची तालीम ते देत होते ती मला सहज ओळखतां येईना. अवरोहाकडे व चिजेच्या तोंडाकडे मी पुष्कळ वारकाईनें लक्ष देऊन पाहिलं. परंतु ती रागिणी माझ्या परिचयांतली वाटेना. 'कलियन भंवरा' असं चिजेचं तोंड होतं व 'भं' या अक्षरावर कोमल मध्यम लागून स्थिर होत होता. व त्याच अक्षरावर झपतालांतल्या त्या चिजेची सम होती. वाटे मालकंस आहे, पण लगेच दोन्ही गंधार लागलेले दिसत; आणि चीज वरच्या षड्जाकडे जाई तेव्हां स्वच्छ भीमपलास दिसे! अखेर मीं हरि शंकर यांना रागिणीचं नांव विचारलं. 'जोग' असं नांव त्यांनीं सांगितलं, व नंतर रागिणीचं स्वरूप मला समजावून देऊन त्यांनीं पुन्हां गावयास प्रारंभ केला.

दुसऱ्या दिवशीं—म्हणजे रविवार ता. २१ डिसेंबर रोजीं—दुपारीं एक वाजतां आमची तत्त्वज्ञान-परिषद सुरू होणार होती. सकाळीं प्रो. नारळीकर मला भेटण्यासाठीं खोलीवर आले. त्यांनीं विचारलं, "कालचा दिवस कसा घालविलात?" तेव्हां सिद्धेश्वरीबाईंच्या घरीं जाऊन गाणं ऐकल्याची हकीगत त्यांना सांगितली. ते म्हणाले, "कमाल आहे तुमची. आम्ही इतके दिवस बनारसमध्यें आहोंत परंतु आम्ही अजून त्यांचं गाणं ऐकलं नाहीं व तुम्ही चार दिवसासाठीं येथें आलांत ते पहिल्याच दिवशीं गाणं ऐकून मोकळे झालांत." मीं म्हटलं, "ज्याला जें मनापासून हवं असतं तें त्याला मिळतं. तुमची बाईंच्या घरीं यायची तयारी असेल तर बोला. मी ऐकवीन

आज तुम्हांला गाणं." ते म्हणाले, " जरूर तयारी आहे." मग आमच्या दुसऱ्य गप्पा झाल्या. सर राधाकृष्णन् हिंदु युनिव्हर्सिटींतील आपल्या उपकुलगुरुपदाचा राजिनामा देऊन जाणार अशी बातमी आम्ही हिंदु युनिव्हर्सिटींत दाखल होतांच ऐकली होती. त्या बातमीबद्दल गोष्टी निघाल्या. राधाकृष्णन् जाणार म्हणून सगळेच जाणते लोक हळहळत होते. युनिव्हर्सिटींतल्या चार पांच विद्यार्थिनींनीं उपासहि सुरू केला होता. गांधी, नेहरू इत्यादि बडया मंडळींनीं मध्यस्थी करावी अशी मागणी करण्यासाठीं विद्यार्थ्यांचं शिष्टमंडळ दिल्लीस गेल्याचंहि आम्ही ऐकत होतों. परंतु या कोणत्याहि गोष्टींचा उपयोग होणार नव्हता. कारण हिंदु युनिव्हर्सिटीचा कारभार ज्या कार्यकारी मंडळाकडे आहे, ( त्या मंडळाला ' कोर्ट ' असं नांव आहे ) त्यांत राधाकृष्णन् यांना हुसकून लावण्याची इच्छा करणारा एक गट आहे. त्या गटाचा जोर आहे. तेव्हां राधाकृष्णन् हिंदू युनिव्हर्सिटी सोडून जाणार. याबद्दल शंकाच नव्हती. गेल्या पांच दहा दिवसांपासून ते सभासंमेलनासारखे प्रसंग पार पाडीत होते ते अशाच जाणीवेनें कीं येथून आपल्याला लवकरच चंबुगबाळं आटपून जायचं आहे. त्यांचं अंतःकरण आतां बनारसमध्यें राहिलं नव्हतं. कुणी म्हणे कीं तें अंतःकरण आतां ऑक्सफर्डकडे वळलेलं आहे. कुणी असंहि म्हणत होते कीं हिंदुस्थान सरकारचे ॲंबॅसडर म्हणून त्यांना इंग्लंडमध्यें धाडण्यांत येईल. या बातम्यांवर विश्वास ठेवायला मला कांहीं हरकत वाटत नव्हती. राधाकृष्णन् म्हणजे आधुनिक बुवाबाजीचं एक मोठं उदाहरण आहे. अशा पायघोळ संतांचं सहसा अकल्याण होत नाहीं.

पायघोळ संत असं वर्णन मी मुद्दाम जाणून बुजून करतों आहें. कारण त्यांना जें मोठेपण प्राप्त झालेलं आहे तें असल्या माणसांची जी परस्पर सहकारी पेढी असते तिच्या जोरावर झालं आहे. त्यांचीं पुस्तकं मारे गाजलेलीं असतील परंतु ' हिंदी तत्त्ववेत्ता ' ही पदवी त्यांना मिळावी असं कोणतं नवं स्वतःचं तत्त्वज्ञान त्यांनीं त्यांत प्रतिपादलं आहे ? भारतीय दर्शनाचं विवेचन करण्यापलीकडे त्यांच्या ग्रंथांत दुसरं कांहीं नाहीं. आणि हें विवेचन ( इंग्रजींतसुद्धां ! ) इतर अनेकांनीं केलेलं आहे. वक्तृत्वाबद्दल त्यांची मोठी ख्याति आहे. परंतु लठ्ठ लठ्ठ शब्दांच्या नादानं ज्यांना गुंगी येते व त्या शब्दांतून कांहीं अर्थ निष्पन्न होतो कीं नाहीं ही चिकित्सा जे करीत नाहींत अशा लोकांनीं राधाकृष्णन् यांच्या या कीर्तीचा डोलारा

उभा केलेला आहे. नीट तपासून पाहिलं तर निरर्थक जडजंबाल शब्दांच्या पोपट-पंचीपलीकडे राधाकृष्णन् यांच्या भाषणांत मला कधींच कांहीं आढळलं नाहीं.

आमच्या तत्त्वज्ञान परिषदेच्या अधिवेशनांत राधाकृष्णन् यांनीं केलेलं भाषणच पहाना ! त्या भाषणाचा सारांश असा:—" आम्हांला स्वातंत्र्य मिळालं आहे, परंतु त्याचा कांहीं उपयोग झालेला नाहीं, कारण आमच्या अंतःकरणांतच अजून उणीव (इन्. ॲडिक्सी ) आहे. आज जगांत जिकडे तिकडे लोक भौतिक सुखाच्या मागं लागलेले आहेत आणि स्वार्थासाठीं युद्ध करीत आहेत. अशा काळांत जगाला सन्मार्गावर आणून इतर सर्व राष्ट्रांचा गुरु होण्याचं काम हिंदुस्थाननं केलं पाहिजे. आजच्या सारख्या परिस्थितींत तत्त्वज्ञान्यांवर फार मोठी जबाबदारी असते. तत्त्वज्ञान्यांचं खरं काम हें कीं त्यांनीं बाह्य जगाकडे बिलकुल लक्ष देतां कामा नये. त्याकडे पाठ फिरविली पाहिजे. आणि इतर कोणत्याहि सत्याला किंमत न देतां आपल्या अंतरंगांतल्या सत्याचाच तेवढा शोध केला पाहिजे. हें अंतरंगांतलं सत्य इतर सर्व सत्यांहून निराळं व म्हणून श्रेष्ठ असतं. इत्यादि, इत्यादि. "

आतां तूंच सांग, या बडबडीला कांहीं अर्थ आहे का ? आज वास्तविक तत्त्वज्ञानी लोकांना असा उपदेश कुणीतरी करावयास हवा, कीं इतके दिवस जगाकडे पाठ फिर-विलीत तेवढं पुरें झालं, जगाकडे जरा पहा, आणि तुम्ही ज्या अंतिम तत्त्वाच्या शोधांत आहांत तें या विश्वाच्या जगड्व्याळ व्यापाराशीं असंबद्ध असूं शकत नाहीं हें ओळखा; तुम्ही असं केलंत तरच तुमच्या तत्त्वज्ञानानं मानवतेचा कांहीं फायदा होईल. हा मोलाचा उपदेश करण्याऐवजीं सर राधाकृष्णांनीं काय सांगितलं, तर म्हणे, विथ्ड्रा फ्रॉम् दि औटर वर्ल्ड, ॲन्ड सीक द इनर ट्रुथ विदिन् यू वुइच ट्रुथ इज् डिफरंट फ्रॉम ॲन्ड हायर दॅन् ऑल अदर ट्रुथ्स् ! अंतरंगांतलं सत्य इतर सर्व सत्याहून निराळं व म्हणू-नच श्रेष्ठ होय या विधानाचा अर्थ काय देव जाणे ! आणि हें सत्य शोधायचं म्हणजे काय करावयाचं व तें सांपडल्यावर त्याचा कोणता उपयोग करावयाचा तें एक सर्व-पल्ली राधाकृष्णन् जाणे ! असली अर्थशून्य बडबडच हे गृहस्थ आजपर्यंत करीत आले आहेत, व असल्या बडबडीवरच त्यांनीं कीर्ति मिळविली आहे. म्हणूनच या गृहस्थांना पायघोळ संत असं मी म्हणतों !

आमची परिषद ' उघडण्याचं ! ' काम पार पाडतांना जागतिक कीर्तीच्या या हिंदी तत्त्वज्ञान्यानं अर्धा तासपर्यंत अर्थशून्य शब्दांचा फसफसाट केल्यानंतर परिषदेच्या अध्यक्षांचं भाषण झालं. भाषण झालं म्हणजे छापील बासष्ट पानांचं तें भाषण मधले मधले भाग गाळून वाचून दाखविण्याचा अत्यंत कंटाळवाणा विधि या महाशयांनीं उरकला. त्रिवेंद्रम येथील परिषदेतलं शफी साहेबांचं अध्यक्षीय भाषण किती कंटाळवाणं झालं तें तुला आठवत असेल. त्याहूनहि ही वरची कडी होती. त्रिवेंद्रमच्या परिषदेंत अध्यक्षांच्या कंटाळवाण्या भाषणाकडे संपूर्ण दुर्लक्ष करून सभागृहांतल्या इतर गोष्टींकडे आणि व्यक्तींकडे नजर टाकून मनोरंजन करून घेणं तरी शक्य होतं. इथें तीहि शक्यता नव्हती. सभागृहाची भव्यता नव्हती, थाटमाट नव्हता. आपल्या राजाराम कॉलेजच्या हॉलच्या फार तर दुप्पट म्हणावं लागेल एवढं सभागृह होतं, पण त्यांतहि पुष्कळशा खुर्च्या रिकाम्या होत्या व वर गॅलरींत शुकशुकाट होता, आणि ' प्रेक्षणीय ' पुरुष अथवा स्त्रिया औषधाला देखील नव्हत्या. अध्यक्ष महाराजांचं चऱ्हाट ऐकून आम्ही परत आलों ते अगदीं दमून भागून. सर्वस्वी कंटाळवाण्या अशा दीडतासाच्या त्या कार्यक्रमानं आमचा जीव घाबरा झाला होता. हूं कीं चूं न करतां एकाहून एक निरर्थक आणि कंटाळवाणीं दोन भाषणं ऐकणं म्हणजे कांहीं चेष्टा नव्हे. आम्हांला भयंकर शीण आला होता. कोथमिरेचा बिचाऱ्याचा तत्त्वज्ञानाशीं काय संबंध ? पण केवळ हौसेनं, आणि तत्वज्ञान परिषद म्हणजे मोलाचं बोधामृत प्यायला मिळायची एक सुवर्णसंधि या समजुतीनें त्यानं तिकिट काढलं होतं. गेले तीन रुपये खड्ड्यांत, असा पश्चात्ताप करीत तो माझ्याबरोबर खोलीवर आला. तो आतां पुन्हां कधीं तत्त्वज्ञानाच्या वाटेला जाणार नाहीं ! अशा वेळीं सपाटून खायला प्यायला मिळालं तर शरीराचा आणि मनाचा शीण जातो.

आमच्या सुदैवानं ही व्यवस्था तयारच होती. परिषदेच्या सर्व प्रतिनिधींना दरभंग्याच्या महाराजांची बगीच्यांतली पार्टी होती. या कार्यक्रमाची आठवण होतांच मी प्रो. नारळीकर यांच्या बरोबर तिकडे गेलों. त्रिवेंद्रमच्या परिषदेच्या वेळीं झालेल्या बगीच्यांतल्या पार्ट्यांच्या कल्पना तूं डोळ्यापुढें आणूं नकोस. कारण कार्यक्रम पत्रिकेंत जरी ' गार्डन ' पार्टी असं छापलं होतं तरी इथें ' पार्टी ' तेवढी होती, ' बगीचा ' नव्हता. हिंदु युनिव्हर्सिटीचं जें आर्टस् कॉलेज आहे त्या कॉलेजांत खुर्च्या टेबलं मांडलीं होतीं. तिथें जमिनीवर हिरवळ मुळींच नव्हती आणि पांच पंचवीस

कुंड्या ठिकठिकाणीं मांडल्या होत्या. त्यांनाच आम्हीं बगीचा समजायचं होतं. शिवाय दरभंग्याचे महाराज कांहीं कारणानं येऊं शकले नाहींत म्हणून यजमानाचं काम राधाकृष्णन् यांच्याकडे आलं होतं. परंतु बगीचा नसला आणि यजमान बदलला असला तरी आमच्या दृष्टीनं तो कांहीं महत्त्वाचा मुद्दा नव्हता. जो मुद्दा महत्त्वाचा होता तो सुंदर होता. आणि यजमान कुणी कां असेना यज्ञ यथासांग करण्याचं ठरवून खरा यजमान येऊं शकला नाहीं याबद्दल यत्किंचितहि वाईट वाटून न घेतां सारे तत्त्ववेत्ते त्यावर यथास्थित हात मारीत होते ! जगाकडे सर्वस्वी पाठ फिरविण्याचा ' सर्वपल्ली उपदेश त्यांनीं दोनच घटकांपूर्वी ऐकला असून !

पार्टी संपवून आम्हीं निघालों तों जवळजवळ दिवेलागणी झाली होती. आतां काय करायचं असा प्रश्न होता. मीं प्रो. नारळीकरांना म्हटलं, " माझ्याबरोबर गांवांत येतां ? तुम्हांला गाणं ऐकायचं आहे ना ? " ते म्हणाले, " जरूर जाऊं या. " आजहि पुन्हां सिद्धेश्वरीबाईंच्या घरीं गाणं ऐकायला मिळेलच अशी माझी खात्री नव्हती. गाणं नाहीं तर नाहीं, गाण्याबद्दल चर्चा तर करतां येईल, तिच्यांतहि कांहीं कमी आनंद नाहीं असं मी स्वतःशीं म्हणत होतों. पण गाणं ऐकायला मिळालं नाहीं तर नारळीकरांची निराशा होईल असं माझ्या मनांत आलं, व म्हणून रिक्षांत बसतां, बसतां मीं त्यांना म्हटलं, " निराश होण्याच्या तयारीनं चला हं. "

" अगदीं पूर्ण निराश होण्याची माझी तयारी आहे." मीं म्हटलं, " ठीक आहे. ' व आम्ही रिक्षांत बसलों.

आम्ही सिद्धेश्वरीबाईंच्या घरीं पोचलों तेव्हां त्या घरांत होत्या. मीं मनाशीं म्हटलं, पहिला शकुन तर चांगला झाला.

• • •

## —३—

आम्ही गेल्याबरोबर बाईंनीं हरि शंकर मिश्र यांच्याकडे निरोप पाठविला व थोडया वेळानं तेहि त्या ठिकाणीं आले. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर मीं विषय काढला, " गाणं ऐकवणार काय ? " परंतु बाई म्हणाल्या, " माझ्या गळ्यांत आज दर्द आहे. " हें ऐकल्यावर आमची एक विकेट पडली ! मग जरा वेळ इतर गप्पा करतां करतां पुढचा डाव कसा टाकायचा याचा मी विचार करूं लागलों. बाईंच्या गळ्यांत दर्द असला तर असूं द्या, तुम्ही गा कीं, अशी विनंति हरि शंकर मिश्र यांना करण्याची माझी इच्छा होती. पण या बाबतींत पुष्कळ अनुभव घेतल्यानं मला माहीत होतं कीं सरळ अशी विनंति करतां कामा नये. म्हणून जरा वेळानं मीं हरि शंकर मिश्र यांना म्हटलं,

" आपलं कालचं गाणं अजून माझ्या कानांत आहे. "

ते खुष होऊन हंसले.

मीं आणखी एक चेंडू टाकला. मीं म्हटलं, " माझे कान आपण काल अगदीं बिघडवून टाकले ! पुन्हां आपलं गाणं ऐकायला मिळायला पाहिजे, असा माझ्या कानांनीं हट्ट धरला आहे. "

ते आणखी खूष होऊन हंसले. परंतु नंतर वाईट चेहरा करून घसा चोळीत ते म्हणाले, " आज मला पडसं खोकला झाल्यामुळें आवाज ठीक नाहीं. शिवाय मी घाईंत आहे. आपण आल्याचा निरोप आला म्हणून आलों. परंतु पांच दहा मिनिटांतच घरीं गेलं पाहिजे. धाकट्या मुलीला देवी काढल्या आहेत. आतां रात्रीं देवींची पूजा आहे घरांत. "

हें त्यांचं बोलणं ऐकल्यावर गप्प बसणं भागच होतं. कशाला आलों आपण प्रोफे-सर फडक्यांच्या नादानं, असं नारळीकर मनाशीं म्हणत असणार याची मला खात्री वाटली. त्यांच्या दृष्टीनं या घरांतला माझा भाव अगदींच गडगडला असला पाहिजे असं मनांत येऊन माझा अहंकार जरासा दुखविला गेला. गवयी लोकांना गातं कसं करावं ही विद्या इतक्या वर्षांच्या नादलुब्धतेनं मीं थोडीशी हस्तगत केलेली आहे. त्या विद्येचं अस्त्र टाकून पहायचं मीं ठरविलं. मी इतर गप्पांत थोडासा वेळ जाऊं दिला व नंतर हरि शंकर यांना एकदम प्रश्न केला,

" पंडितजी, मालकंस व चंद्रकांत यांच्यांतला नक्की फरक मला समजावून सांगतां काय ? "

ते खुलले, व त्यांनीं विचारलं, " किती तऱ्हेचे ' कसं ' तुम्हांला माहिती आहेत ? " आणि माझ्या उत्तराची वाट न पाहातां त्यांनीं कंस रागिणीच्या सर्व प्रकारांचीं नांवं सांगितलीं, व प्रत्येक भेदाचं स्वरूप दाखविण्यासाठीं आपल्या मुलाला डग्ग्यावर ताल धरायला लावून गावयाला प्रारंभ केला.

मग ते आपण होऊनच ' केदार ' रागाच्या किती तऱ्हा आहेत ते सांगूं लागले व प्रत्यक्ष गाऊन दाखवूं लागले. त्यानंतर माझी त्यांची श्रुतीबद्दल चर्चा झाली; ' मियामल्हार ' रागाच्या नांवांत ' मिया ' घुसडला गेल्याबद्दलचा राग बोलून दाख-वून त्यांनीं मल्हारच्या विविध तऱ्हा दाखविण्यास प्रारंभ केला; केवळ हलक्या गळ्यानं खूप ताना मारणं म्हणजे ' टप्प्यां ' ची गायकी होते काय असा मीं प्रश्न करतांच अस्सल ' टप्पा ' कसा गातात तेंहि त्यांनीं दाखविलं; आणि ज्यायोगें मनुष्य तरतो तो ' तराणा, ' तराण्यांतील मूळच्या साऱ्या अस्सल शब्दांना कसा परमार्थपर अर्थ आहे, इत्यादि गोष्टी त्यांनीं आपणहूनच काढल्या व तराणाहि गाऊन दाखविला !

जो गृहस्थ पांच दहा मिनिटांतच उठून देवीच्या पूजेसाठीं घरीं जाणार होता त्यानं तब्बल दीड तास आम्हांला नुसतं गाणंच ऐकवलं नहीं तर गायनाच्या विविध अंगांची व निरनिराळ्या गानप्रकारांची उद्‌बोधक चर्चाहि ऐकविली ! खरा अंतःकरणाचा कलावंत कलेच्या रंगांत असा बेभान होतो ! बनारस येथील बडे रामदासी गायनाचार्य यांचं नांव महशूर आहे. कबीर चौरा या इतिहासप्रसिद्ध ठिकाणीं ते रहातात. सिद्धेश्वरी-बाई यांच्या शिष्या होत; आणि हरि शंकर मिश्र हे त्यांचे चिरंजीव. हा गायक मला

फार आवडला. महाराष्ट्रांतल्या ठिकठिकाणच्या संगीत क्लबांनीं या गृहस्थाला इकडे आणला पाहिजे, याचं गाणं ऐकलं पाहिजे असं मला वाटलं. कोल्हापूरच्या देवल क्लबातर्फे त्यांना आमंत्रण देण्याची व्यवस्था करावयाची असं मनाशीं योजून मीं त्यांना म्हटलं, "कोल्हापूरचं आमंत्रण आलं तर आपण स्वीकारलं पाहिजे." ते म्हणाले, "अवश्य येईन," त्यांनीं विचारलं, "उद्यां येणार ना पुन्हां," मीं हंसून म्हटलं, "तुमच्या सौजन्याचा मीं फार फायदा घेतला. आतां उद्यां येणार नाहीं." आम्ही त्यांचा निरोप घेऊन रस्त्यावर आलों तेव्हां प्रो. नारळीकर म्हणाले, 'इट वॉज ॲन आर्टिस्टिक एक्सपीरिअन्स' (आज एक मोठा कलात्मक अनुभव मिळाला मला.) त्यांचा तो उद्‌गार ऐकून मला फार बरं वाटलं. अर्थात् हरि शंकर मिश्र यांना गातं करण्यासाठीं आणि नंतर सतत गात ठेवण्यासाठीं मीं जे युक्तीचे डाव टाकले होते त्यांचा खुलासा मीं त्यांच्या जवळ फारसा केला नाहीं.

सोमवारीं सकाळीं परिषदेच्या कार्यक्रमांत वेळ गेला. परंतु तो घालवून शिवाय हिंदु युनिव्हर्सिटीहि मीं पाहिली. ही युनिव्हर्सिटी म्हणजे केवढा प्रचंड व्याप आहे! त्याची राजाराम कॉलेज, लिंगराज कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज अशा कॉलेजांवरून तुला कल्पना येणार नाहीं. या युनिव्हर्सिटीचा एकंदर विस्तार जवळजवळ बारा मैलांचा आहे. सर्व विषयांचं अध्यापन करणारीं निरनिराळीं कॉलेजं या विस्तारांत आहेत. इंजिनिअरिंग कॉलेज आहे, मायनिंग कॉलेज आहे, शेतकी कॉलेज आहे, त्या कॉलेज साठीं लागणारीं शेतं आणि बागाहि आहेत, चार हजारांच्या वर विद्यार्थी आणि विद्यार्थिनी (विद्यार्थिनींचं स्वतंत्र कॉलेज आहे!) इथं शिकत आहेत, आणि बनारस शहरांतून येणारे थोडे विद्यार्थी सोडले तर सारे युनिव्हर्सिटीच्या वसतिगृहांतून रहाणारे आहेत. साडेतीनशें विद्यार्थ्यांचं एक अशीं कित्येक वसतिगृहं आहेत. बिर्ला हॉस्टेल, रुईया हॉस्टेल, मोरवी हॉस्टेल, लिंबडी हॉस्टेल अशीं यांचीं नांवं आहेत. या नांवावरून तूं ओळखशीलच कीं हीं सारीं वसतिगृहं मोठमोठ्या धनिकांच्या व संस्थानिकांच्या देणग्यांतून बांधलीं गेलीं आहेत. श्रीमंतांकडून लाखालाखांनीं देणग्या घेण्याची अपूर्व विद्या या विश्वविद्यालयाचे संस्थापक पंडित मालवीय यांना कशी अवगत होती, त्याविषयींच्या अनेक आख्यायिका मीं ऐकल्या होत्या आणि इथल्या मुक्कामांत आणखी ऐकायला मिळाल्या. मी घरीं परत आल्यावर त्या सगळ्या तुला सांगेन. एकट्या व्यक्तीच्या पुण्याईवर व कर्तबगारीवर उभारली गेलेली इतक्या प्रचंड

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
क्रमांक ७३५२१ वि: कमलपत्रे.
नोंद १८६२ नों. दि.


व्यापाची दुसरी संस्था हिंदुस्थानांत नाहीं. लाख दहा लाख रुपये म्हणजे ज्यांच्या हातचा मळ अशा दोनच पुढाऱ्यांचीं नांवं आपल्याला घेतां येतील. एक गांधी महाराज आणि दुसरे पंडित मालवीयजी ! हिंदु युनिव्हर्सिटी म्हणजे मालवियांचं एक अलौकिक स्मारक आहे. या संस्थेच्या रूपानं त्यांची स्मृति अजरामर राहील.

सोमवारीं तिसऱ्या प्रहरीं पुनः बगीचा पार्टी होती. आदल्या दिवशींचीच जागा वा आदल्या दिवशींचाच 'मेनू' आणि पाहुणेहि आदल्या दिवशींचेच; फक्त यजमानाच्या नांवाची पाटी बदलायची होती. बनारसला आल्यापासून तिन्हीं त्रिकाळ संदेश, गुलाबजाम अशा मिठाईचा आणि समोसे, कचोरी अशा मसालेदार तिखट पदार्थांच आमचा खुराक चालूं होता. म्हणून या पार्टीला न जातां गांवांत जाण्यासाठीं कोथमिरेला घेऊन मी निघालों. सिद्धेश्वरीबाईऐवजीं विश्वेश्वराचं दर्शन घ्यायचं मीं ठरविलं होतं.

या देवस्थानाचं दर्शन तीस वर्षांपूर्वीं मी बनारसला आलों असतांना घेतलं होतं. तेव्हां आज तें स्थळ मी प्रथम पहाणार होतों असं नव्हे किंवा भाविक यात्रेकरूच्या श्रद्धाळू वृत्तीनं मी निघालों होतों असंहि नव्हे. मी निरीश्वरवादी आहे हें ज्यांना माहीत आहे अशा मंडळींना मीं देवळांत गेलों कीं मोठं आश्चर्य वाटतं. परंतु देवळांत जाणं माझ्या निरीश्वरवादाशीं विसंगत आहे असं मला वाटत नाहीं. कारण एखाद्या नव्या गांवीं गेल्यावर तिथले रस्ते, तिथलीं शाळा कॉलेजं, तिथले बाजार या गोष्टी जशा पहायच्या त्याप्रमाणें देवळंहि पहाण्याची माझी तयारी असते. त्या ठिकाणीं परमेश्वर भेटेल अशा कल्पनेनं मी कांहीं जात नाहीं. आणि देवळाच्या इमारतीचं आणि माझं वाकडं असायचं कांहीं कारण नाहीं. इतकंच नव्हे तर मंदिराच्या गाभाऱ्यांत जाऊन त्या ठिकाणीं जो कोणी देव असेल त्याच्यापुढें हात जोडण्यासदेखील मला कांहीं प्रत्यवाय वाटत नाहीं. मला त्या देवापाशीं कांहीं मागायचं नसतं, त्याचं स्तवन करायचं नसतं, माझ्या पापांची मला क्षमा कर असं म्हणायचं नसतं. परंतु इतरांच्या दृष्टीनं पवित्र असलेल्या त्या स्थानाची प्रतिष्ठा मीं हात जोडल्यानं रहाते तर हात जोडायला काय हरकत आहे ? नित्याच्या व्यवहारांत डांबीसांतल्या डांबीस माणसालादेखील शिष्टाचार म्हणून आपण नमस्कार करतों, मग देवळाच्या गाभाऱ्यांतल्या निरुपद्रवी पाषाण मूर्तीला नमस्कार करायला काय हरकत आहे ? माझ्या दृढ

निरीश्वरवादाशीं तें विसंगत आहे असं मला मुळींच वाटत नाहीं. कन्याकुमारीच्या देवळांत तर तिथल्या नियमाप्रमाणें मी स्नान करून ओलं वस्त्र नेसून आलों होतों हें तुला आठवत असेल. शिवाय देवालय म्हटलं कीं तिथें शिल्पकलेचा थोडा तरी प्रेक्षणीय नमुना आढळतोच, व तो पहाण्यासाठीं म्हणून कां होईना देवळांत जावंसं मला वाटतं.

मात्र दुर्दैवाची गोष्ट अशी कीं काशी विश्वेश्वराच्या या देवालयांत शिल्पकलेच्या दृष्टीनं पहाण्यालायक कांहीं एक नाहीं. भव्यतेचा भाग या ठिकाणीं काडीमात्र नाहीं. देवळाचा उत्तुंग सोनेरी कळस लांबून दिसेल अशा कल्पनेनं दृष्टि टाकीत जावं तो दिसत नाहीं. हमरस्त्याशीं फुटणाऱ्या एका गल्लीच्या तोंडापाशीं येतांच लोक सांगतात या गल्लींत विश्वेश्वराचं देऊळ आहे. त्यांचं तें सांगणं प्रथम खरं देखील वाटत नाहीं. जेमतेम सहासात फूट रुंद असलेल्या या गल्लींत शिरून दोन्ही बाजूंच्या दुकानाकडे दृष्टि टाकली कीं आपण बाजार पेठेंतून चाललों आहोंत असं वाटतं. पायाखालची फरसबंद वाट तुडवीत या गल्लींतून जाऊन आणखी एक दोन वांकडीं वळणं घेतलीं कीं ज्या दरवाजांत आपण उभे रहातों तोच काशी विश्वेश्वराच्या मंदिराचा मुख्य दरवाजा. या दरवाजांतून आंत नजर टाकली कीं अगदीं छोटेसं घाणेरडं आवार व बारीक बारीक देवळं दिसतात. मुख्य देऊळ आहे त्या ठिकाणीं काशी विश्वेश्वर आहे. एखाद्या लहानशा खेडेगांवांतल्या मंदिराचा सभामंडपदेखील मोठा म्हणावा लागेल इतका लहान आणि सर्वस्वी गलिच्छ अवस्थेंत राहूं दिलेला त्या देवळाचा सभामंडप आहे. मुख्य गाभारा केवढा आहे म्हणशील तर आपल्या घरांतल्या माझ्या लिहिण्याच्या खोलीहूनहि थोडासा लहानच. दहावीस माणसं दाटीनं कशीबशी येथें उभीं राहूं शकतील. या गाभाऱ्यांत शंकराची पिंडी आहे. ती देखील मधोमध नाहीं, तर कां कोण जाणे जराशी डाव्या अंगाला आहे. तिच्यावर सारखा अभिषेक चालू असतो. दर्शनाला येणारे लोक फुलं व बिल्वपत्रं वहात असतात व पूजा साहित्य ठेवीत असतात. गाभाऱ्याची फरशी ओलीचिंब व घाणेरडी झालेली असते. ज्यायोगें मन गंभीर आणि प्रसन्न होईल अशी एकही गोष्ट इथें नाहीं. सारं वातावरण सर्द आणि उदास आहे. भयंकर वेडी आंधळी श्रद्धा बरोबर आणल्या-खेरीज हिंदूंचं हें जगप्रसिद्ध पवित्र देवस्थान आहे यावर विश्वास आणि ती श्रद्धा बरोबर आणली तरी या देवस्थानचा इतिहास ऐकल्यावर ती कशी टिकायची परमे-

श्वर जाणें! देवळापासून अगदीं नजीकच एक मशीद दृष्टीस पडते. तिथें काशी विश्वेश्वराचं देऊळ प्रथम होतं. तें औरंगजेबानं उध्वस्त केलं, तिथली शंकराची पिंडी फेकून दिली व त्या ठिकाणीं मशीद बांधली. नंतर कित्येक वर्षांनीं म्हणे काशी विश्वेश्वर अहिल्याबाई होळकरणीच्या स्वप्नांत आला व त्यानं सांगितलं, मी अमक्या ठिकाणीं विहीरींत पडलों आहे ( ही विहीर आजहि दाखविण्यांत येते ! ) तेथून माझी पिंडी काढ व तिची चांगल्या प्रकारें स्थापना कर. हा दृष्टांत झाल्यावर अहिल्याबाईनं देऊळ बांधलं. तें आजचं काशी विश्वेश्वराचं देवालय !

हा इतिहास ऐकल्यावर भोळी श्रद्धा जर हालत नसेल तर तिचा मूर्खपणा आणि चिवटपणा अजबच म्हणावा लागेल. परमेश्वराची जी कल्पना मूर्तिपूजेसाठीं आम्ही केलेली आहे ती अशी, कीं त्या मूर्तीला ओंवळ्यानें स्पर्शदेखील करतां कामा नये. जागरूक देवस्थानाबद्दलची समजूत अशी कीं तिथें यत्किंचित् अश्रद्धा खपत नाहीं. अश्रद्धा दाखवून अपराध करणाऱ्या व्यक्तीला ताबडतोब कडक शासन मिळतं तर मूर्तिभंजक औरंगजेबानं केलेला अत्याचार काशी विश्वेश्वरानं सहनच कसा केला ? औरंगजेबाला ताबडतोब मरण कसं आलं नाहीं व त्यानं बांधलेली मशीद ताबडतोब जळून खाक कशी झाली नाहीं ? आमचा हिंदूंचा परमेश्वर त्याची आम्ही कल्पना करतों त्याप्रमाणें खरोखर असता तर आमचीं देवस्थानं उध्वस्त करणाऱ्या म्लेंछांना ताबडतोब शासन मिळायला हवं होतं. परंतु तसं कांहीं एक झालं नाहीं. अगदीं जागरूक समजलीं जाणारीं देवस्थानं यवनांनीं एकामागोमाग एक उध्वस्त केलीं, तीं माणसांनीं तर उघड्या डोळ्यांनीं पाहिलींच, परंतु त्या त्या मंदिरांतून हांकून दिलेल्या देवांनींहि आपल्या दशसहस्र नेत्रांनीं खुशाल पाहिलीं ! काशी विश्वेश्वर दीर्घ काल विहिरींत पडून राहिला आणि नंतर अहिल्याबाईच्या स्वप्नांत जाऊन त्यानं तिच्याजवळ उद्धाराची विनंति केली, हा त्याच्या तेजाचा आणि सामर्थ्याचा पुरावा म्हणायचा कीं दुबळेपणाचा व विटंबनेचा ? खरोखर ज्याच्या ठिकाणीं थोडी तरी चिकित्साबुद्धि शिल्लक आहे त्याला या काशी विश्वेश्वराच्या स्थलाचं पावित्र्य आणि महात्म्य पटणं कठीण आहे. आमच्या सर्वच देवालयांची स्थिति अशी आहे कीं तिथें परमेश्वर आहे अशी खात्री पटण्याऐवजीं श्रद्धेला धक्का मात्र बसतो. माझ्याजवळ श्रद्धाच नसल्यामुळें धक्का बसण्याचा प्रश्नच उरत नाहीं. परंतु कित्येक देवळांत निदान शिल्पाची भव्यता असते, मूर्तीचं सौंदर्य असतं, पूजेचा मोठा बडिवार आणि थाट असतो, एकंदर

वातावरण परिणामकारक असतं. परंतु काशी विश्वेश्वराच्या या देवालयांत यांपैकीं एकहि गोष्ट नाहीं. या तीर्थाचं दर्शन घेतल्याखेरीज मरण येऊं नये अशी भाविकांची समजूत आहे. पण मी म्हणेन, प्राण गेला तरी या ठिकाणीं येऊं नये. अखेर साऱ्यांना इथें यायचं आहे असं भाविक समजतात. (मृताच्या अस्थी तरी निदान् इथें पोचत्या करण्याची वहिवाट आहे.) मी निराळ्या अर्थानं असं म्हणेन कीं, 'धिस इज द लास्ट प्लेस वन् शुड व्हिझिट.' मी परिषदेसाठीं बनारसला निघालों तेव्हां घरांतल्या म्हाताऱ्या माणसांसाठीं प्रसाद आणा असं तूं म्हणालीस म्हणूनच मी आज काशी विश्वेश्वराला दुसऱ्यांदा दर्शन दिलं!

आम्ही देवळांतून बाहेर पडलों. कांहीं खरेदी करण्याच्या निमित्तानें बाजारांत थोडे हिंडलों. मग कोथमिरे मला म्हणाला, "सर, आतां जाऊं या ना परत युनि-व्हर्सिटींत? फार उशीर करतां कामा नये." मीं म्हटलं, "होऊं दे रे थोडा उशीर झाला तर; एका घराचा पत्ता काढतां आला तर काढायचा आहे मला." त्यानं विचारलं, "कुणाच्या घराचा?" मी म्हटलं, "कुणाच्या तरी, तुला काय करायचं आहे? तूं आपला मुकाट्यानं माझ्याबरोबर चल." त्यानं माझं तें उत्तर ऐकून घेतलं, व तो माझ्याबरोबर गर्दीतून वाट काढीत निघाला. यांना आतां कुणाच्या भेटीला जायची लहर आली आहे कुणास ठाऊक असं तो मनाशीं आश्चर्य करीत असला पाहिजे, हें त्याच्या खालीं मान घालून चालण्याच्या तऱ्हेवरून मी ओळखूं शकत होतों, व मला कुठें जायचं होतं हें कळल्यावर तो किती आश्चर्यचकित होईल त्याच्या कल्पनेनं मला हंसूं येत होतं.

• • •

— ४ —

कोल्हापुराहून निघतांना सिद्धेश्वरीबाईची गांठ घेण्याचं ज्याप्रमाणें मीं मनाशीं ठरविलं होतं त्याप्रमाणेंच बनारसच्या आणखी एका प्रसिद्ध गायिकेची भेट घेण्याचा मीं बेत केला होता. या गायिकेचं गायन रेडियोवर मीं अनेक वेळां ऐकलं होतं आणि प्रत्येक वेळेस तिचं गाणं मला अपूर्व वाटलं होतं. या बाईच्या आवाजाची जातच अशी कांहीं मधुर आणि रसपूर्ण आहे आणि ठुमरी गझल कवालीचे शब्दोच्चार करण्याची हिची तऱ्हा अशी कांहीं भावनापूर्ण आणि ढंगदार आहे कीं या गायिकेच्या गळ्यांतून बाहेर पडलेली एक ओळ ऐकल्याबरोबर कुणाहि श्रोत्याच्या वृत्ती थरारून जाव्यात. आपल्याकडल्या बऱ्याच गायिका ठुमरी, गझल, कवाली हे प्रकार गातात. भावगीतं गाणारे गायक आणि गायिका तर आतां अक्षरशः गल्लोगल्लीं झालेल्या आहेत. परंतु सुंद्राबाईचं एक उदाहरण सोडलं तर श्रोत्याला कवितेंतील भावनेचा तात्काळ प्रत्यय घडवून भावना विव्हल करणारा ढंग कुणाच्याहि गाण्यांत आढळत नाहीं. चित्रपटांतलीं गाणीं महाराष्ट्रीय तारकांच्या तोंडून ऐकली तरी त्यांत भावनेची आर्तता ओतलेली नसल्यामुळें श्रोत्याच्या अंतःकरणाला त्यांचा चटका लागत नाहीं, व मग असं वाटूं लागतं कीं शृंगार गीतं, विलापिका, इतकंच काय भजनं देखील, उत्तर हिंदुस्थानांतील आणि पंजावी बायकांनींच म्हणावीं. बनारसची जी खास ठुमरी आहे तिची सर दुसरीकडच्या ठुमरीला नाहीं, असं जाणते लोक म्हणतात. अशा अनेक कारणांनीं बनारसच्या या गायिकेच्या गायनावर मी विलक्षण लुब्ध होतों; आणि बनारसला गेल्यावर तिची भेट जरूर घ्यायची असा बेत मीं केला होता. या गायिकेचं नांव रसूलनबाई. हिचं गाणं तर मीं रेडिओवर ऐकलं होतंच, परंतु हिच्या कीर्तीच्या कांहीं आख्यायिकाहि ऐकल्या होत्या. त्यांपैकीं एक

आख्यायिका अशी कीं इंदूरचे माजी महाराजा तुकोजीराव होळकर हे आपल्या कारकीर्दीत होळीचा उत्सव फार मोठ्या प्रमाणावर करीत असत, व त्या उत्सवांत हिंदुस्थानांतील वडेवडे नामी कलावंत बोलावून घेऊन त्यांचा अगदीं मुक्तहस्तानं सत्कार करीत असत. त्यावेळीं एका उत्सवांत रसूलन आणि बतूलन ही तरुण गायिकांची जोडी आली होती. या जोडीनं त्या वेळेस इंदूरची संगीत-प्रेमी दुनिया हालवून सोडली होती, व तुकोजीरावांनीं हजारों रुपयांची खैरात त्यांवर उधळली होती. ही हकीगत सुमारें पंचवीस तीस वर्षांपूर्वींची आहे. तेव्हां रसूलनबाई आतां जवळजवळ पन्नाशींतल्या घरांतली असणार हें मला कळत होतं. पण मला तिचं तारुण्य थोडंच पहायचं होतं? तिच्या गायनाचा मी एक नम्र चहाता आहे एवढं सांगण्यासाठींच फक्त मला तिची भेट घ्यायची होती.

सिद्धेश्वरीबाईंकडे मी प्रथम गेलों तेव्हां गप्पा मारतां मारतां रसूलनबाईंची भेट घेण्याची माझी इच्छा आहे, असं मी त्यांच्याजवळ बोललों होतों. परंतु त्यांनीं माझ्या त्या इच्छेविषयीं थोडी अप्रियता दाखवून म्हटलं होतं, “ ती काय बैठकींत गाण्याच्या लायकीची बाई आहे? ” त्यांच्या या उद्‌गारांतला अभिप्राय अर्थात्‌च असा होता कीं चार-सहा घंटे आम्ही ख्याल गाणाऱ्या बायका, आणि रसूलन बाई म्हणजे साधी ठुमरी गझल गाणारी बाई, तिच्याविषयीं तुम्ही कां एवढा आदर ठेवतां? त्यांच्या त्या उद्‌गाराला मीं उत्तर दिलं नव्हतं. पण मीं मनाशीं म्हटलं होतं, उगीच कशाला हा दुरभिमान ठेवतां, तुमच्यानंतर रसूलनबाई गायला बसली तर कवालीच्या एक दोनच चरणांनीं तुमची चारसहा घंट्यांची बैठक ती पुसून टाकील. परंतु हा विचार मीं माझ्या मनांतच ठेवला होता, व कांहीं वेळानं त्यांना मीं विचारलं होतं, “ रसूलनबाई कोठें रहातात तें तर सांगा? ” यावर त्या नाक मुरडून म्हणाल्या होत्या, “ तुमच्यासारख्या शरीफ (सभ्य) माणसानं जाण्यासारखा तो मोहल्ला नाहीं. ” माझ्या स्वतःच्या सभ्यपणाच्या कल्पना फार निराळ्या आहेत. खऱ्या कलावंताला भेटण्यासाठीं कोणत्याहि ठिकाणीं जातांना स्वतःची सभ्यता बिघडणार नाहीं अशी शंका मला कधीं येत नाहीं. ती मीं कधीं मनांत येऊं दिली नाहीं म्हणूनच गाण्यावाजविण्याची व नृत्याची मौज तृप्त होईतों मीं लुटली. परंतु या गोष्टी सांगून सिद्धेश्वरीबाईंशीं वाद घालण्यांत कांहीं अर्थ नव्हता. शिवाय सभ्य माणसांनीं जाण्यासारखा तो मोहल्ला नाहीं या त्यांच्या बोलण्यावरून रसूलनबाईचा

पत्ता बनारसच्या कोणत्या भागांत लागण्यासारखा आहे याचा तर्क मला सहज करतां आला.

तेव्हां सभ्य माणसांनीं न जाण्यासारखा मोहल्ला कोणता याची चवकशी करीत मी आतां निघालों, आणि चार पांच लोकांना विचारल्यानंतर तो मोहल्ला आम्ही शोधून काढला. हा मोहल्ला म्हणजे लांबच लांब–जवळजवळ तीनशें चारशें यार्डांची–एक गल्ली आहे. गल्ली अगदीं अरुंद आहे. दुतर्फा दुकानं आहेत त्यांकडे दृष्टि टाकली कीं मुंबईच्या महंमदअल्ली रोडची आठवण होते. दोन्ही बाजूंस खालच्या मजल्यावर छोटींमोठीं दुकानं व गलिच्छ हॉटेलं आहेत, आणि वरच्या मजल्य वरच्या सान्या माडयांना पडदे लावलेले आहेत. या ठिकाणीं आम्ही आलों खरे, परंतु जवळजवळ पाव मैलावर पसरलेल्या या गल्लींत रसूलनबाईचं मकाण कोणतं हा प्रश्न उरलाच. परंतु चवकशी करायला आपलं तोंड शाबूत असल्यावर सांपडणार नाहीं असं ठिकाण जगांत कुठें असूं शकेल काय ? दुकानादुकानांतून आम्ही खुशाल विचारण्याचा धडाका सुरू केला. शेवटीं एकानं सांगितलं कीं रसूलनबाई अनवर गल्लींत रहाते. हा मुख्य रस्ताच जेथें पुरतां दहाफुटांचाहि नव्हता तेथें आतां त्याला फुटलेली अनवर गल्ली किती अरुंद असेल त्याची कल्पना करीत आम्ही निघालों. अनवर गल्लींत शिरून दहावीस पावलं आम्ही टाकलीं नाहीं तोंच आम्ही जागच्या जागीं उभेच राहिलों. कारण उजव्या डाव्या अंगाला बारीक बारीक गल्ल्यांचं असं कांहीं जाळं पसरलेलं होतं कीं जर का या चक्रव्यूहांत आम्ही सांपडलों तर बाहेर पडणं अशक्य होईल असं आम्हांला वाटलं. आम्ही कांहीं वेळ तसेंच उभे राहिलों. इतक्यांत जरा अंतरावर दोन इसम बोलत असलेले दिसले. डोळ्यांत सुरमा, चष्मा, खूप तेल लावून लांबलांब केसांचा कसोशीनं काढलेला भांग, खालीं तलम धोतर, आणि पायांत काळाभोर पंपशू, असा त्यांपैकीं एकाचा थाट होता. मीं तर्क केला कीं हा इसम गाणाऱ्या वाजविणाऱ्यांतला असला पाहिजे. म्हणून मीं कोथमिरेला म्हटलं रसूलनबाईचा पत्ता त्याला विचार. माझा हा तर्क बरोबर ठरला. परंतु तो इसम जेव्हां उजव्या हाताला जा, मग डाव्या हाताला वळा, मग पुन्हां उजव्या हाताला वळा, असं गुंतागुंतीचं भौगोलिक दिग्दर्शन करूं लागला तेव्हां मीं त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हटलं. " मेहेरबानी करून आपण आमच्याबरोबर चला. इतकंच नव्हे तर परत आम्हांला याच ठिकाणीं आणून सोडण्याची कृपा करा. कारण आपल्या वर्णनावरून रसूलनबाईचं मकाण तर

आम्हांला सांपडणार नाहींच पण परत वाटहि या जन्मांत सांपडायची नाहीं. " तो हंसला व आमच्याबरोबर निघाला. ज्या वांकडया तिकडया गल्ल्यांतून आम्ही गेलों त्या गोमुखीचं वर्णन करणं माझ्या शक्तीच्या बाहेर आहे. शेवटीं एका मोठ्या दुमजली इमारतीपुढें आम्ही उभे राहिलों. हेंच रसूलनबाईचं मकाण. घराचं दार बंद होतं. आमच्या घरांचीं दारं नेहमीं बंद असतात, अशी इंग्रज लोकांनीं वढाई मारण्याचं कांहीं कारण नाहीं. त्यांनीं बनारसच्या गल्ल्यांत जरा हिंडून पहावं.

आमच्या वाटाडया मित्रानं दार ठोठावलं. आतून 'कोण आहे' म्हणून आवाज आला; आणि आमच्या मित्रानं योग्य तें उत्तर दिल्यावर कांहीं वेळानं दरवाजा उघडला गेला. आम्ही आंत पाऊल टाकलं. छोटासा चौक होता, व बनारसच्या पद्धतीप्रमाणें त्या चौकावर लोखंडी जाळी होती. वरच्या मजल्यावरून एका बाईनं विचारलं " कोण आहे ? " आमच्या मित्रानं आमच्यातर्फे उत्तर दिलं, " कोणी मेहमान (पाहुणे) आपल्याला भेटायला आलेले आहेत. " " असं होय ? या वर. " असं वरून उत्तर आलं. मीं तर्क केला कीं ही वरून बोलणारी स्त्रीच रसूलनबाई असली पाहिजे. आम्ही जिना चढून वर गेलों, आणि सलाम करणाऱ्या रसूलनबाईकडे पाहून सर्दच झालों. पन्नाशीच्या सुमाराची एक स्त्री दृष्टीस पडेल हें मला माहीत होतं, परंतु तिच्या घरचा देखावा आणि वेष असा असेल अशी माझी कल्पना नव्हती, ज्या खोलींत तिनं स्वागत केलं ती एक लहानशी खोली होती. खोलीची जमीन उघडी होती. एका भिंतीपाशीं एक मळकट सतरंजी पडली होती तेवढीच. दोन अर्धवट उघडीं नागडीं बालकं खोलीच्या गलिच्छपणांत भर घालीत होतीं. स्वतः रसूलनबाई केंस न विंचरलेली, जुनेरासारखं वस्त्र नेसलेली, अंगावर कुठेंहि अलंकार नाहीं, फक्त कसलं तरी घरकाम करीत असतांनाच त्या बाहेर आल्यामुळें तोंडावरून ओघळणाऱ्या घर्मबिंदूचेच काय ते अलंकार अशा थाटांत पुढं येऊन आमच्यापाशीं बोलत होत्या, व बोलतां बोलतां त्या लहान बालकांनीं केलेले पराक्रम एका फटकुरानं पुशीत होत्या.

हें सारं दृश्य पाहून मला फार वाईट वाटलं, आणि माझा अपेक्षाभंगहि पुष्कळ झाला. तथापि त्या बाईविषयींचा माझा आदर कमी होण्याचं कारण नव्हतं. त्यांच्याशीं जें बोलायचं मीं ठरविलं होतं तें बोललों. मग त्यांचा निरोप

घेतला; आणि सुरमा घातलेल्या आमच्या नव्या मित्राच्या सहाय्यानं आम्ही अनवरगल्लीच्या तोंडाशीं परत आलों व सभ्य माणसांनीं न जाण्यासारखा तो मोहल्ला ओलांडून आम्ही मोठ्या रस्त्याला लागलों. कोथमिरे म्हणाला, " सर, आतां लवकर गेलं पाहिजे बरं कां. फार उशीर झाला. तुमचं व्याख्यान आहे तें तुम्ही विसरलां वाटतं ?' मीं माझ्या लहरीपणांत इतका वेळ घालविला याबद्दलची नापसंती त्याच्या सुरांत होती. मीं त्याला म्हटलं, " व्याख्यान काय नेहमींचंच आहे रे. पण रसूलनबाई कशी आहे तें पहाण्याची संधि काय मला पुन्हां येण्यासारखी होती ? " त्याला कांहीं माझें तें उत्तर पटलं नसावं. " आहा ! काय ती बाई ! " असं तो मनाशीं बहुतेक म्हणालाहि असेल. रसूलनबाईच्या खऱ्या गुणाची त्याला काय कल्पना ? त्याला निश्चित करण्यासासाठीं मीं म्हटलं, " आतां अगदीं सरळ युनिव्हर्सिटीकडे जायचं, माझ्या व्याख्यानाचा मला अगदींच विसर पडला आहे असं समजूं नकोस. "

बनारसला ' भारतीय साहित्य सहकार ' या नांवाची जी संस्था आहे त्या संस्थेतर्फे माझा सत्कार व्हायचा होता. या संस्थेचं स्वरूप व उद्देश मोठे चांगले आहेत. बनारसमधील हिंदी साहित्याचे प्रमुख सेवक या संस्थेचे सभासद आहेत. आणि, शिवाय गुजराथी; मराठी अशा इतर भाषांचेहि अभिमानी या संस्थेंत आहेत. ही मंडळी एकमेकांच्या भाषेंतील साहित्याचा एकमेकांना परिचय करून देण्यासाठीं वरचेवर एकत्र जमत असतात, अशा संस्थेचा सत्कार स्वीकारण्यांत मला आनंदच वाटण्यासारखा होता, व म्हणून मीं या समारंभाला संमति दिली होती. हा समारंभ फार चांगल्या रीतीनं पार पडला. परस्पर परिचय झाला, उपाहार आणि गप्पागोष्टी झाल्या; आणि नंतर मीं इंग्रजींत व्याख्यान दिलं. बनारस हिंदु युनिव्हर्सिटींत जवळ जवळ अडीचशें महाराष्ट्रीय विद्यार्थी आहेत. पूर्वी याहूनहि जास्त होते म्हणतात. मात्र या विद्यार्थ्यांपैकीं आर्ट्स कॉलेजांत फार थोडे आहेत. बहुतेकजण महाराष्ट्रांतून आले आहेत ते एंजिनिअरिंग, मायनिंग, मेटॅलर्जी असे विषय शिकण्यासाठीं. कोल्हापुराहून आलेले बारा तेरा विद्यार्थी येथें भेटले. पंडित मालवीय यांचं महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांवर विशेष प्रेम होतं. महाराष्ट्रीय माणसांसारखीं नेकीचीं व स्वाभिमानी माणसं दुसरीं नाहींत असं ते वारंवार बोलून दाखवीत. महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांनीं कोणताहि कार्यक्रम योजला कीं पंडित मालवीय अगत्यानं हजर रहात. इतर विद्यार्थ्यांच्या नाटकांना ते सहसा जात नसत; परंतु महाराष्ट्रीय

विद्यार्थ्यांचं नाटक असलं कीं ते न चुकतां उपस्थित असत. युनिव्हर्सिटींत मोठमोठ्या पगारांच्या अध्यापकांच्या जागेवर मालवियांनीं महाराष्ट्रीय माणसं निवडलीं होतीं. गोडबोले, पुणतांबेकर, नारळीकर, जोशी वगैरे यांपैकींच होत. या सर्वांनीं आपल्या अध्यापनांतील कौशल्यानं आणि वागण्यानं कीर्ति आणि लोकप्रियता मिळविलेली आहे. महाराष्ट्रीय मंडळींपैकीं कुणी ना कुणीतरी रोज माझ्या खोलीवर गप्पा मारण्यासाठीं येत. महाराष्ट्र मंडळासाठीं एक स्वतंत्र व्याख्यान झालं पाहिजे असा या सर्वांनीं आग्रह केला व तो मला मान्य करावा लागला. 'भारतीय साहित्य सहकार' या संस्थेतर्फे माझा सत्कार सोमवारीं झाला, आणि महाराष्ट्र मंडळासाठीं जें मीं व्याख्यान दिलं तें मंगळवार ता. २३ रोजीं दिलं. या व्याख्यानाची वेळ संध्याकाळीं साडेपांच वाजतांची ठरली होती. पण मला व्याख्यानाच्या ठिकाणीं पोचायला जवळ जवळ सात वाजले. कारण परिषदेस आलेल्या सर्व प्रतिनिधींची ' सारनाथ 'ला जाण्यासाठीं जी ट्रिप निघाली त्या ट्रिपमध्यें मी गेलों होतों, व आम्ही जरी दुपारचं जेवण आटोपल्यावरोबर ट्रिपला जावयासाठीं बसमध्यें बसलों होतों तरी तिकडून परत यायला आम्हांला अनेक कारणांनीं फार उशीर झाला.

बनारसला येणाऱ्या प्रत्येक माणसानं न चुकतां पहावं असं ' सारनाथ ' हें ठिकाण आहे. प्राचीन काशी या ठिकाणीं होती म्हणतात; आतां हें स्थान बनारसपासून सुमारें चवदा मैलांच्या अंतरावर आहे. बुद्धाला साक्षात्कार झाल्यावर आपल्या नवधर्माचं प्रवर्तन करण्यासाठीं त्यांनं जें पाहिलं जाहीर प्रवचन ( सरमन ) केलं तें बुद्ध धर्माचा पाया समजला जातं. हें प्रवचन ज्या स्थलीं केलं त्याला सारनाथ असं नांव आहे. 'सारंग' ( म्हणजे हरिण ) या शब्दाचा ' सार ' हा अपभ्रंश आहे. त्या काळांत तेथें असलेल्या वनामध्यें हरिणांचे कळप होते, आणि बुद्ध धर्मातील अहिंसा तत्त्वानुसार या हरिणांची मृगया न करतां त्यांचें परिपालन बुद्धाकडून झालं, म्हणून हरिणांचा पालनकर्ता या अर्थानं बुद्धाला 'सारनाथ' हें नांव पडलं असलं पाहिजे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत या ठिकाणीं फर्ग्युसन नांवाच्या एका इंग्रजानं 'नीळ' झाडांची विस्तीर्ण लागवड केली होती. ती सर्व जमीन या फर्ग्युसन साहेबाकडून सरकारनं १८५६ सालीं मिळविली. सरकारी खात्यानं पुढं १९१४ सालीं या ठिकाणीं उत्खननाचं काम मोठ्या प्रमाणांत केलं, व बुद्धाच्या वेळचे स्तूप, विहार इत्यादि जे अवशेष सांपडले त्यांचा व्यवस्थित पुनरुद्धार केला. अकबराचा बाप हुमायून आश्रय

घेण्यासाठीं या ठिकाणीं आला होता व त्या प्रसंगाचं स्मारक अकबरानं या ठिकाणीं करून ठेवलेलं आहे तेंहि आज दृष्टीस पडतं. बुद्धाचं पहिलं धर्मप्रवर्तक प्रवचन या ठिकाणीं झालं म्हणून बुद्धधर्मीयांच्या दृष्टीनं हें एक अत्यंत पवित्र यात्रास्थान आहे. हिंदूंच्या दृष्टीनं विश्वेश्वराच्या देवालयाला जें महत्त्व आहे तेंच बुद्धधर्मीयांच्या दृष्टीनं या स्थळाला असल्यामुळें जगाच्या सर्व भागांतले लोक या ठिकाणीं यात्रेला येतात. इथें आज घटकेला माझ्यासारख्याच्या दृष्टीनं पहाण्यासारख्या ज्या गोष्टी आहेत त्या म्हणजे पुष्कळशा सुस्थितींत असलेल्या एक प्रचंड स्तूप ( याचं नांव धामेख स्तूप असं आहे. ) अशोकाचा भग्नस्तंभ, विहारांचे अवशेष, चिनी लोकांनीं बांधलेलं बुद्धाचं देवालय, व ' मूलगंध कुटि ' हें मुख्य देवालय.

ही माहिती मला अर्थात्‌च साऱ्या गोष्टी पाहिल्यानंतर मिळाली. ट्रिपला निघण्या-पूर्वी मीं या स्थळाबद्दलची माहिती करून घेण्याचा प्रयत्न केला नव्हता. आधीं सारी माहिती जमवायची व मग एखादं नामांकित स्थळ पहायचं या पद्धतीचे फायदे असतील; परंतु ती मला आवडत नाहीं. या पद्धतीनं वागलं कीं जिज्ञासेची आणि विस्मयाची तीव्रता कमी होते असं मला वाटतं. म्हणून सारनाथाचा पूर्वेतिहास अगर आज घटकेला त्या स्थळीं काय काय दृष्टीस पडतं याची चवकशी मीं आधीं बिल-कुल केली नव्हती. फक्त आम्ही जेव्हां युनिव्हर्सिटींतून निघालों त्यावेळीं हिंदु युनि-व्हर्सिटींतले इतिहासाचे प्रोफेसर श्रीयुत पांडे यांचा माझा परिचय आदल्या दिव-शींच्या सत्काराच्या वेळेस झाला होता त्याचा फायदा घेऊन मीं त्यांना बसमध्यें माझ्या शेजारीं बसवून घेतलं होतं. इतिहासाच्या अभ्यासकांचा एक गुण मला फार आवडतो. तो हा कीं त्यांचा खास विषय निघाला कीं ते आपोआप बोलके होतात. माहिती सांगण्याचा आग्रह त्यांना करावाच लागत नाहीं. त्यांची बडबड आपोआप सुरू होते. एवढंच कीं ते वाजवीपेक्षां जास्त बोलत रहातात, आणि त्यांतलं लक्षांत किती ठेवायचं व सोडून किती द्यायचं त्याबद्दलचा विवेक आपल्याला करावा लागतो. इतिहास तज्ञाची संगत घडली कीं या जगांत निर्भेळ सुख नाहीं, सोयीबरोबर जरा गैरसोय सोसावीच लागते याचा प्रत्यय आल्यावांचून रहात नाहीं.

• • •

—५—

बनारसहून सारनाथला जावयाला निघालं कीं, आधीं वाटेंत शहराच्या त्या बाजूच्या सीमेवर ‘ भारतमाता मंदिर ’ नांवाचं एक मंदिर लागतं. तें पहाण्यासारखं आहे. हें मंदिर कुणी बांधलं, केव्हां बांधलं, किती खर्च आला, इत्यादि गोष्टींची टिपणं मीं करून घेतलीं होतीं. परंतु आतां तुला पत्र लिहायला बसण्यापूर्वी मीं तीं पुष्कळ शोधलीं तरी सांपडत नाहींत. मीं कांहीं बखर लिहायला बसलों नाहीं किंवा प्रवाशांच्या पत्रासारखं हें पत्र मला लिहायचं नाहीं, तेव्हां मंदिराबद्दलच्या या तपशीलाचं महत्त्वहि कांहीं नाहीं. तुला इतकंच सांगतों कीं, हें मंदिर अगदीं अलिकडचं आहे आणि तें पहाण्यालायक आहे. याला मंदिर म्हणतात परंतु देवळाचा थाट इथें मुळींच नाहींच. इमारतीची बांधणी एखाद्या आधुनिक वाचनालयासारखी आहे, व तूं जर कल्पना केली असशील कीं इथें भारतमातेची मूर्ति गाभाऱ्यांत बसविली असेल तर ती चुकीची ठरेल. इथें सभामंडप नाहीं, गाभारा नाहीं, मूर्ति नाहीं ! तूं विचारशील, मग या ठिकाणीं आहे तरी काय ? सांगतों. शाळेंत मुलांना भूगोल शिकविण्याच्या कामीं उपयोगीं पडावेत म्हणून भूपृष्ठ दाखविणारे चिकण मातीचे नमुने तयार करतात ना, तसला हिंदुस्थान देशाचा ( अर्थात् पाकिस्तान फुटून निघण्याच्या आधींचा अखंड हिंदुस्थानचा ) एक भव्य नमुना या ठिकाणीं एका प्रशस्त हॉलच्या मधोमध ठेवलेला आहे. पांढऱ्या व काळ्या संगमरवरी दगडाचा हा बनविलेला आहे. सर्व नद्या, अरण्यं, वाळवंटं, प्रमुख शहरं, पर्वतांच्या रांगा यांत अगदीं कांटेकोर मापं संभाळून दाखविल्या आहेत. कुस्तीचा हौद असतो तश प्रकारच्या एका चौकोनी हौदांत हा नमुना बसविलेला आहे. या जागेला चोहों-बाजूंनीं कठडा आहे. त्याला रेलून हा नमुना वरून तर पहातां येतोच परंतु शिवाय

समुद्रसपाटीशीं समांतर डोळे लावले तर हिंदुस्थान कसा दिसेल तेंहि पहातां येतं. यासाठीं तळघरासारखी एक जागा केली असून तेथें एक खिडकी ठेवलेली आहे. वरच्या हॉलमध्यें चारी बाजूंच्या भिंतीवर प्रमुख हिंदी पुढाऱ्यांच्या तसबिरी लावलेल्या आहेत. या मंदिराच्या आवारांत एक मोठं वाचनालयहि आहे. या मंदिराच्या कल्पनेची नक्कल जिकडे तिकडे जरूर झाली पाहिजे, आणि या मंदिरांत विद्यार्थ्यांना वरचेवर नेलं पाहिजे असा विचार माझ्या मनांत आला.

हें ठिकाण पहाण्यासारखं खचित आहे तथापि ते पहाण्यांत फार वेळ घालविण्यासारखं तेथें कांहीं नाहीं. त्यामुळें आमच्या बसेस तेथून लवकरच पुढं निघाल्या. रेल्वेरस्ता ओलांडून जरा पुढं गेल्यावर बनारस शहराची हद्द संपली, व दुतर्फा शेतं जमिनी आणि तुरळक खेडुतांच्या झोंपड्या दिसूं लागल्या. अखेर 'सारनाथचा रस्ता' अशी पाटी दिसली. तिथें आमच्या बसेस वळल्या. लवकरच आम्ही सारनाथच्या परिसरांत शिरलों व माझ्या शेजारीं बसलेले इतिहासाचे प्रोफेसर पांडे 'हें पहा, तें पहा' असं म्हणून ज्याकडे ते बोट दाखवीत त्याचा इतिहास मला सांगूं लागले. डाव्या हाताला दगडाविटांचा व मातीचा एक प्रचंड ढिगारा दिसला, त्याकडे बोट दाखवून ते म्हणाले, "सारनाथला एकंदर तीन भव्य स्तूप बुद्धाच्या काळांत बांधले, यांतल्या एकाचे हे अवशेष आहेत. या ठिकाणीं हुमायुनानं मुक्काम केला होता. बुद्धाच्या आयुष्यांत एक काळ असा येऊन गेला कीं त्याच्या शिष्यांना त्याच्या वैराग्याबद्दल शंका वाटूं लागली. त्याचे पांच शिष्य त्याला सोडून आले ते या ठिकाणीं राहिले. मात्र बुद्ध जेव्हां सारनाथला आला व त्यानं जेव्हां पहिलं धर्मप्रवर्तक प्रवचन केलं तेव्हां त्याच्याअवतारीपणाची खात्री पटून ते शिष्य त्याला शरण गेले..."

प्रो. पांडे यांची ही हकीकत 'हुं, हुं' म्हणत ऐकतां ऐकतां मी आजूबाजूस दृष्टि टाकीत होतों. इतक्यांत आमची बस सुमारें मैलभराचं अंतर ओलांडून एका बगिच्यापाशीं थांबली, व आम्ही सगळे खालीं उतरलों. जुन्या विहारांचे अवशेष, अशोकाचा भग्न स्तंभ, पुष्कळच सुस्थितींत असलेला एक स्तूप, चिनी लोकांनीं बांधलेलं देऊळ, आणि बुद्धाचं मुख्य मंदिर, या साऱ्या गोष्टी अर्धा पाऊण मैलाच्या आवारांत आहेत. 'विहार' म्हणजे बुद्धांच्या रहाण्याच्या जागा. इथें मधोमध एक मोठा हॉल आहे आणि त्याच्या दुतर्फा हे विहार आहेत. या सगळ्यांचं बांधकाम

अर्थात् दगडाचं आहे. या ठिकाणीं परमार्थ विद्येचं अध्ययन आणि अध्यापन चालत असे. आज जशी बनारसची हिंदु युनिव्हर्सिटी आहे तशी ही एक सहाव्या शतकांतली युनिव्हर्सिटी होती म्हणेनास. अशोकाच्या भग्न स्तंभांचे दोन तुकडे या शिबिरांतील हॉलमध्येंच मांडलेले आहेत. या स्तंभाचा अगदीं वरचा कळसाचा भाग म्युझियममध्यें ठेवलेला आम्ही नंतर पाहिला. या कळसाचं चित्र आतां आपल्या पोस्टाच्या तिकिटावर तुला दिसेल. चार सिंह पाठीला पाठ लावून बसलेले आहेत अशी ती आकृति आहे. या स्तंभाची भव्यता तर चटकन् नजरेंत भरतेच, परंतु तिच्याहूनहि अधिक आश्चर्यकारक आणि नमुनेदार वाटतं तें त्या स्तंभाचं पॉलिश. स्तंभ इतका गुळगुळीत केलेला आहे कीं मेणाचं चित्र देखील यापेक्षां अधिक गुळगुळीत नसेल. दगडाला इतकं सुंदर पॉलिश करण्याची त्या काळची विद्या आतां नष्ट झाली आहे.

या विहारापासून थोडयाच अंतरावर 'धामेख' स्तूप आढळतो. बुद्धाच्या काळांत या ठिकाणीं एकंदर तीन स्तूप बांधले गेले. त्यांपैकीं बऱ्याच सुस्थितींत असलेला हा एवढाच एक स्तूप आहे. तूं म्हणत असशील 'स्तूप' 'स्तूप' ही काय भानगड आहे. पुण्याच्या शनिवारवाडयाचे बुरुज तूं पाहिले आहेस ना. त्या बुरुजासारखेच हे स्तूप असतात. कांहींतरी प्रचंड बांधकाम अगर शिल्प उभारून आपली आठवण मागं ठेवण्याचं बुद्धधर्मीयांना आणि प्राचीन हिंदूंना व्यसनच होतं असं दिसतं. या प्रचंड स्तूपाचा गाभा विटांचा आहे, व त्यावर दगडाचं वेष्टण आहे. दुरून पहातांना या स्तूपाची भव्यता समजत नाहीं, परंतु त्याच्याजवळ जाऊन उभं राहिलं कीं त्याचा प्रचंडपणा कळतो. 'धामेख' हा 'धर्ममुख' या शब्दाचा अपभ्रंश आहे हें तुला सांगितलं म्हणजे या नांवाचं औचित्य तुला कळेल. सरकारी खात्यानं जेव्हां 'सारनाथ'चं संशोधन व उत्खनन केलं तेव्हां या 'धामेख' स्तूपाच्या आसपास मोठमोठे दगडी खलबत्ते सांपडले असं सांगतात. या दगडी खलबत्यांचा उपयोग औषधी रसायनें तयार करण्याकडे होत असावा व बुद्धांच्या काळांत येथें जवळच रुग्णालय असावं असा संशोधकांचा तर्क आहे. या 'धामेख' स्तूपाखेरीज जो आणखी एक तिसरा स्तूप या ठिकाणीं प्राचीन काळीं होता तो जगत्‌सिंग यानं मुद्दाम पाडला आणि त्यांतलं साहित्य नेऊन एक पेठ वसविली. हल्लींच्या बनारस शहरांत 'जगत्‌गंज' म्हणून एक पेठ आहे खरी. सारनाथ येथील स्तूपांतली माती, दगड आणि विटा आतां कुठल्या इमारतींत आहेत, व त्याच्या आश्रयानं बुद्ध भिक्षूंच्याऐवजीं आज कोणते लोक

रहात आहेत तें बघ. काळापुढं नमस्कार असो, असं सुभाषित आहे तें कांहीं खोटं नाहीं. 'एकेकाचं नशीव' नांवाची गडकऱ्यांची कविता आहे, नाहीं? मी कवि असतों तर या स्तूपांतल्या विटादगडांना उद्देशून कदाचित् काव्य केलं असतं. हल्लीं मुक्त-छंद नांवाचा जो काव्य-प्रकार कांहीं कवि घडवीत आहेत त्याला असले विषय फार सोईचे !

बुद्धाचीं जीं दोन देवळं आहेत त्यांतलं चिनी लोकांनीं बांधलेलें देऊळ आम्ही प्रथम पाहिलं. देऊळ म्हणजे एक मोठा प्रशस्त हॉल आहे. तिथं मधोमध एका चव-थऱ्यावर बुद्धाची संगमरवरी मूर्ति आहे व चहूबाजूंच्या भिंतींवर बुद्धाच्या आयुष्यां-तील मुख्य मुख्य प्रसंग दाखविणाऱ्या तसबिरी आहेत. बुद्धाची मूर्ति आसन घालून बसलेली आहे, आणि ती चिनी कारागिरानं बनविली असल्यामुळें तिचं नाक आणि डोळे बारीक आहेत. ' आपणांसारखे करिती तात्काळ ' हें सुभाषित साधुसंतांनांच नव्हे तर शिल्पकारांनाहि लागू असल्याचं हें प्रमाण म्हणावं लागेल.

शिल्पकारांनाच काय म्हणून ? चित्रकारांना देखील ! कारण भोंवतालच्या भिंतीं-वरच्या तसबिरी मी पाहूं लागलों तेव्हां हंसूं आल्यावांचून राहिलं नाहीं. या प्रत्येक चित्रांत बुद्धाच्या आयुष्यांतला कोणता प्रसंग दाखविला आहे त्याचा खुलासा खालीं इंग्रजींत छापला आहे खरा, परंतु प्रत्यक्ष चित्रांत बुद्ध, त्याची आई, मावशी, त्याची भार्या इत्यादि ज्या व्यक्ति दाखविल्या आहेत त्यांची ओळख पटणं कठीण आहे. या साऱ्या व्यक्तींचे नाक डोळे आणि शरीराची ठेवण रोमन लोकांसारखी आहे, व त्यांचीं वस्त्रं, वेशभूषा, हीं देखील अगदीं अस्सल रोमन थाटाचीं आहेत. हीं चित्रं काढ-णारा युरोपियन होता तेव्हां त्यानं खुशाल बुद्धाला व त्याच्या आप्तांना रोमन बन-वून टाकलं ! राम, लक्ष्मण, सीता अथवा राधाकृष्ण यांचीं असलीं रोमन थाटाचीं चित्रं आपल्या देवळांतून टांगलीं तर आपल्या मनाला केवढा धक्का बसेल हें मनांत येऊन मीं तिथल्या व्हिजिटर्स बुकांत मोठमोठ्या अक्षरांत लिहून ठेवलं, ' या देवळां-तलीं सारीं चित्रं भिंतीवरून काढून फेकून देण्यांत यावींत. '

या तसबिरींत बुद्धाच्या आयुष्यांतील जे प्रसंग एका युरोपियन चित्रकारानं चित्रित केले आहेत तेच प्रसंग अलीकडे नव्यानं बांधण्यांत आलेल्या मुख्य सारनाथ मंदिरांत ' कोसेत्सु नोसु ' नांवाच्या जपानी चित्रकारानं सभामंडपाच्या चारी भिंतींवर

चितारले आहेत. ते कितीतरी सुंदर आहेत ! हीं भिंतींवरचीं चित्रं मी फार वेळ पहात राहिलों. या चित्रांत दाखविलेले कांहीं प्रसंग चिकित्सेला पटत नाहींत. उदाहरणार्थ, बुद्धाची आई मायावती हिला गर्भ राहिल्याचा प्रसंग चितारलेला आहे, त्यांत मायावती शय्येवर डोळे मिटून निजलेली आहे व तिच्या उदरांत एक शुभ्र धवल हत्ती ( हत्ती हें ज्ञानाचं प्रतीक समजतात. ) शिरतो आहे असं दाखविलं आहे. बुद्ध जन्मला तो आईच्या जनन-स्थानांतून बाहेर न येतां डाव्या कुशींतून बाहेर आला, जन्मतांच तो चांगला पांच वर्षांच्या बालकाएवढा होता, व त्यानं तीन पावलं टाकलीं, असाही एक प्रसंग चितारला आहे. मला वाटतं असल्या हास्यास्पद भाकडकथा थोर पुरुषांच्या चरित्रांत घुसडल्या जातातच. कृष्णचरित्रांत आहेतच कीं त्या ! तेव्हां या चित्रांत असलीं चमत्कारांचीं जीं चित्रं होतीं त्यांकडे ऐतिहासिक सत्याच्या दृष्टीनं मी पहातच नव्हतों, आणि कलेच्या दृष्टींनं तीं मला फार सुबक वाटलीं. बुद्ध आपल्या पत्नीला सोडून गेला त्या प्रसंगाचं चित्र तर फार नामी आहे. बुद्ध फार देखणा राजपुरुष होता, या गोष्टी चित्रकारानं सतत ध्यानांत ठेवलेल्या आहेत, आणि चित्रांत जपानी थाट त्यानं आणलेला आहे तो फक्त रेषांच्या आणि रंगांच्या पद्धतिपुरता.

या मुख्य मंदिराचं नांव ' मूलगंध कुटि ' असं आहे. ' गंध कुटि ' हें नांव बुद्धाच्या अनेक शिष्यांच्या वसतिस्थानांना दिलेलं आहे, तेव्हां या सर्व गंधांचं मूलस्थान जें बुद्धाचं रहाण्याचं ठिकाण त्याला ' मूलगंध कुटि ' हें नांव देण्यांत औचित्य खास आहे. हें मंदिर एका लहानशा उंचवटयावर बांधलेलं आहे, व मंदिराची इमारत प्रचंड नसली तरी पुरेशी भव्य आहे, आणि गोंडस तर फारच आहे. मंदिराच्या पायऱ्या चढून वर गेलं कीं सभामंडपाच्या अलीकडे जी अरुंद लांबट बोळासारखी जागा आहे तिथें खूप मोठया आकाराची एक घंटा टांगलेली आहे. या घंटेचा विशेष असा कीं ती वाजविण्यासाठीं तिच्यांत धातूचा लंबक टांगलेला नाहीं. एक जाडसा बांबूचा दांडा सुंदर रंगवून घंटेपुढं अशा बेतानें टांगला आहे कीं तो आपण घंटेकडे जोरानं लोटला म्हणजे घंटेच्या बरोबर मध्यावर त्याचा आघात व्हावा. हा आघात झाला कीं घंटेंतून ' घण ' असा आवाज निघत नाहीं, तर ' घॉं ऽ ' असा गंभीर आणि मधुर आवाज निघतो, आणि तो ऐकल्याबरोबर नेहमींच्या हिंदु देवालयांतल्या वातावरणाहून कसल्यातरी निराळ्या वातावरणांत आपण आलों आहोंत

असं वाटल्यावांचून रहात नाहीं. सभामंडप बराच मोठा आहे, व चार बाजूंच्या भिंतींवरील चित्रांमुळें त्याला रम्यता आली आहे. गाभाऱ्यासारखी जी जागा सभामंडपाच्या टोंकाला आहे तिथें संगमरवरी चौथऱ्यावर बुद्धाची मूर्ति आहे. ही मूर्ति संगमरवरी दगडाचीच आहे परंतु तिला सोनेरी रंग दिला आहे. मूर्ति अत्यंत देखणी आहे. मांडी घालून बसलेला बुद्ध 'धर्म प्रवर्तक चक्र मुद्रा' नांवाची मुद्रा आपल्या दोन्ही हातांनीं करीत आहे. या मुद्रेंत हातांचीं बोटं बुद्धानं कशीं धरलीं आहेत तें मी तुला समक्ष सांगेन. तुझ्या नाचांत या मुद्रेचा अंतर्भाव तूं जरूर कर. फारच गोड मुद्रा आहे ही. बुद्धाच्या मूर्तीच्या खालच्या बाजूस चवथऱ्याची जी पट्टी आहे तिच्यावर हरिणांच्या आकृती आणि त्यांच्या मधोमध चक्र दाखविलेलं आहे. हीं शिल्पचित्रंहि भारी मनोहर वाटतात. हरिणाला बुद्ध धर्मात फार महत्त्व होतं असं दिसतं. बुद्धकाळांतल्या राजमुद्रांवर आणि नाण्यांवर हरिणाचंच चिह्न असे; आणि आज घटकेला तिबेटांतील लामांच्या शस्त्रास्त्रांवर देखील हें चित्र आढळतं. हें वाचून तूं म्हणशील, 'सौभद्र' नाटकांत सुभद्रेच्या एका दासीचं नांव 'सारंगनयना' असं आहे, तेव्हां त्या नाटकाचा काळहि बुद्धाच्या वेळचा समजायचा कीं काय? पण तुला ही शंका सुचत असेल तर आपण आपल्या पोतदारांना केव्हांतरी विचारूं.

या मंदिरांतली बुद्धाची मूर्ति ज्या चवथऱ्यावर बसविली आहे त्याखालीं बुद्धाची रक्षा एका करंडकांत ठेवली आहे असं सांगतात. ही माहिती ऐकतांना आणि या मंदिरांत उभं राहून भोंवतालच्या भिंतीवरचीं तीं चित्रं व बुद्धाची ती मूर्ति पहातांना माझ्या मनांत आलं, राजसत्तेचीं साम्राज्यंच कालाच्या उदरांत गडप होतात असं नव्हे तर धर्माचीं साम्राज्यंहि काळ गडप करतो. या सारनाथावर इतिहासाच्या केवढाल्या लाटा येऊन गेल्या! चवदा शतकांपूर्वी या ठिकाणीं किती निराळं आणि केवढं प्रचंड वैभव होतं. अवघ्या एका शतकानंतरच हें वैभव हूणांच्या अत्याचारांनीं किती छिन्नविछिन्न झालं! मध्यंतरीं कित्येक शतकं अशीं लोटून गेली कीं या स्थानाकडे कुणाचं लक्षहि नव्हतं! नंतर विसाव्या शतकाच्या आरंभीं ब्रिटिश सरकारनं भूमिगत अवशेष उकरून काढले व या स्थानाचा उद्धार केला! आणि अखेर 'महाबोधि सोसायटी'नं लाखों रुपये गोळा करून जपानी सरकारच्या मदतीनं १९३६ सालीं सध्याचं हें बुद्धमंदिर बांधलं. मोठमोठीं राज्यं आणि मोठमोठे धर्म अशा चक्रनेमिक्रमांतून जातात! नष्ट होणं हाच साऱ्या गोष्टींचा नियम आहे!

आमच्या बसेस परत निघाल्या तेव्हां या विचारांच्याच तंद्रींत मी होतों. परंतु लवकरच अशी एक गोष्ट घडली कीं या विचारांच्या अगदीं विरुद्ध असा एक विचार मला मान्य करावा लागला. ती एक मोठी सांगण्यासारखी गोष्ट आहे.

● ● ●

# —६—

परिषदेच्या पहिल्या दोन दिवशीं ज्याप्रमाणें प्रतिनिधींना संध्याकाळीं पार्टी होती त्याप्रमाणेंच ती शेवटच्या दिवशीं म्हणजे मंगळवारीं संध्याकाळींही होती. ही पार्टी दिवाण कपूर नांवाच्या एका धनिक गृहस्थांच्या नदी-किनाऱ्यावरच्या बंगल्यावर देण्यांत येणार होती. हा बंगला बनारस शहराच्या सीमेवर व सारनाथच्या वाटेवर असल्यामुळें बेत असा आंखण्यांत आला होता कीं सारनाथची ट्रिप आटपून परत येतां येतां प्रतिनिधींनीं या पार्टीसाठीं दिवाण कपूर यांच्या बंगल्यावर उतरायचं. पार्टीची वेळ कार्यक्रम-पत्रिकेवर छापली होती चार वाजतांची. पण सारनाथहून परत फिरायलाच आम्हाला पांच वाजले. तरी ‘ उशीर होतो आहे ! लवकर आटपा ! ’ असा परिषदेचे-म्हणूनच या ट्रिपचेहि-व्यवस्थापक हिंदु युनिव्हर्सिटींतले तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर आत्रेय यांचा आमच्या मागें सारखा लकडा चालू झाल्यामुळें सारनाथ येथील म्युझियम जितक्या सावकाशपणें पहाण्याची आमची इच्छा होती तितक्या सावकाशपणें आम्ही पाहिलो नव्हतीच ! या घाईमुळें प्रतिनिधी बसेसमध्यें बसल्यावर दिवाण कपूर यांच्या बंगल्यांत शक्यतों लवकर पोचण्यासाठीं बसेस वेगांत निघाल्या. एका बसनं पुढें व्हावं तितक्यांत दुसरीनं तिला गांठावं, तितक्यांत तिसरी मागून येऊन एकदम सर्वांत पुढें जावी, अशी बसेसची शर्यत सुरू झाली. आणि आंत बसलेले सारे तत्त्ववेत्ते लहान मुलांपेक्षांहि अधिक पोरकटपणा करून एकमेकांला हिणविण्यासाठीं आरडा ओरडा करूं लागले !

या शर्यतींत आमची बस् सर्वांत मागं राहिली. बाकीच्या दोन गाड्या खूप पुढें निघून गेल्या. आमच्या बसचा ड्रायव्हर त्यांना गांठण्यासाठीं भलत्या वेगानं निघाला, तेव्हां आम्ही त्याला बजावलं कीं मोक्षप्राप्तीसाठीं आम्ही कांहीं फारसे उत्सुक नाहीं,

गाडी सावकाशच जाऊं दे. त्यानें तें ऐकलं व आमची बस बेताच्या वेगानं जाऊ लागली. पण तितक्यांत पुढें गेलेल्या गाड्यांपैकीं एक गाडी पंक्चर झाल्यामुळें रस्त्याच्या कडेला उभी राहिलेली आहे, व आंतले सारे तत्त्ववेत्ते सडकेवर उतरून उभे राहिले आहेत असं आम्हांला दिसलं. त्या ड्रायव्हरजवळ शिलकी चांगलं चाक नव्हतं, व आमच्या गाडीवर असेल म्हणून तो वाट पहात राहिला होता. सुदैवानं आमच्या ड्रायव्हरजवळ एक शिलकी चाक होतं. त्यामुळें त्या गाडीप्रमाणेंच आमची गाडी रस्त्याच्या कडेला उभी राहिली व नादुरुस्त झालेल्या गाडीला शिलकी चाक बसविण्याचं काम ड्रायव्हर करूं लागले. आम्हांला गाडींतून खालीं उतरण्याचं कांहीं कारण नव्हतं. मी आपल्या जागेवर बसल्या बसल्या आजूबाजूस काय दिसतं तें पाहूं लागलों.

दहाबारा यार्डांच्या अंतरावर चार सहा घरं होतीं. विटांच्या भिंतींचीं आणि मातीनं सारविलेलीं साधीच घरं होतीं तीं. परंतु शेतकऱ्यांचीं नसावींत, जरा सुखवस्तु लोकांचीं असावींत. घरांत पुरुष माणसं नव्हतीं. बायका तेवढ्या होत्या व त्या आपआपल्या घरांतला काम धंदा सोडून एका घरापुढच्या सुंदर सारवलेल्या अंगणांत जमा झाल्या होत्या. कारण एक भिकारी त्यांना गाणं म्हणून दाखवीत होता. एका मोडक्या तोडक्या किनरीवर ' रडूं नको रे गोपाळा, बाळा थांब, बाळा थांब ' हें ठराविक गाणं म्हणणारे आपल्याकडचे भिकारी असतात ना तसला हा भिकारी होता. काविचा रंग देऊन भगवं केलेलं एक लांड पंचेवजा धोतर, भगव्या कापडाचं एक कुडतं, आणि मुंडासं असा त्याचा वेष होता. मी त्याच्याकडे जरा विशेष लक्ष देऊन पहात राहिलों तेव्हां माझ्या-शेजारीं बसलेले प्रो. पांडे आपल्या स्वभावाप्रमाणें मला माहिती देऊं लागले, " हा भिकारी तुम्हांला हिंदु वाटत असेल परंतु तो तसा नाहीं बरं काय. तो जातीनं मुसलमान आहे. दारोदार गाणीं म्हणून भीक मागणाऱ्या या लोकांची जातच्याजात एकेकाळीं मुसलमानांकडून बाटविण्यांत आली. तेव्हांपासून वर्षानुवर्षे हे लोक शिरगण-तीच्या वेळेस आपली जात मुसलमान म्हणून नोंदीत आलेले आहेत. यांचं खाणंपिणं रहाणं हिंदु वळणाचं आहे; हे भीक मागतात ते हिंदूंच्या वस्तींत फिरून; आणि हे गाणीं म्हणतात तीं देखील हिंदु देवदेवतांची आणि राजांचीं. ' गुसांई ' म्हणून हे लोक ओळखले जातात. यांना परत घ्यायला हिंदु धर्म तयार नाहीं.

शिरगणतींत यांची नोंद मुसलमान म्हणून झालेली आहे. कसा चमत्कार आहे पहा. आपल्या देशांत आठ कोट मुसलमान आहेत म्हणतात, पण बाटलेले आणि हिंदु धर्मांत परत येऊं इच्छिणारे असे मुसलमान वजा केले तर खऱ्या अस्सल मुसलमानांची लोकसंख्या दोन कोटी तरी भरेल कीं नाहीं याबद्दल शंका आहे. विचार करा—"

ते सांगत होते त्या हकीगतीकडे माझं खरं लक्ष नव्हतं, किंवा ते मला कोणता विचार करायला लावणार होते तें जाणण्याची उत्सुकताहि मला नव्हती. त्या भिकाऱ्याकडे मी सारखा पहात होतों. ज्या घरापुढं तो उभा होता तिथल्या बायांकडून त्याला दोन मुठी दाणे मिळाल्याबरोबर आपली झोळी सावरून तो तेथून निघाला. मी त्याला मोठ्यांदा हांक मारून जवळ बोलावून घेतलं. आमच्या गाडीच्या जवळ येऊन तो उभा राहिला. माझ्या बोलवण्यानं तो जरा भ्यालेला आणि गांगरलेला दिसला. मीं त्याला म्हटलं, " अरे, तें गाणं म्हणून दाखवीत होतास तें आम्हांला दाखव कीं म्हणून. " त्यानं सलाम केला व तो हसला तेव्हां त्याच्या तोंडांतले बहुतेक दांत पडलेले होते आणि उरलेल्या दांतांना दीर्घ काल धावनाचा संस्कार झाला नव्हता हें मला दिसून आलं. त्यानं आपली किनरी सरसावली, तिच्या एकुलत्या एक तारेवर उजव्या हातानं धनुकली फिरविली व तो गाऊं लागला. त्याचं तें मोडकं तोडकं वाद्य, आणि त्याच्या सुरांत मोठ्या कष्टानं कसा बसा मिळविलेला थकलेला सूर, अशा थाटांत जें गाणं सुरू झालं, तें कोणत्या भाषेंत होतं देव जाणं. परंतु बराचशा ठुमऱ्या ऐकल्यानं मला परिचित झालेले ' मेरे मनवा ', ' पिया ', ' परदेसवा ' अशासारखे कांहीं शब्द त्याच्या त्या कवनांत येऊं लागले तेव्हां मी जरा जास्त लक्ष देऊन ऐकूं लागलों, व जें कवन तो गात होता त्याचा सारांश माझे मित्र प्रो. पांडे यांच्या सहाय्यानं मला कळूं शकला. त्या कवनाच्या अर्ध्या भागांत राजा भर्तृहरीच्या राणीचा विलाप होता. ती म्हणत होती, ' माझा प्रिय पति माझा त्याग करून परदेशीं गेला. आतां माझ्या विरहव्याकुल मनाची समजूत कशी करूं ? ' आणि कवनाच्या उत्तरार्धांत राजा भर्तृहरी परत येऊन तिची समजूत करीत होता. तो तिला म्हणत होता, ' आपण कित्येक वर्षं मोठ्या आनंदानं संसार केला. परंतु दैवाचा योग असा कीं मला आतां वैराग्य आलं आहे. तेव्हां तूं मनाची नीट समजूत घातली पाहिजेस आणि शोक करतां कामां नये. ' मग कवनाचं पालुपद पुन्हां सुरू होत होतं व त्यांत राणी म्हणत होती, ' माझ्या मनाची समजूत मी कशी घालूं ? '

हें गाणं तो पुनःपुन्हां म्हणूं लागला. आम्ही पुरे म्हणेपर्यंत तो गाणार असं दिसलं तेव्हां आम्ही त्याला 'बिदागी' दिली आणि मग उभ्या उभ्या सुरू केलेली ती आपली 'बैठक' संपवून किनरी आणि झोळी सावरीत तो निघून गेला.

आमच्या थांबलेल्या बसेसहि सुरू झाल्या. परंतु माझ्या मनांत त्या किनरीवाल्याचे विचार घोळत राहिले. माझ्या मनांत आलं, कुठला कोण भर्तृहरी राजा आणि कुठला कोण हा दारोदार भिक्षा मागणारा म्हातारा गुसांई! याला भर्तृहरी कोण त्याची कल्पना तरी असेल काय? परंतु हा त्या राजाचीं कवनं म्हणत आपलं पोट भरतो आहे! जवळ जवळ दहा शतकं लोटलीं तरी भर्तृहरीचं चरित्र व त्याचे वैराग्याचे विचार या भिकाऱ्याच्या रूपानं अजून उरलेले आहेत. सारनाथाचं मंदिर पाहून मला वाटलं होतं, नष्ट होणं हाच साऱ्या गोष्टींचा न्याय आहे. परंतु आतां रस्त्याच्या कडेला सहज थांबलों असतांना हा जो अनुभव आला त्यामुळें माझ्या मनांत आलं, थोर व्यक्तींचीं चरित्रं व त्यांचे विचार शतकानुशतकं लोटलीं तरी कोणत्या ना कोणत्या स्वरूपानं कायम रहातात! कायम रहाणं, अमर होणं हाच सर्व गोष्टींचा न्याय आहे!...

तत्त्वज्ञान परिषद आतां समाप्त झाली होती आणि बनारसहून केव्हां परत निघायचं त्याची चर्चा प्रतिनिधि-निवासांत सुरू झाली होती. ता. २४ डिसेंबर रोजीं अलाहाबाद येथें ऑल इंडिया टीचर्स कॉन्फरन्स सुरू व्हायची होती व तिला हजर रहाण्यासाठीं आग्रहाचं आमंत्रण आम्हांला आलं होतं. तें स्वीकारून कांहीं मंडळी तिकडे जाणार होती. मी त्या पार्टींत सामील झालों नाहीं. जबलपूरवरून मी इतकेदां आलों गेलों होतों पण त्या ठिकाणीं मी कधीं थांबलों नव्हतों, व तिथला 'धुवाँधार' नांवाचा धबधबा आणि संगमरवरी खडक पहावयाचें राहिलें होतें. आतां या गोष्टी पहाण्यासाठीं जबलपुरला एक दिवस थांबण्याचं मीं निश्चित केलं. मोगलसराईहून सकाळीं नऊ वाजतां निघून जबलपूरला रात्रीं आठ वाजतां पोचणारी जी गाडी आहे तिनं जायचं मीं ठरविलं. परंतु मोगलसराईवरून नऊ वाजतां निघणारी गाडी सांपडेल अशा बेतानं बनारस कॅंटोन्मेंटवरून सकाळीं निघणारी गाडी नाहीं, तेव्हां हिंदु युनिव्हर्सिटींतून मोगलसराईकडे जाण्यासाठीं टॅक्सी ठरविली. टॅक्सी सकाळीं सात वाजतां येईल व आपण आरामशीर मोगलसराई स्टेशनावर गाडीच्या

वेळेवर जाऊं, अशा समाधानांत आम्ही मंगळवारीं रात्रीं खूप उशीरापर्यंत गप्पा ठोकीत बसलों व मग निजलों.

बुधवारीं सकाळीं लवकर उठण्याचं दिव्य करून, चहा आटोपून, सामान बांधून, व कपडे करून आमची स्वारी बसली; परंतु साडेसात झाले तरी टॅक्सीचा पत्ता कुठें आहे ? आठ वाजले, हळूंहळू साडेआठ झाले, तरी टॅक्सी आली नाहीं ! आतां यापुढें जरी टॅक्सी आली तरी मोगलसराईवरून निघणारी गाडी मिळणं शक्य नव्हतं. बनारस येथील मुक्काम एका दिवसानं उगीचच वाढवावा लागणार व परत प्रवासाचा आंखलेला सारा बेत उस्कटणार या कल्पनेची चीड कशीबशी आवरून कपडे उतरण्याच्या विचारांत मी होतों. इतक्यांत टॅक्सीवाला आला व म्हणाला, "चला." आम्ही त्याला विचारलं, " अरे इतका उशीर कां केलास ? " तो सांगूं लागला, " मला वर्दि आत्तांच कळली. " कुणाच्या समजुतीचा काय घोटाळा झाला होता तो काशी–विश्वेश्वराला माहीत ! तो उलगडीत बसण्यापेक्षां टॅक्सींत बसणं अधिक शहाणपणाचं होतं. गाडीच्या वेळेवर मोगलसराईला पोचणं आतां सर्वस्वी अशक्य होतं. तरी गाडी लेट असली तर सांपडेल असा विचार करून मी निघालों. गाडी वेगांत सुटली. मोगलसराई स्टेशनावर जायचं म्हणजे सबंध बनारस शहर ओलांडावं लागतं, आणि फक्त एकतर्फी रहदारी ज्यावर चालते असा गंगेवरचा एक सखल बोडका पूलही ( कॉजवे ) ओलांडावा लागतो. त्यामुळें टॅक्सीला हजार अडथळे येत होते, आणि ड्रायव्हरनं ब्रेक लावले व हॉर्न बडविण्यास प्रारंभ केला कीं दरवेळीं माझ्या मनांत येत होतं, आतां गाडी साधण्याची आशा मुळींच नाहीं, स्टेशनवर चोवीस तास रखडावं लागणार ! कोथमिरे माझ्याबरोबर आला होता तो तर शर्यतीच्या पंचाप्रमाणं रिस्टवॉच हातांत धरून सेकंदं, मिनिटं मोजीत होता, व मला सांगत होता, ' नऊ पंचवीस ! ' ' साडे नऊ ' ' नऊ पस्तीस ' ' नऊ चाळीस ! '

टॅक्सी स्टेशनाच्या आवारांत उभी राहिल्याबरोबर कोथमिरेनं हमालाला आरोळी ठोकून बोलावलं. सामान घेऊन फलाटाकडे धूम ठोकण्याची जय्यत तयारी आम्ही केली होती. हमाल जवळ येतांच कोथमिरेनं हिंदींत हुकूम सोडला, " सामान काढून डोक्यावर घे. जलदी ! " गाडींतून उडी टाकतां टाकतां त्यानं विचारलं, " कलकत्ता मेल गेली कीं यायची आहे ? " हमालानं उत्तर दिलं, " तीन घंटे लेट आहे. " तें

ऐकतांच आमची सारी धांदल एकदम थंड पडली. थोडी निराशाही झाली. कारण इतके धापा टाकीत आलों तें आगगाडींतही धांवपळ करून बसावं लागलं असतं म्हणजे एकंदर प्रकाराचा योग्य कळस झाला असता. आतां गाडी खात्रीनं सांपडणार होती. पण त्यामुळें आम्ही उगाचच झिंज्या तोडीत आलों असं ठरलं होतं! हें कांहीं बरं झालं नाहीं असं वाटलं!

कोथमिरेला त्याच टॅक्सींत परत पाठवून मीं मग सावकाश तिकिट काढलं व पूल ओलांडून प्लॅटफॉर्मवर गेलों. वेटिंगरूममध्यें सामान टाकलं, रिफ्रेशमेंटरूममध्यें जेवणाची वर्दी दिली, आणि वेळ घालवण्यसाठीं स्टेशनबाहेर पडून रिक्षा केला व गांवांत भटकायला गेलों. बाजारपेठेचा लांबचलांब रस्ता आणि दोन्ही बाजूंस घरं एवढंच गांवाचं रूप दिसलं. भर दुपारच्या उन्हांत धुळीचे लोट हवेंत तरंगत होते, व जाडीं-भरडीं वस्त्रं परिधान केलेलीं माणसं वावरत होतीं. गजबजाट होता, पण धांदल यत्किंचितही नव्हती. सारे व्यवहार थंडपणानं अन् सुस्तीनें चालले होते. जणूं वेळ नांवाची कांहीं चीज आहे याची जाणीवच कुणाला नव्हती. मलाहि त्या घटकेला वेळेची किंमत नव्हती. त्यामुळें एरवीं ज्याकडे मीं लक्ष दिलं नसतं अशा त्या अग-दींच सामान्य, गलिच्छ बाजारपेठेंतल्या आळसटलेल्या मानवी जीवनाकडे कितीवेळ तरी पहात राहिलों.

परत स्टेशनांत आलों तों कळलं कीं कलकत्ता मेल तीन तास नव्हे तर पांच तास उशीरां येणार होती, म्हणजे जवळजवळ अडीच वाजेपर्यंत गाडीची वाट पहात मला वेळ काढावा लागणार होता! रिफ्रेशमेंटरुम्स मधें गेलों. "सावकाश होऊं द्या" असं सांगणारा यजमान कुणी नव्हता. पण माझं मींच स्वतःला तसं सांगितलं. जेवणांत वेळ जाईल तेवढा जायला हवा होता. प्रत्येक घास चाळीस वेळां चावावा आणि मग गिळावा या तत्त्वाचा प्रयोग करून पाह्यला ही वेळ ठीक होती. पण तें कांहीं नीट साधेना. खरोखर चाळीस वेळां रवंथ करणारे कुणी लोक असतील यावरचा विश्वास उडाला. मग चर्वणाची संख्या मोजायचं सोडून दिलं, अन् 'सावकाश' या शब्दाचा सामान्य अर्थ करून जेवलों. वर्तमानपत्रं वाचून काढलीं. बॅग उघडून पानंही खाल्लं. जेवणाच्या टेबलापुढं बसून राहणं आजूबाजूच्या नोकरांच्या दृष्टीनं आतां यापुढं हास्यास्पद ठरेल अशी जेव्हां शंका आली तेव्हांच

तेथून उठलों, व कलकत्ता मेल तीन नंबरच्या फलाटवर यायची होती म्हणून तेथं गेलों. तरी अवघा एकच वाजला होता! अजून दीड तास काढणं भाग होतं! त्या दिवशींच्या एकाहि वर्तमानपत्रांतला एकाहि कोपऱ्यांतला मजकूर मीं शिल्लक ठेवला नव्हता. मग इंग्रजींत म्हणतात त्याप्रमाणें वेळ 'ठार करायचा' (किल) कसा?

शेवटीं ठरविलं कीं प्रवासाला निघाल्यापासून बॅगमध्यें तसंच ठेवून दिलेलं 'सामाजिक मानसशास्त्रा' वरचं पुस्तक वाचायला काढावं, पुढच्या वर्षीं बी. ए. ला हा विषय मला नव्यानं शिकवायचा आहे. यंदा आपल्या ग्रीष्म व्याख्यानमालेंत या विषयावर एक व्याख्यान द्यायचंहि माझ्या मनांत आहे. तेव्हां वाचूं या असा विचार करून पुस्तक काढलं आणि एका बाकावर बसून वाचायला प्रारंभ केला.

किती वेळ मीं तसा घालविला कोण जाणे. पण अखेर कुणी तरी मला अगदीं जवळून विचारलं, "काय फडकेसाहेब! ओळख लागती कां?" तेव्हां मीं पुस्तक दूर करून प्रश्न करणाऱ्या व्यक्तीकडे पाहिलें. आणि पाहिल्याबरोबर मीं म्हटलं,

"अरे! तुम्ही कुणीकडे इकडे?"

माझ्या उजव्या हाताला बाकावर बसलेले ते गृहस्थ दुसरे तिसरे कुणी नसून नाना पाटील होते! हे प्रख्यात क्रांतिसिंह मोगलसराई स्टेशनवरच्या एका बाकावर कुठलं तरी चार आणेवालं डिटेक्टिव्ह गोष्टीचं चोपडं वाचीत गोगलगाईप्रमाणें बसलेले पाहून मला केवढा विस्मय वाटला असेल याची तूंच कल्पना कर!

• • •

# —७—

" एकटेच आहांत कीं बरोबर कुणी आहे ? " मीं नाना पाटलांना विचारलं.

त्यांनीं बोट दाखविलं. बाकाच्या जरा पलीकडे कांवळयावर नाथाजी लाड वाचीत बसलेले मला दिसले. दोघे दाढीवाले इसमही लाडांजवळ दिसले. त्यांचा पाटलांशीं काय संबंध असावा असं माझ्या मनांत आलं. पाटलांच्या सांगण्यावरनं असं दिसलं कीं तनपुरे महाराजांचा मुक्काम गेले कांहीं दिवस बनारसला होता व त्यांच्या दिंडीच्या समारोपासाठीं नाना पाटील आले होते. मीं तर्क केला कीं ते दोघे दाढीवाले तनपुरे महाराजांच्या शिष्यमंडळीपैकीं असून नाना पाटलांना निरोप देण्यासाठीं आले असावेत. मीं पाटलांना म्हटलं,

"तुमचे अहमदाबादच्या बाजूला दौरे झाले त्यांच्या हकीगती वाचल्या आम्ही."

माझ्या स्वरांतली चेष्टा त्यांना कळली कीं नाहीं कोण जाणे. ते म्हणाले,

" हां. चालूं आहे आमचं काम. "

मीं विचारलं, " तुमची तुफान सेना घेऊन हैद्राबादवर हल्ला केव्हां करणार तुम्ही ? "

आतां मात्र बोलण्यांतली खोच त्यांना कळली असावी. कारण–" पाहूं या केव्हां वेळ येते ! " असं कांहीं तरी उत्तर पुटपुटून ते व लाड उठून दूरच गेले, व त्या दोघां दाढीवाल्यांबरोबर चणेफुटाणे खाऊं लागले.

अखेर अडीच वाजतां गाडी एकदांची आली. मीं आपलं 'सामाजिक मानसशास्त्र' बॅगेंत टाकलं, अन् सामान डोक्यावर उचलून घ्यायला हमालाला सांगून गाडींत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम १२३८३२ वि: ...
क्रमांक १८८२ नोंद दिनांक २४।१२।७१


चांगली जागा पकडायसाठीं तयार राहिलों. आतांशा गाड्या बहुतेक उशीरा येतात त्यामुळें गाडी पकडणं सोपं झालं आहे; जागा पकडणंच फार जिकिरीचं होऊन बसलं आहे ! पण सुदैवानं मला एका डब्यांत जागा चांगली मिळाली, आणि वरचा एक बर्थ रिकामा होता त्यावर बेडिंग पसरून गाडी मोगलसराईवरून हालल्याबरोबर मी खुशाल ताणून पडलों. रात्रीं जागरण झालं होतं, आणि स्टेशनवर तब्बल पांच तास ताटकळत काढावे लागले होते त्याचा त्रास त्या जागरणाहूनही अधिक झाला होता. शिणून गेलेलं अंग बर्थवर टाकून भरपूर आळस दिल्यावर मला बरं वाटलं, आणि लवकरच झोंप लागली.

०७५५५

पांच तास लेट असल्यामुळें गाडी जबलपूरला पोंचली तों रात्रीचे साडेबारा झाले होते, मुक्कामावर पोचून निजावयास दीड वाजला. जबलपुरास फक्त एकच दिवस मी काढणार होतों. धुवाँधार धबधबा आणखी संगमरवरी खडक पाहण्याचे एवढाच कार्यक्रम मनाशीं ठरविला होता. पण सकाळीं उठून चहा घेऊन दाढी उरकतो न उरकतो तोंच एक गृहस्थ भेटायला आले, व त्यांनीं हळूंच विषय काढला, " इथें कधीं नव्हे ते आपण आलां आहांत. आम्हांला आपलं व्याख्यान ऐकायला मिळालंच पाहिजे." जबलपूरला महाराष्ट्र हायस्कूल नांवाची मोठी शाळा आहे तिचे हे मुख्याध्यापक होते. यांचं नांव ओक. मीं सांगितलं व्याख्यानासाठीं मी आलों नाहीं. पण ते ऐकेनात, " इथें जबलपुरांत फार मोठा महाराष्ट्रीय समाज आहे. आमच्या शाळेच्या मराठी विभागांत सहासातशें महाराष्ट्रीय विद्यार्थी आहेत. त्यांची निराशा करूं नका..." वगैरे भाषा ते करूं लागले. मीं म्हटलं, " व्याख्यानाचे पैसे घेतल्याशिवाय मी बोलत नाहीं. हे पैसे मला नकोत, तुमच्या शाळेंतल्या " पुअर बॉईज फंडा"ला ते जमा करून घ्या. पण माझं व्याख्यान फुकट ऐकायला मिळूं देणार नाहीं मी लोकांना. " मला वाटलं होतं कीं हें ऐकल्याबरोबर त्यांचा आग्रह थंडावेल व मी व्याख्यानाच्या व्यापांतून सुटेन. पण तसं झालं नाहीं. त्यांनीं माझं म्हणणं मान्य केलं, व मग रुकार देण्यावांचून मला गत्यंतर उरलं नाहीं. व्याख्यानाची वेळ दुपारीं तीन वाजतांची ठरली. कारण संगमरवरी खडक चांदण्यांत पाहण्याची खरी मौज आहे असं मीं ऐकलं होतं म्हणून ते पाहण्यास रात्रीं जावं असा बेत केला होता. व्याख्यान पांच साडेपांचपर्यंत आटपलं कीं, निर्वेधपणें सहा साडेसहा वाजतां 'मार्बल रॉक्स' कडे जावयास आपल्याला निघतां येईल अशा हिशेबानं व्याख्यानासाठीं ही दुपारची वेळ आम्ही ठरविली. वेळ जरा अडचणीची

होते अशी थोडीशी कुरकूर ओकांनीं केली. पण मीं म्हटलं होऊं द्या हो. मला त्या व्याख्यानाबद्दल फारसा उत्साह नव्हता. शंदोनशें लोक जमतील त्यांच्यापुढें अर्धा पाऊणतास करूं कांहीं तरी वडबड असा माझ्या मनांतला विचार.

पण नंतर हा कार्यक्रम मला बदलावा लागला. 'मार्बल रॉक्स' चांदण्यांत पहाण्याची मजा असते खरी, पण चंद्र ऐन माथ्यावर असला तर! आज चतुर्दशी असल्यामुळें रात्रीं सात-आठाच्या सुमारास तो तसा असण्याऐवजीं क्षितिजापाशीं असणार व 'मार्बल रॉक्स' वर ऐन चांदण्याचा झोत पडण्याऐवजीं सावल्याच पडलेल्या असणार, शिवाय थंडीही फार असेल, असं लोक सांगूं लागले. त्यामुळें मार्बल रॉक्सवर रात्रीं जाण्याची कल्पना मला सोडून द्यावी लागली, आणि व्याख्यान उरकून तिकडे जाण्या-ऐवजीं व्याख्यानाच्या अगोदरच तिकडे जाऊन येण्याचा बेत मला ठरवावा लागला.

कार्यक्रमांतला हा बदल ओकांना कळवितां आला नाहीं; आणि शिवाय मार्बल रॉक्सकडे जाण्यासाठीं आपण बारा वाजतां निघालों तर परत यायला फार तर साडे-तीन होतील, आणि अर्ध्या तासाचाच उशीर होईल, अशी कल्पना असल्यामुळें ओकांकडे निरोप धाडला नाहीं तरी चालेल असं वाटलं. परंतु लवकर निघायचं म्हणतां म्हणतां आम्ही प्रत्यक्ष निघालों तेव्हां एक वाजून गेला होता. ज्यांच्या खाजगी गाडींत आम्ही निघालों ते श्रीयुत सराफ मिलिटरी कॉंट्रॅक्टर आहेत. रस्ता सुरेख असल्यामुळें त्यांची छोटी गाडी खूप वेगांत चालली होती, आणि त्यांच्या आमच्या गप्पा व सिगारेटची देवाण-घेवाणहि चालू होती. सुमारें चार मैल गेल्यावर डाव्या हाताकडे बोट दाखवून श्री. सराफांनीं विचारलं, "त्या देवळाचं नांव माहीत आहे काय?" त्यांच्या बोटाच्या दिशेनं मीं डाव्या बाजूला पाहिलं तों साधारणपणें पुण्याच्या पर्वतीएवढ्या टेकडीवर एक दगडी देऊळ दिसत होतं. मीं त्याचं नांव विचारलं तेव्हां श्री. सराफ म्हणाले, "पीसनहारीका मढैय्या या शब्दांचा अर्थ कळतो कां तुम्हांला?" बिहाग रागांत 'हमरे मढैय्या' अशा आरंभाची एक चीज आहे तिची मला एकदम आठवण झाली, आणि मीं म्हटलं, "हो हो. पीसनहारी म्हणजे पिसणारी म्हणजे दळणारी, आणि मढैय्या म्हणजे मंदिर किंवा घर किंवा ठिकाण." ते म्हणाले, "बरोबर आहे, पण या देवळाला हें नांव कां पडलं त्याची छोटीशी

मनोरंजक हकीगत आहे, सांगूं कां तुम्हांला ?" मीं म्हटलं, "सांगा." त्यांनीं सांगितलेल्या हकीगतीचा सारांश असा, कीं पूर्वीं (म्हणजे कितो पूर्वीं तें मीं विचारलं नाहीं.) एक दळण दळणारी बाई होती. तिनं दळणावर होणाऱ्या कमाईतून पैसापैसा अशी बचत केली, आणि अशाप्रकारें जमलेल्या पैशांतून या डोंगरावर हें देऊळ बांधलं. म्हणून या देवळाचं नांव पडलं पीसनहारीका मढैय्या. ही हकीगत सांगून सराफ म्हणाले, "आतां जातांना हें देऊळ पहाणार कीं येतांना ?" मीं विचारलं, "पहाण्यासारखं विशेष कांहीं आहे काय ?" ते म्हणाले, "विशेष कांहीं नाहीं." मीं सांगितलं, "मग आपल्याला इथें जातांनाहि उतरायचं नाहीं आणि येतांनाहि नाहीं." व्याख्यानाच्या जागीं पोचायला भलताच उशीर होऊं नये असं मला वाटत होतं. मग वाटेंतल्या इतर गोष्टी अशाच प्रकारें दुरूनच पाहून मार्बल रॉक्सच्या रोखानं आमची गाडी निघाली. अवघ्या बारा मैलांचाच प्रश्न होता. रस्ताहि बहुतेक शेवटपर्यंत चांगला होता. त्यामुळें आमची छोटी गाडी अर्ध्यातासांतच मार्बल रॉक्सवर पोचली.

या ठिकाणीं मुख्यतः दोनच गोष्टी पहावयाच्या होत्या. धुवाँधार धबधबा आणि संगमरवरी खडक. आम्ही प्रथम धबधबा पहायचं ठरविलं. जिथं आम्ही मोटारींतून खालीं उतरलों तिथून सुमारें एक मैलाच्या अंतरावर धुवाँधार होता. धबधब्यापर्यंत गाडी-वाट आहे पण ती इतकी चढउताराची व धुळीनं भरलेली दिसली कीं सराफांची छोटी बेबी गाडी त्या सडकेनं सुखानं जाण्यासारखी नव्हती. म्हणून आम्ही पायींच निघालों. माझी कल्पना कशी कीं आपण धबधबा पहायला जात आहोंत तेव्हां त्याची गर्जना आधींपासून कानावर येईल. परंतु मी अगदीं लक्ष देऊन चाललों तरी कसलाहि आवाज ऐकूं येईना अगर आपण एका उंच कड्याच्या बाजूनं जात आहोंत असंहि रस्त्याच्या स्वरूपावरून वाटेना. उलट ज्या ठिकाणीं आम्ही मोटारींतून उतरलों होतों त्या ठिकाणाहून खालच्याच पातळीवर आमची वाट जात होती असं दिसलं. मी मनाशीं जरा आश्चर्य करीतच पावलं टाकीत होतों. तितक्यांत कोणसं म्हणालं, "तो पहा धुवाँधार."

आम्ही धबधब्याच्या अगदीं जवळ जाऊन बसलों. माझी बरीच निराशा झाली. एखादा प्रचंड जलप्रपात पहावयास मिळेल अशी जी मीं मनाशीं कल्पना केली होती ती सर्वस्वी खोटी ठरली होती. फार तर पंधरा वीस यार्डांच्या लांबीच्या अर्धवर्तुळा-

तील तीन खांचांतून पाण्याचे ओघ खालीं पडत होते. या तीन धारांची उंची फार तर चार पांच पुरुष असेल. पहाण्यासारखी गंमत वाटली ती एवढीच कीं पाण्याच्या धारा खालीं पडल्या कीं जे फवारे उडत ते जवळ जवळ वरच्या खडकाच्या कंगोऱ्याशीं समांतर येत, आणि सूर्यप्रकाशाचा तिरपा झोत पडल्यामुळें फवाऱ्याच्या सहस्र बिंदूंत इंद्रधनुष्याचे सारे रंग दिसत. या दृश्याकडे सारखी नजर रोखून बसलं कीं पाण्याचं छतच्याछत धुक्याप्रमाणें पसरल्यासारखं दिसतं. म्हणूनच धुवाँधार हें नांव पडलेलं असावं. खडकाच्या तीन निरनिराळ्या चिरांतून खालीं पडणाऱ्या पाण्याचा वेग व स्वच्छ निळसर हिरवट रंग, तिन्ही धारा ज्या ठिकाणीं आपटत होत्या तिथल्या पाण्याच्या फेसाचा अगदीं शुभ्र पांढरा रंग, आणि परत वर उसळी घेणाऱ्या फवाऱ्यांत दिसणारे इंद्रधनुष्याचे रंग ही शोभा फार सुंदर होती. तळाशीं ज्या ठिकाणीं पाणी फेसाळत होतं तिकडे सारखी टक लावून बसलं कीं तिथलं पाणी सारखं उकळत आहेसं वाटे. आपण एकदां चिंचवाड गांवीं गेलों होतों तिथें उसाचा रस कढविण्याच्या मोठमोठ्या काहिल्या पाहिल्या होत्या ना, त्या काहिल्यांतल्या उकळत्या रसाची मला आठवण झाली. आम्ही ही शोभा पहात पुष्कळ वेळ बसलों. परंतु दूरदूरच्या गांवांहून येऊन पहाण्यासारखं कांहीं हें दृश्य मला वाटलं नाहीं. लीला चिटणीस यांनीं ' धुवाँधार ' नांवाच्या एका चित्रपटांत काम केलं ( तो कधींच पुरा झाला नाहीं असं ऐकतों. कां झाला आहे ? ) त्या चित्रपटांतील बरेच देखावे या ठिकाणीं घेण्यांत आले होते म्हणे. त्या चित्रपटाच्या निर्मात्याला अगर दिग्दर्शकाला या स्थळांत एवढं अपूर्व काय वाटलं कोण जाणे ! आपला गोकाकचा धबधबा याहून कमी सुंदर खचित नाहीं. लांबलांबचे लोक इथें येऊन घटकान् घटका या धबधब्याकडे पहात बसतात असं समजलं. आमच्या आधीं शीख स्त्री–पुरुषांचं एक टोळकं आणि लठ्ठ पोटाच्या गुजराथी शेठ-शेटाण्यांचं दुसरं टोळकं ( ही मंडळी अर्थात्च धबधब्याच्या शोभेकडे पहाण्याऐवजीं शेवया, गाठी, भजी यांचा समाचार घेण्यांत गुंतली होती ! ) अशीं दोन टोळकीं येऊन बसलीं होतीं, आणि चांगल्या दोन चार घटका त्या ठिकाणीं काढण्याचा त्यांचा विचार उघड दिसत होता. आम्ही मात्र पंधरा वीस मिनिटेंच बसून उठलों आणि तेथून निघालों.

धुवाँधारचं पाणी तळाशीं पडल्यावर दरीच्या तळाकडे संथपणें वहात जातं. नर्मदा नदीचा हा प्रवाह पुष्कळ पुढें गेल्यावर एके ठिकाणीं संगमरवरी खडकांच्या उंच उंच

रांगांतून तो वाहतो. संगमरवरी खडक पहावयाचे ते याच जागचे. आम्ही ज्या ठिकाणीं मोटर सोडली होती त्या ठिकाणीं परत गेलों. तेथून जवळ जवळ शंभर यार्डांची उतरण उतरून खालीं गेलों कीं एक घाट लागतो. या घाटावरूनच मार्बल रॉक्स पहावयास आलेल्या प्रवाशांना छोटया छोटया नावांतून नेण्याची सरकारी व्यवस्था आहे. हातांनीं वल्हविण्याच्या दोन नावा आम्हांला दिसल्या, व त्याखेरीज एक स्टीम लॉंचहि दिसला. स्टीम लॉंचचं भाडं थोडं जास्त आहे. आम्ही या लॉंच-मध्यें बसलों व निघालों. या ठिकाणीं नदीचा प्रवाह इतका संथ आहे कीं एखाद्या सरोवरांत आपण नौकाविहार करीत आहोंत असं वाटायला कांहीं हरकत नाहीं. ही एकंदर फेरी एक मैल एक फर्लांगाची आहे. घाट सोडून पन्नास साठ यार्ड गेल्याबरोबर दुतर्फा उंच संगमरवरी खडक दिसूं लागतात व मधल्या फार तर तीस फूट रुंदीच्या बोळकंडींतून आपण जाऊं लागतों. मग ज्या ठिकाणीं लॉंच परत वळते त्या ठिकाणापर्यंत संगमरवरी खडकांच्या या रांगा सारख्या लागतात. एके ठिकाणीं ही बोळकंडी इतकी अरुंद झाली आहे व दोन्ही बाजूंचे खडक एकमेकांच्या इतके जवळ आले आहेत कीं एका बाजूच्या रांगेवरून दुसरीकडे उडी मारणं शक्य आहेसं वाटतं. आमचा लॉंचवाला म्हणाला, " या जागेला 'बंदर–कुद' (वानराची उडी) असं म्हणतात. " 'तो बघा सूर्य' 'तो बघा चंद्र' 'ते बघा घोडयाचे पाय' 'तो बघा हत्ती' असं तो नंतर सारखं सांगूं लागला. पावसाळ्यांत नदीचं पाणी खडकांना घाशीत जात असल्या-मुळें त्यांच्या वेगानं या खडकांवर दाबून उठविल्याप्रमाणें विविध आकृतींचे ठसे उमटलेले आहेत. अशा या आकृतींना सूर्य, चंद्र, हत्ती अशीं नांवं लोकांनीं दिलीं असावींत हें उघड होतं. जीं नांवं रूढ आहेत आणि प्रवाशांना ज्यांचा परिचय हे नावाडी करून देतात त्यांहून कितीतरी आणखी नांवं देण्यासारख्या निरनिराळ्या आकृती या खडकावर उमटलेल्या मी पहात होतों. लहानपणीं ढगांकडे पाहून नाहीं का आपण म्हणत तो पहा उंट, ती पहा बाई, त्यांतलाच हा प्रकार होता. पण आकृ-तींचे चमत्कार सोडून दिले तरी संगमरवरी खडकांची ही शोभा विलक्षण वाटते खचित. या रांगांची उंची फार तर तीस फूट असेल. परंतु शुभ्र पांढरे, निळे, काळे, तांबडे, असे बहुरंगी गुळगुळीत संगमरवरी खडक उन्हांत चमचम करतांना दिसले कीं ही अपूर्व शोभा डोळ्यांत सांठवावी तेवढी थोडीच असं वाटूं लागतं. हें ठिकाण मात्र

हजारों मैलावरून येऊन एकदां पहावं असं आहे. मला वेळ असता तर लॉंचमधून दहावीस फेऱ्या मीं पुनःपुन्हां मारल्या असत्या परंतु एकाच फेरींत समाधान मानणं मला भाग होतं. कारण घड्याळांत पाहिलं तों जवळजवळ पांच वाजले होते.

आम्ही जबलपूरला आपल्या मुक्कामाच्या ठिकाणीं आलों तों साडेपांच वाजून गेले होते ! आणि व्याख्यानाची वेळ तीन वाजतांची ठरली होती ! आमच्या दाराशीं दोन चार स्वयंसेवक बसलेच होते. मला उतरलेला पहातांच ते जवळ आले व म्हणाले, " चला चला. लोक पावणे तीन वाजल्यापासून येऊन वाट पहात बसले आहेत. आम्ही तुमच्या व्याख्यानाची जाहिरात थोडी करूं शकलों; परंतु आजपर्यंत आमच्या समारंभांना कधीं आला नव्हता एवढा प्रचंड समाज लोटला आहे." मला वाटलं प्रचंड समाज म्हणजे दोनशेंच्या ठिकाणीं चारशें लोक आले असतील. परंतु व्याख्यानाच्या जागीं जाऊन पहातों तों दोन हजारांवर लोक जमलेले दृष्टीस पडले. सकाळीं शाळेची हकीकत लोकांकडून ऐकली होती तेव्हां वाटलं होतं असेल एक सामान्य शाळा. परंतु शाळेची इमारत पुण्याच्या नू. म. विद्यालयाएवढी, मधलं पटांगणहि तसंच भव्य व सुंदर छतानं झांकलेलं, आणि सबंध पटांगण व चहूंबाजूंच्या वरच्या गॅलऱ्या माणसांनीं फुलून गेलेल्या पाहून मी आश्चर्यचकितच झालों. तो समाज पाहून माझी वृत्ति प्रफुल्लित झाली, आणि जें व्याख्यान मी कसंबसं टोलविणार होतों तें माझं मलाच हवंसं वाटूं लागलं. सारे श्रोते तब्बल तीन तास आपल्या जागेवर ताटकळत बसले होते व उशीर झाल्याबद्दल मी त्यांची क्षमा मागेन अशी साहजिकच त्यांची कल्पना होती. मी त्यांची माफी अर्थातच मागणार होतों. परंतु थोड्या वेळानं मी व्याख्यानाला उभा राहिलों तेव्हां मी पहिलं वाक्य बोललों तें असं कीं " मित्रहो, आपण सर्वजण या ठिकाणीं जवळ जवळ तीन तास माझी वाट पहात बसलांत याबद्दल मला फार आनंद होतो. " माझ्या या अनपेक्षित वाक्यामुळें सभेंत मंदहास्य उठलं व अर्ध्या पटांगणांत पांचसहाशें स्त्रिया बसल्या होत्या तिकडून 'अय्या' असे मंजुळ उद्गार ऐकूं आले. मीं पुढें म्हटलं, " आनंद होतो तो अशासाठीं कीं माझं व्याख्यान आपल्याला मनापासून हवं असं यावरून सिद्ध होतं; व ही गोष्ट जशी आपलं सौजन्य दाखविते तितकीच मला भूषणावह आहे. आपण माझ्यावर खूप रागावला असाल, आणि तें योग्यच आहे. मी आपली क्षमा मागतों, व आपला राग पुरता जावा म्हणून असं

सांगतों कीं आतां मला कसलेंहि अवधान नाहीं तेव्हां मी आपल्याला अगदीं पोट-भर व्याख्यान ऐकविणार आहे. " पुन्हां सभेंत हास्य झालं आणि 'अय्या' असे उद्गार निघाले. कधींकधीं अगदीं शिणलेल्या स्थितींत व्याख्यानाला जावं, व्याख्यान कुठून कबूल केलं असं वाटत असावं, परंतु तेंच व्याख्यान कधीं नव्हे असं रंगावं असा अनुभव मला येतो. जबलपूरचं हे दीड तासाचं व्याख्यान असंच झालं. त्यांत माझा मीच रंगून गेलों होतों.

व्याख्यानानंतर ओक आणि इतर शिक्षक यांच्याबरोबर मी चहा पीत बसलों होतों तेव्हां एक तरुण स्त्री दारांत आली व मला हांक मारून म्हणाली, "तुमच्याशीं थोडं काम आहे. ऑटोग्राफ नको आहे मला. दुसरंच काम आहे." मी उठून जवळ गेलों तेव्हां एक पत्र पुढें करून ती म्हणाली, " हें घ्या आणि सवडीनं वाचा. तीन तास वाट पहावी लागल्यामुळें आम्ही कांहींजणींनीं चिडून हें पत्र लिहून काढलं होतं. आम्ही तुमच्यावर फार रागावलों होतों. किती तें या पत्रावरून तुम्हांला कळेल." मीं विचारलं, " पण आतां तुमचा राग गेला ना ? " ती हंसून म्हणाली " अगदीं पार गेला." मीं म्हटलं, " मग तसं या पत्रावर लिहून द्या." ती म्हणाली, " अगदीं आनंदानं. असं व्याख्यान आम्ही जन्मांत ऐकलं नव्हतं." यावरून माझं त्या दिवशींचं व्याख्यान किती चांगलं झालं याची तुला कल्पना येईल. 'काळे-गोरे' नाटकांत तूं काम करीत होतीस तेव्हां कधीं कधीं नाटकाचा प्रयोग कल्पनेपलीकडे रंगत जातो असा अनुभव तुला वारंवार आलेला आहे तो आठवतो काय ? व्याख्यानाचंहि असंच आहे. एखाद्या प्रसंगीं तें असं कांहीं जमतं आणि रंगतं कीं तो एक स्वतंत्र कलात्मक आनंद म्हणावा लागतो. आणि गंमत अशी कीं तें कांहीं सांगतां येत नाहीं. भट्टी साधली एवढाच त्याचा खुलासा !

हें पत्र तुला पुण्याहून लिहिलं आहे. जबलपूर हाच माझ्या प्रवासांतला दूरचा अखेरचा मुक्काम होता. आतां दोन दिवसांनीं मी परत घरींच येणार. जबलपुराहून एक फार मोठी गंमत घेऊन येणार होतों. ती म्हणजे चंडोल पक्षी. मी जिथें उतरलों होतों तिथें एका कोपऱ्यावरच्या सलूनमध्यें हा पक्षी मला दिसला. चंडोळ पक्ष्याचं नांव आपण काव्यांत वाचतों आणि वापरतोंसुद्धां. परंतु चंडोल-गीत रचणाऱ्या कवी-पैकीं कितीजणांनीं हा पक्षी प्रत्यक्ष पाहिला असेल कोण जाणे ! हा पक्षी आकारानं केवढा असतो सांगूं ? एखाद्या लहानशा चिमणीएवढा. पंखांचा रंग किंवा त्यावरलं

डिझाईन यांतहि सौंदर्याचा भाग मला दिसला नाहीं. पण नानातऱ्हेचे अतिशय मंजुळ आवाज इवल्याशा पांखराच्या कंठांतून निघत असतात. बेफिकिर रंगेलपणाचं प्रतीक चंडोल पक्षी समजला जातो तें योग्य आहे. आपल्या तंद्रींत परोपरीचे अति मधुर शब्द काढणाऱ्या या छोट्या पांखराला जगाची बिलकूल फिकीर नसावी असं वाटल्या-वांचून रहात नाहीं. त्या सलूनवाल्यानं याच्यासाठीं पिंजरा किती सुबक तयार केला होता, व चंडोलला थंडी वाजूं नये म्हणून गरम जाड गादीची पिशवी त्यानं पिंजऱ्यावर चढविली होती. तो पक्षी मला दे म्हणून मी त्या सलूनवाल्याची किती आर्जवं केलीं. पन्नास रुपये द्यायलासुद्धां मी तयार झालों. पण त्याचं एकच उत्तर, “ मी काय विकण्यासाठीं पाळलाय काय ? ” मला अतिशय वाईट वाटलेलं पाहून म्हणाला, “ तुमच्यासाठीं दुसरा एक चंडोल मी आणून ठेवतों. पुन्हां जबलपूरला याल तेव्हां मी खास देईन. ” मी विचारलं, “ खरंच आणून ठेवाल माझ्यासाठीं ? ” तो म्हणाला, “ अगदीं कसम. केव्हां याल सांगा. ” मीं खुशाल उत्तर दिलं, “ आणखी एक महिन्यानं येईन. ”

मीं मनाशीं म्हटलं, आतां कोण येणार आहे पुन्हां जबलपूरला. परंतु हें म्हणतांना असंहि वाटलं कीं खरोखरच बेफिकिर रंगेलपणा करायचा असेल तर केवळ तो पक्षी घेण्यासाठीं पुन्हां जबलपूरला जावं ! चंडोल हवा असेल तर चंडोलासारखं झालं पाहिजे, खरं कीं नाहीं ?

• • •

— ८ —

बर्थवर निजल्या निजल्या खिडकींतून बाहेर दृष्टि टाकली तों सूर्य चांगलाच वर आला असावा असं वाटलं. माझ्या डब्यांतला माझा सहप्रवासी आधींच उठून बिछाना बांधून एक हिंदी चोपडं स्वतःशींच मोठमोठ्यांदा वाचीत आणि वाऱ्याच्या झोतानं उडणारीं धुळीनं भरलेलीं केसांचीं झुलपें पुनः पुन्हा वर करीत खिडकीशीं बसला होता. डब्यांतल्या गाद्यांच्या काळ्या मेणकापडावर धुळीचा थर सांचलेला दिसत होता. या बाजूचा प्रदेश सपाट आणि ठिसूळ, त्यामुळें मातीचे फवारे गाडींत सारखे शिरत असतात. खिडकींतून पहावं तों मैल न् मैल सपाट जमिनीचा पट्टा क्षितिजाच्या रेषेपर्यंत जाऊन पोचलेला दिसतो. पाण्याचे लहान मोठे प्रवाह, छोटे मोठे जलाशय, झाडांच्या राई असा देखावा या मुलुखांत कुठेंच दिसत नाहीं. जिकडे नजर टाकावी तिकडे लहान लहान कांटेरी रानझुडपांचे पुंजके तेवढे दिसतात. लक्षांत येण्यासारखा उंचवटा देखील कुठें दिसत नाहीं. दिल्लीच्या लोकांना लहानसा उंचवटा देखील कुतुहलाचा विषय वाटतो व त्याला 'पहाड' अशी संज्ञा ते खुशाल देऊन टाकतात, याचं कारण हेंच असावं....

मी जागा झालों आहें असं पाहून हिंदी किताब पढणाऱ्या माझ्या सोबत्यानं मला विचारलं, "आपण नवी दिल्ली स्टेशनवर उतरणार आहांत ना ?" मीं होय म्हटलं तेव्हां तो म्हणाला, "मग उठा ना. आतां अर्ध्या घंटयाच्या आंत नवी दिल्ली येईल."

"होय ?" असं उद्गारून मी उठलों आणि तोंड धुण्याचं साहित्य घेऊन न्हाणींत गेलों. बाहेर आलों, बिस्तरा बांधला आणि कपडे केले. इतक्यांत गाडी थांबलीच. नवी दिल्ली स्टेशनावर आम्हीं येऊन पोंचलों होतों. माझी कल्पना होती कीं हें

स्टेशन मोठं भव्य असेल. तीस वर्षांपूर्वी मी दिल्लीस एक वर्ष होतों तेव्हां हें स्टेशन नव्हतं. नवी दिल्ली हा दिल्लीचा भागही त्या वेळेस नुकताच कोठें बांधण्यांत येऊं लागला होता. नवी दिल्ली ज्याप्रमाणें भव्य आणि टोलेजंग अशी बनली आहे त्याप्रमाणेंच नवी दिल्ली स्टेशनही मोठं आणि थाटबाज असेल असं मला वाटलं होतं. परंतु माझी कल्पना चुकीची ठरली. बाकी स्टेशन पाहण्यासारखं असतं तरी तें पाहण्यांत वेळ घालवायला मीं तयार नव्हतों म्हणा. प्रवासांत शिणून गेलों होतों आणि केव्हां एकदां काकासाहेब गाडगिळांच्या बंगल्यावर पोचेन असं झालं होतं. घाईघाईनं स्टेशनांतून बाहेर पडलों. माझी कल्पना अशी कीं तेथें वाटेल तेवढ्या टॅक्सी मिळतील. एवढं मोठ्या राजधानीच्या गांवाचं स्टेशन तेव्हां अशा स्टेशनावर टॅक्सींना काय तोटा? परंतु पहातों तों एक देखील टॅक्सी दिसेना. सात आठ टांगे तेवढे उभे होते. परंतु ते देखील सारे चंद्रमौळी. कोल्हापूर इतर बाबतींत कितीही मागासलेलं असो. ज्या गोष्टींत इतर मोठमोठ्या नामांकित शहरांना कोल्हापूरची सर येणार नाहीं अशा कांहीं गोष्टी आहेत, व त्यांत कोल्हापूरच्या टांग्यांची गणना अवश्य करावी लागेल. राजाराम महाराजांनीं शर्यतीचा षोक केला याबद्दल त्यांना दुवा द्या किंवा शाप द्या, परंतु शर्यतीसाठीं निकामी झालेले चपळ उमदे घोडे भाड्याच्या टांग्यांना जोडले जाऊं लागले हा शहराच्या रुबाबाच्या दृष्टीनं एक मोठा फायदा झाला हें कांहीं खोटं नाहीं. वाईटांतून कांहींतरी चांगलं निघतं असं म्हणतात तें उगीच काय? स्टेशनावरच्या त्या टांग्यांकडे मीं नापसंतीनं आणि तुच्छतेनं पाहिलं पण मग लक्षांत आलं कीं उगीच ऐट करून काय उपयोग, टॅक्सी मिळण्याचा संभव नसेल तर यांपैकींच एकाद्या अश्वरथाचा आश्रय घेतला पाहिजे. त्यांतल्यात्यांत कोणत्या टांग्याचं छप्पर दुरुस्त स्थितींत आहे आणि घोडं जरा तरी त्या नांवाला पात्र आहे तें चोरट्या नजरेनं बघून घेऊं लागलों. चार पावलं पुढं सरकलोंही परंतु तितक्यांत कांहीं उतारू घेऊन एक मोटार खडखड करीत येऊन थडकली. मला वाटलं ती खासगी मोटार असावी कारण तिला मीटर नव्हता. परंतु गाडींतून एक मारवाडी, दोन मारवाडणी, आणि तीन बोचकीं बाहेर काढल्यावर ड्रायव्हरनं मला विचारलं, येतां काय? त्याच्याशीं बोलतांना मला कळलं कीं दिल्लीस भाड्याच्या मोटारींना मीटर नाहीं. उतारूनीं उक्ता करार करायचा आणि गाडींत बसायचं. काकासाहेब गाडगीळांचा पत्ता—म्हणजे बंगल्याचा नंबर आणि रस्त्याचं

नांव एवढं मला माहित होतं. परंतु या ठिकाणीं जायचं म्हणजे किती अंतर तोडायचं त्याची मला कांहींच कल्पना नव्हती. तेव्हां ड्रायव्हरनं जितके पैसे मागितले त्याच्या निम्मे मीं देऊं केले, व त्यानं आर्जवं केलीं तरी माझा सवाल मीं वाढविला नाहीं. अखेर " ठीक आहे, चला " असं तो म्हणाला तेव्हां मोठ्या खुशींत गाडींत चढलों. ज्याअर्थी ड्रायव्हरनं सांगितल्याच्या निम्मे पैसे आपण त्याला कबूल करावयास लावले आणि ज्याअर्थी तें भाडं करण्याच्या अगोदर त्यानं तोंड वाईट केलं होतं त्या अर्थी हा सौदा आपण अगदीं स्वतांत ठरविला यांत संशय काय ? दिल्लींत पाय ठेवल्याबरोबर ही पहिली गोष्ट तर आपण आपल्या मनासारखी घडवून आणली, अशा बडंचा खुशींत दोन्ही बाजूंस दिसणाऱ्या इमारतींकडे बघत मी टॅक्सींत बसलों होतों.

परंतु तितक्यांत पाहतों तों एका कोपऱ्यावर ' फेरोजशहा मेहता रोड ' अशी पाटी दिसली. ती पहातांच मनाचा विरस झाला. काकासाहेब गाडगीळांचा बंगला ज्या रस्त्यावर आहे तो हाच ! या ठिकाणीं येऊन पोचायला पुरतीं आठदहा मिनिटेंही लागलीं नव्हतीं ! म्हणजे टॅक्सीवाल्यानं वाजवी भाड्याच्या चांगलं दुप्पट भाडं माझ्याकडून कबूल करून घेतलं होतं तर ? परंतु असो. आतां वाईट वाटून घेण्यांत अर्थ नव्हता. त्या चंद्रमौळी टांग्यांनींही कदाचित् इतकंच लाटलं असतं. टांग्याऐवजीं टॅक्सींत येतां आलं हें काय कमी होतं...अशा प्रकारें मी आपल्या मनाचं समाधान दुरुस्त करीत होतों तों टॅक्सी एकदम थांबली. मी ड्रायव्हरला विचारलं, " काय रे आला काय बंगला ? " तो म्हणाला, " बंगला आला नाहीं पण पेट्रोल खलास झालंय." मीं विचारलं " अजून किती दूर आहे बंगला ? " त्यानं उत्तर दिलं, " दूर कुठला ? तो दिसतोय नव्हे का ? रस्त्याच्या कडेला राहुटी मारली आहे ना तोच बंगला." मीं म्हटलं, " आतां काय चालत जायचं काय रे ? " तो म्हणाला, " होय. आपणांला थोडं चालावं लागणार खरं. "

मी गाडीखालीं उतरलों परंतु मी बंगल्यापर्यंत चालायला तयार असलों तरी सामान कसं न्यायचं ? सकाळच्या प्रहरीं या विस्तीर्ण राजरस्त्यावर सामान डोक्यावर नेणारा मजूर कसा मिळणार ? मोठमोठ्या शहरांत हजार सुखसोयी असल्यासारख्या भासतात. परंतु बारीक सारीक गैरसोयी कशा लपलेल्या असतात पहा. त्या प्रत्यक्ष वांट्याला आल्यावांचून लक्षांत येत नाहींत. हमाल मिळणं शक्यच नाहीं हें ध्यानांत

आल्यावर मीं ड्रायव्हरला विचारलं " आतां रे ? " आणि ते दोन शब्द उच्चारतांना असा कांहीं स्वर काढला आणि अशा कांहीं रीतीनं त्याच्याकडे पाहिलं कीं मोटार वाटेंतच उभी राहिली हा दोष तुझा आहे तेव्हां माझं सामान तुला उचललं पाहिजे असं मी म्हणत आहेसं त्याला वाटावं. माझी गोळी लागू पडली. त्यानं मुकाट्यानं सामान बाहेर काढून घेतलं आणि तो माझ्या मागून चालूं लागला.

काकासाहेबांच्या बंगल्यांत शिरलों तों पोर्चपुढच्या बगिच्यांत उभा असलेला एक उजळ रंगाचा, चड्डी आणि खमीस घातलेला मुलगा पुढं आला आणि, त्यानं एकदम ड्रायव्हरला म्हटलं " आण सामान इकडे. " मला वाटलं हा कुणीतरी गाडगिळांच्या कुटुंबांतला असावा आणि मी येण्याची वर्दी माझ्या पत्रांतून मिळाली असल्यामुळें माझी वाट पहात असावा. त्याच्या मागून ड्रायव्हर आणि ड्रायव्हरच्या मागून मी असे तिघेजण आंत गेलों. एका फरसबंद उघड्या चौकाच्या उजव्या अंगाला खोल्या दिसल्या. माझं सामान त्यांपैकीं एका खोलींत गेलं म्हणून मीही जाऊं लागलों. जातां जातां पाहिलं तो डाव्या बाजूच्या व्हरांड्यांत जेवणाच्या टेबलाभोंवतालच्या खुर्चींवर तीनचार मंडळी बसली होती. मीं तर्क केला कीं काकासाहेबांच्या कुटुंबांतली ही कोणी तरी मंडळी असावी. म्हणून माझं सामान ज्या खोलींत गेलं तिकडे पावलें टाकीत मीं वळून त्या मंडळींना नमस्कार केला आणि म्हटलं, " मी येण्याची वर्दी आहे ना ? " त्या मंडळींपैकीं कुणीतरी हो हो म्हटलं पण त्या सर्वांचे चेहरे मला गंभीर दिसले. मला ती गोष्ट थोडीशी चमत्कारिक वाटली.

मी खोलींत गेलों आणि कपडे न काढतां तसाच एका खुर्चीवर बसलों. मघाच्या त्या उजळ रंगाच्या मुलानं चहा आणून पुढं ठेवला. मीं त्याला विचारलं, " तुमचं नांव काय ? " त्यानं सांगितलं. " विजय. " ते सांगतांना तो हिंदींत बोलला त्या गोष्टीचा मला चमत्कार वाटला. पण नंतर त्याच्याकडून कळलं कीं तो काकासाहेबांच्या कुटुंबांतला नसून त्यांच्या घरचा नोकर होता. नंतरच्या माझ्या मुक्कामांत मला आढळून आलं कीं हा मुलगा स्वयंपाक्याचं काम करी इतकंच नव्हे तर इतरही बहुतेक घरकाम सांभाळी. निर्वासितांचा लोंढा दिल्लींत आला त्यांत हा मुलगा आला होता व काकासाहेबांनीं त्याला आश्रय दिला होता. कामांत सदा तत्पर आणि हंसतमुख अशी ही किंचित् बारीक डोळ्यांची दणकट अंगाची ठेंगणी स्वारी होती. ' विजय '

म्हणून केव्हांही हांक मारली कीं खणखणीत ओ देऊन तो पुढें यावयाचा, आणि अमुक पाहिजे आहे असं म्हटलं कीं जें हवं असेल तें तयार करून पुन्हा हजर व्हावयाचा.

चहा घेतल्यावर मी तसाच खुर्चीवर बसून राहिलों. व्हराड्यांतल्या ज्या मंडळींना उद्देशून मीं नमस्कार ठोकला होता त्यांपैकीं कुणाशींही माझा पूर्वपरिचय नव्हता. त्यामुळें उठून त्यांच्याकडे मला जातां येईना. त्यांच्यापैकीं कुणीतरी माझ्याकडे येतील असं मला वाटत होतं, पण तसंही घडेना. आणखी जरा वेळ वाट पाहिली व मग सूट-केसमधील पानाचा डबा काढला, आणि पान करून तोंडांत घातलं. तितक्यांत व्हराड्यांत बसलेल्या मंडळीपैकीं एक गृहस्थ खोलींत आले. मी आल्याची वर्दी काकासाहेबांना पोचली कीं ते माझ्याकडे येतील व केव्हां आलांत, प्रवास कसा काय झाला, असे यज-मानानं करावयाचे ठरीव प्रश्न करतील अशी माझी कल्पना होती. आणि अजून ज्याअर्थी काकासाहेब माझ्याकडे आले नाहींत त्याअर्थी ते घरांत नसावेत, कुठें तरी बाहेर गेले असावेत असं मी मनाशीं ठरवूं लागलों होतों परंतु आतां जे गृहस्थ खोलींत येऊन माझ्यापुढं उभे राहिले ते म्हणाले, " काकासाहेब मुंबईस गेले आहेत. " मीं आश्चर्यानं विचारलं, " होय का ? " पण माझ्या प्रश्नाचं त्यांनाच आश्चर्य वाटल्याप्रमाणें त्यांची चर्या झाली. दोन दिवस मी प्रवासांत असल्यामुळें काकासाहेबांच्या पत्नी मुंबईस निवर्तल्या ही बातमी मला नव्हती. काकासाहेब मुंबईस गेले होते.

ही गोष्ट त्या गृहस्थाकडून कळल्यावर मला त्या बातमीचं दुःख व्हायचं ते झालंच पण शिवाय अशा परिस्थितींत कशाला आपण इथें पाहुणे आलों अशा बिचारानं फार संकोचल्यासारखंही झालं. परंतु येऊन दाखल झालों होतों त्याला आतां इलाज नव्हता. ते गृहस्थ म्हणाले, " शनिवारीं येतो असं सांगून गेले आहेत काकासाहेब. त्याप्रमाणें बहुधा येतीलच. कारण कॅबिनेटची मीटींग आहे...." त्यांचं तें बोलणं ऐकतां ऐकतां मीं मनाशीं हिशोब करीत होतों–आज बुधवार, काकासाहेब शनिवारीं येणार म्हणजे चार दिवस थांबायला हवं... मीं असा हिशोब करूं लागलों याचं कारण असं कीं, दिल्लीस शक्य तितकं थोडं राहून पुढें काश्मीरला जाण्याची माझी इच्छा होती, आणि तशी व्यवस्था करण्याचं काकासाहेबांनीं कबूलही केलं

होतं. पण आतां काकासाहेबही ठिकाणावर नव्हते, आणि शिवाय भरीला त्यांच्यावर दुःखाचा प्रसंग कोसळला होता. शनिवारीं ते येतीलच अशी मला खात्री वाटेना. आणि मनांत असंही आलं कीं जरी ते शनिवारीं आले तरी त्यांना कामाची गर्दी असणार आणि ते आपल्या दुःखांत असणार, आपल्या कामाचा लकडा त्यांच्यामागं आपण थोडाच लावूं शकणार ? कोल्हापुराहून प्रवासाला निघतांना मीं कागदावर वेळापत्रक लिहिलं होतं ते असंः– बुधवार तारीख चौदा एप्रिल रोजीं दिल्लीस पोचायचं, गुरुवार तारीख पंधरा रोजीं महाराष्ट्र क्लबांतर्फे होणारी सत्काराची सभा पार पाडायची आणि शुक्रवार तारीख सोळा रोजीं कश्मीरला जाण्यासाठीं दिल्ली सोडायची. पण हें वेळापत्रक आतां चांगलंच उस्कटणार असं मला वाटलं. प्रवासांतल्या अडचणी–अपघातांपैकीं सगळ्यांत अधिक कशानं माझी स्वस्थता नाहींशी होत असेल तर ठरविलेल्या वेळापत्रकांत येणाऱ्या व्यत्ययानं. कश्मीरला तावडतोब जातां येण्याऐवजीं मी आतां दिल्लीस अडकून पडणार ही शंका मला फार त्रास देऊं लागली...

कपडे काढून स्नान करतां करतां मनाशीं ठरविलं कीं काकासाहेबांच्या येण्याची वाट बघावयाची नाहीं. मला कश्मीरला जावयाचं आहे व त्या बाबतींत हिंदुस्थान सरकार मदत करणार आहे वगैरे गोष्टी काकासाहेबांनीं योग्य त्या सरकारी अधिकाऱ्यांच्या कानांवर घातल्या होत्या. तेव्हां अधिकाऱ्यांपुढें जाऊन उभं राहून मी आलों आहे, माझ्या जाण्याची व्यवस्था कराल तर मेहेरबानी होईल असं म्हणायला काय हरकत आहे ? त्या वेळच्या मनःस्थितींत हा विचार मला इतका पटला कीं कपडे करून झाल्यावरोबर संरक्षणमंत्रि बलदेवसिंग यांना मीं फोन केला. त्यांनीं सांगितलं, मी कचेरींत निघालों आहे, तिथें येऊन मला भेटा. मग काय ? आपलं काम होणार असं मला वाटलं, आणि मी तावडतोब सेक्रेटरिएटमध्यें गेलों.

बलदेवसिंगांनीं हातमिलानी करून मला बसायला सांगितलं. माझ्या कामाची नोंद त्यांच्या फाइलमध्यें होती ती काढून त्यांनीं मला विचारलं, "तुम्हांला काश्मीरला जायचं आहे, नव्हे काय ?"

मीं होय असं उत्तर दिलं आणि नामदार गाडगीळ इथें नसल्यामुळें मी भेटीला लों आहे असा खुलासा केला.

ते म्हणाले, " तुम्हांला आणखी दीड महिना जातां येणार नाहीं. "

" कां ? "

" श्रीनगरचा विमानतळ नादुरुस्त झालेला आहे. विमानं बंद आहेत. दीड महिन्यानंतर या, म्हणजे तुमची व्यवस्था मी करीन. "

त्यांचं तें उत्तर ऐकून मी स्तंभितच झालों. दिल्लीस फार तर दोन दिवस राहून काश्मीरची वाट धरायची अशी माझी योजना होती ! आणि आतां हा गृहस्थ सांगत होता दीड महिन्यानंतर या ! अगदीं तीव्र निराशेनं मनाची घायाळ स्थिति व्हावी असे माझ्या आयुष्यांत जे क्षण येऊन गेले त्यांतला हा क्षण होता. त्यावेळीं माझी चर्या कशी झाली होती हें एक बलदेवच जाणे !

● ● ●

—१—

" सहा आठवड्यानंतर या; मग मी तुमची काश्मीरला जाण्याची सोय करीन.." हे बलदेवांचं उत्तर पत्करून त्यांच्या कचेरींतून परत फिरणं माझ्या जिवावर आलं. कारण एक तर दीड महिना इथें वाटेंत दिल्लींतच राहून मी करणार होतों काय ? बरं कोल्हापुरास घरीं परत येऊन पुन्हां दीड महिन्यानंतर इकडे येण्याचा बेत तरी कसा करायचा ? तुम्ही सारे कोल्हापुरच्या स्टेशनावर हार घालून थाटानें माझी रवानगी केलीत, आणि आतां काश्मीरला न जातांच परत येऊन तुम्हांला आतां काय असं सांगूं कीं दीड महिन्यानंतर मी जाणार आहे ? ही माझी चांगली शोभा होईल म्हणायची ! आणि ही शोभा मुकाट्यानं गिळायची म्हटली तरी देखील दुसरा प्रश्न होता तो हा कीं यानंतर दीड महिन्यांत कॉलेजची उन्हाळ्याची सुटी संपत येणार ! म्हणजे दीड महिन्यानंतर माझी काश्मीरला रवानगी करण्याची जी तयारी बलदेव-सिंग मोठ्या भलेपणानें दाखवीत आहेत तिचा मला काय उपयोग ? सारांश, आतां दिल्लीहून परतायचं याचा अर्थ काश्मीरची सफर करण्याचा बेत रद्द करायचा असा सरळसरळ होता. हा अर्थ पत्करावयास माझं मन तयार होईना. मीं बलदेवसिंगांना भीतभीत विचारलं,

" आपल्या समजुतींत कांहीं घोटाळा तर होत नाहीं ना ? "

ते हंसले व म्हणाले, " घोटाळ्याचा काय प्रश्न आहे ? श्रीनगरचा विमानतळ नादुरुस्त आहे, आमची लष्करी वाहतुक रोज व्हावयाची ती देखील बंद पडली आहे. "

" पण मी तर केवळ येवढ्यासाठीं कोल्हापुराहून येथें येऊन बसलों—" मी पुटपुटलों,

" मी तुमची मनःस्थिती ओळखूं शकतों," ते म्हणाले, " मी तरी काय करूं ? विमानांची वाहतूक पुन्हां सुरू झाल्यावरोवर पहिल्या विमानांत मी तुम्हांला जागा देईन परंतु त्यासाठीं सहा आठवडे तुम्हांला वाट पहायला हवी. माझा अगदीं नाइलाज आहे. "

इतकं झाल्यावर मीं त्यांना नमस्कार ठोकरा आणि त्यांच्या खोलीबाहेर पडलों.

सेक्रेटरीएटमधून बाहेर पडून पुढच्या विस्तीर्ण प्रांगणांत आलों. गाडगीळांच्या बंगल्यावर परत जाण्यासाठीं टांगा मिळतो का बघावं म्हणून रस्त्याकडे गेलों तिथें पाहिलं तो रस्त्याच्या दोन्ही बाजूस छोटे छोटे कामचलाऊ मांडव दिसले. प्रत्येक मांडवांत बाकं खुर्च्या मांडलेल्या होत्या. चुलाण्यावरील कढईत पुऱ्या भजीं तळलीं जात होतीं. त्या क्षणीं तीव्र निराशेमुळें माझी तहानभूक अजिबात नाहींशी झाली होती. परंतु मनांत आलं, खाण्याच्या निमित्तानं झाडांच्या गार सावलीखालीं एकाद्या मांडवांत बसूं या आणि पुढें काय करायचं याचा कांहीं विचार सुचतो काय बघूं या. म्हणून एका मांडवांत शिरलों, टेबलापुढें बसलों, आणि दुकानदाराच्या कट्टयावर पदार्थ नजरेला दिसले त्यांतलीं जीं नांवं तोंडाला आलीं तीं उच्चारलीं. पंजाबकडून जे हजारों निर्वासित दिल्लीस आले त्यांच्यापैकीं कांहींनीं हीं फराळाचीं दुकानं घातलेलीं होतीं. हे लोक मोठं रुचकर पदार्थ तयार करतात, आणि विपन्नावस्थेंत असल्यामुळें म्हणून कीं काय कोण जाणे गिऱ्हाइकांशीं मोठ्या अदबीनें वागतात. मीं आजूबाजूला दृष्टि टाकली तों सेक्रेटरिएटच्या त्या रस्त्याला एखाद्या जत्रेची शोभा आणणाऱ्या त्या साऱ्या छोटया छोटया मांडवांत शेकडों लोक खात बसले होते. खाणाऱ्यांपैकीं बहुतेक सारेजण सेक्रेटरिएटमध्यें नोकरी करणारे कारकून, अगर पट्टेवाले, अथवा कांहीं कामानिमित्त बडया दप्तरांत जाणार असलेले किंवा जाऊन आलेले लोक होते. सगळ्यांना घाई होती. मलाच तेवढी नव्हती. कुठें जायचं, काय करायचं हें मला कळत नव्हतं. माझ्या नेहमींच्या स्वभावाप्रमाणें त्या छोटया उपाहारगृहाच्या मालकाशीं बातचीत करीत, तो कोण, कुठला, त्याच्या घरीं कोण कोण होतं, इथें दिल्लीस त्याची रोजची मिळकत किती होती, इत्यादि चांभार चौकशा करण्यांत मीं कांहीं वेळ घालविला, आणि नंतर बशींतले समोसे खातां खातां माझ्या मनांत एक कल्पना आल्याबरोबर मला आनंद झाला. मला वाटलं अगदींच बंद गल्लींत कांहीं मी सांपडलों नाहीं. खटपट करून पहाण्याची एक दिशा मोकळी आहे. माणसाला ज्या वेळेस पुढें

काय करावं तें सुचत नसतं त्या वेळेस त्यानं रस्त्याच्या कडेला कुठल्या तरी दुकानांत शिरून एकटं बसून समोसे खावेत, असा एक तोडगा जाहीरपणानं केव्हां तरी लिहून टाकायचं मीं ठरविलं. तें असो. कोणती कल्पना मला सुचली तें तुला सांगतों. माझ्या मनांत आलं कीं कश्मीरला जाण्याच्या बाबतींत कश्मीर दरबारशीं आपला पत्र-व्यवहार झालेला आहे आणि कश्मीर दरबारचे प्रसिद्धि खात्याचे प्रमुख श्री. बामझाओी यांचं आपल्याला उत्तरही आलेलं आहे कीं तुम्ही दिल्लीस या, आम्ही तुम्हांला सर्व प्रकारची मदत करूं. मग बामझाओींना जाऊन भेटायला काय हरकत आहे ? हें मनांत येतांच जणूं प्रश्न सुटला अशा पोरकट आनंदानं ताडकन उठलों, मांडवांतून बाहेर पडलों आणि टांगा करून पृथ्वीराज रोडकडे निघालों.

नव्या दिल्लीच्या रचनेची अेक गम्मत अशी आहे कीं बहुतेक प्रमुख राजरस्ते सेक्रेटरीएटपर्यंत पोचतात. पाटी पहाणाराला वाटतं कीं अमुक रस्ता ना हा सांपडलाच कीं ! परंतु त्या रस्त्यावरचा जो बंगला नंबर हवा असतो तो शोधायला लागलं कीं कधीं कधीं दोन तीन मैल जावं लागतं. कारण रस्त्याचं एक टोंक असतं सेक्रेटरीएटपाशीं पण आपल्याला ज्या ठिकाणीं जायचं तें त्या रस्त्यावरचंच ठिकाण असतं या अफाट विस्तीर्ण शहराच्या दुसऱ्या सीमेवर ! आतां मला हाच अनुभव आला. चांगला दीड पावणे दोन मैल टांगेवाल्यानं चकचक करीत घोडा दामटला तेव्हां कुठें पृथ्वीराज रोडवरचा पांच नंबरचा बंगला सांपडला.

बामझाओींच्या ऑफिसांत गेलों तेव्हां त्यांनीं माझं आनंदानं स्वागत केलं. कांहींसा ठेंगणा, स्थूल नव्हे पण बांध्यांत चांगला जाड आणि मजबूत, अद्यावत फॅशनचे गरम जाड कपडे घातलेला, कपाळावर तांबूस रंगाचीं झुलपं पण डोक्याच्या मागचा चांदवा टक्कल पडलेला, बोलण्यांत मिठास आणि अखंडपणें सिगरेट ओढणारा—असं या गृहस्थाचं वर्णन, त्याच्याशीं संभाषण करतां करतां, मीं करून टाकलं. माझ्या व त्यांच्या झालेल्या पत्रव्यवहाराची त्यांनीं अेक स्वतंत्र फाओलच करून ठेवलेली दिसली.

“ केव्हां आलां ? ” त्यांनीं हंसत विचारलं. “ आज सकाळींच आलों. ” मीं सांगितलं.“ प्रवास छान झाला ? ” “ हां, अगदीं आरामशीर” असं उत्तर देतांना मी मनाशीं विचार करीत होतों, बलदेवांशीं झालेलं बोलणं यांना सांगावयाचं कीं नाहीं ? अेकदां वाटायचं सांगावं, व त्यांना म्हणावं यांतून कांहींतरी मार्ग काढा. पण पुन्हा

वाटे यांना कशाला सांगायची ती गोष्ट? बघूं या हे स्वतंत्रपणें काय उत्तर देतात तें.

पण तितक्यांत बामझाओींनीं प्रश्न केला "तुम्ही आलांत. फार छान झालं. केव्हां जातां श्रीनगरला? बोला."

ते अैकून मी चमकलोंच. मीं म्हटलं, "तुम्हीं मला धाडाल तेव्हां जाओीन, केव्हां धाडतां, सांगा."

तें म्हणाले, "वाटेल तेव्हां. उद्यां जातां?"

मला मोठा चमत्कार वाटला. बलदेवसिंगासारखा वरिष्ठ अधिकारी मला म्हणाला होता, तुमचं श्रीनगरला जाणं आणखी सहा आठवडे होणं शक्य नाहीं, आणि हा गृहस्थ मला विचारीत होता, उद्यां जातां? बामझाओी माझी चेष्टा करीत असावेत अशी शंका घेणं शक्य नव्हतं. नाहीं तर ती माझ्या मनांत आलीही असती.

मीं त्यांना विचारलं, "श्रीनगरला विमानं जातात?"

ते म्हणाले, "हें काय विचारतां? आज सकाळींच आमची कांहीं मंडळी विमानानं गेली."

मीं चांचरत म्हटलं, "नाहीं. मला कुणाकडून तरी कळलं कीं, श्रीनगरचा विमानतळ नादुरुस्त आहे, आणि विमानं जात नाहींत."

बामझाओी म्हणाले, "शीः! कुणी सांगितलं तुम्हांला हें? एखादे वेळेस एवढंच होतं कीं हवा फार वाईट असली आणि धुक्यानं दिशा दिसत नसली तर त्या दिवसाचं विमान निघत नाहीं, किंवा वाटेंत जालंदरला म्हणा, जम्मूला म्हणा थांबविण्यांत येतं. तुमची रवानगी केव्हांही करूं शकूं. उद्यां, परवां, तेरवां चालेल तेव्हां तुम्ही जा."

मीं म्हटलं, "मी उद्यांच निघालों असतों पण नामदार गाडगीळ मुंबईस गेले आहेत, त्यांची भेट न घेतांच श्रीनगरला जाणं मला प्रशस्त दिसत नाहीं. ते शनिवारीं येतील त्यांच्या सल्ल्यानं केव्हां निघायचं तें ठरवीन आणि तुम्हांला कळवीन."

"कांहीं हरकत नाहीं. तुमचा टेलिफोन आला कीं दुसऱ्याच दिवशींचं रिझर्वेशन तुम्हांला मिळेल अशी मी व्यवस्था करीन."

मी त्यांचे आभार मानले आणि निरोप घेतला. बलदेवसिंगच्या ऑफिसांतून जितक्या खिन्न मनानें बाहेर पडलों होतों तितक्याच उल्हसित वृत्तींत मी आतां होतों. दीड घटकेपूर्वीं माझं कश्मीरला जाणं घडत नाहीं अशी निराशा माझ्या पदरीं आली होती. आतां माझी इच्छा असेल तर उद्यां सकाळच्या विमानानें मी जाऊं शकत होतों. बरं झालं, बलदेवसिंगांनीं जें सांगितलं त्यावर इलाज काय असणार अशा हताश शहाणपणाऐवजीं बामझाओींना भेटण्याचा वेडेपणा मीं केला ! त्या पंजाबी उपहारगृहांतील समोशांचा गुण खरा !

मात्र अगदीं खूष झालेल्या मनानं टांग्यांतून गाडगीळांच्या बंगल्याकडे निघालों तेव्हां राहून राहून माझ्या मनांत येत होतं, बामझाओी म्हणतात विमानांची वाहतूक चालू आहे, त्यांचीं कांहीं माणसं आज सकाळीं गेलीं देखील, आणि बलदेवसिंग म्हणतात श्रीनगरचा विमानतळ नादुरुस्त आहे, याचा अर्थ काय ? हें गौडबंगाल उलगडायचं कसं ?

माझ्या मनांत एकदां आलं, परत बलदेवसिंगच्या भेटीला जावं. त्यांना सांगावं बामझाओी म्हणतात—

पण तितक्यांत वाटलं, नको.

...उत्तम गोष्ट अशी कीं श्रीनगरला जायचं आणि परत आल्यावर मात्र बलदेव-सिंगांना भेटून विचारायचं, मी तर श्रीनगरला जाऊन राहून परत देखील आलों, पण अजूनहि तुमच्या कागदोपत्रीं श्रीनगरचा विमानतळ नादुरुस्त आहे काय ?

● ● ●

—१०—

'उद्यां सकाळीं श्रीनगरला जाण्यासाठीं निघत आहे' अशा मजकुराची तार मी केली ती तुला वेळेवर पोचली असेल आणि त्यामुळें तूं साहजिकच कल्पना केली असशील कीं आज आमची स्वारी कश्मीरच्या राजधानींत असावी. या पत्राच्या उजव्या वरच्या कोपऱ्यांतलं मुक्कामाचं गांव पाहून तुला आश्चर्यच वाटेल. तूं म्हणशील म्हणजे काय, अजून हे दिल्लींतच आहेत काय? होय मी अजून इथेंच आहे. कांहीं विघ्नं उद्भवलीं म्हणून नव्हे, तर स्वागतार्ह अडचणीमुळें मला इथला मुक्काम वाढवावा लागला. मी दिल्लींतच आहे हें कळल्यावर इथल्या ऑल इंडिया रेडिओ स्टेशनचे एक डायरेक्टर डॉ. मराठे यांनीं मला निरोप पाठविला कीं तुम्ही 'मराठी लघुकथा' या विषयावर इंग्रजींत भाषण करावयास याल तर मेहेरबानी होईल. मीं त्यांचं आमंत्रण स्वीकारलं. ज्या कार्यक्रमांची आगाऊ वर्दी 'लिसनर'मध्यें छापलेली नसते अशा ऐन वेळच्या कार्यक्रमासाठीं कांहीं वेळां राखून ठेवलेल्या असतात. माझं हें इंग्रजी भाषण या ऐन वेळच्या कार्यक्रमांत व्हावं अशी त्यांची इच्छा होती. परंतु असा 'आगंतुक'पणा करण्याची माझी इच्छा नव्हती. म्हणून मीं त्यांना सूचना केली कीं माझ्या भाषणाचं रेकॉर्डिंग करून ठेवा आणि मग व्यवस्थितपणें 'लिसनर'च्या छापील प्रोग्रॅममध्यें दाखल करून तें ब्रॉडकास्ट करा. ही माझी सूचना त्यांनीं मान्य केली. मग दुपारीं मी स्टूडिओंत गेलों. एकदां रिहर्सल घेतली आणि मग रेकॉर्डिंग करून टाकलं. रेडिओवरील भाषण करतांना अखेरच्या पंधराव्या मिनिटाच्या शेवटच्या सेकंदावर कांटा यायला आणि माझा अखेरचा शब्द हवेंत विरायला एक गांठ पडली पाहिजे असा माझा नेहमीं कटाक्ष असतो हें तुला माहीत आहे. यावेळेचं भाषणही या कटाक्षानंच मीं केलं. सारा विधि अवघ्या अर्ध्या पाऊण तासांत उरकून मोकळा

झालों. आतां हें माझं भाषण ज्या दिवशीं ब्रॉडकास्ट होईल त्या दिवशीं मी कोल्हा-पुरांत परत आलों असेन आणि तुझ्याबरोबर मीही तें ऐकेन.

अशा इतर अनेक कामांत मी दिल्ली येथें वाढलेल्या मुक्कामाचे हे दिवस घालवीत आहे. पण कामांत जाणाऱ्या वेळापेक्षां अिकडे तिकडे भ्रमंती करण्यांतच मी अधिक वेळ घालवीत आहे. महाराष्ट्र क्लबतर्फे माझा सत्कार झाला त्या वेळेस आणखी एका छोटया पार्टीचं आमंत्रण मीं स्वीकारलं होतं. श्रीनगरला लगेच गेलों असतों तर हें आमंत्रण मीं रद्द केलं असतं. परंतु आतां माझा मुक्काम वाढला तेव्हां त्या मंडळींना दिलेलं वचन मीं पूर्ण केलं. जुनी दिल्ली आणि नवी दिल्ली असे दिल्लीचे दोन भाग आहेतच, पण नव्या दिल्लीचा विस्तार इतका अफाट आहे कीं तिचे कांहीं भाग एकमेकांपासून सहा सहा सात सात मैलांच्या अंतरावर आहेत. 'लोदी रोड' नांवाची जी वसाहत आहे ती नव्या दिल्लीच्या अगदीं एका टोकावर आहे. या ठिकाणीं कित्येक महाराष्ट्रीय कुटुंबं रहातात आणि या मंडळींची आग्रहाची इच्छा होती कीं मीं त्यांच्याकडे एकदां जावं. व्याख्यानासाठीं नव्हे. चहासाटीं आणि मनमोकळ्या गप्पांसाटीं. श्री. गोखले नांवाचे मूळ इंदोरकडचे एक तरुण इथें एका सरकारी खात्यांत चांगल्या हुद्याच्या नोकरीवर आहेत. 'लोदी रोड' वसाहतींत ही फराळांची, गप्पांची बैठक घडवून आणण्याचा उत्साह मुख्यतः त्यांचा. यांना मराठी साहित्याची फार आवड आहे. साधी कोरडी आवड नव्हे, तर अगदीं आस्थेची आणि अभ्यासपूर्ण आवड आहे, अितकंच नव्हे तर नाटय, संगीत अित्यादि कलांतही त्यांना पुष्कळ गोडी आहे असं मला दिसून आलं. त्यांच्या घरींच ही गप्पांची बैठक भरली होती. बैठकीचा थाट सर्वतोपरी कलापूर्ण व पोट आणि चित्त प्रसन्न करून सोडणारा होता. गप्पांनाही रंग आला. कुणीही मनमानेल तो प्रश्न मला विचारावा अशी मुभा होती. बंधन एवढंच होतं कीं ज्यायोगें चर्चेला फार गंभीर वळण लागेल असा प्रश्न कुणी काढायचा नाहीं. हजर असलेल्या कांहीं स्त्रियांनीदेखील जेव्हां प्रश्न विचारायला सुरवात केली तेव्हां मीं कबूल केलं कीं अिथल्या महाराष्ट्रीय स्त्रिया राजधानींतल्या आघाडींतल्या स्त्रिया शोभतात खऱ्या! साहित्यांतल्या नेहमींच्या गंभीर वादांना कटाक्षानं बगल देऊन झालेली ही चर्चा मोठी मजेदार झाली. तरी शेवटीं अेका गृहस्थांनीं मला प्रश्न केलाच कीं "तुमचा आणि अत्र्यांचा अेकमेकांशीं एवढा विरोध कशासाठीं आहे?" मीं हसून त्यांना म्हटलं, "खरं म्हणजे तुमचा प्रश्न नियमबाह्य आहे. तथापि हा

विषय मी टाळतों असं तुम्हांला वाटूं नये म्हणून मी माझी भूमिका थोडक्यांत सांगतों. ”

पृथ्वीराज कपूर यांच्या कंपनीचे खेळ दिल्लींत चालू आहेत. त्यांच्या कंपनींत दोन महाराष्ट्रीय तरुण भगिनी आहेत हें तुला खरं वाटेल काय? मलाच वाटलं नसतं, परंतु त्यांतील एक भगिनी श्री. गोखले यांच्या घरच्या पार्टीला हजर होत्या. त्यांच्या निमंत्रणावरून मीं त्या रात्रीं होणाऱ्या ‘ पठाण ’ नाटकाच्या प्रयोगाला जायचं कबूल केलं. श्री. गोखले यांच्या घरून आम्ही जे निघालों ते थेट थिएटरवरच गेलों. पृथ्वीराज यांच्या गाजलेल्या नाटकाविषयीं अनुकूल प्रतिकूल असं पुष्कळच मीं ऐकलं होतं परंतु त्यांचा एकही प्रयोग मीं अजून पाहिला नव्हता. त्यामुळें मी थिएटरवर दाखल झालों तो अतिशय उत्सुकतेनं. गर्दी चिकार होती. मनस्वी उकडत होतं. डोक्यावर पंखे घरघरत होते. प्रेक्षकगृहांतील साऱ्या स्त्री-पुरुषांच्या हातांतही छोटे छोटे पंखे हालत होते.

‘ पठाण ’चं कथानक लहानसं आणि सुटसुटीत आहे. वायव्य सरहद्दीवरील कुठल्यातरी डोंगरमाथ्यावरील एक ‘गढी.’ पठाणांच्या एका टोळीच्या वृद्ध म्होरक्याचं हें घर. ( या वृद्ध म्होरक्याचं काम पृथ्वीराजनें केलं. ) या म्होरक्याचा दिवाण हिंदु आहे. नाटकाच्या पहिल्या अंकांत घटना अशी नाहीं. महत्त्वाची गोष्ट घडते ती एवढीच कीं कित्येक वर्षं अपत्यावांचून राहिलेली पुढाऱ्याची बायको पहिल्या अंकाच्या शेवटीं प्रसूत होते, आणि तिला मुलगा होतो. दुसऱ्या अंकाचा पडदा वर जाण्यापूर्वी लाऊडस्पीकरमधून सांगितलं गेलं, “ काफी बरसके बाद ! वही गढी ! वही लोक ! ” पडदा सरकला. दुसरा अंक सुरू झाला. पठाण पुढाऱ्याचा मुलगा आणि हिंदु दिवाणाचा मुलगा या दोघा समवयस्क तरुणांतील गमतीचीं रुसणीं फुगणीं, त्यांचे मर्दानी खेळ आणि त्यांचं एकमेकांवरील अति गाढ प्रेम याचं चित्रण करण्यांतच दुसऱ्या अंकाचा बराच भाग खर्च होतो. महत्त्वाची घटना घडते ती एवढीच कीं पठाण पुढाऱ्याच्या मुलाचं लग्न होतं. पठाणाच्या घरांत सून येते. नवपरिणीत वधू-वर एकांतासाठीं शय्यागृहांत जातात. इतक्यांत त्याच टापूंतल्या दुसऱ्या पठाण टोळीचा हल्ला येतो. या हल्ल्याला कारण झालेलं असतं कीं हिंदु दिवाणाच्या मुलानं विरोधी टोळींतला एक इसम मारलेला असतो. खूप घनचक्कर लढाई होते. शेवटीं गढीवरच्या लोकांना वाटूं

लागतं कीं उभयपक्षांतील लोकांची हत्त्या चालू ठेवणं बरं नव्हे. त्यापेक्षां तह होत असेल तर बघावा. मग तहाचीं बोलणीं करण्यासाठीं विरुद्ध पक्षाचे म्होरके गढीवर येतात. पठाण लोकांतला कायदा असा कीं माणसाला माणूस मिळालं तरच न्याय झाला.

विरोधी टोळीचं म्हणणें असं कीं ज्यानं आमच्या माणसाची हत्त्या केली तो आमच्या ताब्यांत मिळाला पाहिजे, हिंदु दिवाणाचा मुलगा गढीवरच्या पठाणाला स्वतःच्या पुत्रापेक्षांही प्यार ! त्याचे प्राण वांचविण्यासाठीं तो म्हणतो, "तुम्हाला माणसाला माणूस मिळालं पाहिजे एवढंच ना ? मी तुमच्या स्वाधीन होतों. माझे प्राण घ्या. मग तर झालं." परंतु विरोधी टोळींतले लोक हे मानीत नाहींत. ते म्हणतात, "ज्यानं आमची आगळीक केली तो तरुण होता, तूं म्हातारा आहेस तुझे प्राण घेतल्यानं आम्हांला हवा तो बदला नाहीं मिळायचा." हें ऐकून गढीवरचा पठाण निरुत्तर होतो आणि हिंदु दिवाणाच्या मुलाला शत्रूच्या स्वाधीन करण्याखेरीज दुसरा मार्ग त्याला उरत नाहीं. तो म्हणतो, "ठीक आहे. न्या त्याला." तें ऐकून जवळ उभी असलेली त्या मुलाची आई मोठ्यान आक्रोश करूं लागते. पण तितक्यांत इतका वेळ आपल्या नववधूच्या हातांत हात घालून उभा असलेला पठाणाचा मुलगा पुढं येतो आणि शत्रूला म्हणतो, "मी तुमच्याबरोबर येतों. माझे प्राण घ्या." शत्रूचं समाधान होतं. ते त्याला घेऊन जातात. त्याची आई मोठयांदा रडूं लागते. जिनं त्याचं एकांतांतलं पहिलं आलिंगन पुरतं घेतलंही नव्हतं ती त्याची तरुण पत्नी किंकाळी फोडून धरणीवर अंग टाकते. पडद्यांत बंदुकीचे ठो ! ठो ! ठो ! असे बार होतात. गढीवरचीं सारीं माणसं कपाळावर हात मारून पुतळ्यासारखीं निश्चेष्ट होतात. तिसरा अंक संपतो. नाटक संपतं.

'पठाण' नाटकाचं कथानक अगदींच थोडं आणि साधं आहे हें यावरून तुझ्या ध्यानांत येईल. परंतु या नाटकाचं खरं आकर्षण कथानकाच्या विशालत्वापेक्षां त्यांत प्रवेशांप्रवेशांतून पठाणांच्या एकंदर राहणीचं जें वातावरण निर्माण करण्यांत आलं आहे त्या वातावरणांत व प्रयोगाच्या भव्यपणांत आहे. घटनाप्रधान, रहस्यप्रधान, स्वभाव-चित्रण-प्रधान असे कादंबरीचे प्रकार आपण मानतों तसे नाटकाचेही मानतां येतील. या ठरीव साचांपैकीं कोणत्याही एका साच्याचं 'पठाण' नाटक नाहीं. या नाटकाचं

खरं वर्णन करायचं झालं तर ‘ वातावरणप्रधान ’ नाटक असं मी करीन. हें नाटक पहात असतांना आपण खरोखरच पठाणांच्या प्रदेशांत आणि तिथल्या वातावरणांत वावरत आहों असं प्रेक्षकांना वाटत असलं पाहिजे. मला तरी तसं वाटलं. पडदा वर जाऊन पहिला अंक सुरू होतो त्या वेळेस अगदीं क्षीण प्रकाशानं उजळलेला अंधार, आकाशांत लुकलुकणाऱ्या चांदण्या, दूर भासमान होणारे पहाड, वस्तूंचे अगदीं अस्पष्टपणें कळणारे आकार, आणि गढीवरील पठाणाच्या अंगणांत चौपाईवर बसलेल्या कुणा तरी व्यक्तीच्या तोंडची ऐकूं येणारी पहाडी गीताची ललकारी– इत्यादींच्या सहाय्यानं पहाडी मुलुखांतल्या पहांटेच्या पहिल्या प्रहराचं वातावरण अशा कांहीं बेमालूम रीतीनं चित्रित केलेलं आढळतं कीं प्रेक्षक त्याच्याशीं एकदम समरस होतो. अंधार हलके हलके विरून जाऊं लागतो, चांदण्या दिसेनाशा होतात. आभाळ स्वच्छ होतं. गढी स्पष्ट दिसूं लागते. पहाडांची पार्श्वभूमि स्पष्ट साकार होते. आणि पहिला अंक जसजसा पुढें सरकतो तसतशी प्रसन्न सुप्रभातही अधिकाधिक डौलानं आणि तेजानं खुलूं लागते. डोंगरमाथ्यावरील एका पठाण पुढाऱ्याच्या गढीवर आपण दाखल झालों आहोंत अशी पूर्ण प्रचिती प्रेक्षकाला येते. नाटकाचं वातावरण यापुढेंही प्रत्येक अंकांत अशाच कौशल्यानं रंगविलेलं आहे. शूरमर्द, निधडया छातीच्या, भोळ्या मनाच्या, उदार अंतःकरणाच्या, प्रेमळ, रागीट, साहसप्रिय, अशा पठाण लोकांमध्यें आपण वावरत आहोंत, त्यांचे सामाजिक आचाराचे नियम, त्यांची निष्ठा, त्यांचा त्याग, त्यांचीं वैरं, इत्यादि गोष्टी त्यांच्यांत मिसळून आपण अनुभवीत आहोंत असं प्रेक्षकाला वाटतं. पठाणी जीवनाचं वातावरण अगदीं पूर्णत्वानं या नाटकांत कांठोकाठ ठासून भरलेलं आहे. मला वाटतं, या नाटकाचं जें मुख्य आकर्षण आहे तें म्हणजे प्रयोगाचा भव्यपणा. जीं नाटकं आपण सामान्यतः पहातों त्यांत रंगभूमीवर दोनचार पात्रांचे संवाद चालू असतात आणि मधेंच एकादें पात्र गातं परंतु या ‘ पठाण ’ नाटकाच्या प्रयोगांत कित्येक वेळां तरी चाळीस चाळीस पन्नास पन्नास माणसं रंगभूमीवर दिसतात, आणि यांतल्या संगीताचीही बाजू सजविली आहे ती अशा चाळीस पन्नास माणसांच्या संघगीतांनीं आणि नृत्यांनीं. पहिल्या अंकाच्या शेवटीं पठाणाची बायको प्रसूत होते तेव्हां केवढी धांदल उडून जाते रंगभूमीवर ! पठाणाचे सारे अनुयायी गोळा होतात आणि फेर धरून नाचूं लागतात. शेजारणी धांवत आणि नजराण्याचीं ताटं घेऊन पठाणाच्या गढींत प्रवेश करीत असतात. पठाणाची मोलकरीण आंतबाहेर सारखी

धांवत सुटते आणि जो जो पाहुणा येईल त्याला त्याला उंची रंगीत दस्त रुमाल हवेंत उंच फेकून बहाल करते ! त्याचप्रमाणें पठाणाच्या मुलाचं लग्न होतं आणि नववधूची ' डोली ' गढीवर दाखल होते तेव्हां केवढा जल्लोष उडतो त्या ठिकाणीं ! किंवा पुढें पठाणांच्या दोन टोळ्यांत युद्ध सुरू होतं त्यावेळची गढीवरची धांदल ! ' ठो ! ठो ! 'असे वार सारखे चालू असतात, वृद्ध पठाणाचे लोक पुन्हां पुन्हां धांवत गढीवर येत असतात, आणि बायका गढींत सांठवून ठेवलेल्या माळा त्यांच्याकडे देत असतात ! अशा प्रकारें प्रक्षोभाचा प्रत्येक प्रसंग नाटकांत अगदीं भव्य प्रमाणावर चित्रित केलेला दिसतो !

आणि या सगळ्याच्या जोडीला ज्या कसबानं प्रयोग बसविला आहे तें कसब ! चाळीस चाळीस पन्नास पन्नास माणसं रंगभूमीवर असतात त्यावेळीं देखील सारीं पात्रं एकजीव झालेलीं असतात, कुणी केव्हां कुठं उभं रहायचं, मुख्य पात्राच्या बोलण्याची प्रतिक्रिया कुणी कशी व्यक्त करायची या साऱ्या गोष्टी इतक्या सुसूत्र बसविलेल्या आहेत कीं कॅनव्हसवर एकादं भव्य चित्र स्पष्ट उठत जावं त्याप्रमाणें रंगभूमीवरचं तें भव्य दृश्य प्रेक्षकापुढें सफाईनं उभं राहातं. सर्व पात्रांचा अभिनय यथायोग्य होतो. आणि पृथ्वीराज यांचा अभिनय म्हणजे या प्रयोगाच्या सौंदर्याचा कळसच ! जणु या भूमिकेसाठीं पृथ्वीराजांचा जन्म झाला असं वाटतं ! इतका सुंदर नाट्यप्रयोग मीं किती वर्षांत पाहिला नव्हता. कादंबरीच्या अगर नाटकाच्या साहाय्यानं केलेला प्रचार कितपत चिरपरिणामी होतो याबद्दल माझे इतर साहित्यिकांशीं मतभेद आहेत. तथापि ' पठाण ' नाटक पाहिल्यावर माझ्या मनांत आलं, प्रचारात्मक नाट्य सजवायचं असेल तर असं सजविलं पाहिजे. कलावंतानं आपली कला राष्ट्रासाठीं झिजविली पाहिजे असं पृथ्वीराज कपूर यांनीं म्हटलं तर मला समजेल. कारण कांहींतरी करून दाखवायची कळकळ आणि ताकद त्यांच्या कलेंत आहे ! नाहींतर अत्रे देखील ' राष्ट्रासाठीं कला ' अशी घोषणा करतीलच कीं ! त्या घोषणेला कांहीं किंमत आहे काय ?

नाटकाचा अखेरचा अंक संपला. मीं आपल्या जागेवरून उठून श्री. गोखले यांना म्हटलं " चला. " परंतु ते उठले नाहींत. मीं पाहिलं तों प्रेक्षकांपैकीं कोणी उठलेलं मला दिसेना. सारे लोक आपापल्या जागीं बसून राहिलेले होते. मला मोठं आश्चर्य

वाटलं. मीं गोखल्यांना म्हटलं, "कां हो ? चला कीं ! नाटक संपलं ना ?" ते म्हणाले, "नाटक संपलं. पण बसा." मीं विचारलं, "कां ?" ते म्हणाले "बसा, म्हणजे कळेल." मला अधिकच आश्चर्य वाटलं. पण मी बसलों. सारे लोक अगदीं गप्प राहिले होते, आणि त्यांची नजर रंगभूमीकडे लागली होती ! ते कशाची तरी वाट पहात होते !

● ● ●

## —११—

नाटक संपलं तरी लोक उठत नव्हते याचं कारण मला समजण्यास अवकाश लागला नाहीं. रंगभूमीवरचा पडदा दोन्ही हातांनीं दूर करीत कुणीतरी पडद्याबाहेर येत होतंसं दिसलं. दुसऱ्याच क्षणीं नाटकांतल्या वृद्ध पठाणाचा वेष अर्धवट उतरलेला, अर्धवट तसाच ठेवलेला अशा थांटात पृथ्वीराज यांची स्वारी रंगभूमीवर उभी ठाकलेली दिसली. त्यांनीं दोन्ही हात जोडून मस्तक खालीं झुकविलं. प्रेक्षकांनीं टाळ्या वाजविल्या. पृथ्वीराज बोलूं लागले. निर्वासितांच्या केविलवाण्या स्थितीचं त्यांनीं वर्णन केलं, या दुर्दैवी अनाथ लोकांना साहाय्य करणं प्रत्येकाचं कर्तव्य कसं आहे तें त्यांनीं सांगितलं, आणि या निर्वासितांसाठीं पैसे जमा करण्याचा आपला संकल्प त्यांनीं बोलून दाखविला. मग ते म्हणाले, "आतां नाटकगृहाच्या मुख्य प्रवेशद्वारापाशीं मी पदर पसरून उभा राहणार आहे. आपण सर्वांनीं, ज्याची जशी इच्छा असेल, ज्याची जशी शक्ती असेल तशी, देणगी माझ्या पदरांत टाकावी." त्यांनीं पुन्हां नमस्कार केला आणि मग ते रंगभूमीवरून खालीं आले व प्रेक्षकांच्या रांगांमधून असलेल्या वाटेनं प्रवेशद्वाराकडे चालत गेले. सारे प्रेक्षक उठले आणि निघाले. हा प्रकार प्रत्येक नाटकाच्या अखेरीस होतो—असं मला कळलं. नाटक संपलं तरी सारे प्रेक्षक बसून राहिले होते ते याच कारणासाठीं. इतका मोठा समाज इतक्या शिस्तीनें बसून राहिलेला मीं क्वचित् पाहिला होता. पृथ्वीराज यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि लोकप्रियतेचा हा पुरावा होता.

मी आणि श्री. गोखले उठलों आणि निघालों. जिन्याच्या रुंद रुंद पायऱ्या उतरतांना मीं खालीं दृष्टी टाकली तों दारापाशीं पृथ्वीराज उभे होते. त्यांनीं डोळे मिटले होते, दोन्ही हात पसरून पुढं धरले होते, आणि खादीची परीटघडी शुभ्र चादर

हातावर अधांतरी धरली होती. एखाद्या भव्य सुंदर शिल्पाकृतीप्रमाणें ते दिसत होते. त्यांनीं हातावर धरलेल्या चादरीच्या झोळांत लहान मोठीं नाणीं पडत होतीं.

इतक्या रात्रीं टांगा मिळण्यासारखा नव्हता म्हणून आम्हीं चालतच निघालों. वाटेनं चालतांचालतां माझ्या मनांत परस्परविरोधी विचार येत होते. एकदां वाटे पृथ्वीराज यांच्या समाजसेवेच्या तळमळीचं कौतुक करावं तेवढं थोडं होईल. आपली जी कांहीं लोकप्रियता असेल तर ती सत्कारणीं लावण्याची अशी कळकळीची इच्छा दुसऱ्या कितीशा कलावंतांमध्यें आढळून येईल?...परंतु या मागोमाग निराळेच विचार माझ्या मनांत येऊं लागत. मला वाटे, नाटक संपतांक्षणीं त्यांतल्या मुख्य पात्रानं आपल्या नेहमींच्या लौकिक स्वरूपांत पुढं यावं यांत कितीसं औचित्य आहे? ज्या वृद्ध पठाणाच्या जीवनांतील सुखदुःखाचे प्रसंग आम्हीं तीन तास पाहिले तो नाटक संपल्याबरोबर आपलं कलात्मक रूप टाकून देऊन साध्या लौकिक स्वरूपांत आमच्यापुढं उभा राहिला, आणि छोटंसं भाषण करून आमच्या रांगांतून चालत गेला, यांत रसभंग झाला नाहीं काय? नाटकाचा जो कांहीं संकलित कलात्मक परिणाम आम्हा सर्वांच्या मनावर झाला होता तो क्षणांत पुसला गेला नाहीं काय? जे आम्ही उंच उंच पहाडांत या एका गडीवर कांहीं घटका वावरलों होतों ते आम्हीं त्या सुखकारक नशेंत तरंगत तरंगत घरीं जाण्याऐवजीं एकदम सामान्य व्यवहारी पातळीवर ढकलले गेलों नव्हतों काय?–तथापि पृथ्वीराज यांनीं केलेल्या या चमत्कारिक रसभंगाबद्दल त्यांच्यावर टीका करण्यास मन तयार होईना. लोकहिताच्या त्यांच्या तत्परतेबद्दलचं कौतुक मनावेगळं करणं कठीण होतं.

नवी दिल्ली हें शहर अत्यंत आकर्षक आहे. त्याची रचना इतक्या कौशल्यानं केलेली आहे कीं इंग्रजानीं आपल्या अमदानींत ही राजधानी वसविली म्हणूनच, नाहींतर आमच्या स्वकीय राजकर्त्यांना इतक्या भव्य आणि रमणीय प्रमाणावर नवीन शहर वसवितां आलं असतं कीं नाहीं कोण जाणे असं या शहराच्या शोभेकडे पाहतांना वारंवार मनांत येतं. एकाहून एक रुंद गुळगुळीत, स्वच्छ, दोन्ही बाजूंस पादचाऱ्यांसाठीं वाटिका आणि वृक्षांच्या रांगा असलेले असे कितीतरी राजरस्ते आहेत. साऱ्यांची आंखणी अगदीं भूमितींतल्या आकृतींप्रमाणें केलेली आहे. सेक्रेटरिएटच्या उंचवट्यावर उभं राहून पाहिलं तर एखादा मैल न् मैल लांबीचा विस्तीर्ण पट मांडून ठेवल्यासारखा दिसतो. ठिकठिकाणीं सहा सहा आठ आठ राजरस्ते एकत्र आलेले

आहेत. परंतु अशा ठिकाणीं चौक बनलेले नाहींत तर विस्तीर्ण वर्तुळं आखलेलीं आहेत. त्यामुळें अशा ठिकाणीं रहदारीचं नियंत्रण करणारा पोलीस उभा असत नाहीं. त्याची गरजच नाहीं. शहरांत मोठमोठीं मैदानं कितीतरी आहेत. कांहीं प्रमुख ठिकाणीं मोठमोठ्या पुष्करिणी बांधलेल्या आहेत व त्यांतील कारंजांतून पाण्याचे फवारे उडत असलेले क्वचित् दिसतात. दिल्लीचा उन्हाळा अजून दूर आहे, तथापि रस्त्यानं जातांना या पुष्करिणी किंवा हिरव्यागार गवतांनीं आच्छादिलेले रेखीव पट्टे पाहिले कीं त्या जलाशयांत उडी घ्यावी अथवा हिरवळीवर मनसोक्त अंग पसरावं अशी इच्छा झाल्यावांचून रहात नाहीं.

परंतु या वडया शहराची ही शोभा श्रीमंतांसाठीं आहे, गरीबांसाठीं नाहीं असं मनांत वारंवार येतं. याचं मुख्य कारण हें आहे कीं वाहनांच्या सोयी इथें अगदींच नाहींत. ज्याच्याजवळ स्वतःची मोटारगाडी असेल त्याला हे मैल न् मैल लांबीचे डांबराचे प्रशस्त रस्ते सुखाचे होत असतील. परंतु सामान्य माणसाला या रस्त्यांचा उलटा जाच होतो. टॅक्सी मिळण्याची शक्यता नसते, टांगादेखील मिळण्याची खात्री नसते, आणि बस सर्व्हिस आहे परंतु ती अगदीं रद्दी आहे. रात्रीच्या थंड वेळेस टिपूर चांदणं पडलेलं असतांना गप्पा मारीत सहल करायला असे रस्ते कुठें सांपडायचे नाहींत. पण ऐन दुपारचं ऊन पडलेलं आहे, डांबरी रस्ते रखरखलेले आहेत, टॅक्सी मिळत नाहीं, टांगा दिसत नाहीं, बस लवकर येण्याची आशा नाहीं व आली तरी तिच्यांत जागा मिळण्याचा संभव नाहीं—या परिस्थितीचा अनुभव घेणाऱ्या माणसाला विचारा दिल्ली कशी काय आहे ती. त्याच्या तोंडच्या शिव्याच ऐकाव्या लागतील तुम्हांला !

'कॉनॉट सर्कस' हें नांव तूं ऐकलं आहेस. 'कॅरव्हान' मासिकाचे संपादक श्री. विश्वनाथ यांना मी पत्र लिहितों त्यावरच्या पत्त्यांत हें नांव तूं वाचलेलं आहेस. दिल्लीस जे अनेक वर्तुळकार चौक आहेत त्यांतला हा एक आहे या वर्तुळाकार चौकांत दहापंधरा राजरस्ते येऊन मिळतात. त्यामुळें 'कॉनॉट सर्कस' एवढाच पत्ता आपण घेऊन गेलों तर ठिकाण सांपडणं जवळजवळ अशक्य आहे. श्री. विश्वनाथ यांची भेट घेण्यासाठीं त्यांचं 'कॅरव्हॅन' ऑफिस मी शोधूं लागलों तेव्हां पायपिटी करण्यांत आणि पत्ता विचारण्यांत मीं जवळजवळ एक तास घालविला. अखेर निराश होऊन परत वळणार होतों इतक्यांत एका सज्जनानं एका इमारतीकडे बोट वळवून सांगितलं, या ठिकाणीं जा. मीं त्या इमारतींत पाय टाकला, आणि परतच वळणार होतों. कारण

मीं पाहिलं तों एका मोठया फॅशनेबल जवाहिऱ्यांच्या दुकानांत मी शिरलों होतों. परंतु तितक्यांत त्या दुकानाचा मालक जवळ आला आणि त्यानं विचारलं "आपल्याला कोण पाहिजे आहे?" मीं म्हटलं, "कॅरॅव्हानचे संपादक श्री. विश्वनाथ यांना मला भेटायचं आहे." तुमच्या दुकानांत चुकून पाय टाकला. माफ करा. हे शब्द माझ्या तोंडून दुसऱ्याच क्षणीं बाहेर पडलेच असते; परंतु तितक्यांत तो गृहस्थ म्हणाला, "जिन्यानं आपण वर जा, म्हणजे श्री विश्वनाथ आपल्याला सांपडतील." जवाहिऱ्याच्या दुकानांत एका मासिकाच्या संपादकाची कचेरी असावी ही मला कांहींशी विनोदी घटना वाटली. मी पायऱ्या चढून वर गेलों. एखाद्या अडगळीच्या माळ्याची उघडी जागा असावी अशी जागा जिन्याच्या टोकाला होती. एका टेबलापलीकडे एक गृहस्थ खुर्चीत बसले होते. त्यांना मीं विचारलं, "श्री.विश्वनाथ कुठें भेटतील?" ते म्हणाले, "मीच विश्वनाथ." मीं माझं नांव सांगितलं त्याबरोबर त्यांनीं उठून हसत माझ्याशीं हस्तांदोलन केलं, थंड कॉफी मागविली व आमच्या खूप गप्पा सुरू झाल्या.

माझ्यापेक्षां थोडे उंच, पण बळकट बांध्याचे, जरा वाटोळ्या परंतु जवड्याचीं हाडं रुंद असल्यामुळें कांहींसा चौकोनी भासणाऱ्या चेहऱ्याचे, पोषाकाच्या बाबतींत अगदीं साधे, आणि किरट्या आवाजाचे असे हे गृहस्थ आहेत. त्यांना बोलायला खूप हवं. मीं त्यांचा निरोप घेऊं लागलों तेव्हां ते म्हणाले,

"इथें आहांत तंवर रोज येत जा ना इकडे."

मीं म्हटलं, "अगदीं अवश्य येईन, कारण त्यांत माझा फायदा आहे."

ते म्हणाले, "फायदा?"

मीं म्हटलं, "होय. तुमचं ऑफिस एका बडया जवाहिऱ्याच्या दुकानांत आहे. मी रोज या दुकानांत शिरलों कीं पहाणाराची समजूत होईल कीं मी बडा श्रीमंत गृहस्थ असून जवाहर खरेदी करण्यासाठीं या ठिकाणीं येतों. आणि असं झालं कीं माझा सामाजिक दर्जा नाहीं का वाढणार?"

हें ऐकून श्री. विश्वनाथ मोठमोठ्यांदा हसूं लागले.

मीं पाहून ठेवलं आहे कीं किरट्या आवाजाचीं माणसं अशीच खदखदून हंसत असतात.

श्री. विश्वनाथ यांच्याकडे गप्पा मारण्यासाठीं जाणं हें एक नवं आकर्षणच मला झालं आहे. परंतु त्यांच्याकडे जातांना अगर त्यांचा निरोप घेऊन परतल्यावर मी सरळ आपल्या वाटेला लागत नाहीं. शाळेंत जातांना वाटेंत तमाशा पहात उभं राहूं नये हें सुभाषित अगदीं लहानपणीं आमच्या अभ्यास पुस्तकांत मीं वाचलेलं आठवतं. परंतु या सुभाषितावरचा माझा विश्वास लहानपणापासूनच उडूं लागला होता व आतां तर तो अगदींच उडाला आहे. 'गुजगोष्टी'मध्यें एका निबंधांत मीं या सुभाषितांतली चूक दाखविलीही आहे असं वाटतं. ज्या एकाद्या ठिकाणीं आपण जात असतों त्याच्या वाटेवर अशा किती तरी गोष्टी आपल्याला भेटतात कीं त्यांचा आपल्या मनाला मोह पडावा. अशा गोष्टोकडे दुर्लक्ष करून सरळ नाकासमोर जाण्याचे कांहीं फायदे असतील, नाहीं असं नव्हे. परंतु अशानं माणूस आयुष्यांतल्या पुष्कळशा गमतींना मुकतो. ही गोष्ट खरी ती खरीच. 'कॅरव्हान' मासिकाचं ऑफीस ज्या ठिकाणीं आहे तो 'कॉनॉट सर्कस' भाग म्हणजे नव्या दिल्ली शहरांतलं सगळ्यांत गंमतीदार ठिकाण आहे. 'गमतीदार' या विशेषणाच्या जोडीला मला आणखी एक विशेषण वापरायचं आहे. पण मला जो इंग्रजी शब्द आठवत आहे त्याचा मराठी पर्याय चटकन् सुचत नाहीं. 'कलरफुल' असं म्हणायचं आहे मला! कॉनॉट सर्कसमध्यें आपल्या कोल्हापूरच्या खासबाग मैदानाहूनही जरा मोठी अशी एक वर्तुळाकार बाग आहे. या वर्तुळाभोंवतीं खूप मोठा वर्तुळाकार राजरस्ता आहे. आणि या राजरस्त्याला कितीतरी मोठमोठे इतर राजरस्ते येऊन मिळाले आहेत. सर्व प्रकारचीं मोठमोठीं दुकानं या ठिकाणीं आहेत. मोठमोठ्या कंपन्यांचीं ऑफीसंही आहेत. आणि विश्रांतीगृहं आणि सिनेमाची थिएटर्सही आहेत. या शहरांत पांच पांच सहा सहा मजल्याच्या उंच इमारती नाहींत. तीन मजली इमारत हाच ठरीव सांचा. शहराच्या विस्ताराला मर्यादाच नसल्यामुळें मजल्यांची संख्या तिहीच्यापलीकडे फारशी गेली नसावी. 'कॉनॉट सर्कस'मध्यें कचेऱ्या, वखारी, हरतऱ्हेचीं दुकानं, खाद्यपेयांचीं आणि करमणुकीचीं ठिकाणं या सर्वच गोष्टी असल्यामुळें इथें अष्टौप्रहर माणसांची गर्दी दिसते. संध्याकाळच्या वेळेस फेरफटका करण्याची जागा म्हणूनही याच भागाचा लोक उपयोग करतात. मुंबईतील ग्रँटरोड, फोर्ट आणि चौपाटी, ही सारीं एकत्र केलीं तर ज्या तऱ्हेची रहदारी आणि ज्या तऱ्हेचे माणसांचे व्यवहार आपणाला दिसतील तसलं कांहींसं स्वरूप कॉनॉट सर्कसला दिवे लागण्याच्या सुमारास येतं.

( समुद्र मात्र वजा करायचा हं ! ) इथल्या कांहीं दुकानांत आइस्क्रीम फार चांगलं मिळतं असा मला शोध लागला आणि तेव्हांपासून कोणत्या दुकानांतील आइस्क्रीम सर्वांत चांगलं हें ठरविण्याच्या शुद्ध शास्त्रीय हेतूनं मी बहुतेक साऱ्या दुकानांना आश्रय देत आहें. ज्या थिएटरांत 'पठाण' नाटक मीं पाहिलं त्याच्या आसपास कुठें तरी फूटपाथवर एक पानपट्टीवाला बसतो व त्याच्याकडे स्पेशल नागपूरकडील 'रामटेक' पानांची पट्टी मिळते ही गोष्ट त्या रात्रीं श्री. गोखले यांनीं मला दाखविली होती. पुढं मी एकटाच या भागांतून भटकतांना त्या पानवाल्याला मी शोधूं लागलों तों मला तो सांपडेना. तो कोणत्या ठिकाणीं बसतो तें आजूबाजूच्या खुणावरून मीं लक्षांत ठेवलं होतं. परंतु त्या खुणा तिथून नाहींशा झाल्या म्हण, किंवा माझी आठवण बारगळली म्हण, तो पट्टीवाला मला दिसेना. शेवटीं ठरविलं कीं कॉनॉट सर्कसच्या भोंवतीं फूटपाथची जी प्रदक्षिणा आहे ती सबंध घालायची. हा उपाय यशस्वी ठरला. मग त्या मुलाजवळून मीं चांगल्या डझनभर पानपट्ट्या करून घेतल्या. इतकंच नव्हे तर कश्मीरला जातांना दोनशें उत्तम पानं मला लागतील तयार ठेव असं त्याला बजावलं. माझ्या नेहमींच्या संवयीप्रमाणें तो कोण कुठला याची मी चौकशी केली, तेव्हां मला कळलं कीं ते तिघे पोरसवदा भाऊ होते उमरावतीचे रहाणारे. इथें येऊन हा धंदा करीत होते. खास रामटेकचं पान मागविणं, उत्तम स्थितींत राखणं, इत्यादि गोष्टी किती कठीण आणि दगदगीच्या असतील याची तूं सहज कल्पना करूं शकशील. परंतु दगदगीवांचून बरकत होत नसते. आणि कुठें कोणत्या वस्तूची उणीव आहे तें हेरण्याची हुषारी या कष्टांच्या जोडीला अंगी असली तर मनुष्य कुठेंही नशीब काढतो. हेंच पहाना, हीं उमरावतीचीं तीन पोरं इथें नव्या दिल्लींत पानपट्टीच्या धंद्यावर रोज दहा रुपये मिळवीत आहेत. आज तीं आपला धंदा फूटपाथवर करीत आहेत, पण लवकरच एक दुकान आपण थाटूं अशी भाषा हीं करतात. एक दोन वर्षांनीं या शहरीं आलों तर या मुलांचं आरसे, पितळेची भांडीं, तबक, वाट्या, इत्यादींनीं सुसज्ज असं सुंदर पानपट्टीचं दुकान मला आढळेल याबद्दल मला शंका नाहीं !

अशा कितीतरी गमती कॉनॉट सर्कसवरील फेरफटक्यांत मला रोज भेटत आहेत. या भागांत दिवे लागणी झाल्यानंतर जिकडे तिकडे खूपच रोषणाई दिसते. दिव्याची, दुकानाची, माणसांची अशी अनेक प्रकारची शोभा रात्रीच्या पहिल्या प्रहरीं या ठिकाणीं

प्रगट होते. तीस वर्षांपूर्वी मी दिल्लीस होतो तेव्हां राजरस्त्यावर जीं माणसं दिसत त्यांचे पोषाख, त्यांची भाषा, त्यांचे व्यवहार या साऱ्या गोष्टी एका ठराविक नमुन्याच्या असत, पण आतां माझ्या अंगावरून दोन्ही दिशाकडे वाहाणाऱ्या मानवी प्रवाहांतील व्यक्ती हजार नमुन्यांच्या आहेत. या गर्दींत लुंग्या दिसतात, साहेबी थाटाच्या पाटलोणी दिसतात, पंजाबी लेहेंगे दिसतात! आजूबाजूस भाषा चालते तिच्यांत दहा तऱ्हेच्या बोली ऐकूं येतात. हें शहर चांगल्या अर्थानं संपूर्णतः बकाली झालं आहे. आणि रात्रीच्या वेळच्या या बकाली गर्दींत नजर पुनःपुन्हा ओढून कोण घेतं विचारशील तर निर्वासित म्हणून दिल्लीस येऊन राहिलेल्या पंजाबी आणि शीख स्त्रिया. आधींच निसर्गानं ज्यांना देखणेपणाची, निकोप प्रकृतीची देणगी दिलेली आहे अशा या पूर्णतः आधुनिक बनलेल्या पंजाबी आणि शीख तरुण मुली आपापल्या जोडीदारावरोबर हिंडतांना पाहिल्या म्हणजे या ‘ निर्वासित ’ आहेत ही गोष्ट मानायला मन तयार होत नाहीं. त्यांचे ते उंची साटणीचे रंगीबेरंगी लेहेंगे आणि ब्लाऊज, ते झिरझिरित रेशमी दुपट्टे, हातांतले, गळ्यांतले, कानांतले उंची अलंकार, आणि पावडर मारलेले चेहरे व लिपस्टिकनं लालवुंद केलेले ओठ पाहिले कीं खान अबदुल गफारखान यांच्या मुलानं पंजाबी लोकांचं, “ कपड्यांचा, अलंकारांचा व विषयवासनेचा—सगळ्याच गोष्टींचा अतिरिक्त सोस करणारीं माणसं. ” असं जें वर्णन एका लेखांत केलं आहे त्याची आठवण होते! आणि मनाला खिन्न करणारा विचार येतो तो हा, कीं पंजाबी निर्वासितांपैकीं हे जे सधन लोक आहेत त्यांचे हे निर्लज्ज ऐषआरामी चोचले वंद करून यांच्या संपत्तीचा विनियोग जे निर्वासित यांच्याच देशांतून भिकेला लागलेले आहेत त्यांच्या संगोपनाकडे करण्याची योजकता आणि ताकद आमच्या सरकारच्या ठिकाणीं नसावी हें केवढं दुर्दैव.

• • •

## —१२—

नवी दिल्ली शहरांत सहज मजेनं सहल करायला जायचं ठिकाण जसं कॉनॉट सर्कस तसं जुन्या दिल्लींतलं ठिकाण म्हणजे 'चांदणी चौक'. सत्तावीस वर्षांपूर्वी इथल्या सेंट स्टीफन्स कॉलेजांत तत्त्वज्ञानाचा अध्यापक म्हणून मी काम करीत होतों तेव्हां या चांदणी चौकांत मीं कितीदां तरी सहल केली होती. आतां इतक्या वर्षांनीं मी या शहरांत पुन्हां आलों तेव्हां नव्यानं अस्तित्वांत आलेलीं प्रेक्षणीय स्थळं पहावीं अशी इच्छा मला होते त्याप्रमाणेंच सत्तावीस वर्षांपूर्वी दिल्लींतील ज्या स्थळांनीं मला मोह घातला तीं पुन्हां एकदां पहावीं, तीं जशीच्या तशीं राहिलीं आहेत कीं काळाच्या ओघाबरोबर वदललीं आहेत तें बघावं, असं मला वाटणं साहजिक आहे. किंबहुना नव्या दिल्लींतील प्रशस्त रस्ते, वर्तुळाकार चौक, मोठमोठ्या भव्य कचेऱ्या पहातांना जुन्या परिचयाच्या स्थळांचं पुनर्दर्शन घेताना जो आनंद होतो तो मला होत नाहीं. त्यापेक्षा वाटतं, पुन्हां एकवार सेंट स्टीफन्स कॉलेजांत जावं, तिथल्या ज्या वर्गांत मी बी. ए. चे व एम. ए. चे तास घेतले त्या वर्गांत निदान डोकावून पहावं, प्रिन्सिपल रुद्र यांच्या ज्या बंगल्यांत मी राहिलों होतों त्या बंगल्यापुढच्या बागेंत पुन्हां चांदण्यांत फेऱ्या घालतां आल्या तर घालाव्या, मऊ मृदु हिरवळीनं झांकलेल्या ज्या टेनीस कोर्टावर मनोसक्त खेळलों त्या कोर्टावर खेळावं, ज्या विस्तीर्ण मैदानांत ध्यानचंद आणि रूपचंद या पुढें जगप्रसिद्ध झालेल्या खेळाडूंचा हॉकीचा खेळ मीं प्रथम पाहिला त्या मैदानाच्या सीमेवर रेंगाळावें किंवा ज्या चांदणी चौकांत मी कितीदां तरी हिंडलों तो चांदणी चौक काळाबरोबर कितीसा बदलला आहे तें जाऊन पहावं—

म्हणून काल जुन्या दिल्लीकडे जाणाऱ्या एका बसमध्यें शिरलो, तीन आण्याचं

तिकिट काढून निघालों आणि लाल किल्ल्यापाशीं उतरलों. त्या लाल किल्ल्यांत लव-करच गांधीवधाचा खटला सुरू होणार आहे व त्याची तयारी जोरानं चालली आहे असं मीं ऐकलं आहे. कोर्टाची जागा तयार करण्यांत येत आहे, आरोपींच्या कोठड्या साफ-सूफ होत आहेत, पोलिस खात्यांतील अंमलदारांचा तळ पडणार आहे, त्याची तयारी चालली आहे, योग्य ठिकाणीं कांटेरी कुपणं घातलीं जात आहेत. हें सारं पहाण्यासाठीं मी लाल किल्ल्यांत केव्हां तरी जाणार आहें. पण आज नव्हे. आज चांदणी चौक पहायचं ठरवलं होतं मीं.

म्हणून लाल किल्ल्यासमोरच्या चौकांत जेव्हां उतरलों तेव्हां पश्चिमेकडे जाणाऱ्या रस्त्यावर नजर टाकीत कांहीं वेळ मी चौकांत उभा राहिलों. सुमारें अर्ध्या मैलाच्या अंतरावर चांदणी चौकांतील 'घंटाघरा'चा तो परिचित उंच मनोरा मला दिसत होता. मीं मनाशीं म्हटलं, ' चांदणी चौक जागेवर आहे तर ', आणि त्या विचारानं मला आनंद झाला.

मी ज्या ठिकाणीं उभा होतों त्याच्या डाव्या अंगानं घंटानाद ऐकू आले. गौरी-शंकर नांवांचं एक छोटसं देवालय या ठिकाणीं आहे या गोष्टीची मला आठवण झाली. पूर्वीं अनेक वेळां दिवेलागणीच्या सुमारास मी या देवळापर्यंत फिरत आलों होतों. आणि या देवळाच्या कट्ट्यावर स्वस्थ वसून राहिलों होतों. आज नवी दिल्ली आणि जुनी दिल्ली यांच्या सांध्यावर असलेलं आणि गजवजाटांत सांपडलेलं हें देवा-लय सत्तावीस वर्षांपूर्वीं शहराच्या अगदीं टोकाला होतं. तिन्ही सांजांच्या घटकेला या जागीं पूर्ण शांतता असे. देवदर्शनार्थ येणारे लोक पायऱ्या चढून येतांना आणि परततांना मला दिसत. या देवळाच्या कट्टयावर अगदीं एकटं बसून राहून घाल-विलेल्या शांत घटकांची आठवण मला आतां एकदम झाली. मी हळूहळू चालूं लागलों आणि देवळाच्या जवळ आलो. देवळाच्या संगमरवरी पायऱ्यांना भिडलेल्या फूट-पाथवर दुकानांची दाटी दिसली व दर्शनोत्सुक धार्मिक माणसापेक्षां तहान भुकेची तरतूद करण्यासाठीं धडपडणारीं माणसंच देवळापुढें अधिक घोंघावत होतीं असं आढळून आलं ! बिचाऱ्या गौरी-शंकराचा एकांतवास खलास झाला होता ! हा विचार मनाला खिन्न करणारा होता.

एखाद्या नदीनं दोन्ही अंगांचे तट फोडून आपलं पात्र मोठं करून घ्यावं त्या-प्रमाणें पूर्वीं लहानसाच असलेला हा रस्ता चौपट मोठा झालेला मला दिसला, आणि

या विस्तीर्ण रस्त्यांतून रहदारीचं खळखळणारं गढूळ पाणी वाहतांना पाहून मला वाटलं कीं माझ्या मनांत आलेली नदीची उपमा पूर्णोपमा होण्यासारखी आहे. रस्ता चौपट रुंदावल्यामुळें दोन तपांपूर्वीच्या कित्येक खुणा नाहींशा झाल्या होत्या तथापि कांहीं ठळक खुणा अजून कायम होत्या. उदाहरणार्थ जरा पुढं गेलों तेव्हां "फवारा चौक" दिसला, आणि एकादा जुना सुहृद भेटल्याप्रमाणें मनाला आनंद झाला. परंतु हा चौक ओलांडून पुढं गेलों. व ज्या मैलभर लांबीच्या रस्त्याला खास चांदणी चौक म्हणतात त्या रस्त्याकडे नजर टाकली त्याबरोबर माझा हा आनंद नाहींसा झाला, आणि क्षणभर मी अगदी गोंधळून गेलों. ज्या स्थळाला चांदणी चौक म्हणून मी ओळखीत होतों तेंच हें स्थळ काय ? माझ्या दृष्टीवर माझा विश्वास बसेना. विस्मयानं आ वासून मी पहातच राहिलो.

गेल्या सत्तावीस वर्षांत केवढाले बदल देशांत झाले आहेत आणि किती तरी घटना एका मागून एक घडल्या आहेत. प्रथम गुलामगिरींतली शांतता होती. नंतर ब्रिटिश सत्तेशीं झुंज सुरू झाली. आणि कित्येक वर्षं अस्वस्थेंत गेलीं. अखेर स्वातंत्र्य मिळालं परंतु धुमकेतूला अशुभ पुच्छ असावं त्याप्रमाणें स्वातंत्र्याच्या मागोमाग निराशा दुःख आणि संताप यांची वावटळ आली. या साऱ्या घटनांच्या खुणा जुन्या दिल्लीच्या या हृदयस्थानावर उमटलेल्या मला दिसत होत्या. चांदणी चौकाचं जें हें स्थळ माझ्या पूर्ण परिचयाचं आणि प्रीतीचं होतं त्याचा चेहरा आतां इतका बदलला होता कीं क्षणभर मला त्याची ओळख पटेना ! हा नवीनच चांदणी चौक मी पहात होतों. याच्या चेहऱ्याचे भाव माझ्या परिचयाचे नव्हते. या स्थळाची ही 'शक्ल' मला अगदीं अपरिचित आणि भांबावून टाकणारी वाटत होती !

"फवारा" चौकापासून फतेपुरीच्या नाक्यापर्यंत जाणारा चांदणीचौकाचा जुना रस्ता पूर्वीपेक्षां आतां सहापट रुंद झालेला आहे. आतां याची रुंदी सत्तर फूट सहज असेल. परंतु या विस्तारांतली इंचभर तरी जागा मोकळी आहे काय ? नाहीं, दोन्ही अंगानं मोठमोठया टोलेजंग इमारतींत दुकानं आहेत. फूटपाथवर फेरीवाल्यांच्या दुकानांची झुंबड उडाली आहे. फुटपाथला लागून ट्रॅमचे रूळ आहेत व त्यांवरून माणसानीं खचून भरलेल्या भिकार ट्रॅमगाडया खळमुखळम् असा आवाज करीत सरपटत येत जात आहेत. पंजाबाहून आलेल्या निर्वासितांनीं या गर्दीतच दोन्ही बाजूस डालरोटींचीं दुकानं उभीं केलीं आहेत. आणि या दाटींतूनच मोटारी, घोडा-

गाडया, रिक्शा, खटारे, सायकली यांची ये जा चालली जाहे ! सारा गोंधळ आणि बेशिस्त ! दहा भाषांतल्या शब्दांची कटकट चहूंकडून माझ्या कानांवर येत होती. रस्त्यावरच मांडलेल्या चुलाण्यांवरच्या उकळत्या तुपाचा, आंबलेल्या मिठाईचा, सडलेल्या फळांचा आणि लोकांच्या अंगावरील घामाचा संमिश्र दर्प हवेंत दरवळला होता आणि या साऱ्या खुळ्या धांदलीकडे शांत चित्तानं बघत घड्याळाचा मनोरा एखाद्या तत्त्वज्ञान्याप्रमाणें मधोमध आल्या जागीं अढळ उभा होता !

या टॉपवरच्या खालीं चहूं बाजूस कापडाचे ढीगच ढीग उघड्या रस्त्यावर पडलेले होते. कंट्रोलच्या दिवसांत भूमिगत झालेलं हें कापड कंट्रोल उठल्या बरोबर आतां प्रकट झालेलं आहे. कुंभाराची सून कितीही लपली तरी अखेर उकिरडयावर यावी त्याप्रमाणें दीर्घकाल दडून राहिलेल्या या कापडाच्या राशीच्या राशी आतां उघडयावर येऊन पडल्या आहेत. मुंबईच्या मूळजी जेठा मार्केटप्रमाणें कापडाचा एक प्रचंड उघडा बाजार इथें खुला झाला आहे. खरेदी विक्रीला अगदीं जोर आला आहे. गाडे भरभरून गाठी इथं येऊन पडत आहेत आणि उलट विकलं गेलेलं कापड गाडे भरभरुन इथून नेलं जात आहे. विकणारे जमिनीवर मांडी घालून बसले आहेत खरीदणारे उन्हांत उभे आहेत, मोठमोठे घाऊक सौदे पटत आहेत. माझ्या देखतदेखत एका माणसानं दुसऱ्याच्या हातीं पांच हजारांच्या नोटा दिल्या. ज्यानं त्या घेतल्या त्या नोटांचे कोरे करकरीत रंगीत कागद आपल्या लेंग्याच्या खिशांत कोंबले ते इतक्या निष्काळजीपणानं कीं जणू तो विडयाचीं पानं चंचींत कोंबीत होता. मनोऱ्याखालीं कापडाचे घाऊक सौदे चालले होते तर रस्त्याच्या दुतर्फा कापडाची किरकोळ विक्री चालू होती. पुढं, मागें, उजव्या अंगाला, डाव्या बाजूला जिकडे पहावं तिकडे कापडच कापड दिसत होतं ! सत्तावीस वर्षांपूर्वी ज्या चांदणी चौकांत उंची गालिचे, रुजामे, आणि जडजवाहर अशा मालाचीच काय तीं दुकानं होतीं, तो चांदणी चौक पार नाहींसा झाला होता ! व त्या ठिकाणीं हा खुळ्यांचा बाजार निर्माण झाला होता ! या बाजारांत जिकडे तिकडे कापड विखुरलेलं होतं, व कापडाच्या जोडीला कांहीं कांहीं ठिकाणीं बूट, चप्पल, सौंदर्यप्रसाधनं, साबण, खेळणीं असा माल विक्रीसाठीं मांडला होता. पूर्वीची ती जुनी प्रतिष्ठित पेठ काळाच्या उदरांत पार गडप झाली होती !

देशाची फाळणी झाल्याबरोबर एका रात्रींत जे आपल्या शेतीवाडीला, घरादाराला मुकले असे हजारों दुर्दैवी लोक पंजाबांतून आले ते दिल्लींत राहिले. निर्वासितांपैकीं

जे सधन लोक आपली ' माया ' बरोबर घेऊन आले ते थाटबाज पोषाख करून सर्व प्रकारच्या चैनी करीत नव्या दिल्लींत कसे हिंडतात तें मीं कॉनॉट सर्कसवर रोज पहातों आणि आतां पंजाबकडल्या निर्वासितांची ही दुसरी तऱ्हा या चांदणी चौकांत मला दिसत आहे ही पहातांना " तें चित्र पहा, आणि हें चित्र पहा ! " असे जे उद्‌गार हॅम्लेट पिळवटलेल्या अंतःकरणानं आपल्या आईजवळ काढतो ते तोंडाशीं आल्यावांचून रहात नाहींत. प्रश्न एवढाच कीं हे उद्‌गार ऐकणारं कोण आहे ? सर्वस्वी निराधार होऊन आलेल्या या कफल्लक निर्वासितांनीं चांदणी चौक हेंच आपलं घर केलेलं आहे. हीं माणसं इथेंच रहातात, इथेंच जेवतात, इथेंच झोपतात, व्यापार करतात, एकमेकांशीं भांडतात, यापैकीं बहुतेक लोक कापड विकतात; कांहीं फळं विकण्याचा धंदा करतात, कोणी सोडालिंबु आणि आईस्क्रीम विकतात. कित्येकांनीं उघडयावरच छोटींछोटीं ' स्वयंपाकघरं ' उभीं केलीं आहेत आणि या ठिकाणीं मोडक्या बांकावर बसून गिऱ्हाईकं डाळरोटींचा स्वस्त खाना घेतात. टाऊन हॉलच्या भव्य इमारतीपुढं असल्या ' स्वयंपाक घरांची ' रांगच्या रांग लागलेली मला दिसली. त्यांतील एकांत मी शिरलो. डाळरोटी खाण्यापेक्षां या स्वस्त खाणावळी चालविणाऱ्या या लोकांची परिस्थिति समजून घेण्याची उत्सुकता मला अधिक होती. म्हणून ज्या सतरा अठरा वर्षांच्या शीख तरुणानं माझ्यापुढं चपाती डाळ आणि बटाटे भरलेली थाळी आणून ठेवली त्याच्याशीं मीं बोलणं काढलं. त्याच्या सांगण्यावरून असं दिसलं कीं तो, त्याचे भाऊ आणि त्याचे चुलते मिळून हा खाणावळीचा उद्योग करीत होते. ही मंडळी मूळची गुजराणा जिल्ह्यांतील ' किला-साहेब सिंग ' नांवाच्या एका खेडयांतली. तिथें त्यांची पाऊणशें एकर जमीन होती परंतु पाकिस्तान अस्तित्वांत आलं आणि या खेडयांतील सुमारें तीनशें शिखांवर आपल्या जमिनी आणि घरंदारं टाकून पळण्याचा प्रसंग ओढवला. ते हिंदुस्थानांत आले आणि आपली बायका मुलं पानिपतच्या छावणींत ठेवून त्यांनीं इथें चांदणी चौकांत या खाणावळी थाटल्या. डाळ रोटीला महाग झालेले हे किसान आचाऱ्याचा पेशा पत्करून आज लोकांना डाळरोटी शिजवून वाढीत आहेत. माझ्याशीं इंग्रजींत संभाषण करणारा हा शीख तरुण मुलगा त्याचं नांव इंद्रजितसिंग म्हणजे इंद्राला जिंकणारा आणि आणि हा राजांचा राजा आज आचारी बनला आहे ! मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास होता आणि लाहोरच्या कॉलेजांत उच्च शिक्षणासाठीं दाखल होण्याचे बेत करीत

होता. पण पाकिस्तानच्या धक्क्यानं त्याचे ते सारे मनोरथ ढासळले आणि आज तो इथं लोकांचीं उष्टीं खरकटीं काढीत आहे! त्याचा काका चपात्या भाजीत आहे आणि त्याचे धाकटे भाऊ भांडीं विसळीत आहेत! या कुटुंबाची कहाणी किती करुण होती. आणि या चांदणी चौकांत अशा अगणित करुण कहाण्या जागोजाग ऐकायला मिळण्यासारख्या होत्या. अखेर मीं इंद्रजितसिंगचा निरोप घेतला तेव्हां त्यानं तोंडावर जें हास्य आणलं तें देखील मला करुणास्पद वाटलं. माझ्या डोळ्यांसमोर कॉनॉट सर्कसवर रोज संध्याकाळीं पाहिलेल्या निर्वासित छानछबेल्यांचीं भडक रंगदार चित्रं उभीं राहिलीं. कुठेंतरी कांहीं तरी चुकत आहे या विचारानं माझं मन उदास झालं, आणि कुणाचं काय चुकत आहे तें सांगण्याची सोय नसावी ही गोष्ट मनांत येऊन माझी खिन्नता अधिकच वाढली. मी कोणत्या दिशेनें चाललों होतों त्याचं मला नीटसं भान राहिलं नाहीं."

परंतु तितक्यांत एक ट्रॅमगाडी घरघर आवाज करीत माझ्या दिशेनं येत असलेली मला दिसली. तिच्या आंत, बाहेर, वर, जिकडे तिकडे माणसं लगडलीं होतीं आणि रहदारींतून कशीबशी वाट काढीत घळम घळम आवाज करीत एकाद्या श्वापदाप्रमाणें ती पुढं सरकत होती. 'हट जाव' 'हट जाव' अशा जिकडे तिकडे आरोळ्या उठल्या. एका स्वयंपाकघरापुढच्या बाकड्यावर अस्ताव्यस्त पाय पसरून बसलेल्या एका इसमानं किंकाळी फोडली. ट्रॅम त्याच्या पायावरून गेली. परंतु ती तशीच पुढं निघून गेली. त्या माणसाच्या आर्तस्वराकडे कुणीही काडीइतकं देखील लक्ष दिलं नाहीं. असे अपघात इथं नित्यच घडत होते असं दिसलं. रोज मरे त्याला कोण रडे? ज्याच्या तंगडीवरून ट्रॅम गेली होती त्याही पठ्ठयानं शिव्या मोजून रस्त्यावर थुंकून पुन्हा थाळींतली डाळरोटी खायला आरंभ केला. चांदणी चौकांतल्या या निर्वासितांच्या जगानं इतक्या मोठ्या आपत्तींना आणि दारुण दुःखांना तोंड दिलं होतं कीं एक माणसाची तंगडी ती काय असंच जणूं या जगांतले लोक मानीत होते. मीं पाहिलं तों जिकडे तिकडे लोक खात होते, हजामत करून घेत होते, आंघोळ करीत होते, खरेदीविक्री करीत होते! ट्रॅमखालीं सांपडून मोडेना कां एक माणसाची तंगडी? जिथें जमिनी गेल्या, घरंदारं सोडावीं लागलीं, बायकांची इज्जत गेली, पोरांचे प्राण गेले तिथें एका माणसाच्या एका टांगेचा काय मुलाहिजा? एके ठिकाणीं एक फेरीवाला लाल बुंद 'लोकाट' फळं विकीत होता. त्यांतलीं कांहीं घ्यावीं म्हणून मी त्यापुढं उभा राहिलों, इतक्यांत 'देखो' 'मारो'

अशा कर्कश आरोळ्या मला ऐकूं आल्या. मीं पाहिलं तों लोक जिकडून तिकडून सैरा वैरा धांवत येत होते आणि माझ्या उजव्या हाताला असलेल्या एका मोठ्या फॅशनेबल दुकानापुढें येऊन भिडत होते, मी पुढें झालों आणि गर्दींत सामील न होण्याची दक्षता घेऊन आहे तरी काय प्रकार म्हणून बघूं लागलों. दोन माणसांचं कडाक्याचं भांडण चाललं होतं. दोघेही शिखच होते. मला त्यांची भाषा कळेना. पण गर्दींतल्या माझ्या शेजाऱ्यानं मला माहिती दिली. भांडणाऱ्या त्या दोघां शिखांपैकीं एक त्या टोलेजंग कापड दुकानाचा मालक होता आणि दुसरा रस्त्याच्या दुकानाला बसून कापड विकणारा फेरीवाला होता. दुकानांतल्यापेक्षां कितीतरी स्वस्त किंमतींत हा फेरीवाला कापड विकित असे. आणि त्यामुळें कापड खरेदीसाठीं दुकानांत कुणी पाऊलही टाकीत नसे. म्हणून बडा दुकानदार फेरीवाल्याला म्हणत होता कीं माझ्या दुकानापुढें तूं बसतां कामा नये. " या हरामखोर निर्वासितांनीं आमचा सारा धंदा बसविण्याची वेळ आणली आहे. " हें पालुपद तो नाना तऱ्हांच्या शिव्याशापांत घोळून म्हणत होता. उलट " ही फूटपाथवरची जागा तुझ्या बापाची आहे काय ? " असा प्रश्न तो फेरीवाला परोपरीच्या शिव्यांनीं नटवून विचारीत होता. मुद्यावरून गुद्यावर भांडण यायला वेळ लागला नाहीं. हातघाईची लढाई पुरेशी वाटेना तेव्हां त्या दोघा शिखांनीं एका दुकानाच्या छताचे वांबू उपसून काढले आणि एकमेकांवर हल्ला चढवला. कर्णार्जुनाच्या युद्धाच्या वेळीं एखाद्या नाटकांतला संतप्त संवाद रंग-भूमीवर चालावा त्याप्रमाणें एकमेकांवर वांबूचे प्रहार करतांना त्या दोघा शिखांचा आवेशयुक्त संवाद सुरूं होता. आणि माझ्या डोळ्याचं पातं लवतं न लवतं तोंच द्वंद्वयुद्ध खेळणाऱ्या त्या दोघांपैकीं एकानं चटकन सुरा काढला आणि तो दुसऱ्याच्या अंगांत खुपसला ! वड्या दुकानदारानं छोट्याला मारलं कीं छोट्यानं वड्याला मारलं तें नंतरच्या हलकल्लोळांत मला समजलं नाहीं. परंतु एवढं खास कीं जी लढाई अशा प्रकारें शोकान्त ठरली होती ती धर्मवेडाची नव्हती. ही झुंज संपूर्णपणें आर्थिक स्वरूपाची होती. जीवन–कलहाचं जें भयंकर रुद्र नाटक आज घटकेच्या चांदणी चौकांत अष्टौप्रहर चालूं आहे त्या नाटकांतला चित्त थरारून सोडणारा आणि अंतःकरण सुंद करणारा एक छोटासा प्रसंग माझ्या डोळ्यांसमोर घडला होता. पण या लहानशा प्रसंगांत किती मोठा अर्थ भरलेला होता !

● ● ●

# —१३—

उद्यां सकाळीं मीं श्रीनगरला जाण्यासाठीं विमानानं निघत आहे अशी मी काल केलेली माझी तार तुला वेळेवर पोचली असेलच. हें पत्र मी आज लिहीत आहे त्यावर कोंपऱ्यात श्रीनगर असा उल्लेख पाहून तुला समजेलच कीं मीं इथें दाखल झालों आहे. आतां दुपारचे तीन वाजण्याचा सुमार आहे. हें पत्र हवाई डाकेनं रवाना होणार असल्यानं तें तुझ्या हातीं तिसऱ्या दिवशीं पडेल. आज सकाळीं नऊ वाजतां आमचं विमान दिल्लीहून निघालं. दिल्ली-श्रीनगरच्या फेऱ्या करणारीं डालमिया कंपनीचीं हीं विमानं छोटया आकाराचीं आहेत. यांतला प्रवास मला कांहीं फारसा सुखाचा वाटला नाहीं. शिवाय विमान छोटं असो अगर मोठं असो हवाई प्रवासांत विशेष मजा नसतेच. माणसाला एखाद्या पेटींत घालावं, पेटी सिलबंद करून टाकावी व हवेंत सोडून द्यावी, अशांतलाच हा प्रवासाचा प्रकार असतो. हजारों फुटांच्या उंचीवरून विमान जात असल्यामुळें खालच्या सृष्टींतलं सारं वैचित्र्य लुप्त होतं.

आगगाडींतल्या प्रवासांत वरचेवर स्टेशनं येतात. नवेनवे चेहरे दिसतात, वाटल्यास खाद्यपेयं घेतां येतात, ऊठ बस करतां येते, निदान खिडकींतून डोकं बाहेर काढावं, हवेचा झोत अंगावर घ्यावा आणि बाहेरचा देखावा पहावा येवढं तरी हवं तेव्हां करतां येतं. विमानांत या साऱ्याच गोष्टी अजिबाद बंद. बसायची खुर्ची खूप आरामशीर असते खरी परंतु तिच्यांत एकदां बसलं आणि विमान भुर्रदिशीं हवेंत उंच उडून तरंगूं लागलं कीं त्या खुर्चीतच बसून रहायचं. खिडकींतून बाहेर पहावं म्हटलं तर ती कायमची बंद असते. तिच्या काचेच्या तावदानाला कपाळ टेकून खालच्या भूपृष्ठाची शोभा पहायची असेल तर पहावी. कंटाळा आला म्हणजे सिगरेट ओढावी म्हणावं तर त्यालाही या डालमियाच्या विमानांत बंदी होती. प्रवास त्यांतल्या त्यांत सुखकर

करून घेण्याचा हा मार्गही बंद झाल्यामुळें मला या हवाई प्रवासाचा मोठा राग आला. पुन्हां कधीं मी हौसेनं विमानांत बसेन असं मला नाहीं वाटत.

दिल्लीहून विमान निघाल्यानंतर बराच वेळ कांचेच्या झरोक्यांतून खालीं नजर टाकून मी बसलों होतों. दूर अंतरावर जुन्या आणि नव्या दिल्लीचा विस्तार दिसत होता. यमुनानदीचं पाणी उन्हांत चमकत होतं परंतु हें दृश्य लवकरच मागें पडलं आणि मग जिकडे तिकडे सपाट जमीन दिसूं लागल्यामुळें खालीं नजर टाकून बघत रहाण्यांत मौज वाटेनाशी झाली. विमान आतां खूप उंचावर चढून तरंगत होतं. आमच्या विमानांतील एका प्रवाशाला विमान लागलं, आणि प्रत्येकाच्या खुर्चीच्या पाठीच्या कप्यांत ओकण्यासाठीं कागदाच्या पिशव्या ठेवलेल्या असतात. त्यांतली एक काढून त्यानं वापरलेली मीं पाहिली. मला फार आश्चर्य वाटल. कारण ज्यायोगें मळमळावं असं विमानाच्या गतींत कांहीं नसत. प्रथम जमिनीवरून उड्डाण घेतांना आणि नंतर उतरतांना विमान वांकडेतिकडे हेलकावे घेतं, परंतु हजार बाराशें फूट वर चढल्यावर तें इतकं स्थिर असतं कीं आपली घरांतली बसायची खोली व विमान यांत अंतर उरत नाहीं. या मानानं वेगानं जाणाऱ्या आगगाडीला कितीतरी हेलकावे बसत असतात. किंवा मुंबईतली बस कितीतरी हिंदकळत असते. खरं म्हणशील तर विमानाच्या प्रवासांत कांहीं रोमहर्षक अनुभव असेल अशी ज्याची कल्पना असेल त्याची निराशाच होईल. माझी तरी झाली. तुला आठवतं का आपण एकदां मुंबईच्या मुक्कामांत तमाशा पहायला गेलों आणि 'यांत एवढं भयंकर तें काय आहे?' असा निराशेचा उद्‌गार काढीत तूं परतलीस? विमानाच्या प्रवासांत अशीच निराशा होते. इंग्रजींत ज्याला 'सेन्सेशनल' म्हणतात तसं कांहींच या प्रवासांत नसतं. हजारों फुटांच्या उंचीवरून अंतराळांतून आपण जात आहोंत या कल्पनेचाच काय आनंद असेल तेवढा.

झरोक्यांतून पहाण्यासारखी शोभा खालीं नाहीं असं आढळून आल्यानंतर मी आपल्या खुर्चीत डोळे मिटून स्वस्थ पडलों होतों. विमानाच्या पंख्याची प्रचंड घरघर सारखी ऐकूं येत होती आणि एखाद्या मोठ्या कारखान्यांत यंत्राजवळ बसल्याप्रमाणें वाटत होतं. मला वाटतं विमानांचा वेग वाढविण्यासाठीं लोक झटत आहेत त्यापेक्षां पंख्याची ही कानठळ्या बसविणारी कटकट आंतल्या प्रवाशांना ऐकूं येणार नाहीं अशी युक्ति कोणी शोधून काढली तर तिची जरूर अधिक आहे. माझ्या शेजारच्या खुर्चीवर

कश्मीरचे उपपंतप्रधान गुलाम अहंमद बक्षी बसले होते, त्यांना माझा हा विचार मीं बोलून दाखविला तेव्हां ते हंसून म्हणाले, " तुमची ही कल्पना वैमानिक शास्त्रज्ञापुढं मांडण्यासारखी आहे खरी. " आम्ही दोघेही डोळे मिटल्यामिटल्याच एकमेकांशीं बोलत होतो. गुलाम अहंमद बक्षी माझ्याबरोबरच दिल्लीच्या विमानतळावरून निघाले होते.

त्या ठिकाणीं बामझाईनीं त्यांचा व माझा परिचय करून दिला होता व कोणत्या हेतूनं मी कश्मीरला निघालों आहे याची त्यांना माहिती करून दिली होती. किती साधे आहेत हे गृहस्थ. पायांत साधा पांढरा लेहेंगा, अंगांत अेक खमीस व गरम कोट, आणि यावरून एक शाल लपेटलेली, एवढाच या बडया अधिकाऱ्याचा पोषाख. हे गृहस्थ शेख अबदुल्लांप्रमाणें उंच धिप्पाड नाहींत. यांचा तोंडावरचा भावही उग्र किंवा चित्तवेधक नाहीं. दृष्टि तेवढी जरा भेदक वाटते. या गृहस्थांच्या अंगीं संघटना-चातुर्य फार आहे असं ऐकतों. शेख अबदुल्ला ज्या वेळेस तुरुंगांत होते तेव्हां हे बक्षीसाहेब सरकारच्या हातावर तुरी देऊन पसार झाले होते आणि रावळपिंडी लाहोर या भागांत भूमिगत राहून त्यांनीं राजकीय चळवळ जिवंत ठेवली होती. माझ्याशीं ते अगदीं मोकळेपणानं बोलत होते आणि बेचाळीसच्या चळवळींत महाराष्ट्रांत भूमिगतांनीं जी कामगिरी केली तिच्या हकीकती ऐकण्याची त्यांनीं विशेष उत्सुकता दाखवली म्हणून मी त्यांना त्या सांगत होतों. इतक्यांत विमान खालीं उतरत आहे असं त्याच्या गतीवरून मला वाटलं. विमान उंच जाऊं लागतं तेव्हां आणि एकाद्या तळावर खालीं उतरूं लागतं तेव्हां 'आपापले पट्टे बांधा' अशा मजकुराचीं अक्षरं समोरच्या दारावर प्रकाशित होतात. त्या प्रमाणें तीं प्रकाशित झालीं, आणि सारे प्रवासी खुर्चीलाच लावून ठेवलेला पट्टा अंगाभोंवतीं घट्ट करूं लागले. प्रवाशाबरोबर कंपनीचा एक नोकर असतो तो जवळ आला आणि मला म्हणाला " पट्टा बांधा." मीं बांधला नाहीं. ज्यांना हेलकावे सोसत नाहींत, त्यांच्यासाठीं ही सोय असते परंतु माझी तक्रार उलट अशी होती कीं हेलकाव्याची जशी गंमत यावी तशी येत नाहीं. मीं झरोक्यांतून पाहिलं तों आमच्यातलं व जमिनीतलं अंतर झपाट्यानं कमी होत होतं. भोंवतालची सृष्टि केव्हां बदलली होती तें मला कळलं नव्हतं. कारण मी डोळे मिटून आपल्या जागेवर पडलो होतों. आतां पाहिलं तों उजव्या बाजूस हिमाच्छदित पर्वतांच्या रांगा दिसूं लागल्या. हे पर्वत छोटे होते. तथापि डोंगरमाथ्या-

वरचं बर्फ मीं प्रथमच पहात होतों व ही नवीन शोभा मला मोठी रमणीय वाटत होती. श्रीनगरकडे जाणारें विमान वाटेंत दोन ठिकाणीं थांबतं. प्रथम जलंदरला व नंतर जम्मूला. जलंदरचा विमान तळ आतां जवळ जवळ येत होता. दिल्लीहून सकाळीं निघतांना मीं अगदीं माफक फराळ केला होता. त्यामुळें भूक लागली होती आणि विमानाचा हा टप्पा केव्हां येतो असं मला झालं होतं माझी कल्पना अशी कीं या विमानतळावर चहा, ब्रेड, बटर मिळेल.

परंतु विमान थांबलं आणि आम्ही सगळेजण खालीं उतरलों तेव्हां माझी पूर्ण निराशा झाली. कारण माळरानावरचं सपाट केलेलं एक मोटं मैदान, त्या मैदानावर एके ठिकाणीं उभारलेल्या दोन छोटया राहुटया, पलीकडे कांटेरी तारांचं कुंपण, आणि संगिनी बंदुकींना लावून खडे राहिलेले किंवा इतस्ततः हिंडणारे उंच धिप्पाड पंजाबी सैनिक या पलीकडे दुसरं कांहींच त्या विमानतळावर मला दिसेना. कसली ब्रेड बटर आणि कसला चहा ! खिशांतली सिगरेट काढली आणि तिचे झुरके घेत विमानाच्या पंख्याच्या सावलींत माझ्या सहप्रवाशांबरोबर मी उभा राहिलों. आजूबाजूच्या भागांतले कांहीं खेडूत विमान कसं असतं तें जवळून पहाण्यासाठीं गोळा झाले.

हिंदुस्थानच्या सरहद्दीवरच्या या खेडूत स्त्रीपुरुषांचं हें सौंदर्य मोठं पहाण्यासारखं होतं. हीं माणसं नवीन मंडळीच होतीं खरी परंतु त्यांची निकोप प्रकृति, कणखर उंच बांधा, भारी पाणीदार डोळे, आणि केसांचीं झुलपं, हें चित्र डोळ्यांत सांठवून घेण्यासारखं होतं. आपला महाराष्ट्र मानवी सौंदर्याच्या बाबतींत खरोखर फार दरिद्री ठरेल असं माझ्या मनांत आलं आणि अजून कश्मीर तर दूर होतं.

जलंदर सोडून जम्मूच्या दिशेनं आमचं विमान निघाल्यानंतर डावीकडे सारखी मोठी दरी आ वासून राहिलेली दिसत होती आणि उजवीकडे मोठमोठया पर्वतांच्या मस्तकावर बर्फाचे दाट थर किंवा ओघळ उन्हांत चमकत होते. झाडी माल विशेष दिसली नव्हती. आतां हजार फूट खालीं राहिलेल्या जमिनीवर छोटया छोटया टेकडयांच्या कुशींतून वाट काढणारे अक्षरशः असंख्य प्रवाह जिकडे तिकडे दिसत होते, आणि वाळूचे लांबच लांब पट्टे उन्हांत चमकत होते. जम्मूचा विमानतळ ही माळरानावरची छावणीच आहे. मात्र इथें राहुटया पुष्कळ दिसल्या आणि लष्करी 'जिप' गाडयांची वर्दळ दिसली. जम्मूला सध्यां पुष्कळ सैन्य असल्यामुळें या तळावर लष्करी लोकांची निरोप आणण्या नेण्याची धांदल उडाली होती. बक्षी साहे-

बांना कांहीं कामासाठीं जम्मूला थांबायचं होतं. परंतु त्यांनीं श्रीनगरला टेलिफोन करून माझ्या येण्याची बातमी दिली. ब्रिगेडियर उस्मान जम्मूला विमानांत बसले. तेही शेख साहेबांचे पाहुणे म्हणून श्रीनगरला चालले होते. बक्षी साहेबांनीं त्यांची माझी ओळख करून दिली. एक सोबत संपली परंतु दुसरी मिळाली म्हणून मला आनंद झाला.

किती साधा मनुष्य आहे हा ब्रिगेडिअर उस्मान ! खाकी लष्करी कोट पाटलोण, डोक्यावर उलटी फिरवून घातलेली वसकट तांबडी टोपी एवढाच याचा पोषाख. तोंडावर सदा किंचित झांकलेलं हास्य, आवाज मिठास आणि इंग्रजी उच्चाराची सफाई अगदीं ऑक्सफोर्डच्या विश्वविद्यालयांत शिकलेल्या तरुणाप्रमाणें. 'नवशेराच्या' लढाईंत ब्रिगेडियर उस्माननें केवढी मर्दमुकी गाजविली होती. त्याबद्दलच्या हकीकती मीं ऐकल्या होत्या. " एक फार मोठी व्यक्ति भेटल्याचा आनंद मला होत आहे, " असं मीं त्यांना म्हटलं तेव्हां खानदानी इंग्रज माणसाच्या थाटांत ते म्हणाले, " मलाही असंच म्हणतां येईल. " तें ऐकून मी शरमेनं खजील झालों. कारण माझ्या मनांत आलं, या वीर पुरुषाच्या पराक्रमापुढं आपला कसला मोठेपणा ? समशेरीपेक्षां लेखणी श्रेष्ठ आहे वगैरे वल्गना आम्ही साहित्यसंमेलनाच्या व्यासपीठावरून कराव्यात आणि टाळ्या मिळवाव्यात हें ठीक आहे. परंतु आज काश्मीरवरचं संकट दूर करण्याचं काम या लोकांच्या समशेरी जितकं करीत आहेत त्याच्या एक लक्षांश तरी आमच्या लेखण्यांनीं झालं असतं काय ?

" आपण श्रीनगरला प्रथमच जात आहांत काय ? " मीं उस्मान यांना प्रश्न केला.

ते म्हणाले, " होय, प्रथमच जात आहे. लढाईच्या धांदलींत चार दिवसांची देखील विश्रांति मला कधीं घेतां आली नाहीं आणि आतां सुद्धां श्रीनगरला सुट्टीसाठीं जात आहे खरा परंतु माझं सारं लक्ष माझ्या सैन्याकडे आहे. टेलिफोनवर घटके-घटकेला 'आलबेल' कळल्याशिवाय मला चैन पडायचं नाहीं. "

'वाहलम पास' नांवाच्या खिंडींतून आतां आम्ही जात होतों. डावीकडे, उजवी-कडे, पुढं, मागं, जिकडे तिकडे दाट बर्फाच्या थरानं मढविलेले पर्वत दिसत होते व त्यावरून आमचं विमान चाललं होतं. क्षणभर असा भास होत होता कीं ज्याच्या लाटा उंच उंच उसळत आहेत अशा समुद्रांतून जाणाऱ्या एखाद्या गलबतांत तर आपण बसलों नाहीं ना ? आतां विमान फारच उंच पातळीवर होतं. गारठा खूप

वाढला होता. माझ्या लक्षांत एकदम आलं कीं छातीवरच्या खिशाला लावलेल्या फाउंटनमधून शाई उसळून वाहूं लागली आहे. मीं घाईनं फाउंटन काढलं आणि त्याचं टोपण आणखी घट्ट वसविलं. उस्मान म्हणाले, " विमानांतून प्रवास करणाऱ्यासाठीं ज्या सूचना गाईड वुकांत लिहिलेल्या असतात त्या तुम्ही वाचल्या नाहीं वाटतं ? " मीं म्हटलं "नाहीं." ते म्हणाले, " दूध, हेअर ऑईल, शाई, अशा वस्तूंच्या वाटल्या वरोवर घ्यायच्या असतील तर त्यांचीं झांकणं अगदीं भक्कम बंद केलीं पाहिजेत अशी सूचना गाईड वुकांत दिलेली असते. कारण विमान इतक्या उंचीवर चढलं कीं द्रव पदार्थ वाहेर येऊं लागतात. तुमच्या सूट केस-मध्यें हेअर ऑईलची वाटली नाहीं ना ? " मीं म्हटलं " नाहीं. "

आतां डावीकडं उंच उंच पर्वत होते, परंतु उजवीकडे एक विस्तीर्ण खोरं दिसूं लागलं होतं. अर्थात या खोऱ्याच्या पलीकडे पर्वतराजी होत्याच. परंतु पहातां पहातां या देखाव्यांत वदल झाला. डावीकडचेही पर्वत भराभरा दूर झाले आणि आम्ही पंचवीस तीस मैल रुंदीच्या खोऱ्यावर जाऊं लागलों. खालीं जिकडे तिकडे नुकतीच वृष्टि झाल्याप्रमाणें छोटे मोठे तुडुंव शांत जलाशय आणि हिरव्या पिवळ्या रंगानं नटविलेले जमिनीचे पट्टे दिसत होते. मुसळधार पाऊस होऊन गेल्यावर भूपृष्ठाला स्वरूप यावं तसं हें स्वरूप होतं. पुण्याहून मुंबईस जातांना खंडाळ्याच्या घाटांतलं वळण येऊन आगगाडी उतरणीला लागली कीं टाटाचा विजेचा कारखाना आणि त्याच्या आसपासचा विस्तीर्ण खोऱ्याचा प्रदेश एकदम आपल्या नजरेसमोर उघडा होतो, तुला आठवतं ! त्यावेळीं आगगाडींतून पहातांना खालच्या त्या खोऱ्यांमध्यें पाणी आणि जमीन यांच्या सुंदर सरमिसळीची जी शोभा दिसते तिची हजारपट कर म्हणजे वालमच्या खिंडीतून पुढं गेल्यावर मला काश्मीरच्या सृष्टिशोभेचं जें पहिलं दर्शन झालं त्याची तुला कल्पना येईल.

सुमारें पंधरा मिनिटं या रमणीय खोऱ्यावरून प्रवास केल्यानंतर आमच्या विमा-नाच्या पंख्याचा आवाज वदलला. आवाजांतल्या त्या फरकावरून मीं ओळखलं कीं विमान आतां खालीं उतरूं लागलं आहे. पट्टे वांधण्याचा इशारा आमच्या समोर प्रकाशित झाला. इतर प्रवाशांनीं पट्टे अंगाभोंवतीं लपेटून वकलं लावलीं. मीं तसं केलं नाहीं. झरोक्यांतून पाहिलं तों खोऱ्याच्या माथ्यावर असलेल्या विमानतळाकडे आम्हीं खालीं झेप घेत होतों. विमानाची थांवण्याची आणि जमिनीवरून जाण्याची

पद्धत जरा गंमतीदार असते. जिथं थांबायचं त्या ठिकाणीं ते सरळ उतरत नाहीं, तर त्या जागीं येतं, विमानतळाच्या मैदानाला प्रदक्षिणा घालतं, आणि मग थांबतं. श्रीनगरच्या विमानतळावर चांगली टुमदार पक्की इमारत आहे, तिथें खाण्यापिण्याची उत्तम सोय आहे. दिल्ली येथील विमानतळ फारच टोलेजंग आणि थाटबाज आहे, त्या मानानं हा श्रीनगरचा विमानतळ छोटासा वाटतो. तथापि तो सुबक आणि आकर्षक आहे. आम्ही विमानांतून उतरून या छोट्या इमारतीकडे येऊं लागलों तों कांटेरी कुंपणाशीं संगीनवाल्या पहारेकऱ्यानं मला हटकून माझ्याजवळ 'परमिट' मागितलं. मला त्याचा प्रश्न कळेना. परवान्यावाचून कुणालाही श्रीनगरच्या हद्दींत सोडायचं नाहीं असा हुकूम आपल्याला आहे असं तो पहारेकरी सांगूं लागला. मी गोंधळून गेलों. माझ्या जवळ 'परमिट' नव्हतं. परमिट लागतं याची मला कल्पनाही नव्हती. ब्रिगेडियर उस्मान यांना परवान्याची काय गरज? त्यांचा परवाना अंगाखांद्यावर होता. त्यांना पहातांच पहारेकऱ्यानं बुटांचे आवाज करून पाय जुळवून खडी ताजीम दिली. मी मागेंच राहिलों हें पाहून ते ओरडून म्हणाले, "प्रोफेसर! या ना?" मीं ओरडून सांगितलं, "हा पहारेकरी मला परवान्याशिवाय सोडीत नाहीं." ते मोठ्यांदा हसले, लगबगीनं जवळ आले व पहारेकऱ्याला म्हणाले, 'सोड त्यांना.' तितक्यांत शेख अबदुल्ला यांचे खासगी चिटणीस श्री. शामलाल आमच्यासाठीं गाडी घेऊन आले होते. तेही धांवत आले, व पहारेकऱ्याला किंचित् रागानं म्हणाले, "अरे, हे तर आमचे खास पाहुणे. यांच्याजवळ कसला परवाना मागतोस?" मग काय विचारतां? त्या उंच लष्करी पहारेकऱ्यानं मलाही लष्करी सलाम दिला. लष्करी थाटाचा उलट सलाम करण्याचा प्रयत्न केल्यास आपलं कांहींतरी चुकेल आणि तें हास्यास्पद मात्र होईल हें ओळखून मीं फक्त हास्यावर काम भागविलं. आम्ही सर्वजण मोटरमध्यें जाऊन बसलों.

विमानतळावरून श्रीनगरचा देखावा सुमारें सहा मैलांच्या अंतरावर दिसूं लागला. विमानतळ जरा उंचावर आहे आणि श्रीनगर शहर जरा खालच्या पातळीवर आहे. शहराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूस उंच सडक वृक्षांच्या रांगा दिसल्या. हीं 'सुफेता'चीं झाडं मीं प्रथमच पहात होतों. सुरूच्या झाडाप्रमाणें हें झाड सरळ वर गेलेलं असतं. पण सुरूपेक्षां हें कितीतरी उंच असतं, आणि शिवाय बुंध्याला लपेटूनच फुटलेल्या छोट्या छोट्या फांद्यावरचीं पानं कोंवळ्या पिंपळपानांप्रमाणें

अनुक्रम....७३४२१..... वि: ....निबंध....
क्रमांक ....२५.६२........ नोंद दि ....२५।२।७०


पातळ आणि मृदु असतात. रस्ता सरळ असल्यामुळें, सुफेता झाडांच्या दोन रांगा दोहींकडे दोन-चार मैलपर्यंत खड्या ठाकलेल्या दिसत होत्या. आजूबाजूस जिकडे तिकडे जलाशय होते, शेतं होतीं, मळे होते, गांवटयावरच्या झोंपड्या दिसत होत्या, क्वचित् रस्त्याच्या कडेला लागून इंग्रजी धर्तीनं बांधलेल्या बंगल्याची छोटी इमारत दिसत होती. सुगंध दरवळला होता. मध्येंच अेखाद्या ठिकाणीं वेलीवर फुलं बहरलेलीं दिसत होतीं आणि उजव्या डाव्या बाजूस खूप दूर अंतरावर पहाड होते त्यांच्या माथ्यावरचं बर्फ आतां ऐन दुपारच्या कडक उन्हांत तळपत होतं.

हा देखावा मागें पडला, आणि आमची गाडी शहरांच्या वस्तींतून जाऊं लागली. उजव्या अंगाला जेह्लम नदीचं पात्र आणि पाण्यांत हाकारलेले मोठे मचवे व वर-खालीं जाणारे ‘ शिकारे ’ दिसूं लागले. नदीवरचा मोठा पूल आम्ही ओलांडला तेव्हां पुलाच्या दोन्ही बाजूस पादचाऱ्यासाठीं ठेवलेल्या वाटांनीं माणसांची गर्दी दोन्ही दिशांनीं जात होती. सामान्य कश्मीरी दुनिया माझ्या दृष्टीस प्रथमच पडत होती. खूप मोठ्या रुंद गुळगुळीत रस्त्यानं आमची मोटार शहराच्या टोकाला आली. समोरच्या पहाडाचा तट अगदीं जवळ आला. मी मनाशीं आश्चर्य करूं लागलों, आतां या रस्त्यानं आम्ही कितीसे पुढं जाणार. इतक्यांत आमची मोटार डाव्या अंगाला वळली आणि एका अरुंद रस्त्यानं जाऊं लागली. एका लहानशा बंगल्यापुढच्या आवारांत शिरून ती उभीच राहिली. आम्ही उतरलों, आणि शामलालांच्या मागून बंगल्यांत शिरलों. एका खोलीच्या दारावरील पडदा दूर करून एक उंच गृहस्थ आम्हांला सामोरे आले. हेच शेख अबदुल्ला असं मी तावडतोब ओळखूं शकलों. त्यांनीं ब्रिगेडियर उस्मानना कडकडून मिठी मारली. ज्या लढवय्यानं नवशेराच्या रण-धुमाळींत पाकिस्थानी सैन्याची दाणादाण उडवून कश्मीरवरचं संकट दूर केलं होतं तो लढवय्या, आणि ज्यानं स्वातंत्र्याच्या संग्रामांत अनेक वेळां कारावास सोसला होता व कश्मीरचा भविष्यकाळ आतां ज्याच्या हातांत होता तो देशभक्त मुत्सद्दी, या दोघांचं तें गाढ प्रीतीचं आलिंगन मीं डोळे भरून पाहून घेतलं !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ७९५५
(ठाणे)

## —१४—

शेख साहेबांच्या छोटयाशा दिवाणखान्यांत आम्ही कांहीं वेळ गप्पागोष्टी करीत बसलों. माझ्या कामाबद्दल शेखसाहेबांनीं विचारपूस केली, आणि माझी काश्मिरची सफर यशस्वी व्हावी यासाठीं अवश्य ती सर्व व्यवस्था करण्याचं त्यांनीं आश्वासन दिलं. मग ते अेकदम म्हणाले. " चला आतां जेवूं या, खाना तयार आहे. भूक लागली आहे कीं नाहीं ! " दिल्लीहून निघाल्यापासून मला चहा देखील मिळाला नव्हता. आतां दीड वाजून गेला होता. माझ्या पोटांत तर कावळे ओरडूं लागले होते. त्यामुळें शेखसाहेबांनीं सूचना दिल्याबरोबर मी तत्परतेनें उठलों आणि कोट काढूं लागलों. तें पाहून शेखसाहेब म्हणाले, " छे, छे, कोट काढूं नका. " आणि पुढें होऊन माझा काढलेला कोट त्यांनीं पुनः माझ्या अंगावर चढविला. मीं म्हटलं, " मला कांहीं थंडी वाजत नाहीं. " पण ते म्हणाले, " नसली तरी कोट अंगावर राहूं द्या. " मला खरोखरच थंडी वाजत नव्हती. शेखसाहेब आणि शामलाल यांच्या अंगावरचे लठ्ठलठ्ठ लोंकरीचे कपडे पाहून मला आश्चर्यच वाटत होतं. दिल्लीच्या मानानं इथं खूपच थंड होतं याबद्दल वादच नव्हता, परंतु असें अगदीं दहा दहा शेर वजनाचे कपडे घालण्याइतकी ही थंडी कडाक्याची नव्हती. परंतु मी एक गंमत पाहून ठेविली आहे, ती अशी कीं अती उन्हाळा किंवा अती थंडी ज्या प्रदेशांत पडते त्या प्रदेशांत लोक त्या त्या ऋतूचं आणि स्वतःचं कौतुक करतात. उन्हाळा सुरू झाला ना मग प्रत्यक्ष उकाडा कितीही असो, घाला मलमलीचे कपडे, प्या थंडाई, लावा वाळ्याचे पडदे, घ्या हातांत आणि हलवा सारखे पंखे; आणि हिंवाळा सुरू झाला ना, मग प्रत्यक्ष थंडी कितीही पडलेली असली तरी चढवा गरम कपडे, पांघरा शाली अशा प्रकारें हवेचे आणि स्वतःचे लाड करण्याची संवय या लोकांना लागते.

जेवणघरांत गेल्याबरोबर शेखसाहेबांनीं आपल्या पत्नीची व माझी ओळख करून दिली. प्रवास कसा काय झाला, काश्मिरला प्रथमच येतां आहांत काय, किती दिवस रहाणार वगैरे ठराविक औपचारिक प्रश्न बेगमसाहेबांनीं मला विचारले. मग आम्हीं खान्यासाठीं टेबलाभोंवतीं बसलों. जेवणाच्या साहित्याची मांडणी इंग्रजी थाटाची, नोकरांचं वाढणं सवरणं त्याच थाटाचं. परंतु जेवणांतील पदार्थ अस्सल मुसलमानी पाकशास्त्राप्रमाणं बनविलेले होते. मी एवढासा पहिला भात खाऊन पुरे म्हटल्याबरोबर सारीं जणं विलक्षण आश्चर्यचकित झालीं. कारण त्यांनीं साऱ्यांनीं शीग लागेतो प्लेटी भरूभरून भात घेतला होता. काश्मिरमध्यें भात हेंच लोकांचं मुख्य अन्न. सामान्य माणसाच्या घरीं तर पहिला भात, मधला भात आणि शेवटचा भात असंच जेवण असतं, आणि या भातावरोबर तूप, दही, दूध असे प्रकारही आढळत नाहींत, कसला तरी एक रस्सा असला म्हणजे झालं. त्यामुळें मी एवढासा भात खाल्लेला पाहून इतरांना साहजिकच फार विस्मय वाटला आणि "तुमच्या महाराष्ट्रांत इतका कमी भात खातात काय!" इत्यादि प्रश्न ते हंसत हंसत मला विचारू लागले.

टेबलावर आमच्यापैकीं प्रत्येकाच्या पुढें पाण्यानं भरलेल्या एका ग्लासांत कसले तरी कंद ठेवलेले मला दिसले. ग्लासाच्या वरच्या बाजूस त्यांचीं हिरवीं पानं दिसत होतीं आणि खालीं पाण्यांत साधारणतः करंगळीच्या आकाराचे लांबट, नाजूक कंद होते. त्यांचा गडद, गुलाबी रंग अतिशय शोभून दिसत होता. मला वाटलं, टेबलावर सुंदर, सुंदर फुलांचीं पात्रं ठेविलेलीं आहेत त्याप्रमाणेंच हे कंदही केवळ शोभेसाठीं घालून ठेवलेले असावेत. मी केवळ त्याकडे वरचेवर पहात होतों. आणि 'किती सुंदर!' असें मनाशीं म्हणत होतों. परंतु थोडया वेळांत मीं पाहिलं तो माझ्यासमोर बसलेल्या शामलालनीं पुढच्या ग्लासांतला एक कंद काढून घेतला आणि तो काकडीसारखा खावयास प्रारंभ केला आणि मग पाहिलं तर शेख साहेब, ब्रिगेडीयर उस्मान, बेगम साहेबा यांनीं सर्वांनींच एकेक कंद काढून खाण्यास सुरवात केली! ती केवळ शोभेचीच नव्हे तर खाण्याची वस्तु होती याबद्दल शंका उरली नाहीं. तेव्हां मी देखील त्यांतला एक कंद काढून खाऊ लागलों. चव चांगली लागली, परंतु तो काय पदार्थ आहे तें माझ्या लक्षांत येईना. हें काय आहे असं विचारावं असं मनांत आलं. परंतु मीं विचारलं नाहीं. शक्य तो आपलं अज्ञान न दाखवितां आपोआप मिळेल तेवढी माहिती घ्यावी असा विशेष शिष्ट समाजांत संकेत पाळला कीं बरं

असतं. शिवाय मनाशीं असा विचार केला कीं आपल्या कश्मिरच्या मुक्कामांत ही वस्तु पुनः कोठें तरी भेटेलच आणि मग तिचं नांव गांव आपल्याला कळेलच कीं.

जेवण आटोपल्यानंतर शेखसाहेब कामासाठीं निघून गेले, एकाद्या कर्तव्यदक्ष गृहिणी-प्रमाणं बेगमसाहेबांनीं मला कांहीं वेळ गप्पागोष्टींत गुंतविलं, आणि मीच जेव्हां त्यांना म्हटलं कीं " आपण आतां थोडो वामकुक्षी करा ", तेव्हां त्या हंसल्या व उठून आपल्या खोलीकडे गेल्या. मग मीही माझ्या खोलीकडे गेलों. इथें सुखरूप येऊन पोंचल्याची तार तुला पाठवायला हवी होती ती लिहून नोकराकडे दिली आणि पलं-गावर पडलों. पडल्या पडल्या समोरच्या खिडकींतून दिसणाऱ्या अंगणांतील बगीच्या-कडे मी पहात होतों. कश्मीरच्या प्रधान मंत्रिपदावर शेख अहंमद अबदुल्ला आहेत, परंतु स्वतःला रहाण्यासाठीं जो बंगला त्यांनीं पसंत केला आहे तो लहानसाच आहे. या घरांत थाटमाट नाहीं, घरापुढं सशस्त्र पहारा नाहीं. ज्या सामान्य माणसांच्या इच्छेनं आपण प्रधान मंत्री झालों त्यांना हा आपल्यांतलाच एक मनुष्य आहे असं वाटावं अशा प्रकारची शेखसाहेबांची साधी सुधी रहाणी आहे. एवढ्या मोठ्या माण-साच्या घरीं आपण जाणार या विचाराची मला थोडी धास्ती वाटली होती. परंतु दिल्लींत असतांना पुष्कळांनीं मला सांगितलं होतं कीं शेख साहेब तुम्हांला मोठे वाटावयाचे नाहींत. त्यांचं सांगणं शेखसाहेब अगदीं साधे गृहस्थ आहेत या अर्थानं खरं ठरलं आहे पण म्हणूनच ते मला फार मोठे गृहस्थ वाटतात...

मला किती वेळ झोंप लागली कोण जाणे. परंतु मी जागा झालों तेव्हां क्षणभर मला एकदम फार एकटं एकटं आणि उदास वाटलं. या छोट्या बंगल्यांत जिकडे तिकडे अगदीं स्तब्ध होतं. मनांत आलं, मी तुझ्यापासून किती भयंकर दूर, कुठल्या कुठं, या अपरिचित मुलुखांत येऊन पडलों आहे ! मी बोलूनचालून हौसेनं या सफ-रीवर आलों. इथें माझी व्यवस्था उत्तम लागली आणि ज्या कामासाठीं मी आलों तें काम उत्तम प्रकारें होणार याबद्दलची खात्री वाटते. असं असूनही तुझ्यापासून हजारों कोसांच्या अंतरावर मी आहे याची जाणीव मला असह्य वाटली, आणि खिन्नतेनं माझं अंतःकरण जड झालं. मग ज्यांना आपलं घरदार आणि आपले प्रियजन टाकून सक्तीचं देशांतर पत्करावं लागतं त्यांच्या चित्ताची काय अवस्था होत असेल ? मी उठलों, न्हाणीघरांत जाऊन तोंड धुतलं आणि बगीच्याकडे पहात खिडकीजवळ उभा राहिलों. अगदीं अंगणांत असल्याप्रमाणें शहराच्या उत्तर सीमेवरची छोटी टेकडी

आणि तिच्यावरचं पुरातन काळांतलं शंकराचार्यांचं मंदिर मला दिसलं. त्या टेकडीच्या पाठीमागं पर्वतांच्या रांगा आहेत, त्यांच्या माथ्यावरचे बर्फाचे थर संध्याकाळच्या तिरप्या उन्हांत झळाळत होते. या सुंदर दृश्याचा कधीं कंटाळा येणं शक्य आहे काय ? नोकरानं चहा आणल्याची चाहूल मला लागली तेव्हां मी परत वळलों.

चहा घेतल्यावर मी कपडे केले, कॅमेऱ्यांत फिल्म घालून तो खांद्यावर अडकविला आणि बंगल्यांतून बाहेर पडलो. शेखसाहेबांचा छोटासा बंगला ज्या आवारांत आहे त्या आवारांतच त्यांचं ' दफ्तर ' म्हणजे कचेरी आहे ! आणि त्याच्या एका बाजूस जो दुसरा लहानसा बंगला आहे त्यांत शामलाल राहतात. मला बाहेर पडलेला पाहून शामलालनीं मला हांक मारली. बागेंत खुर्च्या टाकून पांचसहा मंडळी बसली होती. मी त्यांच्याजवळ गेलों तेव्हां शामलालनीं एका वृद्ध गृहस्थांना माझं नांव सांगितलं आणि त्यांची माझी ओळख करून दिली, " हे माझे वडील. " पायांत तंग सुरवार, अंगांत लोकरीचा कोट आणि त्यावर जाड लठ्ठ शाल लपेटलेली, डोक्याला पागोट्या-सारखा वाटणारा पण कांहींसा शिखांच्या फेट्याप्रमाणें बांधलेला पांढरा शुभ्र फेटा, अशा पोषाखाच्या, तिपाइवरच्या गुडगुडीची नळी हातांत धरणाऱ्या, गोऱ्या पान किंचित लालसर वर्णाच्या, निळसर डोळ्यांच्या त्या वृद्ध गृहस्थांकडे मी अगदीं निरखून पाहिलं. काश्मिरी हिंदु पंडितांच्या कुटुंबांतल्या वृद्ध पुरुषाचा हा नमुना कादंबरी लिहावयाची झाली तर मला उपयोगी पडेल असं माझ्या मनांत चट्‌कन आलं. त्यांना इंग्रजी यथातथाच बोलतां येत होतं, परंतु बोलण्याची फार हौस दिसली. माझा आहार फार थोडा आहे ही गोष्ट एव्हांना या गृहस्थांच्या कानापर्यंत आली होती असं दिसलं, कारण बोलतांबोलतां त्यांनीं मला विचारलं, " एवढसं खाऊन तुम्ही जिवंत कसे रहातां ? " मीं त्यांना म्हटलं, " जिवंत राहतों हें तर आपल्याला दिसतंच आहे, कसं तें परमेश्वराला माहीत. " ते हंसले आणि माझा हात धरून म्हणाले, " तें कांहीं नाहीं, आमच्याकडे आलां आहांत, आतां तुमचा आहार आम्ही वाढविणार. आज रात्रीं तुम्ही आमच्याकडे जेवायला या, तुम्ही कसे खूप जेवीत नाहीं पहातों ! " आणि आपल्या पत्नीकडे पाहून त्यांनीं तिला माझ्या रात्रींच्या जेवणा-बद्दल वर्दी दिली. मीं पाहिलं तों या बाई खूप गोऱ्या, लालसर आणि ठेंगण्या ठुसक्या होत्या. अंगांत पुरत्या बाह्यांचा खमीस, त्यावर ' फेरन, ' हातांत लठ्ठ लठ्ठ बांगड्या, केसांच्या वेण्या घातलेल्या आणि त्यांत निरनिराळ्या आकारांचीं सोन्याचीं फुलं

बांधलेली, असा या बाईचा अस्सल कश्मीरी वेष होता. या तरुणपणीं किती सुंदर दिसत असतील असं त्यांच्याकडे पहात असतांना माझ्या मनांत आलं. त्यांच्या शेजारच्या खुर्चीवर बसलेली स्त्री शामलालची बहिण होती. या तरुण स्त्रीचा वेष अगदीं निराळा होता. तिनं निळ्या किनारीची शुभ्र साडी परिधान केली होती, अंगांत ब्लाऊज घातला होता, आणि केस रचना आधुनिक पद्धतीनें केली होती. आपल्या आईप्रमाणेंच ही अतिशय देखणी होती, परंतु हिच्या वर्णांत लालसरपणा कमी होता. हिची छोटी मुलगी जवळच खेळत होती. तिच्या गालावरचे गडद गुलाब आणि डोक्यावरची तांबूस झुलपं पाहून मी एकदम तिच्याकडे आकर्षित झालों. अनोळखी मनुष्य घरीं आलं कीं त्याच्याकडे अगदीं निरखून पाहून घेण्याच्या बालकांच्या स्वभावाप्रमाणें ती माझ्याकडे पहात होती. मीं तिला जवळ ओढून घेतली आणि विचारलं, "आपका नाम क्या?" तिनं आपला उजवा हात माझ्यापुढें केल आणि ती म्हणाली, 'देखो'. मीं तिला पुनः विचारलं 'आपका नाम क्या?' तिनं आपलीं नखं माझ्या डोळ्यापुढें जवळ केलीं आणि म्हटलं, "ये देखो ना?" मीं शामलालांना म्हटलं, "हिला नांव विचारतो आहे, आणि ही असं काय करते?" ते म्हणाले, "तुम्हारा नांव क्या" असं विचारा. मीं असं विचारल्यावरोबर त्या मुलीनं उत्तर दिलं, "मेरा नांव उषा." शामलालनीं खुलासा केला कीं कश्मीरी भाषेंत 'नाम' या शब्दाचा अर्थ 'नख', आणि नांव याला शब्द नांवच. तें ऐकून माझ्या लक्षांत आलं, माझ्या पहिल्या प्रश्नाला उत्तर म्हणून छोटी उषा आपली नखं मला दाखवित होती तें बरोबर होतं. मला फार हंसू आलं, आणि आमच्या मराठींतला 'नांव' हा शब्द कश्मीरी भाषेंतही त्याच अर्थानं रूढ असावा या गोष्टीची गंमत वाटली.

• • •

-१५-

आज सकाळीं न्याहरी आटोपल्यावरोबर रात्रीं तुला लिहून ठेवलेलं पत्र पाठविण्यासाठीं मी पोस्टाकडे निघालों. नोकराकडे तें देतां आलं असतं, परंतु पोष्ट जवळच आहे असं कळलं, आणि शिवाय 'बंड रोड' नांवाच्या ज्या रस्त्यावर तें आहे त्या रस्त्यावरून एकदां चक्कर टाकावी असं मला वाटलं. शेख साहेबांच्या बंगल्यांतून बाहेर पडलं कीं समोर एक विस्तीर्ण मैदान आहे. पूर्वीच्या राजवटींत कश्मीरमध्यें गोऱ्या लोकांचं प्रस्थ फार मोठं होतं. या गोऱ्या लोकांनीं युरोपमधील सुप्रसिद्ध थंड हवेच्या ठिकाणांच्या नमुन्या बरहुकूम कश्मीरमधील अनेक ठिकाणांची रचना करून टाकली आहे. 'गुलमर्ग' या ठिकाणीं आपण गेलों तर हिंदुस्थानमध्यें आहोंत कीं स्वित्झर्लंडमध्यें आहोंत असा भ्रम पडतो असं सांगतात. इथें श्रीनगरमध्येंही जुन्या शहराचा भाग सोडला आणि कँटोनमेंटमध्यें आपण हिंडूं लागलों म्हणजे देखील पदोपदीं असंच वाटतं कीं विलायतेंतील एकाद्या थंड हवेच्या ठिकाणीं आपण आहोंत. स्वित्झर्लंड आणि कश्मीर यांच्यांत वनश्रीच्या बाबतींत तर आश्चर्यकारक साम्य आहेच. परंतु गोऱ्या लोकांच्या वस्तीबरोबर चर्च, बाजारपेठेची एक विशिष्ट मांडणी, विलायती थाटाच्या बागा, क्लब, बोटक्लब, पोलो ग्राउंड इत्यादि ज्या संस्था अपरिहार्यपणें येतात त्याही इथें श्रीनगरमध्यें आहेत. त्यांचे अवशेष आहेत असं आतां म्हटलं पाहिजे. कारण साऱ्या हिंदुस्थानांतूनच ब्रिटिश लोक गेले तेव्हां श्रीनगरमधूनही ते बहुतांशीं गेले आहेत. कँटोनमेंटमध्यें हिंडतांना डोक्यावर छत्री धरलेल्या, लटपटत्या पायांनीं चालणाऱ्या, वेडयावाकडया रूपाच्या, म्हाताऱ्या मिशनरी बाया क्वचित भेटतात, आणि क्लब, बोटक्लब, पोलो ग्राउंड अशा नुसत्या पाटया दारं बंद केलेल्या इमारतीपुढें दिसतात. या संस्थांतला प्राण निघून गेला आहे. शेख

साहेबांच्या बंगल्यासमोरचं जें मोठं मैदान मी म्हणतों तें पूर्वीं पोलोच्या खेळाचं मैदान होतं. गौरकाय लोकांच्या क्रीडेसाठीं राखून ठेवलेली ती पवित्र जागा होती. तिच्या आसपासदेखील फिरकण्याची देशी लोकांना परवानगी नव्हती. परंतु आतां मीं पाह्यलं तर या पोलो ग्राऊंडच्या सुंदर हिरवळीवर गवळ्यांचीं गुरं खुशाल चरत होतीं !

हें पोलोचं मैदान उजव्या हाताला टाकून पुढें गेलं कीं जो मोठा रस्ता लागतो त्याचं नांव रेसीडेन्सी रोड. हा रस्ता म्हणजे श्रीनगरच्या कँटोनमेंटमधला सगळ्यांत मोठा आणि महत्त्वाचा रस्ता म्हणावा लागेल. मात्र जेहलम नदीच्या 'अमीरा कदल' नांवाच्या मुख्य पुलापासून रेसिडेन्सीपर्यंत गेलेल्या या रस्त्यावर दुकानं, वखारी, छापखाने, वृत्तपत्रांच्या कचेऱ्या असल्या तरी खरी महत्त्वाची बाजारपेठ या रस्त्यावर नसून हा ओलांडून पायऱ्या चढून गेलं कीं जो एक जरा अरुंदसा रस्ता लागतो त्या रस्त्यावर आहे. याच रस्त्यांचं नांव बंडरोड. या रस्त्याला हें नांव पडण्याचं कारण हें कीं जेह्लमच्या पाण्याला इथें खरोखरच बांध घातलेला आहे. या रस्त्यानं निघालें कीं एका बाजूस जेह्लमच्या पाण्याचा छोटयाशा सरोवरासारखा देखावा दिसतो आणि दुसऱ्या बाजूस ओळीनं मोठमोठीं दुकानं दिसतात. पूर्वींच्या राजवटींत जेव्हां श्रीनगरमध्यें गोऱ्या लोकांची आणि चैन करावयास काश्मीरमध्यें येणाऱ्या श्रीमंत हिंदी लोकांची गर्दी असे तेव्हां ही बाजारपेठ सदा गजबजलेली असे. अशा गिऱ्हाइकांच्या सर्व प्रकारच्या गरजा भागविणारीं हीं दुकानं होतीं. तऱ्हेतऱ्हेचं उंची कापड, शिकारीचं साहित्य, दारू, चिरूट, सिगारेट, तमाखू, काश्मीरी कारागिरीचे नमुने, मध, लोणी, फोटोग्राफीचं साहित्य अशा विविध मालाची मांडणी या दुकानांतून झालेली आढळते. आतां गोरे लोक गेले, गेल्या नोव्हेंबर महिन्यांत पाकिस्तानच्या सहाय्यानं कबायलींनीं ( लुटारूंनीं ) काश्मीरवर हल्ला केल्यापासून मजेखातर येणारे प्रवासीही येईनासे झाले, त्यामुळें हीं सारीं दुकानं मोडकळीस आलेल्या जहागिरीप्रमाणें वाटतात. परंतु ऐन भरभराटीच्या दिवसांत ही बाजारपेठ कशी खुललेली दिसत असेल याचं कल्पनाचित्र मीं काढूं शकतों.

एका बाजूस जेह्लमच्या अडविलेल्या पाण्याचं जें सरोवर आहे त्यांत ठिकठिकाणीं 'हाऊस-बोटी' ( म्हणजे ज्यांत मुक्काम करण्याजोगं चार दालनाचं विलायती थाटाचं सुंदर घरच बनविलेलं असतं अशा बोटी ) जागोजाग उभ्या राहिलेल्या दिसतात. या

हाऊस-बोटींनाही आतां गिऱ्हाइक नाहीं. फक्त प्रत्येक हाऊस-बोटीला जी एक छोटीशी छपरानं बंद केलेली होडी जोडलेली असते तिच्यांत हाऊस-बोटीच्या मालकाचं कुटुंब तेवढं आहे आणि क्वचित् त्या छोट्या होडयांतून स्वयंपाकाचा धूर निघत आहे, क्वचित छोटीछोटीं पोरं पाण्यांत खेळत आहेत, क्वचित जाडेभरडे कपडे घातलेली परंतु गोऱ्यापान वर्णाची आणि टपोऱ्या, चमकदार डोळ्यांची मालकीण खरकटीं भांडीं विसळण्यासाठीं बाहेर डोकावत आहे. या साऱ्या बोटींवर 'भाडयानें देणें आहे' अशा पाटया लागलेल्या आहेत; आणि 'हंस,' 'मयूर,' 'बगळा' अशी वेगवेगळ्या पक्ष्यांचीं अथवा 'मेरी,' 'नीना,' 'ल्यूसी' अशी स्त्रियांचीं नांवं त्यावर रंगविलेलीं आढळतात. जलाशयांत ठिकठिकाणीं नाजूक वेताचीं झाडं बहुतेक अंग पाण्याबाहेर काढून उभीं आहेत, त्यांच्या कमानदार फांद्यांवर बारीक पातळ पानांची सळसळ चाललेली आहे, पलीकडे बऱ्याच अंतरावर एक मिशनची मोठी शाळा आहे, तिथल्या मनोऱ्याचं घडयाळ उन्हांत चमकत आहे, ज्या बांधावरून मी चालत आहे त्याच्या उतरणीवर सारखा बगीचा तयार केलेला आहे. या बगीच्यां-तील कांहीं फुलं मला अपरिचित वाटतात. गुलाबाचीं फुलं फारशीं दिसत नाहींत, पण जीं दिसतात तीं आकारानं फार मोठीं आहेत, आणि त्यांच्या रंगाचं तेजही विलक्षण वाटतं. लोक मला सांगतात, कीं सध्यां वसंतऋतु चालू आहे (पंजाबी भाषेंत वसंताला 'बहर' म्हणतात, कश्मीरी भाषेंत 'सोंथ' म्हणतात.) त्यामुळें कश्मीरच्या पुष्पसृष्टीची खरी शोभा तुम्हांला पहावयास मिळणार नाहीं; तुम्ही ऐन उन्हाळ्यांत या म्हणजे 'स्वर्गातली बाग' असं कश्मीरला कां म्हणतात तें कळेल, गुलाबाचीं फुलं तर मोठमोठया कलशाच्या आकाराचीं असलेलीं तुम्हांला आढळतील, आणि ज्यांना दोन्ही हातांचा विळखा घालणं कठीण अशीं मोठमोठीं कमळं सरोवरांतून फुललेलीं तुम्हांला दिसतील. हें बोलणं ऐकलं कीं वाटतं कश्मीरला या वेळीं आलों त्यापेक्षां इथल्या ग्रीष्म ऋतूंत (सुमारें ऑगस्ट महिन्यांत) आलों असतं तर बरं झालं असतं. परंतु कॉलेज सोडून मला कसं येतां आलं असतं? आणि शिवाय हवेच्या दृष्टीनं कश्मीरमधला अगदीं उत्तम ऋतु हाच. ग्रीष्म ऋतूंतलं इथल्या सृष्टीचं वैभव अजून प्रगट झालेलं नाहीं, तरी पण त्या वैभवाच्या पुसट पहिल्या खुणा मला जिकडे तिकडे दिसतात. लहानमोठया सर्व वृक्षांच्या फांद्यांवर नवी पालवी फुटत आहे. वेलीवेलींवर फुलांच्या छोटया छोटया कळ्यांचे विविध रंग

खुलत आहेत, त्यांचा दरवळ हवेंत भरला आहे, जे पक्षी हिंवाळ्यांत कश्मीर सोडून पंजाबकडे गेले होते ते ग्रीष्म संपेपर्यंत रहाण्यासाठीं आतां परत आले आहेत, आणि आपल्या कंठाचीं वाद्यं साफसूफ करूं लागले आहेत !

इथलं पोस्ट ऑफिस किती छोटेखानी आहे. खालच्या रेसीडेन्सी रोडकडे त्याची पिछाडी आहे व तो भाग दुमजली आहे; परंतु इकडे बंडरोडच्या बाजूला त्याचा जो दर्शनी भाग आहे तो एखाद्या लहानशा राहत्या घरासारखा आहे. अंगणांत बाग आहे. ती मात्र छोटीशी परंतु प्रसन्न आहे. शेख साहेबांच्या बंगल्यापुढली बाग नीट ठेवलेली नाहीं; परंतु ही छोटी बाग फारच चांगली राखलेली आहे. आज तुला धाडलेल्या पत्रांत मीं फुलं घातलेलीं होतीं. तीं शेखसाहेबांच्या बागेंतलींच. परंतु आतां या पत्रांत आणि यानंतरच्या सगळ्या पत्रांत या पोस्ट ऑफिसपुढच्या सुंदर बगीच्यांतलीं फुलं मी घालणार आहें. तेवढ्यासाठीं मी पोस्टमास्तरची ओळख करून घेतली आहे. त्यानं बगीच्यांतलीं फुलं घ्यायला मला आनंदानं परवानगी दिली आहे. मी कोल्हापूराहून आलों हें या पोस्टमास्तरना खरं वाटत नाहीं. ते म्हणाले, "केवळ अिथली परिस्थिति पाहाण्यासाठीं अेखादा लेखक अितक्या दूर येतो हें मला नवलाचं वाटतं. हां ! अिंग्रज माणूस येईल, परंतु आपल्या देशांतल्या अेखाद्या माणसानें यावं हें मी पहिल्यांदांच पहातों आहे." हे गृहस्थ मोठे संभाषणप्रिय दिसले म्हणून मीं त्यांना विचारलं, "शेखसाहेबांविषयीं कश्मीरच्या सामान्य माणसाला काय वाटतं हो ?" ते हंसत म्हणाले, " तुम्ही शेखसाहेबांचे पाहुणे आहांत हें मला माहित आहे म्हणून मी असं बोलतों असं समजूं नका, पण कश्मीरच्या सामान्य माणसाला शेखसाहेबांच्याविषयीं भरंवसा आणि आदर आहे. तुम्हीं सामान्य लोकांत मिसळून पहा म्हणजे समजेल."

त्याच्या उद्‌गारांचा प्रत्यय मला लवकरच आला. चालत चालत 'अमीरा कदल'च्या दिशेनं मी निघालों. बंडरोडवरून खालीं रेसीडेन्सी रोडवर उतरलों आणि कोपऱ्यावर टांगे उभे होते त्यांजवळ जाऊन अेका टांगेवाल्याला विचारलं, "मला जरा बाजारांत हिंडवून आणतोस का ?" मीं बसलों, टांगा निघाला, आणि हळुहळु मी टांगेवाल्याशीं संभाषण काढलं. " आतां हालहवाल कशी आहे ?" असं मीं विचारल्याबरोबर तो म्हणाला, "हुजूर आतां वरंचसं आबादीआबाद आहे, परंतु गेल्या दसऱ्यानंतर चार महिने आमचे जे हाल झाले ते विचारूं नका. पाकिस्तानकडून येणारा सारा माल बंद झाला होता. बर्फ पडल्यामुळें हिंदुस्थानचा

रस्ता तुटला होता. साखर नाहीं, घासलेट नाहीं, मीठ नाहीं, अशी बडी हालत आली होती. हें असं कां होत आहे हें श्रीनगरचा सामान्य रहिवाशाला कांहींच कळेना. पाकिस्तान स्वारी करणार आहे ही गोष्ट पुढाऱ्यांना माहीत असली तर कोण जाणे, परंतु आम जनतेला याची पुसट देखील खबर नव्हती. लुटारू मुझफराबादमध्यें घुसले, उडीला आले तरी श्रीनगरच्या सामान्य लोकांना दाद नव्हती. दसऱ्याच्या दिवशीं एकदम बिजली गेली पण महोराचा वीज-कारखाना लुटारुंनीं तोडला हें कुणाच्या गांवींही नव्हतं. बारामुल्लाची लूट आणि जाळपोळही कुणाला समजली नव्हती. श्रीनगरपासून चार मैलांवर तोफा गर्जूं लागल्या तरी सारे लोक झोपेंतच होते. "शहर गेलंच होतं, हुजूर, पण हिंदी फौजा ऐन वख्ताला आल्या आणि–आणि कोणती आफत टळली त्याची कल्पना आम्हांला नंतर झाली."

मीं त्याला विचारलं, "आतां शेखसाहेबांचं राज्य कसं आहे?"

तो म्हणाला, "आतां फिकीर नाहीं, हुजूर, शेखसाहेब आमचं कल्याण करतील."

"मुसलमानांचं कीं सगळ्यांचं?"

"सगळ्यांचं, हुजूर."

"खात्री आहे?"

"हां, हा, बेशक!"

● ● ●

—१६—

मला वाटेल तिकडे हिंडतां यावं यासाठीं वाहनाची आणि मार्गदर्शकाची उत्तम सोय शेख साहेबांनीं कायमची करून ठेविलेली आहे. परंतु त्या सोयीचा आणि सोबतीचा उपयोग सतत करून घेण्याची माझी इच्छा नाहीं, कारण त्यांत फायदा आहे तसेच तोटेही आहेत. मुख्य तोटा असा कीं शेखसाहेबांनीं दिलेल्या वाहनांतून आणि सोबतीनं जायचं म्हणजे माझं स्वातंत्र्य जातं. लहर लागेल त्या ठिकाणीं जाण्याची आणि लहर लागेल त्या लोकांत मिसळण्याची मोकळीक मला हवी आहे. अशा दूर देशच्या प्रवासांत एकटयानं मन मानेल त्याप्रमाणं भटकण्यांत क्वचित् धोका असतो, परंतु खरी गंमत अशा भटकण्यांतच आहे. आपले नेहमींचे मित्र बरोबर असले तर पुष्कळदां असें होण्याचा संभव असतो कीं अपरिचित प्रदेशांत आपण हिंडतों खरे परंतु परिचितांच्या बंधनांतून आपण पूर्णांशानं मुक्त होऊं शकत नाहीं आणि जें अपरिचित त्याच्याशीं तद्रूप होऊन त्याचा बेछूट आस्वाद आपल्याला घेतां येत नाहीं.

म्हणून इथला अत्यंत रम्य आणि प्रसिद्ध ‘ दल ’ नांवाचा विस्तीर्ण तलाव, आणि ‘ शालीमार ’ ‘ निशात ’ आणि ‘ चष्मशाई ’ या तीन बागा पहाण्यासाठीं कुणालाही बरोबर न घेतां एकटयानं जाण्याचं मीं ठरविलं. श्रीनगर शहर पूर्व पश्चिम वहाणाऱ्या जेहलम नदीच्या दोन्ही तीरांवर वसलेलं आहे, आणि शहराच्या कित्येक भागांत नदीचे कालवे आलेले आहेत त्यामुळें पुष्कळशी रहदारी व मालाची वाहतुक, जलमार्गानेंच होते. युरोपमधील ‘ व्हेनिस ’ शहराशीं श्रीनगरची तुलना होते ती यासाठींच. नदीच्या मुख्य पात्रांत अथवा कालव्यांत हांकारून उभ्या रहाणाऱ्या अगर ये जा करणाऱ्या बोटींचे तीन प्रकार आहेत. जिच्यांत मन मानेल तितके दिवस मुक्काम

करून रहाण्याची सोय असते तिला ‘ हाऊस–बोट ’ म्हणतात. जी एखाद्या टांग्या-प्रमाणें तात्पुरत्या प्रवासासाठीं वापरतात तिला ‘ शिकारा ’ म्हणतात, हे ‘ शिकारे ’ सुंदर शृंगारलेले असतात. टांग्याच्या टपाप्रमाणें त्याला सुंदर छत असतं, बसायला गाद्या गिरद्या असतात. यांत दोन माणसं अगदीं ऐसपैस ऐटीनं बसूं शकतात, दाटीनं बसायचं असेल तर किती माणसांनीं बसावं तो ज्याच्या त्याच्या मर्जीचा प्रश्न. शिकारे वल्हविणारे दोन इसम असतात. ते आळीपाळीनं एकानं वल्ह मारावं, आणि दुसऱ्यानं भला लांब वांबू पाण्यांत तळापर्यंत घालून जरूर तेव्हां दिशा द्यावी अशीं कामं करतात. बहुधा शिकाऱ्याचा मालक आणि त्याचा लहान छोकरा अगर छोकरी अशी जोडी असते. ‘ शिकारा ’ हें इथलं अत्यंत लोकप्रिय, आरामशीर व जलद वाहन आहे. बोटींचा तिसरा प्रकार म्हणजे आच्छादनावांचूनचीं लहानमोठीं होडगीं. यांत प्रवासी बसत नाहींत. आपल्याकडे मालाची वाहतुक करणारे जसे गाडे तसे इकडे या होडया. याखेरीज प्रचंड ओझ्याचा माल वाहून नेणारे आणि आणणारे मोठमोठे पडाव निराळेच. ‘ अमीरा कदल ’ पुलाच्या कठडयावर रेलून जेहलमकडे पाहिलं कीं या सर्व प्रकारच्या बोटी उभ्या राहिलेल्या अगर वर खालीं हिंडतांना दिसतात.

मला जो शिकारा मिळाला त्याच्या मालकाचं नांव आहादु. शेखसाहेबांच्या बंगल्याच्या पिछाडीला अगदीं थोडया अंतरावर कालवा आहे. या कालव्याच्या बांधावर मीं सकाळीं सात वाजतां यायचं आणि आहदुनं आपला शिकारा घेऊन त्या ठिकाणीं हजर रहायचं असं ठरलं होतं. त्याप्रमाणें अगदीं वक्तशीर तो हजर राहिला. मीं शिकाऱ्यांत बसलों आणि शिकारा निघाला. हा कालवा अखेर ‘ दल ’ तलावांत शिरतो, पुष्कळ वेळ मी कालव्यांतूनच चाललों होतों. खेडयांतून शहराकडे भाजी आणणाऱ्या शेतकऱ्यांचे ताजे टवटवीत भाज्यांनीं शिगोशीग भरलेले छोटेमोठे पडाव अंगावरून जात होते. उन्हं पुरतीं पडलीं नव्हतीं. सकाळच्या या पहिल्या प्रहरीं पाण्यावर चमत्कारिक वाफेचा जो थर असतो तो जिकडे तिकडे दिसत होता, आणि त्यांतून बाणाप्रमाणें आरपार गेलेलीं किरणं मोठीं प्रेक्षणीय वाटत होतीं. शेख साहेबांच्या घरीं पहिल्यांदा जेवतांना गडद गुलाबी रंगाचे लांबट छोटे छोटे जे कंद घालून ठेवलेले मला दिसले होते त्यांचा ढीगच्या ढीग घेऊन चाललेली एक होडी पाहतांच मी आहादुला विचारलं, “ आहादु, हें काय आहे ? ” त्यानं उत्तर दिलं “ ये

मुली है, हुजूर ! ” मुळे ! शेखसाहेबांच्या घरीं कोणती वस्तू आपण पाहिली आणि खाल्ली याचा मला उलगडा झाला. पण मला फार आश्चर्यही वाटलं. कारण गडद गुलाबी रंगाचे असे सुंदर मुळे असूं शकतात याची मला कल्पना नव्हती. देशमानाप्रमाणें माणसांचं आणि जनावरांचं नव्हे तर कंदमुळांचं आणि फळांचं देखील रूप किती भिन्न असतं पहा ! पुण्या-मुंबईकडे मुळे पांढरे शुभ्र आणि फार तर वीत दीडवीत लांबीचे असतात. सत्तावीस वर्षांपूर्वी मी सिंधमध्यें होतों तेव्हां तिकडे मुळे पाहिले होते, ते पांढरे शुभ्रच पण दोन दोन हात लांबीचे आणि गलेलठ्ठ. एक मुळा खरेदी केला कीं दहा पंधरा माणसांना पुरेल इतकी भाजी व्हायला हरकत नाहीं. आणि आता इथं कश्मीरमध्यें पाहतों तों या वस्तूला किती नाजूक आणि मनोहर स्वरूप आलेलं. मुळ्याऐवजीं मुळी हें स्त्रीलिंगी मृदु नांव या वस्तुला दिलं आहे तें अगदीं बरोबर आहे. आहादुला मीं म्हटलं, “ एखादी गढी विकत मिळेल कां आपल्याला ? ” “ हां, हां, हुजूर जरूर ” असं म्हणून त्यानं त्या भाजीवाल्याला खूण करून होडी थांबविली, सहा गढ्या काढून घेतल्या, आणि तो मला म्हणाला, “ हुजूर एक आणेली द्या त्याला. ” त्या सहा गढ्यांत मिळून पन्नास, साठ मुळे सहज होते. तेवढ्याचा एक आणा द्यायचा याची मला शरम वाटली. मी चार आणे दिले, आणि भाजीवाल्यानं मोठ्या कृतज्ञतेनं सलाम करून आपली होडी पुढं नेली. त्याच्या चेहऱ्यावरची ती कृतज्ञता बघून मला अतिशय लाजल्यासारखं झालं. अवघ्या सोळा पैशांत त्याची ती कृतज्ञता मीं मिळविली होती. पण इथं कश्मीरला मी पाहातों आहे, सामान्य लोक भलत्याच दारिद्र्यांत आहेत. शिकाऱ्यांत तासभर रपेट करावी, चार आणे द्यावेत ! मोठमोठीं लालबुंद सहा सफरचंदं घ्यावीं, तीन चार आणे द्यावेत ! अशा प्रकारें शेतकरी आणि मजूर यांची कमाई अगदीं नीच बिंदूला पोचलेली आहे. पूर्वीच्या राजवटीनं या लोकांचं जिणं विकत घेतलेल्या गुलामांच्या जिण्याहून खालच्या दर्जाचं करून टाकलेलं आहे. ज्या कश्मीरला स्वातंत्र्य आणि वैभव मिळवून देण्याचा विडा शेखसाहेबांनीं उचलला आहे त्या कश्मीरची दशा बहुतांशीं अशी आहे...

मी आठ दहा मुळे खाल्ले, बाकीचे आहादुला आणि त्याच्या छोट्याशा मुलाला देऊन टाकले. आतां आमचा शिकारा शहराची सीमा ओलांडून पुढं आला होता आणि कालव्याच्या दोहों बाजूंस घरांऐवजीं भाजीचे छोटे मोठे मळे दिसत होते.

आहादुनं मला सांगितलं कीं ज्या जमिनींत हे मळे आहेत त्या जमिनी पाण्यांत तरंगणाऱ्या असतात आणि घट्ट बांधून एके ठिकाणीं स्थिर करून ठेवाव्या लागतात. एकाचीं गुरं दुसऱ्यानं ओढून न्यावी त्याप्रमाणें हे भाजीवाले शेतकरी एकमेकांच्या जमिनी रातोरात सोडून लांबवितात. त्यामुळें या मळ्यांच्या जमिनीवर सक्त पहारा ठेवावा लागतो. अगदीं तयार झालेल्या कांद्या–बटाट्यांसकट किंवा फळा–फुलांसकट जमीन कोणी तरी चोरून नेली कीं संपलंच सगळं. हें वर्णन मला फार गंमतीदार वाटलं आणि दोन्ही बाजूंच्या त्या मळ्याकडे मी कौतुकानें अगदीं निरखून पाहूं लागलों.

कुटुंबांतील मुख्य कर्ते पुरुष होड्यांत भाजी भरून शहराकडे गेले होते, आणि बायका व मुलं वाफ्यांत कामं करीत होतीं. मुलांच्या अंगावर धड कपडे नव्हते, पण किती सुंदर आणि गोजिरवाणीं होतीं तीं सारीं ! इथें आल्यापासून कुरूप, वेडंविद्रं, काळं मूल मला दिसलं नाहीं. मळ्यांतल्या त्या शेतकरी बायका देखील फार सुंदर वाटल्या. इथें कश्मीरमध्यें मुसलमानांतही गोषा नसल्यामुळें स्त्रिया अगदीं मोकळे-पणानं वावरतांना दिसतात आणि कश्मीरचं स्त्रीसौंदर्य पोट भरून पहायला मिळतं. आहादुला विचारलं, “ या वाफ्यांत काम करणाऱ्या बायकांपैकीं एखादीचा फोटो घ्यायला मिळेल का मला ? ” “ विचारूं या. ” असें म्हणून त्यानं शिकाऱ्याचा वेग मंद केला आणि एका वाफ्याच्या कडेला लावून त्यानं “ हे ” अशी हांक घातली. तो चतुर होता. त्यानं भाजी विकत हवी असं सोंग केलं आणि बायकामुलं जेव्हां जवळ आलीं तेव्हां ती विकत घेऊन मला पैसे द्यावयास लावले. मी त्या तरत्या जमिनीवर उडी टाकली आणि दोनचार मुलांचा घोळका नीट उभा करून फोटो घेतला. मी तो घेत असतांना दोन वयस्क स्त्रिया आणि तीन पोर सत्रदा तरुणी तें बघत एकमेकींच्या खांद्यावर हात आणि हनुवटी टेकून हंसत आणि कश्मीरी भाषेंत कांहींतरी बोलत जरा दूर उभ्या होत्या. मुलांचा फोटो घेऊन झाल्यावर मी आहादुकडे पाहिलं. माझ्या त्या पहाण्यांतील अर्थ ओळखून आहादु त्यांतील तरुण पोरींपैकीं एकीला म्हणाला, “ हुजूर तुला पांच रुपये देतील, तुझा फोटो काढूं देशील काय ? ” त्याचं तें वाक्य ऐकल्याबरोबर त्या तिघी पोरी लज्जेचे आणि भीतीचे उद्‌गार काढीत ज्या पळाल्या त्या एकदम त्या वाफ्याच्या दुसऱ्या कडेला गेल्या ! मला तर वाटलं, त्या पाण्यांत उडी घेऊन आत्महत्या करणार ! माझ्या समोरचीं छोटीं मुलं टाळ्या वाज-

वून हसूं लागलीं आणि मग तींही बागडत त्या मुलींकडे गेलीं. त्या दोन वयस्क स्त्रिया तेवढया अजून माझ्यापुढं उभ्या होत्या. फोटो काढून घ्यायला त्यांची कांहीं हरकत नव्हती असं दिसलं! परंतु माझी होती! मी कॅमेरा बंद केला आणि पुनः शिकाऱ्यांत पाऊल टाकून आहादुला म्हटलं, " चल जाऊं या! "

• • •

'दल' सरोवराचे दोन भाग आहेत. त्यांपैकीं एकाला 'बडा दल' म्हणतात व दुसऱ्याला 'छोटा दल' असं नांव आहे. हीं नांवं अर्थात्‌च विस्तारदर्शक आहेत. आमचा 'शिकारा' जेव्हां कालव्यांतून बाहेर पडून पाण्याच्या विस्तीर्ण डोहांत शिरल्याचं मला दिसलं तेव्हां मीं वल्हीं मारण्यांत गुंतलेल्या आहादूला विचारलं, "आपण आतां 'दल'मध्यें येऊन दाखल झालों, नव्हे?" तो म्हणाला, "हां हुजूर, पण हा 'छोटा दल' आहे; थोडया वेळानें आपण बडा दलमध्यें जाऊं." मी आजूबाजूस पाहूं लागलों तों त्या छोटया समजल्या जाणाऱ्या सरोवराचाच विस्तार केवढा तरी मला वाटला. जिकडे तिकडे पाणीच पाणी दिसत होतं, दूर अंतरावरच्या किनाऱ्यावर मोठमोठीं झाडं होतीं. उजव्या बाजूस आणि समोर पर्वतांचीं बर्फानं आच्छादलेलीं शिखरं दिसत होतीं. सूर्यप्रकाशानं आतां साऱ्या दिशा चांगल्याच उजळल्या होत्या. सरोवराच्या काळ्याभोर पाण्यांत पर्वतांचीं प्रतिबिंबं स्पष्ट दिसत होतीं. सरोवरांत ठिकठिकाणीं वेतांच्या झाडांचे गुच्छच्या गुच्छ अर्धं अंग पाण्यावर काढून उभे राहिलेले होते, त्यांच्या फांद्यांवरची लांबट मऊ हिरव्या रंगाची नवी पालवी वाऱ्यावर सळसळत होती. वेताच्या झाडाला इकडे 'वंश' म्हणतात. सामान्य लोकांच्या तोंडी 'बंस' असा अपभ्रंश रूढ आहे. 'बांसरी' हा शब्द 'बंस' या शब्दावरूनच तयार झाला असला पाहिजे असं माझ्या मनांत आलं.

आतां आमचा 'शिकारा' संथ जलपृष्ठावरून खूपच वेगानं चालला होता. 'बडा दल'मध्यें आम्ही दाखल झाल्यावर भोंवतालच्या जलविस्ताराकडे पाहून मीं महादूला प्रश्न केला, "काश्मीरमधलं हें सर्वांत मोठं सरोवर का रे?" तो म्हणाला, "छे! छे! हुजूर आपण सोपूरला जाऊन तेथला 'वूलर' तलाव बघा. तो तलाव

म्हणजे दर्याच वाटेल आपल्याला." मी म्हटलं, "होय का? मी जाणारच आहे सोपूरला." कश्मीरच्या नॅशनल कॉन्फरन्सचं सोपूर. येथील अधिवेशन म्हणजे कश्मीरच्या स्वातंत्र्य संग्रामाचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणावा लागेल. कादंबरी लिहिण्याच्या दृष्टीनं सोपूर हें गांव प्रत्यक्ष जाऊन पहाणं मला आवश्यक होतं. सोपूर गांवाविषयीं मी आहादूला कांहीं प्रश्न विचारूं लागलों तेव्हां त्यांचीं उत्तरं देतां देतां मध्येंच त्यानं मला विचारलं, "हुजूर आपण कुठून आलांत?" "कोल्हापुराहून." असं सांगितलं तर त्याला कळण्यासारखं नव्हतं म्हणून मीं म्हटलं, "मुंबईहून." तें ऐकून तो सांगूं लागला. "पाकिस्तानशीं लढाई सुरू झाल्यापासून कश्मीरला पाहुणे येईनासे झाले आहेत. पण पूर्वी मुंबईचे फार लोक इकडे येत असत, आणि तेव्हां आमच्या धंद्याला अशी तेजी होती कीं रात्रंदिवस आम्हांला फुरसत नसे. वल्हवून वल्हवून खांदे दुखायला लागायचे. पण पैशाचा लोभ माणसाकडून काय करून घेत नाहीं, हुजूर? दिवसाकाठीं पांच पंचवीस रुपये सहज मिळून जायचे आम्हाला. आणि आतां एखादुसरा देखील मिळत नाहीं. फार खराब दिवस आले, हुजूर. पाकिस्तानचं हें युद्ध संपायचं कसं? पाकिस्तानला तर इंग्रजांची आणि अमेरिकेची मदत आहे म्हणतात, होय हुजूर? हें खरं आहे?" त्याच्याशीं आंतरराष्ट्रीय राजकारणाची चर्चा करण्याची माझी फारशी इच्छा नव्हती. त्याच्या बहुश्रुतपणाचं मला फार कौतुक वाटलं. परंतु विषय बदलून मीं त्याला विचारलं, "काय रे आहादु, शेख साहेबांविषयीं तुम्हा लोकांना काय वाटतं?" ज्या व्यक्तिविषयीं अत्यंत आदर असेल तिच्याविषयीं बोलतांना दोन्ही कान चिमटीनं पकडण्याची जी विशिष्ट मुसलमानी तऱ्हा आहे तिला अनुसरून आहादुनं दोन्ही कान पकडले आणि म्हटलं, "शेखसाहेब फार मोठे आणि सच्चे गृहस्थ आहेत. आम्हांला दुसरं कांहीं कळत नाहीं, पण एवढं कळतं कीं शेखसाहेब जे सांगतील त्यांत आमचा फायदा आहे."

आहादूशीं गप्पा मारतां मारतां मी सभोंवारच्या रमणीय दृश्याकडे पहातच होतों. माझ्या लक्षांत आलं कीं बडया दलचा विस्तार ओलांडून 'शिकारा' आतां पुन्हां एखाद्या मोठ्या कालव्याप्रमाणें दिसणाऱ्या प्रवाहांतून जात होता. माझी समजूत होती कीं मी या सफरीवर फारच लवकर निघालों; आणि 'शालिमार' बागेवर पोचेपर्यंत रविवारची मजा करावयास आलेले इतर लोक मला फारसे भेटणार नाहींत. 'छोटा दल' ओलांडीपर्यंत माझी कल्पना खरी ठरलीही होती. परंतु आतां पहातों तों किती-

तरी शिकारे ‘ शालिमार ’ बागेकडे चाललेले दिसूं लागले. कुठून आणि केव्हां आले ते मला कळलंही नव्हतं. आपल्याला नकळत पक्ष्यांचा थवा गोळा झालेला दिसावा तद्वत शिकारे प्रगट झाल्यासारखं मला वाटलं. शिकाऱ्यांप्रमाणेंच कांहीं ‘हाऊस–बोटी’ही बागेकडे चालल्या होत्या. कांहीं नौकांतून कुटुंबवत्सल माणसं आपल्या बायका-मुलांना घेऊन निघालीं होती. कांहींत फक्त पुरुषच होते, आणि बायका-मुलांच्या सान्निध्यांत ठेवावा लागणारा संकोच ठेवण्याची त्यांना गरज नसल्यामुळें एकीकडे पत्ते खेळतां खेळतां त्यांच्या गप्पागोष्टी, गाणीं, आणि भांडणं उंच आवाजांत चालू होतीं. कित्येक नावांत फोनोग्राफ लागले होते; आणि प्रत्येक नावेंत मागच्या आडोशाच्या बाजूस शेगड्या पेटल्या होत्या आणि खाना तयार होत होता. एखाद्दुसऱ्या शिकाऱ्यांत नोकर उंच सुरईसारख्या एका भांड्यांतून चिनीमातीच्या बसकट पेल्यांत चहा ओतून देतांना मला आढळत होता. त्या चमत्कारिक भांड्याकडे मीं दृष्टी लावल्याचं आहादूच्या लक्षांत आलं असावं, कारण त्यानं मला विचारलं, “ हुजूर चहा घेणार काय ? ” मीं त्याला विचारलं, “ तूं कुठला देणार मला चहा ? ” तो म्हणाला, “ तें का हुजूर, आपल्याजवळ सारी तयारी आहे. पहा ना. ” मीं पाहिलं तों खरोखरच शिकाऱ्याच्या मागच्या टोकाला एक मोठी सुरई घेऊन आहादुचा छोटा गोरापान मुलगा निखारे फुलवीत बसला होता. सुरई सारख्या त्या भांड्याला ‘ समूवार ’ म्हणतात असं मला आहादूनं सांगितलं. रशियन साहित्यांत हा शब्द मीं वारंवार वाचला होता त्याची मला आठवण झाली. ‘समूवार’ म्हणजे पंचधातूचं एक सुरईसारखं भांड असतं. आपल्याकडे आंघोळीच्या पाण्याच्या बंबांना ज्याप्रमाणें विस्तव घालण्यासाठीं मधोमध पोकळ नळी असते त्याप्रमाणें या समूवारलाही मध्यभागीं पोकळ जागा असते. तिच्यांत कोळसे घालायचे, पंखा मारून फुलवायचे आणि चहाची पत्ती टाकून पाणी उकळत ठेवायचं. या पाण्यांत चवीसाठीं मीठ टाकलेलं असतं. साखर वापरीत नाहींत. याला म्हणायचं नमकीन चहा. आहादूच्या मुलानं तयार केलेला हा नमकीन चहा पसरट पेल्यांतून घेतां घेतां मीं आहादूला विचारलं, “ समूवार हें भांडं कश्मीरमध्यें कसं आलं ? याचा विशेष प्रचार तर रशियांत आहे ? ” त्याच्यासारखा एका साध्या नावाड्याला या प्रश्नाचं उत्तर देतां येईल अशी माझी कल्पना नव्हती. परंतु मला वाटतं ज्या ठिकाणीं बाहेर गांवचे मुशाफर पाहुणे मोठ्या संख्येनं नेहमीं येतात तिथले सामान्य लोक मुशाफरांच्या कुतूहलाचं

समाधान करण्याची जबाबदारी पार पाडून पाडून आपोआप विद्वान होतात. पर- प्रांतांतल्या प्रवासांत या गोष्टीचा अनुभव मला वारंवार आलेला आहे. आतां आहा- दूच्या बाबतींतही असाच अनुभव आला. समूवारबद्दलचा माझा प्रश्न त्यानं टाळला नाहीं. अगदीं आपल्या दत्तो वामन पोतदारांचा हजरजबाबीपणा दाखवून त्यानं मला सांगितलं कीं फार जुन्या काळीं काश्मीरचा अमुक अमुक राजा चीनमध्यें व तेथून पुढें रूस देशांत गेला होता त्यानं हें समूवार भांडं आपल्याबरोबर आणलं आणि तसलीं भांडीं इथल्या कारागिरांकडून घडविण्याचा प्रघात पडला.

लवकरच आम्ही शालिमार बागेवर येऊन पोचलों. आहादूनं शिकारा कांठाला लावला आणि माझ्याबरोबर तो आणि त्याचा मुलगाही खालीं उतरला. बागेपुढच्या पटांगणांत घाणेरड्या मिठाईचीं दुकानं दिसलीं आणि ताज्या भाज्या आणि सफरचंद यांचे मोठमोठे हारे घेऊन बसलेल्या अस्सल काश्मीरी वेशांतल्या सुंदर खेडुत बाय- काही दिसल्या. पटांगणांत जिकडे तिकडे केरकचरा सांठलेला होता. एखाद्या मोठ्या गांवांतल्या पाटलाच्या घराभोंवतीं जशी तटासारखी भिंत असते तशी बागेची भिंत मला वाटली. बागेचं प्रवेशद्वार तर मुळींसुद्धां भव्य वाटलं नाहीं. " हत्तिच्या हीच का शालीमार ! " असं स्वतःशीं पुटपुटत मी आंत शिरलों परंतु बागेची एकेक मजगी ( मजला ) जसजसा चढून पुढं जाऊं लागलों तसतशी माझ्या उद्गाराची मला शरम वाटूं लागली. कारण एक अत्यंत भव्य आणि रमणीय उद्यान मला दिसूं लागलं. या उद्यानाची लांबी जवळजवळ एक तृतीयांश मैल आहे आणि रुंदी याच्या निम्यानं आहे. चिनार झाडांच्या रांगांच्या रांगा उभ्या असून त्यांनीं मर्यादित केलेल्या हिरव्यागार तृणांकुरांनीं आच्छादलेल्या रेखीव विविधाकृति वाफ्यांत अगणित रंगांचीं फुलझाडं आहेत. ' चिनार ' हें झाड मूळचें प्रशियांतलं आहे, व मोंगल लोकांनीं तें काश्मीरमध्यें आणलं असं म्हणतात. या झाडांचा प्रचंडपणा, त्यांचीं गर्द छाया, त्यांच्या पानांचा नाजुकपणा आणि तेज या गोष्टींची कल्पना केवळ वर्णनानं येणं शक्य नाहीं. तुला इतकंच सांगतों कीं पर्शियन भाषेंत सुंदर स्त्रीच्या करपल्लवाला चिनार झाडाच्या पल्लवाची उपमा देतात. असे शतसहस्र कोमल चिनारपल्लव वाऱ्यावर डुलत असलेले त्या विस्तीर्ण बगिच्यांत मला दिसले आणि वृक्षलतांच्या आणि सुगंधी फुलांच्या त्या शोभेलाही मागं सारणारी अशी दुसरीही एक शोभा मला दिसली. बागेच्या मधोमध प्रत्येक मजगींत ( म्हणजे मजल्यावर ) एकेक मोठी पुष्करिणी असून चारी

मजल्यावरच्या चारी पुष्करिणी एका पाटानं जोडल्या आहेत आणि या पाटांत कारंजांची रांगच्या रांग लागलेली आहे. श्रीनगरच्या उत्तरेस अकरा मैलांवर ' हारवान ' (हरवन) नांवाचा जो मोठा तलाव आहे त्यांतलं पाणी या बागेंत आणून खेळविलं आहे. वरच्या पुष्करिणींतून खालच्या पुष्करिणींत अशा प्रकारें पाणी पडत असतं आणि अखेर दल तलावांत जात असतं. चौथ्या मजगीवर पासष्ट फूट लांब आणि रुंद असा चवुतरा असून त्यांवर दगडी मंडप आहे. मंडपाचे खांब काळ्याभोर संगमरवराचे असून त्यांवर सुबक नक्षीकाम केलेलं आहे. या मंडपांत मी येऊन उभा राहिलों आणि प्रवेशद्वाराकडे तोंड करून त्या भव्य उद्यानाचं सौंदर्य बघत राहिलों. माझं मन सव्वातीनशें वर्षं मागं गेलं. ज्यावेळीं जहांगीर बादशहानं हें उद्यान तयार करविलं त्या काळांत या बागेचं वैभव कशा प्रकारचं असेल आणि ज्या मंडपांत मी या घटकेला उभा आहे त्या मंडपांत प्रेमाच्या किती गुजगोष्टी आणि क्वचित् राजकारणाचीही किती खलबतं झालीं असतील आणि या रमणीय पुष्करिणीच्या स्फटिकतुल्य पाण्यांत किती लावण्यवती ललनांनीं मनसोक्त जलक्रीडा केली असेल त्याचीं कल्पनाचित्रं माझ्या नजरेपुढें तरंगूं लागलीं......

" हुजूर, आपल्याला निषात बागेकडे जायला उशीर होतों. इथेंच किती वेळ उभे राहणार ? "

आहादूचं तें बोलणं ऐकून मी एकदम बेहस्तांतून खालीं पृथ्वीवर आलों.

' निषात ' बागेपाशीं माझा ' शिकारा ' येऊन पोंचला तेव्हां सूर्य अगदीं माथ्यावर आला होता. भोंवतालीं नजर टाकली कीं जिकडे तिकडे छोटया छोटया जललहरींचा चमचमाट दिसत होता. वनभोजनाची ही खरी घटका होती म्हणून म्हणा किंवा हें उद्यान लोकांच्या अधिक प्रीतींतलं होतं म्हणून म्हणा ' शालीमार '-पेक्षां या ठिकाणीं लोकांची किती तरी अधिक गर्दी उसळलेली दिसली. बागेपुढच्या तलावाच्या काठांशीं नौकांची अशी कांहीं झुंबड उडाली होती कीं तिच्यांतून मार्ग काढून ' शिकारा ' कांठाला लावणं कठीण होतं. पण मीं पाहिलं तो आहादूनं नावांच्या किचकट दाटींतून हां हां म्हणतां सफाईनं वाट काढली आणि 'शिकारा' किनाऱ्याला लावला. तें पाहून माझ्या मनांत आलं हा सारा संवयीचा खेळ आहे. सायकलीवरून हिंडतांना आपण नाहीं का अशक्य वाटणाऱ्या दाटींतून वाट काढीत ? किंवा

उत्तर हिंदुस्थानांतल्या आग्रा, बनारस अशा शहरांच्या जुन्या भागांतल्या अरुंद रस्त्यांत रहदारीची एकच 'भीड' लागलेली आपल्याला दिसली कीं आपल्याला वाटतं हिच्यांतून आपली गाडी जाणार कशी? परंतु गाडीवान ती सहजासहजी आणि वेग कमीही न करतां नेतो कीं नाहीं? त्याप्रमाणें जलपृष्ठावरील रहदारीची आपल्याला कधीं संवय नसते म्हणून नावांची गर्दी आपल्याला एखाद्या अभेद्य चक्रव्यूहासारखी वाटते परंतु ती ज्यांच्या अंगवळणीं पडलेली असते अशा आहादुसारख्या नावाड्यांना त्यांत भेगा आणि वाटा चटाचट दिसतात व ते आपली नौका सहज लीलेनें पुढें नेतात. 'शिकारा' किनाऱ्याला लागल्यावर मी खालीं उतरलों आणि आहादु व त्याचा छोटा मुलगा माझ्या बरोबर निघाले. उद्यानापुढच्या हमरस्त्यावर मोटारींची आणि टांग्यांची एकच थाप लागली होती. मिठाईच्या आणि पुरीभाजीच्या दुकानांची दाटी झाली होती आणि सिगरेटस् व काड्यांच्या पेट्या विकणारीं छोटीं छोटीं पोरं इतस्ततः रेंगाळत उंच आवाजांत ओरडत होतीं. सिगरेटचं जें पाकीट कोल्हापूरला सहा आण्यांना मिळायचं तें इथें बारा आणे देऊन मला घ्यावं लागलं. उलट सफरचंदासारखीं सुंदर ताजीं फळं सहा आणे डझनांनीं मिळत होतीं. पण म्हणून कांहीं सिगारेस् सोडून सफरचंद आपण घेत नाहीं? सिगरेटची तल्लफ भागवावयाची असेल तर सिगरेटच घ्यायला हवी, नाहीं का? आहादू मला म्हणाला, "हुजूर थोडी मिठाई घ्याना ना." परंतु दुकानांतल्या परातींत मांडून ठेवलेली ती मिठाई माणसांनीं खायच्या लायकीची असावी असं कांहीं केल्या मनाला पटेना आणि शिवाय शेखसाहेबांच्या घरून खान्याचा छोटा डबा मला देण्यांत आलेला होता. मी आहादूला थोडे पैसे दिले आणि म्हटलं, "तुझ्यासाठीं थोडी मिठाई घे."

या बगीच्याचं प्रवेशद्वार शालिमारच्या प्रवेशद्वाराप्रमाणें रस्त्याच्या पातळीवर नाहीं, उंचावर आहे. चांगल्या दहावीस दगडी पायऱ्या चढून जावं तेव्हां प्रवेशद्वाराची मुख्य कमान लागते. या कमानींतून शेकडों माणसं आंत शिरत होतीं. कांहीं थोडीं आपला वनभोजनाचा कार्यक्रम आटोपून बाहेर पडत होतीं, परंतु आंत शिरणाऱ्यांची गर्दी फार होती. हें उद्यान शालिमारइतकंच लांब पण त्याहून अधिक रुंद आहे. शालिमारला चारच मजगी आहेत, पण या बागेला सात आहेत. शेवटची मजगी फारच उंच असून तिच्या मागें अगदीं चिकटून पर्वताचे हजारों फूट उंचीचे कडे आहेत. शालिमारमध्यें एकच मंडप आहे, इथें दोन आहेत, एक प्रवेशद्वारापाशीं आणि दुसरा अखेरच्या

सातव्या मजगीवर. बाकीचा सारा नमुना शालीमारप्रमाणेंच आहे. तसेच प्रचंड चिनार-वृक्ष, तशाच पुष्पलता, तशीच हिरवळ, तशाच पुष्करिणी आणि तशाच कारंजांच्या रांगाच रांगा ! जणूं एकाच एंजिनिअरनं दोन्ही बागांची आंखणी केली असावी. शालिमार बाग जहांगीर बादशहानं १६१९ मध्यें तयार करवली, आणि निषात नूरजहान राणीचा भाऊ असफशाह यानं नंतर बांधली, आणि हा बगीचा अधिकच नयनमनोहर झालेला पाहून जहांगीर बादशहाला विषाद वाटला, आणि या बागेंत येणारं पाणी त्यानं कांहीं दिवस तोडलं होतं असं सांगतात. ही आख्यायिका खरी असो किंवा खोटी असो, एवढं खरं कीं हीं दोन्ही उद्यानं एकाच नमुन्याचीं असली तरी निषातची सर शालीमारला नाहीं. म्हणूनच मला वाटतं वनभोजनाला येणाऱ्या लोकांची खरी प्रचंड गर्दी या उद्यानावर मला दिसत होती. या गर्दीत श्रीमंतांपेक्षांहि सामान्य गरीब लोकांची संख्या अधिक होती हें विशेष आहे. बरोबर दोनचार नोकर, खान्याचीं मोठमोठीं भांडीं, अशा इतमामानं आलेले श्रीमंत लोक मला दिसत होते, परंतु त्यापेक्षांहि अधिक गर्दी सामान्यांची दिसत होती. अंगावर साधे मळके क्वचित् फाटके कपडे, त्यांवर जुनी फाटकी शाल किंवा कश्मीरी घोंगडी लपेटून घेतलेली, अशा वेषांत साधे खेडूत किंवा कामकरी लोक आपले मित्र म्हणा किंवा आपलीं बायकामुलं घेऊन म्हणा आलेले दिसत होते, आणि या मंडळींच्या तोंडावरचा उल्हास आणि हास्य श्रीमंतां-इतकंच भासत होतं. क्वचित् खेडूत प्रेमिकांची तरुण जोडीही आढळे, आणि कश्मीरी भाषेंत चाललेल्या त्यांच्या गुजगोष्टी मला समजण्यासारख्या नव्हत्या याचं मला वाईट वाटे. उद्यानांत जिकडे दृष्टि टाकावी तिकडे माणसांचा गजबजाट दिसत होता. कुणी आस्ते कदम सहल करीत होते, कुणी कारंजापुढं थबकले होते, कुणी हिरवळीवर धांवणाऱ्या अगर पुष्करिणींतलं पाणी एकमेकांवर उडविणाऱ्या किशोरांचा खेळ पहात होते, कुणी वृक्षांच्या गर्द छायेंत तृणांकुरांवर खुशाल झोपले होते, कुणी वनभोजन करीत होते, आणि इकडेतिकडे समूवारवर चहा तयार होत होता. श्रीमंत असो गरीब असो प्रत्येकाजवळ समूवार असायचाच असा जणूं संकेत दिसला. सारं उद्यान आनंदानं आणि समाधानानं बहरून गेलं होतं. पुरुष, स्त्रिया, म्हातारे, मुलं, श्रीमंत, गरीब हे भेद या ठिकाणीं घटकाभर नाहींसे झाले होते. सारीं माणसं एकाच पातळीवर आलीं होतीं. क्रीडोद्यानांत विहार करणारीं हीं सारीं माणसं होतीं. हें रमणीय उद्यान सगळ्यां-च्या मालकीचं होतं. या ठिकाणीं कोणी किती मजा लुटावी त्याला बंधन नव्हत.

खरं म्हणजे अशा या सुंदर उद्यानांत दहा पंधरा मित्रांचं टोळकं घेऊन यायला हवं, आणि सबंध दिवस मजेंत काढायला हवा. परंतु मी अगदीं एकटाच होतों, आणि भोंव-तालचे लोक प्रियजनांशीं व मित्रांशीं गप्पा गोष्टी करीत असलेले पाहून एकटेपणाची माझी जाणीव मला अधिकच असह्य होत होती. पण त्याला इलाज नव्हता. आणि शिवाय चिनारवृक्षांच्या छायेंत हिरवळीवर खुशाल पडून राहाण्यांत आणि मनाशीं विचार करण्यांतही मजा होतीच कीं ! काश्मीरमधल्या मुक्कामांत पुन्हां एकदां केव्हांतरी या बगीचांत आलं पाहिजे असा निश्चय करून संध्याकाळीं पांच वाजण्याच्या सुमारास मी तेथून निघालों. पण शेखसाहेबांच्या बंगल्यावर परत येतांच शेखसाहेबांचे प्रायव्हेट सेक्रेटरी श्री. श्यामलाल यांनीं माझ्यासाठीं तयार केलेल्या कार्यक्रमाचा खर्डा जेव्हां माझ्यापुढें टाकला तेव्हां समजलों कीं निषात बागेंत पुन्हां जाण्याचा माझा बेत पार पडणं कठीण आहे. या शामलाल साहेबांचं वर्णन तुला लिहिलेल्या एखाद्या पत्रांत मीं केलं आहे का ? यांचं आडनांव कौल असं आहे. एका उच्च वर्णीय हिंदु कुटुंबांतले हे गृहस्थ आहेत. शेखसाहेबांचे प्रायव्हेट सेक्रेटरी हिंदु आहेत या गोष्टींतच पुष्कळ अभिप्राय आहे असं मला वाटतं. शेखसाहेब उंच आणि धिप्पाड आहेत, तर शामलाल ठेंगणे आणि स्थूल आहेत. ते चष्मा घालतात आणि त्यांची नजर एखाद्या विसरभोळ्या माणसासारखी वाटते. शिवाय ते थोडेसे तोतरे आहेत. त्यामुळें ते बोलूं लागले, कीं जे वर्ण त्यांना साफ उच्चारतां येत नाहींत ते उच्चारतांना त्यांच्या जबड्याला चमत्कारिक झटके बसतात. त्यांना मी अगदीं प्रथम पाहिलं तेव्हां माझ्या मनांत आलं होतं.–‘ असा हा गबाळा तोतरा माणूस एवढ्या मोठ्या जबाबदारीच्या जागेवर आहे हें एक आश्चर्यच म्हणायचं ?’ पण आतां हें माझं मत पार बदललं आहे. वरकांतो जरासा बावळट आणि विसरभोळा दिसणारा हा माणूस अत्यंत हुशार आहे, आणि विशेष म्हणजे हा विसरभोळा मुळींच नसून याची स्मरणशक्ति खरोखरच अजब आहे. शेखसाहेबांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीचं काम म्हणजे कांहीं थट्टा नाहीं. रोज सकाळपासून हजार प्रकारचीं कामं शामलालना करावीं लागतात. गुप्त पत्रव्यवहार पहावयाचा, साधे राज्यव्यवहाराचे कागद पहावयाचे, पाहुण्यांची बरदास्त ठेवायची, सभासमारंभ असतील त्यांची नोंद करावयाची, अशीं कितीतरीं कामं ! पण हीं सारीं कामं शामलाल अगदीं बिनचूक आणि सुसूत्रपणें करतांना दिसतात. त्यांच्या कोटाला आणि विजारीला एकंदर किती खिसे असावे याचा अदमास अजून मला लागलेला नाहीं. या खिशांत सरकारी कागद, खाजगी

पत्रें, फोटोग्राफस्, करन्सी नोटा, विमानाचीं तिकिटं, अशा हजार गोष्टी सदा खच्चून भरलेल्या असल्यामुळें त्यांचे सारे खिसे नेहमीं फुगलेले दिसतात. परंतु या जादूच्या पोतडयांतून कोणता कागद केव्हां काढायचा व कोणाला द्यायचं याबद्दलचं विलक्षण अवधान शामलालना असलेलं मला दिसून आलं. आतांच पहाना. माझ्या कार्यक्रमाचं टिपण जसं त्यांनीं माझ्यापुढं ठेवलं त्याचप्रमाणें एक निळं पाकोट काढून ते मला म्हणाले, " ज्याची तुम्ही वाट पहात होतां तें हें पत्र घ्या. " तें तुझं पत्र होतं. मीं त्यांचे आभार मानले आणि ते गेल्यावर तुला हें पत्र लिहावं म्हणून बसलों.

पण इतक्यांत शामलालचे म्हातारे वडील आले. ते रोज एकदां नियमानं माझ्या-कडे येतात आणि गप्पा मारून जातात. त्यांच्या येण्याच्या वेळेस बहुधा मी तुला पत्र लिहीत बसलेला असतों. ते विचारतात, " कुणाला पत्र लिहितां ? " माझं उत्तर ऐकून ते विचारतात, "रोज लिहितां ?" मी होय म्हणून हंसल्यावर तेहि मोठमोठ्यानं हंसतात ! त्यांना तुझा फोटो पहाण्याची फार इच्छा आहे, दाखवीत नाहीं. आतां ते येऊन गेले तेव्हां देखील त्याबद्दल त्यांनीं मला प्रश्न केलाच. मीं म्हटलं, " मागवला आहे. आला कीं दाखवीन आपल्याला. " माझ्या उत्तरावर विश्वास नसल्याप्रमाणें त्यांनीं डोळे मिचकावले, हास्य केलं, आणि नाकापुढें बोट धरून ' समजलं महाराज ' अशा अर्थानं तें हालवीत ते निघून गेले. माझ्या मनांत आलं त्यांना परत बोलवावं आणि फोटो काढून त्यांना दाखवावा पण पुन्हा मनांत आलं प्रतारणा केलीच आहे तर ती पुरती करावी. तीनचार दिवसानं तुझा फोटो दाखवून मी त्यांना म्हणणार आहे, " आज आला बघा ! " अर्थात् त्यांना तें खरं वाटणार नाहीं हें मला माहीत आहे.

● ● ●

—१८—

या पत्रावर उजव्या हाताच्या वरच्या कोपऱ्यांत लिहिलेला पत्ता वाचल्याबरोबर तुला कदाचित् आश्चर्य वाटेल आणि तूं माझ्यावर रागावशील. इकडे काश्मीरला याव-यास निघतांना मीं कुठेंही धोक्याच्या ठिकाणीं जातां कामा नये असं तूं मला बजा-वलं होतंस, आणि मीही तें कबूल केलं होतं आणि असं असून उडीच्या आघाडीवरून हें पत्र मी लिहीत आहे. हें पाहून तूं म्हणशील कीं माझं ऐकण्याची यांची ही चांगली तऱ्हा आहे म्हणायची. पण माझ्यावर विश्वास ठेव. मी इथें आघाडीवरच्या छावणींत आलों असलों तरी त्यांत भिण्यासारखा कोणताच धोका नाहीं. इथें पहाडां-पलीकडे लपलेल्या पाकिस्तानी आणि टोळीवाल्या सैनिकांच्या बंदुकांचे 'डक्डम्' असे आवाज मधूनमधून ऐकूं येतात, आणि त्याला उत्तर म्हणून या छावणींतून तोफा डागल्या जातील, हें खरं आहे, तथापि तूं भ्यावंस आणि माझी काळजी करा-वीस असं यांत कांहीं नाहीं. शिवाय तूं हें कबूल करशील कीं काश्मीरमधील सध्यांची परिस्थिति नीट समजून घ्यायची तर निरनिराळ्या आघाड्यांवर काय चाललं आहे तें मला पाहिलं पाहिजे. हें करतांना मी अविचारानं भलत्याच ठिकाणीं जाणार नाहीं एवढं आश्वासन मी तुला देतों. वास्तविक काल सकाळींच या उडीच्या आघाडीवर येण्याची संधी मला मिळत होती, पण मींच ती जाऊं दिली. ब्रिगेडियर उस्मान यांना घेऊन शेखसाहेब इकडे यायला निघाले त्यावेळेस ते मला म्हणाले, " हें काय? कपडे कराना." मी त्यांना सांगितलं, " मी येत नाहीं." त्यांनीं विचारलं, "कां?" मी म्हटलं, " तुमच्याबरोबर आलों कीं मला ज्या गोष्टी खरोखर पहायच्या आहेत त्या पहातां येणार नाहींत. सैनिकांशीं आणि ऑफिसर्सशीं मला मनमोकळ्या गप्पा मारा-यच्या आहेत त्या मारतां येणार नाहींत. तुम्ही जाल, सलामी घ्याल, आलबेल पाहून

परत याल. अशा ट्रिपमध्यें माझा हेतु साध्य नाहीं व्हायचा. माझ्या जाण्याची स्वतंत्र व्यवस्था शामलाल करणार आहेत. त्याप्रमाणें मी जाईन. तुमच्यावरोबर येत नाहीं याबद्दल माफ करा." ब्रिगेडियर उस्मान हंसून शेखसाहेबांना म्हणाले. "अहो ते लेखक आहेत हें तुम्ही विसरतां." शेखसाहेब उलट हंसले व म्हणाले, "हां हां खरंच." आणि ते दोघे निघून गेले. शामलालना मीं म्हटलं, "पण उद्यां मला उडीला पाठविण्यासाठीं स्वतंत्र मोटारची व्यवस्था तुम्ही करणार आहांत ना. विसरून जाल हं." त्यांनीं सारे खिसे चाचपले, एकदोन तारा काढून वाचल्या. जणूं माझा प्रश्न त्यांनीं ऐकलाच नव्हता आणि ते दुसऱ्या कोणत्या तरी विचारांत होते. पण मग त्या दोन्ही तारा खिशांत कोंबीत त्यांनीं माझ्याकडे पाहिलं आणि, "फिकीर करूं नका हो." असं हंसून म्हणत ते निघून गेले. मग मीं कपडे केले आणि कॅमेरा घेऊन बाहेर पडलों. सबंध दिवस जुन्या श्रीनगर शहरांत भटकण्याचं मीं ठरवलं होतं. दुपारच्या जेवणाला मी बंगल्यावर येणार नाहीं अशी वर्दीही मीं देऊन टाकली होती.

श्रीनगरच्या ज्या भागांत शेखसाहेबांचा बंगला आहे तो कॅंटोनमेंटसारखा आहे. जेह्लम नदीच्या उत्तरेकडच्या कांठावर पूर्वेच्या बाजूला हा भाग आहे. या कांठाच्या पश्चिम अंगाला आणि नदीच्या दक्षिण कांठावर जुनं श्रीनगर शहर आहे. काश्मीरच्या महाराजांचा जुना राजवाडाही याच भागांत आहे. कॅंटोनमेंटमधून जुन्या श्रीनगरमध्यें जायचं म्हणजे रेसिडेन्सी रोड नांवाच्या मोठ्या प्रशस्त डांबरी रस्त्यानं जाऊन जेह्लमवरचा सगळ्यांत मोठा अमीराकदल नांवाचा पूल ओलांडावा लागतो. रेसिडेन्सी रोडनं निघालं कीं दोन्ही बाजूस मोठमोठीं दुकानं लागतात. काश्मीरी कलाकुसरीच्या वस्तू, गरम लोकरीचं कापड, शाली, जोडे, पुस्तकं अशांचीं दुकानं तर आहेतच, पण या दुकानावरच्या पाट्या पाहून मला विशेष गंमत वाटली नाहीं कारण असलीं दुकानं हिंदुस्थानांतल्या इतर कित्येक शहरीं आपण पहातोंच. पण ज्यांकडे विशेष लक्ष जावं अशा पाट्याही मधूनमधून मला दिसल्या. उदाहरणार्थ एका पाटीवर लिहिलं होतं. 'पाळण्यासाठीं मधमाशा मिळतील', किंवा दुसरी एक पाटी होती, 'खात्रीचा मध मिळेल.' या रस्त्यावर डेअरीचींही कांहीं दुकानं मला दिसलीं. तेथें ताजं दूध, लोणी इत्यादि वस्तू मिळतात. असल्या कांहीं दुकानांत हॉटेलप्रमाणें खुर्च्या टेबलं मांडलेलीं असतात, आणि दूध लोण्याबरोबर ताजी पॅस्त्री, केक्स् इत्यादि पदार्थ मिळतात. तुला मीं एकाद्या पत्रांत लिहिलं होतं कीं अमीराकदलच्या अलीकडच्या चौकांत सिने-

माच्या थिएटराजवळ मुसलमानांचीं हॉटेलं आहेत. त्यापैकीं एकांत शिरून मीं चावल आणि कोफ्ता यांची चव घेतली ! त्या सगळ्या जेवणाचा मीं समाचार घेऊं शकलों नाहीं, परंतु त्या घाणेरड्या हॉटेलांत बसल्याबसल्या सामान्य काश्मीरी मुसलमानांचे जे नमुने मीं पाहिले त्यांचा मला कादंबरी लिहितांना फार उपयोग होणार आहे. अगदीं गलिच्छ हॉटेलं जशीं मीं पाहिलीं तशीं इथलीं जरा फॅशनेबल हॉटेलं कशीं आहेत तें पहायचं मीं काल ठरवलं होतं. श्रीनगरमधलं सगळ्यांत भारी खर्चाचं आणि श्रीमंती थाटाचं हॉटेल अर्थात्च मीं पाहिलं होतं. मुंबईत ज्याप्रमाणें 'ताजमहाल' हॉटेल त्याप्रमाणें इथलं हें हॉटेल आहे. 'नीहोज हॉटेल' असं त्याचं नांव आहे. शेख-साहेबांचा राहाता बंगला आणि हॉटेल यांमध्यें फक्त एक बोळ आहे. येथें बडेबडे सरकारी पाहुणे अथवा मोठे लष्करी अधिकारी, किंवा काश्मीर पहायला आलेले पैसे-वाले फिरस्ते रहातात. हें हॉटेल उत्तम आहे याबद्दल वादच नाहीं. पण अमीराकदल लगतच्या ग्रँट रोड छापाच्या कबाब–रोटी किंवा चावल–कोफ्ता देणाऱ्या सामान्य उपाहारगृहांहून वरच्या दर्जाचीं, पण 'निहोज' पेक्षां खालच्या दर्जाचीं, अशीं मध्यम इंग्रजी फॅशनचीं हॉटेलं मला पहायचीं होतीं. असलीं दोनतीन हॉटेलं रेसिडेन्सी रोडवर मला दिसलीं. त्यांपैकीं 'इम्पीरियल कॅफे' नांवाच्या हॉटेलांत मी शिरलों.

इथला साधा पण फार नीटनेटका थाटमाट आणि विशेषतः संपूर्ण शांतता पाहून मी एकदम खूष झालों. अगदीं कोपऱ्यातलं एक टेबल पसंत केलं, आणि ब्रेकफास्ट मागितली. मुंबईच्या अगदीं महागड्या हॉटेलांतही गेल्या पांच वर्षांत मला मिळाला नाहीं इतका नामी खाना मला मिळाला. कॉफींत घालायसाठीं क्रिम मिळाली ती तर अशी जाड कीं कांहीं विचारू नकोस. अशी क्रिम गेल्या कित्येक वर्षांत मीं चाखली नव्हती. आणि विशेष म्हणजे ब्रेकफास्टचं बिल किती झालं तर अवघे चौदा आणे ! हें ठिकाण मला इतकं आवडलं कीं दुपारच्या लंचची ऑर्डर मीं दिली. जुन्या श्रीनगरच्या रस्त्यांतून आणि गल्लीकुचींतून मनसोक्त भटकून दुपारीं दीड वाजतां या हॉटेलांत आलों तों माझ्यासाठीं सकाळची कोपऱ्यांतली जागा राखून ठेवलेली दिसली. लंचही अगदीं एक नंबरचं होतं. जेवतां जेवतां माझी दृष्टि दूरच्या कोपऱ्यांत एका लहानशा पाटीवर गेली. तिच्यावर लिहिलं होतं–'मेहेरबानी करून राजकीय गोष्टींची चर्चा करूं नये.' मी मनाशीं म्हणालों इथें तर सभास्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य, भाषण-

स्वातंत्र्य सगळीं स्वातंत्र्यं आहेत, मग ही पाटी कशी ? कदाचित् जुना अवशेष असेल. त्या पाटीकडे बोट दाखवून मीं प्रथम वेटरला आणि नंतर मॅनेजरला प्रश्न केला. पण त्या दोघांनीं हंसण्यापलीकडे कांहीं उत्तर दिलं नाहीं. मला तें चमत्कारिक वाटलं. पण मग तो विषय मनांतून काढून जेवण संपल्यावर मीं माझ्या बॅगमधून कागद काढले आणि कांहीं गोष्टींचीं मला टिपणं करायचीं होतीं तीं करीत मी तिथेंच बसलों. लिहायला वाचायला मोठी निवांत जागा वाटली ही मला !

वंगल्यांत परत गेलों तेव्हां चार वाजले होते. थोडा निजलों, मग स्नान केलं आणि मनाशीं म्हटलं आतां लवकर कपडे करून तयार झालं पाहिजे, कारण पांच वाजतां मेजर जनरल कुलवंतसिंग यांना 'गार्डन पार्टी' होती. मला तिकडे जायचं होतं. कुलवंतसिंग यांच्याकडे काश्मीरमधील हिंदी फौजांचं नेतृत्व होतं. पण हिंद सरकारनं अधिक मोठ्या हुद्यावर त्यांची बदली केली होती, व त्यांना निरोप देण्यासाठीं बेगमसाहेब आणि शेखसाहेब यांच्यातर्फे आजची पार्टी होती. पूर्वीच्या जमान्यांत इथला रेसिडेंट ज्या बंगल्यांत रहात असे त्याच्या पुढच्या आवारांतल्या प्रशस्त आणि अत्यंत रमणीय अशा उद्यानांत हा समारंभ होता. पूर्वी या भागांत हिंदी लोकांनीं पाऊल टाकलेलं खपत नव्हतं, पण आतां तो जमाना पार गेला होता. रेसिडेंटच्या बंगल्यांत काश्मीरी कलाकुसरीच्या वस्तूंचं एक कायमचं भव्य प्रदर्शन आणि विक्रयकेंद्र स्थापण्यांत आलं होतं, आणि त्याचा उद्घाटनसमारंभ आजच्या पार्टीनंतर व्हावयाचा होता. मी बागेंत गेलों आणि पार्टीचा एकंदर थाट पाहून चकित झालों. ते मोठमोठे वृक्ष आणि लतामंडप, ती जाड आणि मखमलीहूनही मऊ अशी हिरवळ, चार चार खुर्च्यांच्या मधोमध मांडलेल्या व सुंदर वस्त्रांनीं आच्छादलेल्या टेबलावर ठेवलेल्या फुलदाण्यांतलीं ती अतिमोहक गेंदेवाज फुलं आणि खाद्यपदार्थांचीं पात्रं इत्यादि थाट पाहून माझ्या मनांत आलं हे काश्मीरी लोक मोठे रसिक खरेच. दिल्लीहून बामझाई इथें आले होते ते मला भेटले आणि त्यांनीं सर्व लोकांशीं माझा परिचय करून दिला. मी कुणाशीं तरी बोलत बसलों होतों तोंच शामलाल एकदम एका गृहस्थांना बरोबर घेऊन माझ्याजवळ आले आणि म्हणाले, " प्रोफेसर, तुमची ओळख करून देतों. हे मीरमहंमद गिलानी. हे उडीच्या आघाडीवर स्पेशल इमर्जन्सी ऑफिसर आहेत. हे रातोरात परत जाणार आहेत. तुम्ही उद्यां जाल, तेव्हां तुमची सारी व्यवस्था उत्तम करण्याबद्दल यांना मीं बजावलं आहे, " इतकं

बोलून ते जसे घाईघाईनें आले होते तसेच लगबगीनें निघून गेले. आतां या गृहस्थाला विसरभोळा म्हणायचं कीं शतावधानी म्हणायचं तूंच सांग !

या गार्डन पार्टीसाठीं किती निरनिराळ्या तऱ्हेचीं माणसं जमा झालीं होतीं! खाशा स्वाऱ्यांच्या रांगेंत उंच धिप्पाड हंसतमुख शेखसाहेब होते. त्यांच्या ठेंगण्याठुसक्या गोऱ्यापान तथापि निदान मला तरी विशेष देखण्या न वाटणाऱ्या बेगमसाहेबा होत्या, उंचीनं बेताचेच, अंगानं जरा आडवे आणि दणकट, वर्णानं काळे, चेहऱ्याकडे पहातां विशेष चलाख अथवा बुद्धिमान न वाटणारे शिख पद्धतीची विंचरून वळविलेली दाढी आणि जाडजुड मिशांचे मुख्य पाहुणे मेजर जनरल कुलवंतसिंग होते. अस्सल पंजाबी थाटाच्या वेशभूषेंतली, संस्कृत काव्यांतून ज्या गौरवर्णाचीं वर्णनं आपण वाचतों त्या कांतीमय वर्णाची फार उंच नसूनही कां कोण जाणे उंच भासणारी, मोहक हालचाली करणारी, मोठ्या टपोरेदार डोळ्यांची कुलवंतसिंग यांची पत्नी होती, बडेबडे लष्करी ऑफिसर्स होते, सध्यांच्या कश्मीर सरकारचे सारे मंत्री होते, श्रीनगरमधले बडेबडे धनिक होते, सात महिन्यांपूर्वी टोळीवाल्यांनीं कश्मीरवर हल्ला चढवला तेव्हां ज्यांच्या जहागिरी आणि घरंदारं सफाई लुटलीं गेलीं असे दोन छोटे राजे होते, व सरदार कमालखान नांवाची एक व्यक्ति होती. या कमालखानानं १९४६ सालीं भूमिगत होऊन लूटमारीची आणि बंडाव्याची मोठी धमाल उडवून देऊन त्यावेळेच्या कश्मीर सरकारला दे माय धरणी ठाय करून सोडलं होतं. पुढें तो रावळपिंडीला पकडला गेला होता व दरबारांत अनेक आरोपाखालीं त्याला एकंदर तीस वर्षांची शिक्षा ठोठावली गेली होती. शेख अबदुल्लांच्या नव्या सरकारनं त्याला नुकतंच मुक्त केलं होतं. या गृहस्थाशीं खूप बोलण्याची माझी साहाजिकच इच्छा होती. मीं त्याला मुद्दाम माझ्याजवळ आग्रहानं बसवून घेतलं आणि त्याला बोलायला लावण्याचा परोपरीनं प्रयत्न केला. पण साधा मळका लेहेंगा, शर्ट आणि कोट घातलेला, बुटका, किरकोळ नव्हे पण धिप्पाडही नव्हे अशा बांध्याचा, तोंडावर वण असलेला, आणि ज्याच्याकडे पाहिलं कीं त्याच्या डोळ्यांत कांहीं दोष असावा अशी पहाणाऱ्याला शंका यावी असा हा माणूस मितभाषीच नव्हे तर मुखदुर्बल असल्याचं माझ्या लक्षांत आलं. 'मूकं करोति वाचालं' अशी शक्ति या गृहस्थाच्या बाबतींत माझ्या ठिकाणीं नव्हती. मग त्याच्याशीं बोलायचा नाद सोडून देऊन इतरांशीं संभाषण करीत टेबलावरील खाद्य–पेयांचा समाचार मी घेऊं लागलों.

या पार्टीची सारी व्यवस्था 'नीडोज' हॉटेलनं ठेवली होती. खाण्याच्या पदार्थांत विलायती चिजा होत्या तशा देशी आणि अस्सल काश्मीरी चिजाही होत्या. इकडे कमळांच्या झाडांच्या जोडीनं पाण्यांत उगविणारी एक विशिष्ट वेल आहे तिचं नांव 'रव्यल.' या वेलीला खूप रुंदरुंद पानं येतात. या पानांना म्हणतात 'थर'. आणि या वेलींच्या मुळांना म्हणतात 'नद्रू'. आपल्याकडे ज्याप्रमाणें अळवाच्या देठापासून अनेक खाद्यपदार्थ तयार करतात त्याप्रमाणें या नद्रूचा इकडे उपयोग केला जातो. गार्डन पार्टीत टेबलावरच्या प्लेटींत वेटर लोक गरमगरम भजी आणून वाढीत होते ती या नद्रूंचीं होतीं.

बामझाई मला हें सारें समजावून सांगत होते. मला वाटतं मी केव्हांतरी त्यांना म्हटलं होतं तुम्हां कश्मीरी लोकांना भात आणि पालेभाजी याखेरीज दुसरं येतं काय करायला ? या माझ्या टीकेला उत्तर म्हणून ते हे 'नद्रूपुराण' सांगत होते. व 'बघा तरी याची लज्जत' असं वरचेवर म्हणत माझ्यापेक्षां जास्त भजीं ते स्वतः खात होते. आणखीही कांहीं अस्सल कश्मीरी पक्वान्नांची माहिती ( अर्थात् प्रात्यक्षिकावांचून ) मला देण्याच्या बेतांत ते होते, पण तितक्यांत सगळ्या टेबलावरचं कुजबुजणं एकदम बंद झालेलं आमच्या लक्षांत आलं. शेखसाहेब उभे राहिले होते आणि कुलवंतसिंग यांना द्यावयाचं मानपत्र वाचून दाखवित होते. मानपत्र वाचून झाल्यावर त्यांनीं छोटसं भाषण केलं. तें अर्थात् चांगलं होतं, परंतु नंतर कुलवंतसिंग यांनीं उत्तरादाखल जें भाषण केलं तें मला विशेष चांगलं वाटलं. त्यांचे इंग्रजी उच्चार अगदीं सफाईदार होते, शब्दांची योजना ठाकठिकिची होती, आणि बोलण्यांतला आशय समयोचित व भावनापूर्ण होता. छोटसंच पण इतकं नीटनेटकं व हृदयस्पर्शी भाषण हा गृहस्थ करील अशी माझी कल्पना नव्हती. पार्टी आटोपून जेव्हां आम्ही सगळे प्रदर्शनाकडे निघालों तेव्हां मी मुद्दाम कुलवंतसिंग यांच्याजवळ गेलों व "आपलं भाषण मला फार आवडलं" असं त्यांना सांगितलं. मीर महंमद गिलानी जाण्यापूर्वी मला पुनः भेटले व म्हणाले, "उद्या तुमची वाट पाहीन हं, तुम्ही येथून केव्हां निघणार ? सकाळींच ना ? शक्य तों लवकर निघा." मीं म्हटलं, "तें माझ्या हातांत कुठें आहे ? शामलालजी व्यवस्था करतील त्याप्रमाणें निघेन."

आज सकाळीं नास्ता घेतल्याबरोबर मीं निघावं असा बेत शामलालनीं आंखला होता. परंतु काल रात्रीं पार्टी आटपल्यानंतर थोड्याच वेळानं जो पाऊस सुरू झाला तो आजही

थांबला नव्हता, त्यामुळें मीं दुपारचं जेवण इथं आटपून निघावं असं ठरलं, आणि प्रत्यक्ष निघायला जवळजवळ दुपारचे तीन वाजले. प्रथम शेखसाहेबांच्या गाडींतून बदामी बाग नांवाची जी मोठी लष्करी छावणी इथें आहे त्या ठिकाणीं मी गेलों. इथून कांहीं लष्करी ऑफिसर्स उडीला जायचे होते व त्यांनीं आपल्याबरोबर मला न्यावं अशी व्यवस्था करण्यांत आलेली होती. ही 'बदामी बाग' म्हणजे एक अत्यंत रमणीय ठिकाण आहे. 'निषात' बागेच्या पाठीशीं ज्या पर्वतांचे उंचउंच कडे आहेत त्यांची रांग पूर्व–पश्चिम खूपच लांबवर पसरलेली आहे. तिच्या मांडीवर ठेवल्याप्रमाणें ही जवळजवळ दोन अडीच मैल विस्ताराची छावणी वसलेली आहे. ज्यांचे माथे शुभ्र बर्फानें माखलेले आहेत अशा नगराजांचा काळा जांभळा भव्य तट, त्या तटाला लागूनच असलेल्या लष्करी तऱ्हेच्या छोटया मोठया इमारतींचीं लालभडक छपरं, ठिकठिकाणीं उभ्या केलेल्या राहुटयांना उन्हांत चकाकणारा पांढरा रंग, जिकडे तिकडे दिसणारे उंच उंच हिरवेगार वृक्ष, आणि ठिकठिकाणीं आखलेले हिरवळीचे लहान मोठे पट्टे आणि या बहुरंगी मनोहर पार्श्वभूमीवर जागोजाग चाललेली सैनिकांची कवायत व धांवपळ, आणि छोटया 'जीप' गाडयांची व मोठमोठया ट्रक–गाडयांची चाललेली ये जा–हें दृश्य मला फार मनोहर वाटलं. ज्या ऑफिसर्सबरोबर मी इकडे उडीला येणार होतों त्यांची निघण्याची तयारी होतां होतां पुष्कळच खोटी झाली. पाऊसही सारखा पडतच होता. पण मला कंटाळा आला नाहीं. ऑफिसर कमांडिंगनं सिगरेटचा एक डबा माझ्यापुढं आणून ठेवला होता; आणि चिकाच्या पडयांतून रंगभूमीवरचा एकादा देखावा पहायला मिळावा त्याप्रमाणें जलधारांत न्हाऊन निघणाऱ्या बदामी बागेचं तें सौंदर्य कितीही पाहिलं तरी समाधान होण्यासारखं नव्हतं.

वाटेंत 'पट्टण', 'संग्राम', 'बारामुल्ला', 'महोरा' इत्यादि ठिकाणीं थोडाथोडा मुक्काम करीत करीत आम्ही आलों. बारामुल्लाला मी स्वतंत्रपणें जाणार आहे, म्हणून तिथं फारसा वेळ घालविला नाहीं. तथापि थोडया वेळांतही, टोळीवाल्यांनीं या सुंदर शहराची केवढी खराबी केली ती सहज दृष्टीस पडली. माझ्या कादंबरींत या भागाला कदाचित् विशेष महत्त्व द्यावं लागणार आहे. म्हणून इथलं सारं वातावरण मीं विशेष काळजीपूर्वक पाहिलं व आणखी पहाणार आहे. महोरा येथें जो विजेचा कारखाना आहे तेथून सबंध कश्मीर दरींत वीज पुरविली जाते. टोळीवाल्यांनीं हा कारखाना संपूर्ण उध्वस्त करून टाकला होता. पण आतां तो पुन्हां चालूं झाला आहे. या

कारखान्याची जागा किती रमणीय आहे म्हणून तुला सांगूं? फार, फार! किंबहुना उडीपर्यंतचा हा प्रवास ज्या प्रदेशांतून मीं केला तो साराच रम्य आहे. सत्तर मैल लांबीचा रस्ता, प्रशस्त आणि गुळगुळीत आहे. ह्या रस्त्याशीं समांतर जेहलम नदीचा प्रवाह आहे. जिकडे नजर टाकावी तिकडे डाव्या अंगाला शेत, बगीचे आणि उजव्या अंगाला नदीपलीकडचे दूरचे उंच उंच पहाड दिसतात. महोरापाशीं डाव्या अंगालाही डोंगराचे कडे दिसूं लागतात. या डोंगरांचे झाडीनं आच्छादलेले कडे, त्यांच्याखालीं उडीकडे येणारा रस्ता, त्याच्याखालीं कारखाना, त्या पलीकडे भव्य पात्रांतून वाहाणारं खळखळणारं जेहलमचं पाणी, पलीकडे मोठमोठ्या झाडांनीं आच्छादलेला भूप्रदेश, आणि अखेर कडेला दूर अंतरावरचे भव्य पर्वत–असा हा दिवसभरच्या पावसानं भिजलेला व संध्याकाळच्या प्रकाशांत धूसर वाटणारा देखावा मी कधीं विसरेन असं मला वाटत नाहीं!

● ● ●

## —१९—

आम्हीं उडीला पोचलों तेव्हां जवळजवळ तिन्ही सांजा झाल्या होत्या. मोटार हांकणाऱ्या कर्नल साहेबांनीं मला विचारलं, " आपण उतरायला छावणींत येणार कीं गिलानी साहेबांकडे उतरणार ? " त्यांनीं असं विचारलं याचं कारण आघाडीवरची अर्धवर्तुळाकार छावणी जेह्लम नदीच्या पलीकडच्या तीरावर होती. टोळीवाल्यांशीं झालेल्या युद्धांत या ठिकाणच्या जेह्लमवरचा जो एक पूल फार महत्त्वाचा ठरला होता तो ओलांडून छावणीवर जायचं होतं; आणि गिलानी यांची कचेरी पुलाच्या अलीकडे रस्त्याच्या कडेला होती. मीं कर्नल साहेबांना सांगितलं, " मी गिलानी साहेबांकडे उतरणार आहे." गाडी हाकतां हाकतां ते म्हणाले, " अच्छा " आणि मग थोड्याच वेळानं गाडी थांबवून ते म्हणाले, " इथें उतरा आपण. हीच गिलानी साहेबांची कचेरी. " मीं पाहिलं तों ती कचेरी म्हणजे एक साधी दुमजली इमारत होती. खालीं रस्त्यावर गाडी उभी राहिली तेव्हां वरच्या मजल्यावरून बरेच लोक ओरडले, " आइये साब ! आइये जनाब ! " मीं वर नजर करून पाहिलं तों जाड जाड दुलया ज्यांनीं अंगावर लपेटलेल्या आहेत असे पांच सहा इसम माडीच्या गॅलरीवजा जागेंतून खालीं वाकलेले मला दिसले, आणि त्यांतच स्वतः गिलानी उभे होते. या मकाणाला ' गढी ' म्हणतात; आणि मी जेव्हां वर गेलों आणि त्या धिप्पाड माणसांत बसलों तेव्हां पृथ्वीराज यांच्या ' पठाण ' नाटकांतल्या गढीची मला आठवण झाली. मी बसल्याबरोबर गिलानी साहेबांनीं विचारलं, " काय, चहा पाहिजे ना ? " मीं म्हटलं " नमकीन चहा नको. अस्सल चहा देत असाल तर द्या. " ते हसून म्हणाले, " आपल्याजवळ नक्कल आहे, अस्सल आहे, जें चाहेल तें आहे. " दहा पांच मिनिटांतच चहाची भली मोठी किटली आली आणि थाळीभर बन-केक्स

आल्या. यथेच्छ चहा झाल्यावर सिगरेट्चीं पाकिटं आलीं आणि आमच्या गप्पा सुरू झाल्या. मीरसाहेबांचं बोलणं भारी मिश्रास आहे. त्यांच्याकडे पाहिलं कीं मला सारखी कै. मजीखां यांची आठवण होते. तसंच भव्य शरीर, तशीच ती हंसण्याची तऱ्हा, तशीच तीं कपाळावर रुळणारीं झुलपं, आणि तसंच आवाजाचं माधुर्य! "देखो साब" असं म्हणून ते एकेक हकीकत सांगूं लागले कीं ती कधीं संपू नये असं वाटतं. मीरसाहेबांनीं सर्व मंडळीशीं माझी ओळख करून दिली. त्यांत कांहीं मंडळी अशी होती कीं त्यांना इंग्रजी बोलतां येत नव्हतं, द्वारकानाथ कौल नांवाचे एल्. एल्. बी. झालेले एक गृहस्थ होते ते उत्तम इंग्रजी बोलत होते, उडीचे मॅजिस्ट्रेट होते त्यांनाही इंग्रजी चांगलं येत होतं, आणि स्वतः मीरसाहेबांचा खाक्या इंग्रजी उर्दू जसं जमेल तसं बोलण्याचा आहे. कोल्हापूरसारख्या दूरच्या ठिकाणीं रहाणाऱ्या माझ्यासारख्या माणसानं कश्मीरमधील परिस्थिति प्रत्यक्ष पहाण्यासाठीं यावं या गोष्टीचं या सर्व मंडळींना विलक्षण आश्चर्य वाटत होतं, आणि आपल्या देशांतील परिस्थिति मला समजावी याबद्दलची त्यांची कळकळ इतकी तीव्र होती कीं हकीगती सांगण्यांत त्यांच्यामध्यें चढाओढ लागली होती. रात्रीचं जेवण झाल्यावरही कितीतरी वेळ आमच्या गप्पा चालूंच होत्या. इतक्यांत धडाड् धूम असे आवाज ऐकूं आले, आणि त्याबरोबर कुणीसं म्हणालं, "बत्ती मालवा." मीरसाहेब मला म्हणाले, "रोजचंच आहे." आणि टोळीवाले लोक पहाडाच्या पलीकडे अजूनही कसा त्रास देतात त्याचं वर्णन त्यांनीं सुरू केलं. आम्ही सारेजण दुलया लपेटून बिछान्यावर आडवे झालों तरी पडल्यापडल्या आमच्या गप्पा चालूंच होत्या. मीरसाहेबांच्या बोलण्यांला हूं हूं करण्याचं मीं केव्हां बंद केलं तें माझं मलाच कळलं नाहीं.

कपबशांचा खळखळाट ऐकूं आला म्हणून पांघरूण दूर करून डोळे उघडून मीं पाहिलं तों सारे लोक उठून आपापल्या अंथरुणावर बसले होते. मीरसाहेबांनीं मला विचारलं, "क्यं साब, झोप ठीक झाली ना? का स्वप्नांत तोफांची सरबत्ती ऐकूं आली?" मीं म्हटलं, "छे हो. रात्रभर स्वप्नं पडत होतीं, पण तीं फार निराळीं होतीं, तुम्हांला सांगण्यासारखीं नाहींत." सगळेजण हसले, आणि मीरसाहेब म्हणाले, "अच्छा अच्छा! तुमचीं स्वप्नं आम्हांला सांगितलीं नाहींत तरी आम्हांला तर्क करतां येतो. उठा आतां चहा घ्या. चहा आटपल्यावर आपल्याला छावणींत जायचं आहे. खालीं गाडी येऊन तयार आहे."

उडीच्या छावणींतल्या मुख्य ठाण्याकडे आम्ही होतों तोंच रस्त्यानं जाणाऱ्या एका ऑफिसरला सलाम करून मीरसाहेब गाडीखालीं उतरले, व लगबगीनं रस्ता ओलांडून त्याच्याजवळ गेले. त्या दोघांचं काय बोलणं झालं तें मला ऐकूं आलं नाहीं पण दुसऱ्या क्षणीं ते ऑफिसर गृहस्थ गाडीजवळ आले व अस्सल महाराष्ट्रीय थाटाचा नमस्कार करून मला ते म्हणाले, " केव्हां आलांत आपण ? " इथें उडीच्या आघाडीवर महाराष्ट्रीय ऑफिसर भेटेल अशी माझी कल्पना नव्हती. मला फार आनंद झाला व मोटरखालीं उतरून त्यांच्याशीं मीं हस्तांदोलन केलं. या गृहस्थांचं नांव ठकार असं होतं. लेफ्टनंट कर्नलच्या हुद्यावर ते होते, आणि नंबर दोनची दोग्रा रेजिमेंट त्यांच्या ताब्यांत होती. हे फर्ग्युसन कॉलेजचे माजी विद्यार्थी आहेत. "तुमचीं पुस्तकं मीं वाचलीं आहेत आणि कांहीं व्याख्यानंही ऐकलीं आहेत. " असं त्यांनीं मला सांगितलं आणि मग आम्ही फर्ग्युसन कॉलेज, पुणें, कोल्हापूर याबद्दलच्या गप्पांत इतके रंगून गेलों कीं जणू आम्ही दोघेही उडीची आघाडी सोडून आपल्या माय देशांतच आलों आहोंत असं आम्हांला वाटलं. मग अर्थातच मला छावणीवरच्या साऱ्या गोष्टी दाखवण्याची कामगिरी ठकारसाहेबांनीं आपल्याकडे घेतली.

टोळीवाल्यांनीं उडी शहराची कमालीची नासधूस केलेली आहे. बाजारपेठ, शाळा, इस्पितळ, पोस्ट ऑफिस, लोकांचीं रहाण्याचीं घरं, सारं बेचिराख करून टाकलेलं दिसलं. १९४७ सालीं कश्मीर दरबारनं शेखसाहेबांना पकडून त्यांच्यावर खटला भरला तेव्हां पंडित नेहरू दिल्लीहून तडक श्रीनगरकडे धांवले होते, व त्यावेळच्या कश्मीर सरकारनं त्यांना पकडून उडीच्या डाक बंगल्यांत ठेवलं होतं. ही बातमी तुला अजून आठवत असेल. हा डाक बंगला मीं पाहिला. म्हणजे जाळपोळी नंतर उरलेले त्याचे अवशेष पाहिले. जेहूलमच्या अगदीं तीरावर हें रम्य ठिकाण आहे. माझ्या मनांत आलं या डाक बंगल्याच्या व्हरांड्यांतच अस्वस्थ चित्तानं येरझारा घालीत जेहूलमच्या पात्राकडे पहात असतांना नेहरूंना हें शक्य तरी वाटलं असेल काय कीं अवघ्या दोनच वर्षांत राजकारणाचा प्रवाह भलतीकडेच वहात जाईल आणि शेखसाहेब कश्मीरचे पंतप्रधान होतील !

छावणींतल्या सर्व दैनंदिन व्यवहाराची माहिती ले. कर्नल ठकार मला मोठ्या उत्सुकतेनं देत होते. तोफा मधूनमधून डागल्या जात होत्या. हें पाहून मीं त्यांना विचारलं, " पहाडापलीकडे शत्रूची हालचाल आतां देखील चालू आहे काय ? " ते

हंसले व म्हणाले, " छे छे! पण रात्रीं सरवत्ती करावी लागते तिची ही तयारी आहे. ' रेंजेस ' घेऊन ठेवण्याचं काम चाललं आहे. " त्यांचं बोलणं मला समजलं नाहीं हें माझ्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसलं असावं म्हणून ' रेंजेस ' घेणं म्हणजे काय याचा त्यांनीं खुलासा केला. ते म्हणाले, " आतां तोफेंतून उडणारा गोळा पहाडापलीकडे कुठें जाऊन पडतो तें त्या बाजूला असलेले आमचे टेहळे पाहून ठेवतात, म्हणजे त्या ठिकाणीं गोळा जाऊन पडण्याची ' रेंज ' ठरते. अशा ज्या दिशा आतां आम्हीं ठरवतों त्यांना नांवं दिलीं जातात. सैन्यांतल्या जवान लोकांना सिनेमा नट्यांची आवड फार म्हणून या दिशांना ' काननवाला ' ' बेगमपारा ' ' जयश्री ' ' रेहना ' अशीं नांवें दिलीं जातात. मग रात्रीं पहाडाच्या माथ्यावरील टेहळ्यांना शत्रूची हालचाल दिसली कीं ते आम्हांला फक्त इतकाच संदेश देतील कीं बेगमपारा उडवा. मग इकडून त्या रेंजनं तोफ डागली जाते, व तोफेचा गोळा नेमका शत्रूवर जाऊन पडतो. " मला हें सारें फार गंमतीचं वाटलं आणि मनांत आल कीं ही गोष्ट जर आमच्या सिनेमा नटयांना माहीत झाली तर लढाई जिकण्यांत आमचा केवढा भाग असतो बघा असं त्या खच्चित म्हणूं लागतील!

श्री. ठकार यांनीं छावणी दाखवल्यानंतर ' ऑफिसर्स–मेस् ' ला नेलं व तिथें सर्वांची ओळख करून दिली. हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांतून आलेले हे लोक होते आणि बहुतेकजण मोठे बोलके होते. मी मुंबईचा आहे, हें कळल्यावर ते म्हणूं लागले, " तुमची चैन आहे महाराज! आम्ही इकडे पहाडावर संन्यस्त जीवन कंठीत पडलों आहोंत. " त्यांच्यापैकीं कांहींच्या हातांत बिअरचे ग्लास होते त्याकडे अर्थपूर्ण दृष्टि टाकून मीं म्हटलं, " वा वा! चांगलं आहे कीं हें संन्याशाचं जीवन! आणि दोस्त हो, खरं म्हणाल तर मुंबईत आतां पूर्वीची मजा मुळींच राहिलेली नाहीं. शराब तर सोडाच पण चांगलं सुग्रास अन्न देखील किती पैसे मोजले तरी मिळण्याची पंचाईत झाली आहे मुंबईत! " यावर त्यांपैकीं एकजण म्हणाला, " असेना का पंचाईत! मुंबई ती मुंबई. भुकेनं मेलों तरी चालेल पण मुंबईत मला मरण येऊं दे अशी मी अल्लाची रोज प्रार्थना करीत असतों! " या गृहस्थाचं हें विनोदी बोलणं तूं सोडून दे पण एक गोष्ट त्या साऱ्यांच्या बोलण्यांत दिसून आली ती ही कीं हे लोक दुसरं महायुद्ध सुरू झालं तेव्हांपासून सतत जवळजवळ नऊ वर्षं युद्धांत गुंतलेले आहेत आणि बायकामुलांपासून दूर राहून राहून कंटाळले आहेत. ' तुम्हा सिव्हिलीयन

लोकांची चैन आहे " असा जो उद्गार त्यांच्या तोंडून वरचेवर निघत होता याचं कारणं हें होतं.

टोळीवाल्यांनीं उडीवर हल्ला चढवला तेव्हां जीं माणसं त्यांच्या अत्याचाराला बळी पडलीं होतीं त्यांपैकीं कांहींना माझ्या प्रत्यक्ष मुलाखतीसाठीं मीरसाहेब घेऊन आले. या लोकांच्या हकीगती मोठ्या हृदयद्रावक होत्या. एक बाई तर इतकी म्हातारी होती कीं तिच्या तोंडाचं बोळकं झालं होतं. परंतु टोळीवाल्यांनीं हिच्याशीं देखील पशु-तुल्य कामाचार केले होते. या सगळ्या लोकांच्या करुण कहाणीचं तात्पर्य एवढंच होतं कीं पाकिस्तान्यांनीं आणि टोळीवाल्यांनीं लुटालूट, जाळपोळ आणि अत्याचार करतांना हा हिंदु, हा मुसलमान असा भेद ठेवला नव्हता आणि त्यामुळें पाकिस्तान-वाले मुसलमानांचा कैवार घेतील ही कल्पना इथें कुणाच्याही मनांत शिल्लक नव्हती. ‘ पाकिस्तानला आमच्या जमिनीचा शिवराई एवढाही तुकडा आम्ही मिळूं देणार नाहीं ’ हें आपापल्या हृदयद्रावक हकीगती सांगणाऱ्या या लोकांचं पालुपद आहे. या उडी गांवांत ब्राह्मणांची वस्ती बरीच आहे पण हे ब्राह्मण त्याचप्रमाणें इतर वर्णांचे हिंदु आणि मुसलमान सारे नागरिक हातांत कुदळी, खोरीं, फावडीं घेऊन रस्ते तयार करण्याचं काम मोठ्या हौसेनं आणि उत्साहानं करतांना मला दिसले. मीरसाहेबांनीं मला मुद्दाम निरनिराळ्या प्रकारच्या लोकांत मिसळून बोलण्याची संधी दिली. सर्व लोकांच्या मनांत हिंदी फौजांनीं कश्मीरचं संरक्षण केलं अशी दृढ कल्पना आहे आणि हिंदी सैनिकांविषयीं सर्वांना विलक्षण आपुलकी आणि आदर वाटतो. या आदराबद्द-लच्या अनेक आख्यायिका मीरसाहेबांनीं मला सांगितल्या, त्यांपैकीं एक तुला इथें सांगतों.

पहाडाच्या माथ्यावर टेहेळणीच्या ज्या जागा असतात त्या अर्थातच फार धोक्याच्या असतात. या जागीं मोर्चे धरून बसलेल्या हिंदी शिपायांना उत्तमउत्तम खाद्य पदार्थ आणि फळफळावळ पोंचविण्याची इथल्या नागरी लोकांत अहमहमिका चालते. मोर्चा-वरच्या शिपायांपैकीं सावळाराव नांवाचा एक शिपाई इथल्या लोकांत फार लोकप्रिय झाला होता. " तो जेव्हां आजारी झाला, " मीरसाहेब मला म्हणाले, " तेव्हां गांवा-तल्या साऱ्या मुसलमानांनीं त्याला आराम पडावा म्हणून ‘ नियाझ ’ केले. " मीं विचारलं, " नियाझ म्हणजे काय ? " त्यांना प्रतिशब्द सांगतां येईना परंतु त्या

शब्दाच्या अर्थाची फोड करण्याचा मीरसाहेबांनीं जो प्रयत्न केला त्यावरून मी ओळखलं कीं नियाझ म्हणजे नवस.

उडीहून परत श्रीनगरला जाण्यासाठीं मला स्वतंत्र गाडी मिळावी अशी व्यवस्था झालेली होती. परंतु मीरसाहेबांनीं मला विचारलं, " स्वतंत्र गाडींत जाणार कीं येथून कॉनव्हॉय निघणार आहे त्याबरोबर जाणार ?" कॉनव्हॉय म्हणजे सैनिकांनीं भरलेल्या चार सहा मोठमोठ्या ट्रक्स, व त्यावर देखरेख करणाऱ्या ऑफिसर्सची जीपगाडी, हे मला माहीत होतं. म्हणून मीं एकदम उत्तर दिलं " अर्थात कॉनव्हॉयबरोबर." मीरसाहेब म्हणाले, " अच्छा ", व त्याप्रमाणें त्यांनीं टेलिफोनवरून छावणीकडे निरोप दिला. कॉनव्हॉय दुपारीं दोन वाजतां निघावयाचा होता. मला निरोप देण्यासाठीं म्हणून मीरसाहेबांनीं मोठ्या खान्याचा बेत केला. भर दुपारची वेळ होती, परंतु आकाश अभ्राच्छित होतं, हें पाहून गढीपुढच्या प्रशस्त अंगणांत गालिचे, रुजामे टाकून जेवणाच्या थाळ्या मांडल्या होत्या. एकेक थाळी एकेकाला असं समजूं नकोस. एका एका थाळींत चौघापांचजणांनीं जेवायचं. लहानपणीं आपण मुलंमुलं जेवतो ना ? त्याप्रमाणें आणि खरोखरच जेवतां जेवतां आमच्या गप्पा चालल्या होत्या त्या अशा प्रेमानं आणि मोकळेपणानं कीं जणूं आम्ही सारीं लहान मुलंच होतों. कुठला मी व कुठले हे मीरसाहेब आणि त्यांचे स्नेही ! परंतु आमच्यांत केवढा सुहृद्भाव निर्माण झाला होता. मला वाटतं मैत्रीचा ओलावा दीर्घत्वावर नव्हे तर अंतःकरणाच्या समान धर्मावर आणि परस्पराविषयींच्या सहानुभूतीवर अवलंबून असतो ! तें जेवण संपविणं आणि एकमेकांचे निरोप घेणं आम्हांला फार अवघड झालं. परंतु मीरसाहेबांच्या गढीखालच्या रस्त्यावर कॉनव्हॉयमधली जीप गाडी येऊन उभी राहिली आणि तिचा हॉर्न वाजला तेव्हां गढीखालीं उतरणं मला भागच होतं.

जीपमध्यें बसलेले दोघे कर्नल छावणीवर माझ्या परिचयाचे झालेलेच होते. यांपैकीं एकाचं नांव फुलमनराम. किती देखणा आहे हा तरुण माणूस. विलक्षण सतेज गौरवर्ण, अंगाचा सडसडीत पण दृढ. सरळ बांधा, मोठमोठे डोळे, तरतरीत नाक, ओठावरची ऐटबाज मिशीची रेघ, आणि इंग्रजी बोलणं फार सफाईचं अशा थाटाचा हा लष्करी अधिकारी मला पाहिल्याबरोबर एकदम आवडला होता. आणि आतां पहातो तों त्याच्याजवळ एक ठेंगणी, ठुसकी, केसाळ, अति सुंदर कुत्री. जीप गढीजवळ थांबल्याबरोबर या कुत्रीनं खालीं उडी टाकली होती व कुत्र्याच्या नेहमींच्या लहरी-

पणास अनुसरून डुंगतडुंगत ती गढीचा पहाड चढून वर गेली होती. फुलमनराम एकीकडे मला बसायसाठीं जीपमध्यें जागा करून देत होते व दुसरीकडे 'जंपी' 'जंपी' म्हणून आपल्या लाडक्या कुत्रीला हांका मारीत होते. पण ती कसली खट ! तिला कोणत्यातरी झुडपाचा वास फार आवडला होता. व तेथूनच केसांच्या बटा ज्यांवर आल्या आहेत अशा डोळ्यांनीं आपल्या मालकाकडे ती पहात होती. व कोवळ्या जनानी गोड आवाजांत भोकून 'मानापमान' नाटकांतल्या भामिनीप्रमाणें सांगत होती, " साफ सांगतें मी येणार नाहीं. " अखेर स्वारी जीपजवळ आली परंतु उडी मारून गाडींत चढण्याचं तिच्या मनांत नव्हतं. जंपीजंपी असं म्हणून फुलमनराम तिला चढवीत होते, व चुटक्या वाजवून उडी मार म्हणून खुणवीत होते. परंतु ती जमिनीला बिलगून मान वेळावीत होती आणि आपल्या शेपटीचं थोटूक जोरजोरानें हालवीत होती. तें पाहून मीं फुलमनरामना म्हटलं, " जी कुत्री उडी मारीत नाहीं तिचं नांव तुम्हीं जंपी कशाला ठेवलंत ? बदला तें नांव. " फुलमनराम हंसले व म्हणाले, " तुमचं म्हणणं बरोबर आहे. " त्यांनीं अखेर शरण जाऊन जंपीला उचलून घेतलं, व ते गाडींत चढून बसले. जंपी त्यांना अशी बिलगली होतीं कीं जणुं आपण खूपच मोठा अपराध केला आहे हें तिला समजलं होतं व त्यांच्या रागावर उतारा म्हणून ती त्यांचा गळा सारखा चाटूं लागली होती.

● ● ●

—२०—

आमची जीप् पुढें आणि चार मोठमोठ्या ट्रक गाड्या मागें अशा थाटांत आमचा प्रवास सुरू झाला. ट्रकगाड्यांत शिख शिपाई लोक होते, त्यांच्या उंच आवाजांतल्या गप्पा, हास्यविनोद, आणि मधूनच सुरू होणारीं गाणीं आम्हांला ऐकूं येत होतीं. पाऊस आजपासून अजिबात थांबला होता, आकाश अगदीं स्वच्छ झालं होतं, आणि वाऱ्याचा झोत मोठा सुखकारक वाटत होता. हे सारे शिख शिपाई बदली झाल्यामुळें उडीची आघाडी कायमची सोडून निघाले होते. त्यांना कांहीं घरीं जाण्यासाठीं रजा मिळालेली नव्हती, कुठल्यातरी दुसरीकडच्या लष्करी तळावर त्यांची रवानगी होत होती परंतु लष्करी जीवनाच्या धकाधकींत सरावलेल्या या लोकांचा आनंद लहान मुलांच्या आनंदाप्रमाणेंच कसा निर्व्याज आणि सहजासहजीं उत्पन्न होणारा असतो पहा. केवळ एक ठिकाण सोडून दुसऱ्या कोणत्यातरी दूरच्या ठिकाणीं आपण सारे मिळून निघालों या जाणीवेनेंच ते सारे जवान लोक उत्साहित झाले होते आणि कुठेंतरी गंमतीच्या सफरीला निघालेल्या विद्यार्थ्यांप्रमाणें त्यांची एकमेकांत थट्टा-मस्करीचीं बोलणीं चाललीं होतीं. मला क्षणभर इच्छा झाली कीं या जीपमध्यें न बसतां मागच्या एखाद्या ट्रकमध्यें त्या शिखजवानांत बसावें. वळणावळणानं जाणारा उन्हांत तळपणारा प्रशस्त रस्ता, उजव्या अंगाला देवदारांच्या झाडांनीं ज्यांचीं निळी अंगं झांकलीं आहेत असे पर्वत, खालच्या बाजूस जेहलम नदी तिच्या पलिकडे जमिनीचा मोठा पट्टा आणि त्याही पलिकडे मस्तकांवर बर्फाचें घुंगट घेऊन उभ्या राहिलेल्या पर्वतांच्या रांगा हें दृश्य पहात पहात आणि मागून ट्रकमधून येणाऱ्या सतराव्या माउंटन बॅटरींतल्या सवाशे शिख जवानांचे हंसण्याखिदळण्याचे आवाज ऐकत वेगानं पुढेंपुढें जाण्यांत मोठी मौज होती.

महोरा येथील विजेचा कारखाना आतां लवकरच येईल म्हणून मी उत्सुकतेनें पहात होतों. पण तितक्यांत कारखान्याच्या अलिकडे तीन मैलावरच आमची जीप थांबली आणि मागच्या साऱ्या ट्रकगाड्याही थांबल्या. फुलमनराम मला म्हणाले, " येथें ॲक्टिंग ब्रिगेडियर खन्ना या शिख सैनिकांना निरोप देण्यासाठीं छोटसं भाषण करणार आहेत." हें ऐकून मला आनंद झाला. लष्करी जीवनातलं हें आणखी एक दृश्य मला अनायासें दिसणार होतं. स्वतंत्र मोटरमध्यें परत श्रीनगरला जाण्याऐवजीं कॉनव्हॉयबरोबर प्रवास करण्याचं मीं ठरवलं तेंच ठीक झालं असं माझ्या मनांत आलं. ट्रकमधले सारे शिख सैनिक आपापल्या बंदुका घेऊन उतरले, ऑफिसर लोकांचे खड्या आवाजांतले हुकूम हवेंत उठूं लागले, सैनिकांच्या एकीसमोर एक अशा दोन रांगा रस्त्याच्या दोन्ही बाजूस तयार झाल्या. ॲक्टिंग ब्रिगेडियर खन्ना यांचा बंगला पहाडांत उंच जागीं होता. ते साध्या वेशांतच खालीं आले. सैन्याची सलामी झाली. पुन्हा अधिकाऱ्यांच्या हुकुमाचे शब्द हवेंत घुमले. 'दक्ष' पवित्रा घेऊन सारे सैनिक खडे झाले. आणि खन्ना यांनीं हिंदींत बोलण्यास प्रारंभ केला. रस्त्याच्या दुतर्फाच्या उंच उंच वृक्षांतून डोंगरी वारा घोंघावत होता. खालच्या जेहूलमच्या प्रवाहाचा धीरगंभीर आवाज अस्पष्ट ऐकूं येत होता. दूर एका शिलातलावर बसून खन्ना यांचं भाषण मी ऐकत होतों. उडीच्या आघाडीवर बजावलेल्या कामगिरीबद्दल त्यांनीं या शिपायांची प्रशंसा केली. आणि तुम्ही कुठेंही गेलात तरी हिंदची लष्करी इभ्रत वाढविण्यासाठीं झटा असं त्यांनीं त्यांना सांगितलं. मी दूर असल्यामुळं त्यांच्या भाषणांतलं वाक्यन्वाक्य मला ऐकूं येत नव्हतं, पण मला वाटतं ते त्या शिपायांना असं म्हणाले कीं तुम्हाला लवकरच हैद्राबादकडे जावं लागेल. तो उल्लेख ऐकून माझ्या मनांत आलं, हैद्राबादचा प्रश्न लष्करी उपायांनीं निकालांत काढण्याचा हिंद सरकारचा विचार आहे, असं जे परवा शेखसाहेबांच्या बंगल्यावरच्या गप्पांत ऐकलं त्याला पुष्कळ आधार आहे म्हणावयाचा.

खन्ना यांचं भाषण संपलं, त्याबरोबर " श्रीवाही गुरुका खालसा! श्रीवाही गुरुकी फत्ते!" अशा जयघोषांनीं त्या सैनिकांनीं साऱ्या दिशा दणाणून सोडल्या. वाही म्हणजे थोर आणि खालसा म्हणजे शिख हे अर्थ तूं लक्षांत घे म्हणजे शीख सैनिकांच्या त्या ठरलेल्या रणगर्जनेचा अर्थ तुझ्या लक्षांत येईल. सव्वाशे जवानांच्या कंठांतून निघालेल्या त्या जयनादाचा प्रतिध्वनि पर्वतराजींत उठला. माझ्या अंगावर

रोमांच उभे राहिले. ब्रिगेडियर खन्ना सैनिकांच्या रांगांतून सावकाश चालत गेले व नंतर आपल्या बंगल्याकडे जाण्यासाठीं पहाड चढूं लागले. रांगा मोडल्या. शाळा सुटल्यावर पाटीदप्तर घेऊन धावणाऱ्या मुलांप्रमाणें ते शिख सैनिक आरोळ्या ठोकीत धावले व आपापल्या ट्रकमध्यें उड्या मारून बसले. ‘ सारे लोक बसले काय ?’ व ‘हां बसले’ अशा अर्थाच्या आरोळ्या झाल्या. जंपी पुन्हां भटकायला गेली होती तिला बोलावून उचलून फुलमनराम जीपमध्यें चढून बसले. जीपचा हॉर्न वाजला. जीप निघाली. आगगाडीचे डबे एंजिनच्या मागें सरकावेत त्याप्रमाणें आमच्या मागोमाग त्या मोठमोठ्या ट्रकगाड्या सरकूं लागल्या.

श्रीनगरला परत आलों तों शामलालचे वडील माझ्याकडे आले. मला वाटलं ‘ फोटो आला काय ’ म्हणून ते विचारणार. परंतु ते म्हणाले, “ आज रात्रीं तुम्ही आमच्याकडे जेवायचं. ” मीं विचारलं, “ कां ? ” ते म्हणाले, “ आज शामलालचा वाढदिवस आहे, आणि त्यानिमित्त शेखसाहेबांना आम्ही जेवायला बोलावलं आहे. ” मीं म्हटलं, “ वहोत अच्छा. ” ते म्हणाले, “ आज एवढसं खाऊन उठूं देणार नाहीं आम्ही तुम्हांला.” आणि असं म्हणून रात्रीच्या जेवणासाठीं कोणते कोणते पदार्थ तयार होत होते त्याचं त्यांनीं अगदीं रसरशीत वर्णन केलं. त्यांचं वर्णन यथार्थ होतं असं रात्रीं टेबलावरचा थाट पाहिल्यावर मला कबूल करावं लागलं. पंगत मोठी नव्हती. आठदहा लोकांचीच होती. परंतु शेखसाहेब आलेले म्हणून विशेष सजावट केलेली होती. या सजावटींत मनांत भरण्यासारखी पहिली गोष्ट होती ती फुलांच्या लयलुटीची. जेवणघरांतल्या साऱ्या कोपऱ्यांतल्या उंच टेबलावर, जिथें जागा सांपडेल तिथें फुलांचे मोठमोठे गुच्छ सुंदर सुंदर फुलदाण्यांतून ठेवलेले होते. दारांवर, खिडक्यांवर गेंदेबाज पुष्पमाला लटकावलेल्या होत्या. पाहुण्यांच्या गळ्यांत हार आणि हातांत गजरे घालण्यांत आले होते. खान्याच्या टेबलावरच्या शुभ्र चादरीवरही रांगोळी-ऐवजीं रंगीत फुलपाकळ्यांची नक्षी काढलेली होती. आमच्याकडे ताटांभोंवतीं वाट्या निराळ्या मांडलेल्या असतात, पण इथें पाहिलं तो ताटाचा घेरच खूप मोठा, त्याला कडेला भोकं पाडलेलीं आणि दुहेरी पत्र्याच्या थाळींत त्या साऱ्या वाट्या बसविलेल्या दिसल्या. खाद्यपदार्थ पुष्कळच होते, पण त्यांत भाताचेच प्रकार फार. केशरी भात, पुलाव, बिर्याणी असे मला ठाऊक असलेले प्रकार तर होतेच, पण आणखीही कितीतरी होते. जेवतांना गप्पा चालल्या होत्या त्यांत राजकारण मुळींच निघालं नाहीं

परंतु इथें लवकरच स्वातंत्र्यदिनाचा उत्सव होणार आहे त्यावेळेस पंडित नेहरू मुद्दाम येणार आहेत, तेव्हां तो विषय मात्र निघाला. हा विषय चालला असतांना शामलाल शेखसाहेबांना म्हणाले, "आपण या फडके साहेबांना कांहीं सांगाना. ते तर म्हणतात कीं आतां चार पांच दिवसांनीं मला जाऊं द्या." शेखसाहेब म्हणाले, "छे छे असं कुठं झालंय्. फडके जाऊं लागले तर आम्ही त्यांना अटक करून इथें ठेवूं शकूं. नाहीं तरी कश्मीरमधल्या इतर गोष्टी त्यांनीं पाहिल्या त्याचप्रमाणें आमचा तुरुंग कसा आहे तें त्यांनीं पहायला नको काय?" यावर सगळे हसले. मी मात्र मनांतल्यामनांत थोडा अस्वस्थ झालों, कारण इथें सारी व्यवस्था जरी कल्पनेपलीकडे उत्तम आहे, आणि पहाण्यासारख्या गोष्टीही अगणित आहेत तरी मला आतां परतावसं वाटूं लागलं आहे, आणि शेखसाहेबांच्या उद्गारांचा नूर पाहाता माझ्या मनांतल्या बेताप्रमाणें ते मला पंडित नेहरूंचं इथें होणारें स्वागत पाहिल्याखेरीज जाऊं देतील असं वाटत नाहीं.

परंतु मीं आपल्या मनानं इथून अमक्या दिवशीं निघायचं असं ठरविलेलं आहे आणि म्हणून ज्या महत्त्वाच्या गोष्टी अजून पहाण्याच्या राहिल्या आहेत त्या पहाण्याचं काम उरकून टाकण्याच्या उद्योगाला मी लागलों आहे. उडीप्रमाणेंच पूंचकडली आघाडी मी पाहून आलों, जम्मूलाही मुद्दाम एक दिवस जाऊन आलों, परंतु खुद्द श्रीनगरमधलीं कित्येक ठिकाणं पाह्यचीं राहिलीं तीं पाहण्यासाठीं आज मी निघालों. या कामीं मला मदत करण्यासाठीं सत्यभूषण नांवाचा एक तरुण शामलालनीं माझ्याबरोबर दिला. नॅशनल कॉन्फरन्सचं काम गेलीं सात वर्षे करीत असल्यामुळें याच्याकडून मला फार हकीगती कळत आहेत. कश्मीर दरबारनं १९४६ सालीं शेखसाहेबांना पकडलं तेव्हां सध्याचे उपप्रधान गुलाम महमद बक्षी भूमिगत कसे झाले व रावळपिंडीला राहून राजकीय चळवळ त्यांनीं कशी जिवंत ठेवली त्याच्या मोठ्या मनोरंजक गोष्टी सत्यभूषणकडून मला कळल्या. तो म्हणाला, "आम्हाला शेखसाहेबांची भीति वाटत नाहीं. पण बक्षीसाहेबांची वाटते. एखाद्या कार्यकर्त्याची कांहीं गलती झाली तर बक्षीसाहेब त्याच्या खाडकन मुस्कुटांत लगावल्याशिवाय रहायचे नाहींत. भारी तिखट आहे त्यांचं काम!" राजोरी, भिंबर, मिरपूर इत्यादि भागांत हिंदूंची जी सरसहा कत्तल झाली तिचंही वर्णन या सत्यभूषणकडून मला ऐकायला मिळालं. या लुटमारींत आणि जाळपोळींत आपलं स्वतःचं घरदार आणि

बहुतेक सारे नातेवाईक नष्ट झाल्याचं सांगतांना त्याला साहजिकच हुंदके आवरेनात. सध्यां तो सर्वस्वी निष्कांचन आणि निराश्रित झालेला होता. तो मला म्हणाला, " माझे वृद्ध पिताजी आणि तीन बहिणी कुठेंतरी कुणाच्या तरी आश्रयानं राहिलेल्या आहेत. मी असा भटकतों आहे. नॅशनल कॉन्फरन्सच्या प्रचाराचं एकच ध्येय डोळ्या-पुढें ठेवून मी वागतों आहे खरा. माझ्या स्वतःच्या योगक्षेमाची मला फिकीर नाहीं. परंतु वडील आणि बहिणी यांची जबाबदारी माझ्यावर आहे ती मला विसरतां येत नाहीं. रात्रीं झोप लागत नाहीं. एखादेवेळेस लागली तरी वाईट स्वप्नं पडतात, आणि मी दचकून जागा होतों–" या तरुणाची ही कहाणी हृदयद्रावक होती. मी त्याचं सांत्वन कोणत्या शब्दांनीं करूं शकत होतों ? आणि माझ्या मनाला फार यातना देणारा विचार होता तो हा, कीं महाराष्ट्रांत ज्याप्रमाणें राजकीय चळवळींच्या उत्पा-तांत संधि साधून पुढारी गबर झाले, पण सामान्य कार्यकर्त्यांचीं जीवनं बरबाद झालीं त्याप्रमाणें इकडेहि घडलेलं होतं. 'महापुरें झाडें जाती, तेथें लव्हाळे वाचती' या तुकारामाच्या उक्तींत परमार्थाच्या दृष्टीनं सत्य असेल, परंतु राजकारणाच्या धकाधकींत बडे लोक आणखी बडे होतात व सर्वस्वीं भरडून निघण्याची पाळी किती सामान्य लोकांवर येते त्याला गणति नाहीं. खरोखरच राजकारण म्हणजे किती गलिच्छ गोष्ट आहे ! अगदीं गांधींचं सत्याच्या प्रतिज्ञेनं करण्यांत येणारं राजकारण पाहिलं तरी त्यांतही बळी तो कान पिळी हा डार्विनचा जीवनकलहाचा सिद्धांतच खरा ठरावा !

मला कोणकोणत्या ठिकाणीं घेऊन जायचं आणि कुणाकुणाच्या भेटी करून द्यायच्या त्याची यादी सत्यभूषणनं तयार केली व आम्ही निघालों. जुन्या श्रीनगर शहराचा रैनावारी नांवाचा पश्चिम दिशेकडील भाग आहे, तिकडे गाडी घ्यावयास सत्यभूषणनं ड्रायव्हरला सांगितलं. मीं त्याला विचारलं, " आपण काय पहाण्यासाठीं निघालों आहोंत ? " " सांगतों ऐका–" असं म्हणून त्यानं एक लांबलचक हकीगत सांगितली. अठरा वर्षांपूर्वी इथें कश्मीरमध्यें जुलमी राजसत्तेविरुद्ध पहिला उठाव लोकांनीं केला. तेव्हां अबदुल कादीर नांवाच्या चळवळ्याला तुरुंगांत टाकण्यांत आलं, आणि त्याला सोडविण्यासाठीं लोक तुरुंगावर चाल करून गेले, त्यावेळेस पोलिसांनीं गोळीबार केला आणि पंचवीस लोक जागच्याजागीं ठार झाले. लोकांनीं या मृतांचीं प्रेतं एका मशिदींत आणून पुरलीं. तेव्हांपासून या ठिकाणाविषयीं कश्मीरच्या लोकांना विशेष आदर वाटतो. ज्या दिवशीं हे पंचवीस लोक गोळीबारांत मेले तो तेरा जुलै हा हुतात्मा-दिन

म्हणून साजरा होतो. सत्यभूषणनं जी ही हकीगत सांगितली ती मला शेखसाहेबांकडून आधीं कळलेली होती. यंदाचा हुतात्मादिन विशेष थाटानं साजरा करण्याचा आपला बेत त्यांनीं मला सांगितला होता. आणि ते म्हणाले होते, " जे कश्मीरचं लष्कर आज देशभक्तांना गोळ्या घालून ठार करीत आहे त्याच लष्कराला या मृतांच्या थडग्यांना सलामी द्यायला मी लावीन, अशी मी एकदां जाहीर प्रतिज्ञा केली होती. ती प्रतिज्ञा यंदाच्या वर्षी मी पुरी करणार आहें. " आतां सत्यभूषणचं बोलणं ऐकतांना शेख-साहेबांनीं माझ्याजवळ काढलेल्या उद्‍गारांची मला आठवण झाली, आणि ते उद्‍गार काढतांना त्यांच्या डोळ्यांत जो अभिमान व प्रतिज्ञेच्या साफल्याचा आनंद चमकला होता तो माझ्या नजरेला पुन्हां स्पष्ट दिसला.

रैनावरी भागांतल्या ख्वाजा बझारमध्यें जी ही ऐतिहासिक महत्त्वाची 'जी आरत' ( कबर ) आहे ती नक्षबंदी नांवाच्या पिराची आहे. ही 'जी आरत' साधीसुधी आहे व तिची निगाही फारशी ठेवलेली नाहीं. या 'जी आरती'च्या ओसाड वाटणाऱ्या आंगणांत एके ठिकाणीं पंचवीस छोट्या छोट्या पांढऱ्या कबरी सत्यभूषणनं मला दाखवल्या. त्या पहात मी उभा राहिलों तेव्हां मळकट कपडे घातलेलीं पंधरावीस छोटीं छोटीं पोरं आमच्या भोंवतीं गोळा झालेलीं दिसलीं. त्या सर्वांच्या हातांत छोटया छोटया लाकडी बंदुका होत्या. त्यांच्याकडे बोट दाखवून सत्यभूषण मला म्हणाला, " ही सारीं मुलं राष्ट्रीय बालसेनेंतलीं आहेत. हीं रोज कवायत करतात आणि नॅशनल कॉन्फरन्सचा पुकारा करीत गल्लोगल्लीं हिंडतात, " त्या मुलांकडे वळून तो म्हणाला, " पाहुण्यांना सलाम करा रे. " त्याबरोबर त्या लहानशा वानरसेनेनं मला खडी ताजीम दिली आणि " शेरे कश्मीर झिंदाबाद ! अवामी राज ( म्हणजे लोकांचं राज्य ) झिंदाबाद ! " असा चीत्कार केला !

आम्ही तेथून निघालों तेव्हां सत्यभूषण म्हणाला, " खान-काही-मोआला नांवाच्या दर्ग्यांत मी आतां तुम्हाला नेणार आहे. कश्मीरच्या राजकीय चळवळीच्या इति-हासांत या दर्ग्यालाही फार महत्त्व आहे. " माझ्या मनांत आलं, एकाद्या क्षेत्राच्या ठिकाणीं गेल्यावर पंडे लोक ज्याप्रमाणें यात्रेकरूला निरनिराळ्या ठिकाणीं नेतात व नमस्कार करायला लावून दक्षणा ठेवायला लावतात त्यांतलाच प्रकार या सत्यभूषणनं चालवला आहे, फरक इतकाच कीं, " हां ठेवा इथें चार आणे दक्षणा " असं हा म्हणत नाहीं. या विचारानं मला हंसूं आलं, व तें पाहून " कां हंसलांत ? " म्हणून

सत्यभूषणनं मला विचारलं, तेव्हां माझ्या मनांत आलेली उपमा मीं त्याला सांगितली. ती ऐकून तो हंसेल असं मला वाटलं होतं. परंतु तो मुळींच हंसला नाहीं. विनोदाची मजा चटकन् घेणाऱ्या माणसांपैकीं तो नव्हता हें समजून माझी जरा निराशा झाली, आणि विनोदबुद्धीनं दरिद्री असलेल्या माणसांचा सहवास कसा कठीण होतो याबद्दल तुझ्या माझ्यांत वारंवार जी सोदाहरण चर्चा होते तिची मला आठवण झाली. परंतु असंही मनांत आलं, कीं हा बिचारा सत्यभूषण खाजगी दुःखानं विमनस्क झालेला आहे, याला विनोदाची चैन चटकन् घेतां आली नाहीं तर तें क्षम्य आहे. मनाशीं असे विचार करीत मी त्याच्याकडे पहात होतों, आणि तो मला ज्या ठिकाणाकडे आम्ही निघालों होतों त्याचं राजकीय महत्त्व सांगत होता. "१९४७ च्या मे महिन्यांत शेखसाहेबांनीं 'छोडो कश्मीर'ची चळवळ जोरानं सुरू केली तेव्हां प्रथम कांहीं दिवस रोज संध्याकाळीं तुफान गर्दीच्या ज्या जाहीर सभा झाल्या त्या 'खान-काही-मोआला' नांवाच्या मशिदींत भरल्या, ही मशीद जेहलमचा दुसरा पूल व तिसरा पूल यांच्या मधोमध दक्षिण तीरावर आहे. सभा चालूं असतांना उत्तरेकडच्या तीरावरून कश्मीर दरबारच्या तैनातींतील डोग्रा पलटणीनं सभेवर गोळीबार अनेक वेळां केला होता. त्यावेळचा पंतप्रधान पंडित काक याचा डाव असा होता कीं लोकांना अत्याचारांना प्रवृत्त करायचं आणि मग राज्यांत निर्दय सोटेशाही सुरू करायची. परंतु शेखसाहेबांनीं हा डाव ओळखला होता व लोकांकडून अत्याचार घडूं दिले नव्हते. 'छोडो कश्मीर' या पुकाऱ्याचं पहिलं शेखसाहेबांचं जाहीर भाषण तारीख ९ मे रोजीं झालं होतं. २० मे रोजीं ते पकडले गेले होते!"

खान-काही-मोआलापाशीं उतरल्यावर मीं पाहिलं तों या मशिदीचा थाट नक्षबंदी साहेबाहून कितीतरी अधिक रुबाबाचा आणि नीटनेटका दिसला. प्रवेशद्वार भव्य होतं, आणि आंत पाऊल टाकून पाहिलं तों केवढया तरी विस्ताराचं फरसबंद अंगण माझ्या दृष्टीस पडलं, मशिदीची मुख्य इमारत खूपच मोठी आणि पूर्ण डागडुजींत ठेवलेली आहे. सत्यभूषणाला या इमारतीचा काल नक्की सांगतां येईना, पण मीं मनाशीं तर्क केला कीं कश्मीरमध्यें हिंदूंच्या, बुद्धांच्या, मोंगलांच्या व अखेर सिखांच्या वर्चस्वाचे जे कालखंड एकामागून एक होऊन गेले त्यांपैकीं बुद्ध कालांतील ही मशीद असावी. कारण बुद्ध मंदिराला ज्याप्रमाणें पावसाळी धडपांसारखी एकावर एक छपरं असतात तशीं या मशीदीच्या इमारतीला आहेत, हिच्या मिनाराच्या

मस्तकावर मुकुटाप्रमाणें राजचिन्ह आहे. गंमत अशी कीं या मशीदीचा जेहलमच्या बाजूला जो तट आहे त्या तटाला लागूनच मशिदीच्या एका भागांतच— हिंदु देवालय आहे. कश्मीरमध्यें हिंदु आणि मुसलमान कित्येक शतकं पूर्ण प्रेमभावानं नांदत आल्याचा हा केवढा पुरावा आहे, नाहीं का? देवालयाच्या सभामंडपाच्या दगडी खांबांकडे बोट दाखवून सत्यभूषण मला म्हणाला, "या खांबाकडे जरा नीट बघा." तो असं कां सांगतो तें मला चटकन् कळेना, म्हणून त्यानं पुढं होऊन खांबांतल्या कित्येक भोकांत बोट घालून दाखवलं, व म्हटलं "डोग्रा शिपायांच्या बंदुकींतून सुटलेल्या गोळ्यांच्या या खुणा आहेत!"

ते ऐकून रविंद्रनाथ टागोरांच्या गोष्टीची मला आठवण झाली, आणि माझ्या मनांत आलं, या जुन्या पवित्र इमारतीच्या दगडांना जर वाचा फुटली तर ते किती रोमांचकारक हकिगती सांगतील! शेखसाहेबांचं भाषण ऐकण्यासाठीं जमलेले हजारो लोक त्यांच्या अंतःकरणातील गुलामीची चीड, शेखसाहेबांच्या स्फूर्तीनं त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झालेलं धैर्य, जेहलमच्या उत्तर तीरावरून गोळीबार करणारे भाडोत्री क्रूर डोग्रा शिपाई, त्यांच्या बंदुकांतून सुटलेल्या गोळ्या, गोळीबार होऊं लागल्यावर सैरावैरा धावूं लागलेल्या लोकांच्या किंकाळ्या आणि दोन्ही तीरावर मिळून हे विचित्र शोक-नाटक घडत असतांना संथपणें वाहणाऱ्या जेहलमचा धीर गंभीर आवाज—या सगळ्यांचीं वर्णनं या फत्तरांच्या अंतःकरणांत साठलेलीं आहेत. ज्ञानेश्वरांनीं भिंत चालविली त्याप्रमाणें या मशिदीच्या भिंती बोलक्या करण्याचा चमत्कार करणारा एखादा किमयागार या सत्यभूषणाऐवजीं माझ्याबरोबर यावेळीं अगत्यास हवा होता.

• • •

## —२१—

नॅशनल कॉन्फरन्सच्या अनेक कार्यकर्त्यांची व माझी भेट यापूर्वीच निरनिराळ्या प्रसंगीं झाली होती, परंतु त्यांच्या मुख्य कचेरींत जाऊन त्यांच्या कामाचा पसारा प्रत्यक्ष पाहण्याचा योग शेवटीं आज आला. नॅशनल कॉन्फरन्सची कचेरी कित्येक दिवस जेथें जागा सांपडेल तेथें कुठेंतरी—आज या गल्लींत तर उद्यां त्या मोहल्यांत आणि परवां एखाद्या सिनेमा थिएटराच्या इमारतींतल्या सांदी–कोपऱ्यांत—ठेवण्यांत आली होती. परंतु आतां ते वनवासाचे आणि अज्ञातवासाचे दिवस संपले आहेत. आतां स्वतःच्या इमारतींत ही कचेरी आहे. जेहलमच्या उत्तर तीरावर शहराचा जो भाग आहे त्यांत ही इमारत आहे. आणि 'मुजाहित मंझील' (धर्मयोद्ध्यांचं गृह) असं मोठं अन्वर्थक नांव तिला दिलेलं आहे. इमारतीच्या अंगणांत शोभिवंत बगीचा आहे. दुसऱ्या मजल्यावर ज्यांत दीड-दोन हजार लोक मावतील असा गॅलरी असलेला प्रशस्त हॉल आहे. हॉल भोंवताल्च्या खोल्यांतून आणि तळ मजल्यावर नॅशनल कॉन्फरन्सच्या निरनिराळ्या चळवळींच्या शाखा आहेत. 'खिदमद' नांवाचे जें उर्दू दैनिक इथें लोकप्रिय आहे त्याचा छापखाना आणि कचेरी, व एका इंग्रजी साप्ताहिकाची कचेरी या इमारतींत आहे. उर्दू दैनिकाचे संपादक कशफी आणि इंग्रजी साप्ताहिकाचे संपादक रैना यांच्याशीं गप्पा मारीत चहा घेत मी बसलों असतांना आणखी एक संपादक त्या ठिकाणीं आले, त्यांचं नांव मी विसरलों, पण त्यांच्या पत्राचं नांव 'खलिद' एवढं मला आठवतं. खलिद म्हणजे सेनापती. शेखसाहेबांना ज्याप्रमाणें 'शेरे–कश्मीर' असा किताब लोकांनीं दिलेला आहे, त्याप्रमाणें सध्याचे उपप्रधान गुलाम महमद बक्षी यांना 'खालीदे कश्मीर' असं म्हणतात आणि सध्याच्या मंत्र्यांपैकीं कुणातरी

एकाला ' बुलबुले कश्मीर ' अशी पदवी इथल्या लोकांनीं दिलेली आहे! म्हणजे आमच्या सरोजिनीदेवींनाच काय तो " बुलबुल " या पदवीवर हक्क पोचत होता असं आम्हाला वाटायला नको म्हणायचं! आणि लोकमान्य, लोकनायक, वीर, क्रांति-सिंह इत्यादि पदव्या आपल्या पुढाऱ्यांना दिल्याच पाहिजेत या आचरटपणाच्या समजुतींत हे कश्मीरी लोक आमचे भागीदार आहेत म्हणायचे!

कश्मीरच्या वृत्तपत्रसृष्टींतल्या लोकांनीं माझ्यासाठीं एक छोटी पार्टी घडवून आणली. त्या पार्टीच्या वेळीं त्या सर्वांनीं मला वरचेवर एकच प्रश्न केला, " कश्मीरच्या सद्यः-स्थितीबद्दल तुमचा ग्रह काय झाला, सांगा. " त्यांना समाधान वाटेल असं पुष्कळसं सांगण्याजोगं होतं तें सारं सांगितल्यावर मीं त्यांना म्हटलं, आतां जरा अप्रिय अशा कांहीं गोष्टी तुमच्या कानांवर घातल्या तर त्या तुम्हांला सोसतील का? त्यांनीं होय म्हट-ल्यावर मला संकोच ठेवण्याचं कारण उरलं नाहीं. कश्मीरमधील परिस्थितींत ज्या कित्येक गोष्टी मला थोड्या चिंताजनक वाटतात त्या मीं त्यांना सांगितल्या. शेख अबदुल्ला यांच्या विषयीं वैयक्तिक आदर इकडे सर्वांना आहे आणि त्यांच्या मंत्रीमंडळावर जनतेचा विश्वास आहे याबद्दल वादच नाहीं. परंतु एकंदर समाजाच्या कोणत्याही थरांत असं-तोष शपथेला देखील नाहीं असं म्हणतां येणार नाहीं. राजकारणांतील जुन्या नव्या मतभेदामुळें शेख अबदुल्लांच्या राजवटीबद्दल तीव्र नापसंती दाखविणारे छोटेमोठे गट तर आहेतच आणि जगांत सगळीकडेच असावयाचे, त्याप्रमाणें खाजगी हेव्या-दाव्यांनीं प्रेरित झालेले वैरीही मंत्रिमंडळाचे पाय ओढायला तयार आहेत. पण यां-खेरीज कश्मीरच्या प्रजाजनांत कांहीं लोक असे आहेत कीं राजकीय जागृतीच्या दृष्टीनं ते मला बरेच मागासलेले वाटले, आणि सध्यांच्या परिस्थितीवर ते फार नाराज आहेत.

श्रीनगरमधील नावाड्यांचं उदाहरण पहा. छोटे शिकारे चालविणारे आणि मोठ्या हाऊस-बोटी राखणारे हे नावाडी आज बहुतांशीं बेकार व निष्कांचन झालेले आहेत. पूर्वींच्या काळांत या लोकांचा धंदा फारच उत्तम चालत असे. हौशी मुशाफरांचा लोंढा कश्मीरमध्यें सतत लोटत असे आणि त्यांच्या आश्रयावर हे लोक अगदीं मजेंत दिवस कंठीत असत. परंतु आतां मुशाफरांची रहदारी बंद झाली आहे आणि श्रीनगरमधील हॉटेलं जशीं उजाड झालीं आहेत व कित्येक बंगल्यांच्या बंद दरवाजावर जशा "भाड्यानें देणें आहे " च्या पाट्या व्यर्थ लटकल्या आहेत त्याचप्रमाणें छोट्या

विहार-नौका ( शिकारे ) स्वंथ करीत उभ्या आहेत आणि हाऊस-बोटींच्या रांगांच्या रांगा जागच्या जागीं खडया असून त्यांतल्या दालनांत केरकचरा आणि कोळिष्टकें सांचलीं आहेत. एखाद्या क्षेत्राच्या ठिकाणीं यात्राच भरली नाहीं तर यात्रेकरूंच्या जिवावर जगणारे उपाध्ये, जोशी, भटभिक्षुक, पंडे, बडवे इत्यादि लोक ज्याप्रमाणें उघडे पडतात त्याप्रमाणें कश्मीरांतले हे नावाडी आज उघडे पडले आहेत. मुशाफर येईनासे झाल्यामुळें कापडवाले, फळवाले, कलाकुसरीच्या वस्तु करणारे व विकणारे अशा अनेकांचा योगक्षेम संपुष्टांत आलेला आहे; पण सगळ्यांत जोराचा तडाखा बसला आहे तो या नावाडयांना !

सध्यांच्या परिस्थितीवर ते मला चिडलेले दिसले. ही परिस्थिती कशामुळें उत्पन्न झाली व या परिस्थितींतूनच पुढचे चांगले दिवस कसे निर्माण होणार आहेत याचा विचार करण्याची कुवत त्यांच्या अंगांत नाहीं. चंगी भंगी श्रीमंत लोकांची मर्जी राखण्यांतच त्यांचे आजपर्यंत दिवस गेलेले असल्यामुळें दहा वर्षांत घडलेल्या राजकीय घडामोडींपासून हे लोक सर्वस्वी अलिप्तच राहिले. राजकारणाच्या प्रवाहाबरोबर वहात जाण्याऐवजीं जुन्या जमान्याच्या सांडपाण्यांत हे आपला धंदा संभाळून राहिले. त्यामुळं आज ज्या क्रांतीचा आरंभ कश्मीरमध्यें झाला आहे तिचा अर्थ तर त्यांना समजत नाहींच पण शिवाय तिच्याविषयीं अप्रीती त्यांच्या मनांत आहे. म्हणजे या वीसपंचवीस हजार नावाडयांचा एक चमत्कारिक प्रतिगामी गट तयार झालेला आहे. हा गट विरोधी नाहीं पण उदासीन खचित आहे आणि मतलबी लोकांना यांच्या उदासीनतेचें रूपांतर विरोधांत सहज करतां येण्यासारखं आहे. कारण या नावाडयांपैकीं कांहींजण माझ्याशीं बोलतांना म्हणाले जी राजवट आमचा धंदा आम्हांला परत देईल तिचं आम्ही स्वागत करूं. मग ती शेखसाहेबांची असो नाहींतर पाकिस्तानची असो.

हे माझे विचार मीं त्या संपादक मंडळींना सांगितले आणि विचारलं, " उद्यां सार्वमत घ्यायची वेळ आली तर या हजारों लोकांचीं मतं तुम्हांला मिळतील अशी खात्री तुम्हांला बाळगतां येईल काय ? या लोकांचा पाठिंबा तुम्ही कसा मिळविणार आहांत ? कां हीं हजारों मतं गेलीं तरी हरकत नाहीं असं तुम्हाला वाटतं ? "

ते म्हणाले, " छे, छे, असं कसं वाटेल ? सार्वमताचा प्रसंग आला तर एकेक मत पदरांत पाडून घेण्यासाठीं आम्हांला झटावें लागेल. हजारों नावाडयांना सध्यांच्या

राजवटीबद्दल आत्मीयता वाटायला लावली पाहिजे हें उघड आहे. त्यासाठीं कोणता उपाय तुम्ही सुचवितां ?

मीं म्हटलं, " या साऱ्या नावाड्यांना 'इंटेरिम रिलीफ' ( मदत ) देण्यांत आल्यास त्यांच्या मनांतली आजची रुक्षता नाहींशी होईल, आणि मग सावकाश यांच्या नावा विकत घेऊन यांचा धंदा मुळीं आपल्या हातीं घेण्याची योजना सरकारनं आखावी. विशेष खोल विचार न करतां मी हें कांहींतरी बोलतों आहे. त्यांत तुम्हांला कांहीं ग्राह्यांश दिसतो कां पहा. "

माझी कल्पना या मंडळींना पुष्कळच पटली. खलीदचे संपादक तर म्हणाले, " तुमची ही मुलाखत मी उद्यां प्रसिद्ध करतों, आणि तिच्यांत तुमची ही सूचना प्रामुख्यानं छापतों, तुमची हरकत नाहीं ना ? "

मीं म्हटलं, " माझी कांही हरकत नाहीं. "

मला वाटलं या संपादक मंडळीवर मीं चांगलंच 'इंप्रेशन' मारलं. त्यांच्या दृष्टीनं मी मोठा शहाणा ठरलों, याचा मला अभिमान वाटला. रात्रीं शामलालचे वडील जेव्हां गप्पा मारायला आले तेव्हां मी त्यांना संपादक मंडळीशीं बोलणं झालं होतं तें सांगितलं. " हें सारं छापून येणार आहे खलीदमध्यें—" मी मार ऐटीनं म्हणालों. माझी कल्पना अशी कीं ते माझी वाहवा करतील.

पण ते म्हणाले, " या हाऊस-बोटवाल्यांच्या वांट्याला बेकारी आली म्हणून तुम्हांला कळवळा आला असेल, पण मला नाहीं येत, उपाशी मेले हे बदमाष तर कांहीं बिघडणार नाहीं ! "

" असं कां म्हणतां हो ? " मीं विचारलं.

" अहो यांनीं पिढ्यानपिढ्या फक्त बोटी वल्हविण्याचा सोवळा धंदा केला अशी तुमची कल्पना आहे काय ? " म्हातारा संतापानं बोलूं लागला. "पैसेवाले मुशाफिर यांच्या बोटींतच रहात असत अन् नोटा फेकीत असत ते फक्त खाण्यापिण्याच्या सोयीसाठीं नव्हे, तर त्यांच्या दुसऱ्याच पागल हौशीसाठीं. हाऊसबोटी म्हणजे गुत्ते आणि कुंटनखाने करून टाकले होते या नावाड्यांनीं. आणि मुशाफिरांची बदफैली पुरी करून स्वतःचं पोट जाळतांना यांनीं लोकांच्या आया, वहिणी, मुलीबाळींवर नजर ठेवायला कमी केलं नाहीं. जगांत कश्मीरचं नांव बदनाम केलं या नावाड्यांनीं ! हे भिकेला लागले तर त्यांत कांहीं वाईट झालं नाहीं. पिढ्यान् पिढ्या जीं पापं यांनीं केलीं त्यांचं

अनुक्रम.. 63829.... दि: ......
अंक .. 1682...... बांध दि.... 24/12/67



प्रायश्चित्त घेऊं दे बेटयांना. तुम्हांला उगीच दयेचा पान्हा फुटतो आहे. मोठे हरामखोर लोक आहेत हे. तुम्ही उद्यां पायीं पायीं चक्कर टाका, आणि चांगली हाऊसबोट भाडयानं पाहिजे असं सांग करा, म्हणजे एकेक हाऊसबोटवाला तुम्हांला कोणकोणत्या सुखसोयीचं अभिष दाखवील तें बघा, अन् मग बोला या नावाडयांच्या कैवाराच्या गोष्टी–! "

मीं तें सारं बघितलेलं होतं ! आणि मगच बोलत होतों !

पण या वृद्ध गृहस्थांना मी थोडंच तसं सांगूं शकत होतों ? त्यांचा सात्त्विक संतापहि योग्य होता. किंबहुना कश्मीरच्या नावाडयांच्या धंद्यांतल्या अनैतिक व्यापाराचं वर्णन कश्मीरवरची कादंबरी लिहितांना मला उपयोगी पडणार आहे, व त्या वर्णनाच्या-वेळीं या सात्त्विक संतापाचं चित्रहीं मला रंगवावं लागणार आहे, हें मला माहित आहे.त्यांच्या चेहऱ्याकडे निरखून पहात राहिलों व म्हटलं, " तुम्ही म्हणतां तें कांहीं खोटं नाहीं. "

या माझ्या कबुलीनं त्यांना बरं वाटलं, व मग आपल्या नेहमींच्या संवयीप्रमाणें ते माझ्याजवळ येऊन टेबलावर वांकून माझे कागद चाळूं लागले. डोळे मिचकावून त्यांनीं विचारलं, " आज घरीं पत्र लिहायचं नाहीं वाटतं तुम्हांला ? "

मीं हंसून म्हटलं, " लिहायचं आहे तर ! इथून लिहिलेलं–अखेरचं पत्र असणार आहे तें ! "

" म्हणजे काय ? "

" सोमवारीं जाणार मी ! "

" तुम्ही पुष्कळ जाल, आम्ही सोडलं पाहिजे ना तुम्हांला ? " ते माझा खांदा धरून म्हणाले, आणि तितक्यांत शामलाल तेथें आले तेव्हां त्यांच्याकडे वळून त्यांनीं विचारलं, " होय रे, प्रोफेसरसाहेब सोमवारीं जाणार ? खरं ? "

" छट् ! ते कसचे जातात ! " शामलाल म्हणाले, " शेखसाहेब काल दिल्लीस जातांना बजावून गेले आहेत यांना सोडूं नका म्हणून ! "

" होय ना ?–मग कसे जाणार हो तुम्ही ? " शामलालच्या वडिलांनीं मला विचारलं. " शेखसाहेबांनीं निरोप दिल्याशिवाय तुम्ही कसे जाणार. तुम्ही आमचे कैदी आहांत एक तऱ्हेचे ! " ते हंसूं लागले.

" कैदीदेखील पळून जाऊं शकतात. माहीत नाहीं वाटतं आपल्याला ? "

असं म्हणून मी त्यांच्याहूनही मोठ्यांदां हंसलों. पण खरं म्हणजे सोमवारीं श्रीनगर सोडण्याचा माझा बेत ही मंडळी पार पडूं देणार नाहींत अशा भीतीनं मी मनांतल्या मनांत फार खिन्न झालों होतों.

.शेखसाहेब दिल्लीहून परत आल्यावर माझी सुटका होणं अगदीं अशक्य आहे. "जवाहरलाल नेहरू दहाबारा दिवसांनीं श्रीनगरला यायचे आहेत, त्यांच्या स्वागताचा फार मोठा कार्यक्रम आंखला गेला आहे. हा अपूर्व समारंभ पाहिलाच पाहिजे तुम्ही!" शेखसाहेब मला म्हणाले. तो समारंभ व्हावयाच्या आंत ते मला निरोप देणार नाहींत. तेव्हां ते दिल्लीहून परत येण्याच्या अगोदर मला माझी इथून सुटका करून घेतली पाहिजे. कसं काय जमणार हें कळत नाहीं. पण मी आशा सोडलेली नाहीं. हें पत्र तुला ज्या दिवशीं मिळेल त्याच दिवशीं "श्रीनगरहून निघालों" अशा मजकुराची तारही तुझ्या हातीं पडेल. बघशील तूं.

● ● ●

## —२२—

ज्या अरुंद रस्त्यानं कॅमेरा अडकवून मी अगणित वेळां फिरायसाठीं म्हणून बाहेर पडलों तो झर्रकन दिसेनासा झाला, ज्या विस्तीर्ण हिरव्यागार पोलो ग्राउंडच्या सीमेवर मी कितीदां तरी उभा राहिलों तें मैदान मागं पडलं, मोटार रेसिडेन्सि रोडवर आली अन् वेगानें निघाली. जिथल्या दाट मलओ घातलेल्या कॉफीचं अन् निवांतपणाचं मला व्यसन लागलं होतं ते "अिम्पोरीअल कॅफे," ज्या चिनार वृक्षाखालच्या छायेंत उभं राहून दूरच्या शंकराचार्य-मंदिराच्या टेकडीचं चित्र काढणारी ती निळ्या डोळ्यांची, सफेद झुलपांची, गोरीपान उंच स्त्री मला भेटली होती तो कोपऱ्यावरचा भव्य चिनारवृक्ष, ज्या माडीवरच्या एका लांबट अंधाऱ्या दुकानांत कलाकुसरीच्या वस्तू विकणारा म्हातारा सुलेमान, शेखसाहेबांनीं मला भेट म्हणून दिलेल्या खंजीराचं सुंदर नक्षीचं म्यान कौतुकानं न्याहाळून म्हणाला होता "अशी चीज बघायला मिळत नाहीं अलीकडे!" ती माडी, ज्या 'पॅलेडिअम्' सिनेमापुढच्या चौकांत एकदां रात्रीं कश्मीरी लोकांचं ग्रामीण नृत्यसंगीत मीं पाहिलं, अैकलं तें थिएटर, ज्या गलिच्छ बाजारांत मी दहादां उगीच भटकलों तो बाजार, एकदां विडयांचीं पानं हवीं म्हणून मी शोधीत हिंडलों तेव्हां ज्या एका छोटया दुकानांत अखेर मला जरा बऱ्यापैकीं पानं मिळालीं व असलीं पानं श्रीनगरला होत नाहींत, जम्मूहून मागवावीं लागतात अशी माहितीही दुकानदारानं मोफत दिली तें दुकान, जिथें मोडक्या बाकावर बसून ॲल्यूमिनिअमच्या थाळींतून कोफ्ता-रोटी खातां खातां मी कश्मीरी कामकऱ्यांशीं गप्पा मारल्या तें महंमदी हॉटेल—हीं सारीं स्थळं नजरेपुढं क्षणभर येऊन दिसेनाशीं झालीं! अमीरा कदल पुलावरून आतां आमची मोटार जात होती. दुतर्फांच्या राखीव वाटांवरून जाणाऱ्या लोकांच्या रांगा,

जेहलम नदीचा धीरगंभीर प्रवाह, नावांचे-पडावांचे थवे, उजव्या बाजूकडे पाण्याच्या दोन्ही काठांवर नजरेचा टप्पा संपेपर्यंत दिसणाऱ्या, उन्हांत तळपणाऱ्या आणि वांकडयातिकडया रचलेल्या कललेल्या ढिगासारख्या भासणाऱ्या उंचउंच इमारती, हीं सारीं दृश्यं भराभर दृष्टीपुढं आलीं आणि अदृश्य झालीं!...माझ्या मनांत आलं, ज्या जागीं मी घटकान् घटका बसलों, उभा राहिलों, फिरलों, तीं हीं सारीं स्थळं किती झटकन् माझ्या जीविताच्या कक्षेपासून दूर होत आहेत. ज्या पुस्तकाचे कित्येक भाग आपण आवडीनें सावकाश, शब्दार्थाची व ध्वनीची मजा लुटीत, वाचले तें संपविल्यावर कायमचं हातावेगळं करतांना त्याचीं सारीं पानं झर्रकन उलटण्यापैकींच श्रीनगर शहराच्या त्या त्या भागाचं हें अखेरचं दर्शन भासलं मला!— मीं मागं वळून दूरवर दृष्टि टाकली तेव्हां शेखसाहेबांच्या बंगल्याच्या बागेंत खुर्चीवर पडल्या पडल्या ज्या टेकडीची शोभा मीं हजारदां पाहिली होती ती शंकराचार्य देवालयाची टेकडी मला दिसली. तिच्या पलीकडे उत्तुंग पर्वतांच्या रांगा होत्या. त्यांच्या शिरावर उन्हांत झळकणाऱ्या बर्फाचे राजमुकुट होते. त्या नगराकडे बघत सबंध कश्मीरला उद्देशून मीं म्हटलं, "नमस्ते! येतों!" उंच सडक हिरव्यागार सफेतांच्या रांगांमधून जाणारा रस्ता झपाझप मोटरखालून सरकत होता. दूर उंच टेकडीवर असणारी विमानतळाची छोटी इमारत झराझर जवळ येत होती.

आमची मोटार विमानतळावर पोचायला आणि दिल्लीहून निघालेलं विमान दाखल व्हायला एकच गांठ पडली. दिल्लीहून आलेले उतारू घाईघाईनं मैदान ओलांडून येत होते. त्यांपैकीं कांहींच्या खाजगी मोटरी आलेल्या होत्या त्यांतून आतांपर्यंत आपल्या सीटवर पेंगत पडलेले अथवा सिगरेट फुंकीत बसलेले ड्रायव्हर पटापट खालीं उडया मारीत होते. माझ्या मनांत एकदम आलं कीं या विमानानं शेखसाहेब परत आले असले अन् त्यांनीं मला पाहिलं म्हणजे? मग ते मला जाऊं देतील होय? या विचारानं मी इतका घाबरलों कीं मीं फराळाच्या खोलीकडे धूम ठोकली, अन् एका कोपऱ्यांतल्या खुर्चीवर बसून 'स्टेटमन'च्या ताज्या अंकाआड तोंड लपविलं. शामलालची आर्जवं करून माझ्या जाण्याला त्यांची संमति मीं मिळवली होती. आणि नेहरूंची भेट इतक्या जवळ आली असतांहि मी रहात नाहीं तेव्हां कश्मीरहून लवकरच परतणं मला कांहीं कारणासाठीं भागच असलं पाहिजे अशा विचारांनीं त्यांनीं आपला आग्रह व विरोध सोडून माझ्या प्रवासाची सारी सोय केली होती खरी. पण

तेहि अखेरपर्यंत पुन:पुन्हां म्हणाले होते, तुम्हाला जाऊं दिल्याबद्दल शेखसाहेब माझ्यावर फार नाराज होणार आहेत, ते येण्याच्या आंत तुम्ही जात आहांत म्हणूनच तुमचं जाणं घडणार आहे. इथें विमानतळावर मी जर शेखसाहेबांच्या नजरेस पडलों तर ‘ राइट अबाऊट ’ करून त्यांच्याबरोबर श्रीनगरला जाण्याची पाळी माझ्यावर येणार होती... वेटर माझ्या टेबलाजवळ आला व काय पाहिजे म्हणून विचारूं लागला तेव्हां त्याला उत्तर देतांना मीं वर्तमानपत्र दूर केलं नाहीं. त्यानें टेबलावर पदार्थ आणून ठेवले तरीसुद्धां किती वेळ तरी मी वर्तमानपत्र तोंडाआड धरूनच बसलों होतों. माझ्या श्रीनगरहून परत जाण्याला शिवाजीच्या “आग्र्याहून सुटके” प्रमाणें पलायनाचं स्वरूप यावं, या गोष्टीचं मला मनांतल्या मनांत मनस्वी हंसूं येत होतं. पण या विनोदी घटनेला इलाज नव्हता. नेहरू कश्मीरला येतील तेव्हां केवढा सोहळा होणार होता. तो न पाहातां मी खुशाल निघालों ही गोष्ट कुणालाही तऱ्हेवाइकपणाची वाटण्यासारखी होती. तथापि श्रीनगरहून अमुक दिवशीं परतायचं असं एकदां माझ्या मनानं ठरविल्यावर तो बेत पार पाडलाच पाहिजे असं मला वाटलं. हो ! माझ्या स्वभावांत हा हट्ट आहे खरा. प्रवासांत गाडी चुकल्यामुळें किंवा कुणाच्या आग्रहामुळें माझं वेळापत्रक बदललं कीं माझा सारा आनंद एकदम नाहींसा होतो. विमानतळापर्यंत मीं आलों असतांना जर कां इथें शेखसाहेबांची गांठ पडून माझा दिल्लीस जाण्याचा बेत हुकला तर त्याचं फार दुःख मला होणार होतं ..विमानांतून आलेल्या उतारूंचे आवाज मला ऐकूं येत-होते. मोटारी सुरू होत होत्या. ‘ स्टेट्समन ’च्या आडोशाआड मी भूमिगत झालों होतों...

अखेर सामसूम झाली. इतकी सामसूम कीं किंचित् चमकून मीं वर्तमानपत्र एकदम दूर केलं व आजूबाजूस पाहिलं. सारीं टेबलं रिकामीं दिसलीं. चहा पेयं घेत बसलेले सारे लोक नाहींसे झाले होते ! म्हणजे काय ? माझं विमान निघूनहि गेलं होतं कीं काय ? या शंकेनं मी इतका भ्यालों कीं ताडकन् उठून मी धावलोंच. पण दारांतच एक उंच, धिप्पाड, गोरापान, पिंगट रंगाच्या जाड पिळदार मिशांचा गृहस्थ आंत येतांना भेटला, आणि माझा जीव खालीं पडला. विमानाचा ‘पायलट’ होता तो. दिल्लीहून यानंच मला आणलं होतं. हाच मला आज परत नेणार होता. आतां यानं आणलेल्या विमानांतूनच मी जाणार होतों. श्रमपरिहारासाठीं तो या जागीं आला होता. माझं विमान गेलं नव्हतं तर ? मी त्या पायलटकडे पाहून हंसलों. त्यानं विचारलं,

'येणार काय ?' मीही म्हटलं, 'होय.' हातांतला भला मोठा काळा चष्मा त्यानं टेवलावर ठेवला व तो तोंड धुवायसाठीं खोलींत गेला. मी बाहेर पडलों. माझं सामान विमानांत चढविण्यासाठीं दिलं, आणि आतां कसलंही भय उरलं नाहीं या खात्रीच्या आनंदांत मोकळ्या मैदानांत उभा राहून श्रीनगरच्या बाजूचा देखावा अखेरचा पोटभर पाहून घेऊं लागलों. इकडे आलों त्या दिवशीं जेव्हां या देखाव्याकडे मीं प्रथम दृष्टि टाकली तेव्हां आपल्याला न कळणाऱ्या भाषेंत छापलेल्या पानासारखा तो मला भासला होता. परंतु आतां त्या पानावरचा सारा मजकूर मला ठाऊक झाला होता. ती पहा ती जेहूलम नदी, अमीरा कदलचा तो नाग, रेसिडेन्सी रोड, वंडरोड, शेखसाहेबांचा बंगला इत्यादि माझ्या स्मरणांतून कधीं जाणार नाहींत अशीं स्थळं झांकून लपविणारी ती चिनार सफेतांची गर्द हिरवी झाडी, ज्यानं काश्मीरचा हजारों वर्षांचा इतिहास पाहिला तें 'शंकराचार्य मंदीर', अलीकडे वृक्षराजीच्या उघड्या झरोक्यांतून दिसणारीं बदामी बागेंतल्या लष्करी छावणीच्या बंगल्याचीं लाल छपरं, पर्वतराजीच्या संपुटांत दडलेले ते दूर अंतरावरचे निषात–शालिमार बगीचे, दल तलावाचा विस्तार, हरि पर्वताचं उंच शिखर या साऱ्या गोष्टी मला आतां त्या देखाव्यांत दिसत होत्या. पाउणशें मैल दूर असलेली उडीची लष्करी छावणी देखील क्षितीज-रेषेपलीकडे कोठें आहे तें मला दिसत होतं. या साऱ्या स्थळांच्या असंख्य आठवणी हृदयसंपुटांत अलगद घेऊन मी निघालों होतों.

" गुडबाय काश्मीर ! " असं मनाशीं म्हणत त्या विस्तीर्ण रम्य देखाव्याकडे कितीही पाहिलं तरी पुरेसं वाटण शक्य नव्हतं. " आतां अखेरचं एकच " असं पुन्हां–पुन्हां चुंबन घेणाऱ्या प्रेयसीला सोडून निघालेल्या प्रियकराच्या व माझ्या अवस्थेंत अंतर नव्हतं !

वाहलम खिंड ओलांडून आमचं विमान जम्मूच्या विमानतळावर उतरलं त्याबरोबर वसंतऋतूच्या राज्यांतून आपण हद्दपार झालों याची तीव्र जाणीव झाली. दुपारच्या घटकेला जम्मूच्या विमानतळाचं मैदान रखरखणाऱ्या उजाड वाळवंटासारखं भासत होतं. जीपगाड्यांची व मोठ्या ट्रक्सची धावपळ चालू होती. एका राहुटींतल्या टेलिफोनवरून छावणीवर निरोप जात होते. लष्करी ऑफिसर आमच्या विमानांतून दिल्लीला यायचे होते. त्यांनीं खोटी केली होती. " लवकरच या, " टेलिफोनवर एक जवान पुनः पुनः भुंकल्याप्रमाणें सांगत होता. अखेर तब्बल एका तासानंतर आम्ही

जम्मू सोडलं. जलंदरवर आम्ही उतरलों तेव्हां संध्याकाळ झाली होती. तरी मनस्वी उकडत होतं. सूर्यास्ताच्या आंत दिल्लीस पोचेन असा जो हिशेब मीं मनाशीं केला होता त्यांत आतां कांहीं अर्थ उरला नव्हता. कारण आज आमचं विमान जलंदरहून सरळ दिल्लीकडे न जातां अमृतसरकडे वळून मग तेथून दिल्लीच्या वाटेला लागणार होतं. अमृतसरला उतरायला मिळणार या कल्पनेचा कांहींच आनंद वाटण्यासारखा नव्हता. कारण अमृतसर शहरापासून कित्येक मैल दूर असलेल्या रानमाळावर घंटा दीड घंटा रखडण्यापलीकडे या मुक्कामापासून आम्हांला दुसरी कसली प्राप्ती होणार नाहीं हें उघड होतं. मला आतां या प्रवासांत किंचित्‌ही गोडी उरली नव्हती. दिल्लीस पोचायला रात्रीचे आठ वाजतात कीं नऊ वाजतात या प्रश्नाचा निकालही आतां महत्त्वाचा वाटत नव्हता. कारण केवढाही उशीर झाला तरी त्याला आतां माझ्या मनाची तयारी झाली होती. अमृतसरच्या विमानतळावर मीं खालीं उतरलोंही नाहीं. आपल्या जागीं खुशाल डोळे मिटून स्वस्थ पडून राहिलों. विमानाचें उड्डाण पुन्हां केव्हां सुरू झालं तें मला कळलंही नाहीं.

अंगाला खूपच गारवा लागला तेव्हां मी झोपेंतून जागा झालों. डोळे उघडले तों बरसात सुरू झालेली दिसली. पृथ्वीवर वृष्टि करणाऱ्या ढगांच्या अंगाची खुशाल चिरफाड करीत आमचं हवाई जहाज चाललं होतं. खिडकीच्या काचेला डोकं टेकून मी टपोऱ्या जलबिंदूंच्या जाळींतून खालीं दृष्टि टाकली तों पावसानं भिजलेल्या अंधेराच्या काळ्या शालूवर असंख्य टिकल्या चमचमत होत्या. त्या अपूर्व शोभेवर क्षणभर विश्वास बसेना. कुठली दिव्य शोभा तरंगत होती माझ्या नजरेखालून ! आमचं विमान चुकून एकाद्या यक्षनगरींत तर प्रवेश करीत नव्हतं ! पण त्या लुकलुकणाऱ्या टिकल्या मोठ्या होऊं लागल्या तेव्हां माझ्या लक्षांत आलं कीं दिल्ली शहरांतले दिवे होते ते. अखेर दिल्ली बहोत दूर राहिली नव्हती तर ! या जाणिवेनं एकदम सारा कंटाळा गेला आणि ताज्यातवान्या वृत्तीनं मी खालीं पहात राहिलों. प्रवासाच्या अखेरीस डोळ्यांना मेजवानी मिळत होती. काळोखाच्या अथांग पाण्यांत ठिकठिकाणीं दीपगुच्छांचीं बेटं हेलावत होतीं. दिल्ली शहराचा विस्तार केवढा मोठा आहे त्याची कल्पना अष्ट दिशांनीं दिसणाऱ्या त्या प्रकाशपुंजांवरून येण्यासारखी होती. ज्यानं आपल्या अष्टांगावर रत्नालंकार घातले आहेत आणि जो हातपाय पसरून निजला आहे अशा एखाद्या काळ्याकभिन्न राक्षसाप्रमाणें राजधानीची नगरी त्या क्षणीं मला भासली.

७१८५

थोडयाच वेळांत विमानतळाचे दिवे जवळ आले, रात्रीच्या प्रहरीं वैमानिकाला उतरण्याची जागा स्पष्ट दिसावी म्हणून त्या जागेच्या सभोंवार पेटविलेल्या चुडयांचा जाळ आणि धूर स्पष्ट दिसूं लागलीं आणि आडांतलं भांडं जवळ-जवळ यावं त्या-प्रमाणें तें दृश्य झरझर आमच्याकडे येत असल्याचा भास झाला. खरं म्हणजे ज्योती-वर झडप घालणाऱ्या पतंगाप्रमाणें आमचं विमान त्या प्रकाशाच्या झोताकडे झेप घेत होतं. पण स्थिर वस्तु कोणती आणि हालणारी कोणती याबद्दल संशय उत्पन्न कर-णारा नेहमींचा भास रात्रींच्या त्या घटकेला अधिक सहजपणानं होत होता. पाऊस नुकताच पडून गेला होता. पण हवेंत गारवा किंचितही नव्हता. दिल्लींतील ऐन ग्रीष्मऋतु अजून चार महिने दूर होता. पण याही उकाडयाची तीव्रता मला असह्य वाटत होती. हिमालंकृत पर्वतांच्या भूमींतून मी कित्येक हजार फूट खालच्या रुक्ष प्रदेशांत उतरलों होतों. माझ्या अंगावरची कश्मीरची मिजास खलास होत होती. आतां दिल्लीहून मुंबईपर्यंत तापलेल्या वैराण भागांतून फ्रँटिअर मेलचा कमालीचा कंटाळवाणा प्रवास केला कीं ती सारी मिजास पुरती निकालांत निघणार आहे.

माझ्या मिजाशीची मला येवढी पर्वा नाहीं. पण 'खताई' 'एशिकपचान' 'योस्मन पंजीना' अशी परोपरीच्या एकाहून एक सुंदर कश्मीरी वासंतिक पुष्पांचे नाजुक गुच्छ मी तुला देण्यासाठीं मुद्दाम जपून आणले आहेत त्यांची टवटवी या इकडच्या उष्णतेनं कमी होणार नाहीं ना, अशी चिंता मला फार वाटते. फ्रँटिअर मेलमध्यें बर्फाच्या पेटींत पुष्पगुच्छ ठेवण्याची व्यवस्था करतां येते, आणि ती मी करीनच. पण ती करूनही हीं फुलं कोमेजलीं तर मला फार दुःख होईल. त्यांचे मोहक रंग कमी होतां कामा नयेत, त्यांचा मंद सुगंध जाऊन उपयोग नाहीं, त्यांच्या परिपुष्ट गेंदातली एक पाकळीदेखील दुखवतां कामा नये. वृक्ष-वल्लरींवर डुलतांना त्यांनीं जसा मला मोह घातला तसाच तीं मी तुझ्या अंजलींत ठेवीन तेव्हां तुलाही त्यांचा मोह पडावा अशी माझी फार इच्छा आहे. बारा वर्षांपूर्वीं आपण दोघं एकमेकांवर प्रेम करूं लागलों तेव्हां तूं एकदां मला भेटायला येतांना ताजे टपोरे गडद रंगाचे गुलाब-गेंद घेऊन आलीस, त्याप्रमाणें मी आतां परत येऊन तुला भेटतांना तुझ्या हातांत कश्मीरच्या नंदनवनांतला हा कुसुमसंभार ठेवणार आहे! आतां तुझ्या माझ्या भेटीला अवघे चारच दिवस उरले आहेत! प्रत्यक्ष भेटल्यावर कश्मीरच्या गोष्टी ऐकतां ऐकतां तुला नको जीव होणार आहे! हुश्शार!

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ५३८२१ वि: निबंध
९१६२ नों: दि: २५।२।७१

# फडके-साहित्य

## कादंबऱ्या

१ अल्ला हो अकबर
२ कुलाब्याची दांडी
३ जादूगार
४ दौलत
५ अटकेपार
६ निरंजन
७ कलंक शोभा
८ आशा
९ उद्धार
१० काश्मिरी गुलाब
११ प्रवासी
१२ समरभूमि
१३ उन्माद
१४ गुप्त प्रायश्चित्त
१५ इंद्रधनुष्य
१६ प्रतिज्ञा
१७ वादळ
१८ शाकुंतल
१९ अखेरचं बंड
२० बस नंबर बारा
२१ जीवन–संगीत
२२ माझाधर्म
२३ झंझावात
२४ अंजलि
२५ जेहूलम
२६ पतंग

## गोष्टी

१ प्रो. फडके यांच्या गोष्टी भाग १ ला
२ ” ” ” ” भाग २ रा
३ लोला आणि इतर गोष्टी
४ नमुनेदार गोष्टी
५ उल्हास कथा
६ वत्सला आणि इतर गोष्टी
७ चंद्रा आणि इतर गोष्टी
८ लाडकी लक्ष्मी आणि इतर गोष्टी
९ माझादेश आणि इतर गोष्टी
१० जिवाचं मैतर
११ बाजु बंद
१२ अत्तर गुलाब
१३ मागं वळून पाहूं नकोस, आणि इतर गोष्टी
१४ पुरुष तेवढे सारे, आणि इतर गोष्टी

## नाट्य

१ युगांतर
२ संजीवन
३ तोतया नाटककार
४ काळे गोरे
५ जानकी
६ जडावाची देवी ( नाटिका )
७ आगलावी ( ,, )
८ क्षमेसाठीं अपराध ( ,, )

## ललित गद्य

१ गुज गोष्टी
२ नव्या गुज गोष्टी
३ धूम्रवलयें
४ अवोलीच्या गोष्टी
५ मैफल
६ कमल पत्रें

## चरित्र

१ दादाभाई नौरोजी
२ टेरेन्स मॅक्स्विनी
३ डी व्हॅलेरा
४ तीन थोर देशभक्त

## प्रबंध

१ मानसोपचार
२ मानसोन्नति
३ सुखाचे संसार
४ संततिनियमन
५ आजचे तरूण स्त्री पुरुष
६ प्रतिभा सावन
७ वाङ्मय विहार
८ आधुनिक गीता
९ मानस मंदिर
१० साहित्य व संसार
११ मनोहरची आकाशवाणी
१२ वेचलेले मोती
१३ टाकीचे घाव
१४ टांकाच्या फेकी
१५ माझ्या साहित्यसेवेंतील स्मृति भा.१
१६ कोंदणें
१७ शेला पागोटें

## व्याख्यानें

१ गाजलेलीं भाषणें
२ मित्र हो !
३ मंथन
४ खाडिलकरांच्या नाट्य कृती
५ किर्लोस्कर, देवल, आणि गडकरी

## काव्य

१ रुमझुम

## अिंग्रजी

1 Sex Problem in India
2 Psychology
3 Social Psychology
4 Elements of Ethics
5 History of Philosophy
6 Manual of Logic
7 Birth Control
8 Leaves in the August Wind ( A Novel )
9 Birth Pangs of New Kashmir
10 Sun beams and Shadows ( Stories )

REFBK-0007155